
# तीर्थरूप महाराष्ट्र

पं. शास्त्री

म. ग्रं. सं ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. ५६०




RLFBK-0020794

# तीर्थरूप महाराष्ट्र

भाग पहिला

२०८९४
भू. ५८८/ज

पं० महादेवशास्त्री जोशी



कॉन्टिनेन्टल प्रकाशन

## पं. महादेवशास्त्री जोशी यांची ग्रंथसंपदा

**कथा**

| | |
|---|---|
| वेलविस्तार | खडकातील पाझर |
| विराणी | मोहनवेल |
| कल्पित आणि सत्य | भावबळ |
| प्रतिमा | प्राचीन सुरस गोष्टी ( भाग १ ते १० ) |

**यात्रावृत्त**

तीर्थरूप महाराष्ट्र ( भाग १ व २ )
महाराष्ट्राची धारातीर्थे ( भाग १ व २ )

**इतर**

| | |
|---|---|
| गुणमंदिर | कल्पवृक्ष |
| ज्ञानेश्वरी - प्रवेशिका | गोड स्त्रीगीते |
| नवनीत रामायण | नवनीत भारत |
| सुलभ काव्यशास्त्र | नवनीत भागवत |

या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने
मिळालेला सवलतीच्या दरातील कागद वापरला आहे

• तृतीय आवृत्ती १९५६
• चतुर्थ आवृत्ती १९६१
• सहावी आवृत्ती १९७५
• किंमत पाच रुपये


प्रकाशक •
अनंत अबादास कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर कॉलनी
पुणे : ३०

सर्व हक्क लेखकाधीन •

मुखपृष्ठ सजावट •
पडित सोनवणी
नासिक

मुद्रक •
न. श कुलकर्णी
टीचर्स प्रिंटिंग प्रेस
७२०/२० नवी पेठ
पुणे ३०

माझे कृपावंत सासू-सासरे
कैं० ती० दत्तात्रय घनश्याम फडके
आणि
कैं० ती० सौ० जानकीबाई फडके
यांस सादर समर्पण



# प्रस्थान

महाराष्ट्र म्हटला, की एक विस्तीर्ण त्रिकोण डोळ्यांपुढे उभा राहतो. उत्तरेला तो सातपुड्याच्या पर्वतश्रेणीला जाऊन भिडला आहे त्याचे दक्षिण टोक कारवारपर्यंत खाली गेले आहे. पूर्व बाजूने तेलंगण ही त्याची सीमारेषा आहे आणि पश्चिमेला सह्याद्रीचा घाट उतरून तो थेट पश्चिम सागरात जाऊन भिजला आहे 'महाराष्ट्र म्हणजे महत राष्ट्र। म्हणौन महाराष्ट्र।' आणि तो आपला महाराष्ट्र !

महाराष्ट्राच्या पाठीशी सुमारे तीन हजार वर्षांची परपरा आहे अगस्त्या-पासून महाराष्ट्राच्या कर्त्या पुरुषाची परपरा सुरू होते दडकारण्यात महा-राष्ट्राच्या निर्मितीची मुहूर्तमेढ त्याने रोवली शकपूर्व सातव्या शतकापासून या प्रदेशात आर्यांची रीघ लागली शकपूर्व तिसऱ्या इथे रट्टांची छोटी छोटी राज्ये निर्माण झाली आर्गपैकीच शेकडो गोत्राचे रट्ट म्हणजे शाण्णव कुळीचे मराठे इथे वेगवेगळ्या विभागावर वर्चस्व गाजवू लागले पुढे या छोट्या राष्ट्राचे मिळून महाराष्ट्र सिद्ध झाले. जे महाकांतार होते, तेच महाराष्ट्र बनले

या प्रदीर्घ कालावधीतल्या महाराष्ट्राच्या इतिहासाचे समग्र दर्शन घ्यायचे तर ते 'विश्वरूपदर्शन'च ठरेल मौर्यांपासून इंग्रजांपर्यंत कितीतरी राजवटी इथे 'उत्पद्यन्ते विलीयन्ते' झाल्या अनेक सघर्ष माजले आणि शमले कित्येक धर्मपथ आणि उपासनामार्ग याचा इथे विकास आणि सकोच झाला अनेक पुरे पट्टणे भरभराटली आणि पडली. नवे देव आले, नवे आदर्श निर्माण झाले

आणि नवी तीर्थेही माहात्म्य पावली बऱ्यावाईट दोन्ही प्रकारानी महाराष्ट्राचा इतिहास हा अद्‌भुत इतिहास आहे

महाराष्ट्राच्या एकेका अगाचे दर्शन, अनेक विद्वान सशोधकानी परिश्रमपूर्वक घेतले आहे कोणी राजकारणाचे, कोणी इतिहासाचे, कोणी वाङ्मयाचे, कोणी सस्कृतीचे, कोणी विद्या-कलाचे, तर कोणी शिल्प आणि स्थापत्य यांचे. महाराष्ट्राच्या तीर्थक्षेत्राचीही प्रवासवर्णने झालेली आहेतच आणि या ज्ञानभांडारातून माझ्या अल्पशा मुठीत मावले, तेवढे द्रव्य घेऊन मी या तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवले.

माणूस ज्या वेळी एखाद्या अनोळखी प्रांतात पदार्पण करू इच्छितो, त्या वेळी पूर्वी कोणीतरी ती वाट मळवलेली आहे की काय, ते पाहण्याची त्याला सहज जिज्ञासा होते त्याप्रमाणे मीही महाराष्ट्राच्या स्थलवर्णनाची यात्रिकानी आणि प्रवाशांनी लिहिलेली काही पुस्तके वाचली त्या त्या क्षेत्रापुरती मर्यादित असलेली वर्णनात्मक पुस्तके मिळण्यासारखी होती, तीही मिळवून नजरेखाली घातली आणि हे सर्व वाङ्मय वाचून मला असे वाटले, की याहून अगदी वेगळ्या रीतीने 'तीर्थरूप महाराष्ट्रा'चे महात्म्य आजच्या पिढीला सांगता येण्यासारखे आहे आणि सागणे जरूर आहे केवळ प्रवासवर्णन हे पल्लवग्राही होते केवळ पुराणातले आधार देऊन त्या त्या क्षेत्रातल्या प्रत्येक स्थानाचे महात्म्य प्रतिपादणे उपहासास्पद ठरते. आणि प्रत्येक गोष्टीचा बारीकसारीक तपशील देण्याची गरज नसते. या सर्व गोष्टीत तारतम्य राखून आणि वाचकाला क्षेत्राचे दिव्यत्व आणि पावकत्व तेवढे प्रतीत व्हावे, अशा धोरणाने मी ही लेखमाला लिहिण्याचा प्रयत्न केला आहे

माझ्या डोळ्यापुढे जो वाचकवर्ग आहे, तो सश्रद्ध तर आहेच; शिवाय रसिक आणि तत्त्वजिज्ञासूही आहे अशा त्या वाचकवर्गाच्या मन प्रसादासाठी ही माझी साहित्यसाधना आहे. त्यामुळे क्षेत्रात असे असे देऊळ आहे, अशी अशी देवप्रतिमा आहे आणि असा असा तिचा परिवार आणि परिसर आहे, एवढ्या वर्णनावरच मी थांबलो नाही तर त्या देवतेच्या मागे केवढा इतिहास उभा आहे, त्या दैवतसप्रदायाचा महाराष्ट्रावर कोणता आणि केवढा प्रभाव पडला आहे, तिथले स्थापत्य आणि शिल्प कोणत्या जातीचे अन् कालातले आहे, कोणते दिव्य भौम उत्पात आणि विधर्मीयाचे अत्याचार त्या त्या क्षेत्राला सोसावे

लागले आहेत, त्या त्या तीर्थाविषयी आणि देवतेविषयी पुराणकारांची आणि कविजनाची रसवती काय बोलली आहे, आणि महाराष्ट्राच्या लोकगीतातून आणि स्त्रीगीतांतून, त्यासबधीचे कोणते उल्लेख आढळतात, इत्यादी अनेक गोष्टींचे यावच्छक्य निदर्शन प्रवासवर्णनाच्या अनुरोधाने मी केले आहे.

तीर्थ आणि देव याचा आपण समजतो, त्याहून फार मोठा व्यापक अर्थ आहे केवळ कुड किंवा जलप्रवाह म्हणजे तीर्थ नव्हे. केवळ मूर्ती म्हणजे देव नव्हे पुण्यश्लोक महाभागांनी जे वसवले, ऋषि–मुनींनी जिथे तपे आणि व्रते आचरली, संत-महतानी जिथे राहून असख्य जनाना कर्मभक्ति-ज्ञान उपदेशिले, ते क्षेत्र म्हणजेच तीर्थ. तपोनिधी आणि भक्तराज हेच जलाना तीर्थपदवी देतात आणि मूर्तीना देवकळा चढवतात पितृभक्त पुडलीक भीमेच्या तीरावर सेवाधर्म आचरीत बसला आणि मग परब्रह्म स्वत.च्या पायांनी त्याच्या भेटीस आले आधी अगस्त्य मुनीने आणि नंतर रामप्रभूने वास्तव्य केल्यामुळे पचवटी-परिसराला तीर्थरूपता लाभली गौतमाची तपोभूमी म्हणूनच ब्रह्मगिरीचा महिमा विस्तारला श्रीनरसिंहसरस्वती लोकोद्धारासाठी बारा वर्षं राहिले म्हणूनच कृष्णातीराला आगळे महत्त्व आले. हा सर्व अर्थ लक्षात घेऊनच कविकुलगुरूने तीर्थ शब्दाची व्याख्या केली आहे –

**यदध्यासितमर्हद्भिस्तद्धि तीर्थं प्रचक्षते ।**

‘जे पूज्य पुरुषानी वसवले, तेच तीर्थ ! ’

आपला महाराष्ट्र सह्याद्रीने उत्तुग झाला आहे सागराने गभीर बनला आहे, आणि कृष्णा, गोदा, भीमा, तापी या चार सरितांच्या प्रवाहानी रसमय झाला आहे महाराष्ट्रातली बरीचशी पुण्य क्षेत्रे या नद्यांच्या परिसरातच आहेत. या क्षेत्रांचे तीन वर्ग कल्पिता येतात – देवताक्षेत्रे, अवतारक्षेत्रे आणि सतक्षेत्रे पढरपूर, करवीर, त्र्यबकेश्वर, भीमाशकर, मोरगाव इत्यादी क्षेत्रे ही देवताक्षेत्रे होत नरसोबाची वाडी, औदुबर, पचवटी, परशुराम ही अवतारक्षेत्रे होत देहू, आळदी, पैठण, सज्जनगड ही सतक्षेत्रे समजावी

भरतखडात महाराष्ट्र प्रदेश अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे असे म्हटले तर तो ‘ प्रांतीयतेचा सकुचित अभिमान ’ ठरू नये तीर्थक्षेत्रांच्या बाबतीतही महाराष्ट्राला असामान्यत्व आहे करवीर आणि नासिक-त्र्यंबकेश्वर ही भारतीय कीर्तीची दोन पुराणक्षेत्रे महाराष्ट्रात आहेत. शिवशकराची तर या प्रदेशावर

विशेषच कृपा. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाच ज्योतिर्लिंगे एकट्या महाराष्ट्राच्या वाट्याला आली आहेत अष्टविनायक हे गणपतीचे आठ अवतार, तर सर्वस्वी महाराष्ट्राचेच आहेत दत्तावताराचे तर महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र भारत वर्षात जगदंबेची जी साडेतीन पीठे आहेत, त्यातली दोन मुख्य पीठे करवीर आणि माहूर–ही महाराष्ट्रातच मांडली आहेत आणि महाराष्ट्राला परम भाग्याने लाभलेली ज्ञानेश्वरादी संतपरपरा ! या बाबतीत कोणीही महाराष्ट्राला 'धन्य धन्य' म्हणावे

महाराष्ट्राची तीर्थे म्हटली तरी सर्व तीर्थांची वदना मला करता येणार नाही मी प्रमुख आणि प्रातिनिधिक क्षेत्रे तेवढी निवडली आणि त्याचा प्रपच केला शिव, विष्णू, देवी, दत्त आणि गणपती हीच आपली प्रमुख दैवते होत त्या सर्वांची 'वाङ्मयी पूजा' या पुस्तकाच्या दोन्ही भागांत मिळून झालेली आहे कृष्णा, गोदा, भीमा या महानद्याच्या यशोलहरीही यात उठलेल्या आहेतच

माझ्या बाबतीत हे उभयभागात्मक पुस्तक महद्भाग्याचे ठरले आहे याच्या पाच आवृत्त्या योग्य कालावधीत सपल्या वाचकानी या पुस्तकावर खूप प्रेम केले. अनेकांना त्यातून महाराष्ट्रयात्रेची प्रेरणा झाली. कित्येकानी मला तशी लेखी-तोंडी पावती पण दिली पण गेली काही वर्षे हे पुस्तक बाजारात उपलब्ध नव्हते. त्याच्या पुन प्रकाशनात काही अडचणी निर्माण झाल्या होत्या.

पण या बाबतीत माझे एकान्तमित्र श्री अनतराव कुलकर्णी पुढे आले त्याचे सुपुत्र श्री अनिरुद्ध कुलकर्णी यानी त्याच्या विचाराला होकार भरला. श्री कुलकर्णी याचे कॉन्टिनेन्टल प्रकाशन मराठीच्या प्रकाशनक्षेत्रात नाव मिळवून राहिले आहे त्या प्रकाशनाच्या द्वारे माझे तीर्थरूप महाराष्ट्र नव्याने पुढे येत आहे, याचा मला खूप आनद होतो त्या पिता-पुत्राना मन पूर्वक धन्यवाद.

प्रस्तुत पुस्तकाच्या दोन्ही भागाचे मी पुनर्लेखन केले आहे, काही अनावश्यक अन् कालबाह्य मजकूर काढला आहे काही नवी भर टाकली आहे गोकर्ण महाबळेश्वर आणि गाणगापूर ही क्षेत्रे वगळली आहेत. कारण ती महाराष्ट्रात येत नाहीत माहूरची रेणुका हा नवा लेख समाविष्ट केला आहे. वाचकांनी या गोष्टीची नोंद घ्यावी

आषाढ शुद्ध एकादशी<br>शके १८९७

— महादेवशास्त्री जोशी

अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | विटेवरचे परब्रह्म | १ |
| २ | दक्षिणकाशी-करवीर | २० |
| ३ | कृष्णातीरी नरहरी | ३७ |
| ४ | औदुबराच्या छायेत | ४७ |
| ५ | पचवटीच्या परिसरात | ५८ |
| ६ | ब्रह्मगिरीचा महिमा | ७९ |
| ७ | सज्जनगड | ९७ |
| ८ | मोरगावचा मयूरेश्वर | ११२ |
| ९ | मल्लारी मार्तंड | १२८ |

# १. विटेवरचे परब्रह्म

मी पंढरपूरचे प्रस्थान काढले ते दिवस दिवाळीच्या आधीचे होते. शरद ऋतू ऐन बहरात होता. सृष्टीचा हिरवा रंग आता पोक्त पीतवर्ण धारण करू लागला होता. सायंकाळी साडेपाच वाजता आमची गाडी चंद्रभागेच्या पुलावर आली. सोनेरी सूर्यकिरणात घरे, झाडे, शिखरे अशा संकीर्ण स्वरूपात मला पंढरीचे दूरदर्शन घडले.

पावलो पंढरी वैकुंठभुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ॥

अशा भावोन्मुख अवस्थेतच मी गाडीतून स्टेशनाच्या फलाटावर पाय ठेवला.

राउळाजवळच नारदाश्रमात आम्हा पतिपत्नींना राहायला जागा मिळाली हे छान झाले. त्यामुळे मनात येईल तेव्हा पांडुरंगाच्या दर्शनाचा लाहा घेणे शक्य होते. चंद्रभागेचे स्नान करायचे, पुंडलिकाचे दर्शन घ्यायचे आणि मग पांडुरंगाची भेट घ्यायची असा तिथला रिवाज. पण आम्ही तिथे पोचलो ती कातरवेळ असल्यामुळे स्नानाला अनुकूल नव्हती आणि सकाळपर्यंत मला धीर निघण्याजोगा नव्हता. तेव्हा 'यः स्मरेत् पुंडरीकाक्षं सबाह्याभ्यंतरः शुचिः' हा सोयीचा मध्यम मार्ग मी पत्करला आणि उत्तरद्वाराने सरळ राउळात शिरलो. विठ्ठलाच्या समचरणावर माथा टेकवून प्रथम दर्शनाची धणी पुरवून घेतली. मग मस्तक वर उचलले. माझी दृष्टी देवाच्या चरणापासून त्याच्या सुवर्ण मुकुटापर्यंत जाते न जाते तोच वेत्रधारी डांग्याने मला गाभाऱ्याच्या बाहेर येण्याचा इशारा दिला. कारण आता धूपारतीचा समय झाला होता. बडवे, पुजारी, बेणारी वगैरे हक्कदार सेवेकरी उपचारसामग्रीसह आत येऊ लागले होते.

मी कमानीच्या बाहेर येऊन चौखांबी मंडपात सम्मुख उभा राहिलो. हां हां म्हणता माझ्याभोवती भुरूभुरू माणसे जमली. कुठून आली कोण जाणे! माझ्या-

भोवती 'मंडप घसणी' झाली. त्याच्या मागचा सोळखांबी मंडप भक्त महिलांनी भरून काढला. इथे येण्यापूर्वी मला वाटत होते, की मंडळी 'पुंडलीक-वरदे हरिविठ्ठल' हा उद्घोष करीतच आत येत असतील. कारण कथा-कीर्तनात अन् भोजनाच्या पंक्तीत तोच उद्घोष माझ्या परिचयाचा होता. पण इथले लोक नामघोष करीत होते, 'वासुदेव हऽऽरी!' मला अगदी अन-पेक्षित तो ऐकताच चटकन मला जाणवले विटेवरचा विठ्ठल हा वासुदेव कृष्णाचा अंशरूप आहे, भागवत धर्माचा तोच एक उपास्य आहे हे इथल्या भक्तांनी पक्के लक्षात ठेवले होते. चतुर्भुज रूपडे अन् द्विभुज मूर्ती हा भेद वरवरचा केवळ चर्मचक्षूपुरता. अंतस्तत्त्व एकच!

प्रथम पुजाऱ्याने देवाचे चरणप्रक्षालन केले. नंतर कपाळी आडवा चंदनलेप दिला. देवाच्या गळ्यात घमघमीत माळा घातल्या. आधी धूप अन् मग दीप ओवाळला. त्या पंचारतीच्या प्रकाशात विठ्ठलाचे श्रीमुख झळाळू लागले. समाधी उन्मनी क्षणभर अंतःकरणाला स्पर्शून गेल्या. ज्यांना एका क्षणाचाच उशीर झाला होता, ते आता उभय बाजूच्या खांबांवर चढून आणि वरचा देह झुकवून मोठ्या सायासाने दर्शनसुख अनुभवू लागले. त्या सोळखांबीत जणू तात्पुरत्या सचेतन कमानी उभारल्या गेल्या. नैवेद्यसमर्पणाच्या वेळी देवापुढे पडदा सोडण्यात आला. हो, नैवेद्याच्या मिठाईवर कोण्या आशाळभूताची नजर पडायला नको. नैवेद्य पुढे ठेवताच मायभगिनींच्या कोमल कंठातून देवाची मन-धरणी सुरू झाली—

**सख्या हरी रे तू! जेवी बा सगुणा—**

सकाळी उठून चंद्रभागेवर स्नानाला गेलो. वस्तुत. तिचे नाव भीमा किंवा भीमरथी आहे, पण या ठिकाणी तिला चंद्रकोरीसारखा बाक मिळाल्यामुळे ती चंद्रभागा झाली. भीमाशंकराच्या डोंगरावरून उगम पावलेली ही सरिता महाराष्ट्रातली एक सामान्यशी नदीच म्हणावी लागेल. तिची लांबी दोनशे मैलांहून अधिक नाही. रायचूरजवळ ती कृष्णेला आत्मार्पण करून नाम-रूपातून मुक्त, पण तिच्या काठी पुंडलीक हा भक्तराज जन्माला आला. त्याने विठ्ठलाला 'युगे अठ्ठावीस' विटेवर उभे केले आणि या अलौकिक घटनेमुळे ही भीमा दैवागळी ठरली. प्रतिवर्षी लक्षावधी मानवदेह अन् तेवढ्याच भगव्या पताका

तिच्यात बुडून वर निघतात. विठ्ठलाशी संसर्ग झाल्यामुळे संतांच्या अंतरात आणि वाङमयातही तिला गौरवाचे स्थान मिळाले आहे



भीमा ही त्रिपुरविजयी शंकराची स्वेदधारा आहे त्यावरून पंढरपुरात तिला अकरा घाट असणे रुद्रसंख्येला धरूनच आहे पण या घाटांचा आणि तिच्या प्रवाहाचा आता बादरायणसंबंधच उरला आहे. पात्र असे रुसून दूर गेल्यामुळे वाळवंट आपोआपच विस्तृत झाले आहे.

पंढरपूरच्या निरुंद बोळाच्या चक्रव्यूहात घुसमटलेला जीव चंद्रभागेवर येताच मोकळा मोकळा होतो. वारीची निम्मी-पाऊण यात्रा या वाळवंटातच उतरते. निरनिराळ्या फडावर भजनांचे टाळमृदंग निनादू लागले, की, 'विठोबाची वेडी' भावोन्मत्त होऊन नाचतात, रंगतात, ती इथेच. इथे कोणाला लाजभीड नसते इथे कोणी उच्च-निच नसतो इथे कोणी राव-रंक नसतो सगळे एकाच देवाचे भजक. सगळेच आप्त-स्वजन

भजनात निरूपण अन् निरूपणात भजन अशी इथे दोन्ही भक्तिसाधनांची खेळीमेळी चालते. ज्ञानोबा म्हणतात –

कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामांचे निखिळ प्रबंध ।
माजी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ।।

संतांच्या मुखातून हरिकथेची ऊर्ध्ववाहिनी गंगा धो धो वाहू लागली, की भिवरा आपला निर्घोष बंद ठेवून तिचा आदर करते.

उत्तरेस जे महत्त्व कुरुक्षेत्राला, तेच दक्षिणेस या विशाल वाळवंटाला तिथे अद्वैतामृतवर्षिणी भगवद्गीता प्रकटली, तर इथे भागवत धर्माची ध्वजा फडकली. दुसऱ्या दृष्टीने पाहायचे, तर कुरुक्षेत्राची भूमी अखेर रक्ताने न्हाली, पण इथले वाळवंट मात्र भाविकांच्या प्रेमाश्रूनीच भिजत राहिले आहे. तिथे

अठरा अक्षौहिणींचा संहार झाला, तर इथे काम-क्रोध या मानवजातीच्या अंत शत्रूनाही कोणी कठस्नान घातले नाही त्याना अलगद उचलून विठ्ठलाच्या पायांवर वाहिले गेले ' कामक्रोध आम्ही वाहिले विठ्ठली ' ही इथली अहिंसक युद्धपद्धती

या विठ्ठलाचे भाग्य एवढे थोर की नामदेव-तुकाराम या भक्तश्रेष्ठांच्या हातून त्याला अभगाचे गोड घास मिळाले

श्रीनामदेव तुकया तदभग प्रभुसि गोड घासतसे ।
गहिंवरतसे परिसतां नाचतसे पाडुरग हासतसे ।।

याच वाळवटात ज्ञानियाच्या राजाची रातोत्पलासारखी पावले उमटली इथेच गोरोबा काकाची ब्रह्मानदी टाळी लागली. चोखोबाने इथेच पोथीनिष्ठाना बजावले—

चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रगा ।।

ज्याला आपले चित्त निर्मळ, विशुद्ध व्हावे असे वाटत असेल त्याने या वाळवंटात लोळावे, घोळावे.

साधु–संतांच्या वाटणीं । तुका जाय लोटांगणीं ।।

चद्रभागेचे स्नान झाल्यावर पुडलिकाच्या दर्शनासाठी लाब जायला नको ज्याचे शिखर सर्वांत उच ते पुंडलिकाचे मदिर त्याच्या माता-पित्याची समाधि-मदिरेही तिथे जवळच आहेत. मृत्यूनतरही त्यांची ही अशी जवळीक राहिली आहे. एका शिवलिगाला घातलेल्या पितळी मुखवट्याच्या रूपाने पुडलीक इथे दिसतो शकराचे पुजारी जसे गुरव तसे या पुडलिकाचे कोळी

पुडलीक हा प्रथम बाईलवेडा होता बायकोच्या नादाने त्याने आईबापांना खूप छळले यात्रेला जात असता त्याने आईबापांना अनवाणी चालवले अन् आपणा दोघाची घोड्यावरून वरात काढली.कुक्कुटमुनीच्या आश्रमात गेल्यावर त्याचे डोळे उघडले गगा-यमुना-सरस्वतींनी ते कार्य केले. पुडलीक एकदम बदलला छळक होता तो सेवक बनला. त्याने मायबापाच्या सेवेचे खडतर व्रतच स्वीकारले सर्व देवदेवता आईबापांच्या ठिकाणी पाहिल्या त्याच्या या सेवेने प्रसन्न होणे देवाला भागच होते तो वर देण्यासाठी आला, तर याने

त्याच्यासाठी वीट फेकली. देव बिचारा 'युगे अठ्ठावीस' त्या विटेवरच तिष्ठत उभा!

असा हा लोकविलक्षण पुंडलीक तो शके अकराशेच्या सुमारास झाला असावा असे इतिहास-वेत्ते सांगतात त्याला कानडी मानण्याकडे विद्वानांचा कल आहे याचे देऊळ चांगदेवाने बांधले असे म्हणतात ते कदाचित् वेगळे किंवा दुसरीकडे असावे. साम्प्रतचे देऊळ मात्र होळकरांनी इ स. १७५० मध्ये बांधले आहे

पुंडलिकाच्या दर्शनाआधी देवाचे दर्शन वर्ज्य! देव म्हणतो, 'आधी माझ्या भक्ताच्या पाया पडा भक्त आहे तर मी आहे मी तुमचा देव असलो तरी तो माझा देव आहे' आर्यसंस्कृतीचा एक फार मोठा विशेष यात दिसून येतो. ज्याने क्षेत्र वसवले, ज्याने तीर्थ निर्मिले, त्याचे दर्शन आधी करणे ही एक प्रकारची कृतज्ञता आहे असले हे संकेत परंपरेशी आपल्याला निगडित ठेवतात

सगळ्या संतांनी पुंडलिकाला गायले आहे तुकोबा तर वरपांगी देवाला खूष करण्यासाठी पण आतून पुंडलिकाला गौरवण्यासाठी त्याला म्हणतात—

कां रे पुंड्या मातलासी।
उभें केलें विठ्ठलासी॥

संत पंढरीला माहेर म्हणतात विठोबा-रखुमाई ही मायबापे, पुंडलीक हा भाऊ आणि भीमा ही बहीण असा हा संतांचा माहेरचा गोतावळा आहे.

राउळात प्रवेश करताना महाद्वाराच्या पहिल्या पायरीवर पाय पडू न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे कारण ती नामदेवाची पायरी आहे. जाता येता संतांची, भाविकांची पायधूळ आपल्या अंगावर पडावी म्हणून नामदेवाने तिथे जागा मागितली—

पाषाण करी तरी पायरीच्या मिषें।
तुझ्या दारीं वसें ऐसें करीं॥

ही त्याची आर्त मागणी देवाने ती पुरवली ती पायरी पितळी पत्र्याने मढवून तिच्या उजव्या अंगाला नामदेवाचा पितळी मुखवटा बसवलेला आहे. पण भक्तांना, संतांना त्याची पायधुळीची आकांक्षा पूर्ण करणे शक्यच नव्हते.

नामदेवासारख्या संतशिरोमणीच्या अंगावर पाय ठेवण्याचे पाप कोण करील? त्यामुळे घडले ते असे, की लोक त्या पायरीला करस्पर्श करतात, तोच हात निढळाला लावतात आणि मडूकप्लुतीने वरची पायरी गाठतात

पण देवद्वारी समाधी घेणारा नामदेव काही एकटाच नाही चोखोबाच्या 'विठ्ठल विठ्ठल' नाद घुमवणाऱ्या अस्थीही तिथेच विसावल्या आहेत. एका 'चौकोनी उथळ कुंडात एक उभा दगड आणि त्यावर एक ठेंगणे छत्र या स्वरूपात 'जोहार मायबाप जोहार' म्हणणारा अन् सर्वांभूती नम्र असा चोखोबा आपल्या भावचक्षूंना दिसतो.

महाद्वाराच्या पायऱ्या चढताना पुढे तीनशे पन्नास फूट लांब, एकशेसत्तर फूट रुंद अशा एका विस्तीर्ण दालनात आपला आता प्रवेश होणार आहे, याची मुळीच कल्पना येत नाही. त्याचे नाव आहे मुक्तिमंडप लगेच तिथे डाव्या बाजूच्या कोनाड्यातून गणपती आपल्याला दर्शन देतो तिथून चार पायऱ्या खाली उतरल्यावर लाकडी सभामंडपात प्रवेश होतो 'गरुड हनुमंत पुढे उभे राहती' ते इथेच श्रीहरीचे वाहन गरुड त्यामुळे वस्तुत: देवापुढे उभे राहण्याचा मान त्याचा. पण इथे त्याने हनुमंताला आपल्यापुढे जागा दिली आहे कारण हनुमंत इथे पाहुणा असल्यामुळे गरुडाला अतिथिधर्माला जागणे भाग पडले. 'अतिथि देवो भव' हा आपल्या संस्कृतीचा उपदेश त्याने आवर्जून पाळला.

देवासाठी महानैवेद्य जिथे सिद्ध होतो, ती पाकशाळा इथून उजव्या बाजूला दिसते डाव्या हाताला माळी, माळणी हारीने बसून फुलांचे हार गुंफीत असतात. गरुडाच्या उजव्या हाताला आणखी एक मारुती आहे तो 'भीमरूपी महारुद्र' भासतो समर्थ रामदासांनी त्याची तिथे स्थापना केल्याचे सांगतात.

रामदास एकदा पंढरीला आले होते. 'अनेकी सदा एक देवासि पाहे' या त्यांच्याच उक्तीप्रमाणे ते सर्वत्र रामरूप पाहात होते त्यामुळे विठ्ठलदर्शन होताच 'वासुदे ऽऽ व ह ऽऽ री' च्या ऐवजी 'जयजय रघुवीर समर्थ' हाच जयघोष त्यांच्या वैखरीतून उमटला तो ऐकताच बडवे खवळले त्यांच्या दृष्टीने हा अपराध अक्षम्य होता त्यांनी समर्थांना रागाने घेरले. त्यावेळी नयनात अश्रू आणून सद्गदित कंठाने ते देवाला आळवते झाले —

**येथें का रे उभा रामा ।**
**मनमोहन मेघश्यामा !**

' प्रभुराया, इथे पढरीस वास्तव्याला आलास अन् ती अयोध्या नगरी काय केलीस? तुझ्या वामाकी सीतामाई का बरे दिसत नाही ? धनुष्य बाण टाकून देवा, इथे कटेवर हात का बरे घेतलेस ? '

आणि काय सागावे! सगळा देखावा एकदम पालटला विठोबा रामरूप नटला त्या गर्भागारात अयोध्येचा दरबार थाटला समर्थ देवाला अन् बडवे समर्थांना लोटांगणी गेले वर उल्लेखिलेल्या मारुतीची स्थापना याच वेळी झाली असावी.

या सभामडपाची फरशी सगळीकडे ओरखडे उठल्यासारखी दिसते काय आहे म्हणून पाहायला जावे तो काही नावे वाचायला मिळतात कोणाची ही नावे ? देणगीदाराची का संत-महतांची ? छे ! ती आहेत तुमच्या आमच्या-सारख्या भाविकाची देवदर्शनासाठी येणाऱ्या भक्तजनांच्या पायदळी पडून आपले नाव पुनीत व्हावे, आपल्याला मोक्षाचा अधिकार लाभावा, या हेतूने ती कोरलेली आहेत मी म्हटले, अहकाराचे फणामर्दन व्हायला किती सुदर उपाय आहे हा!

इथून वर जाताना जय-विजय ओटयावर डाव्या हाताला एक अडीच फुटी घटा टांगलेली दिसते ' कुरु घटे रव तत्र ' म्हणून पुढे व्हावे, तर तिला लोळीच नाही लोळीवाचून घटा म्हणजे प्राणावाचून कुडी. अर्थात तिच्याकडे कोणाचे लक्ष जात नाही हे वेगळे!

त्या पितळी दरवाज्यातून आत गेले की, सोळखांबीत प्रवेश मिळतो इथल्या डाव्या हाताच्या दुसऱ्या खाबाचे नाव आहे गरुड खाब हा सोन्यारुप्याने मढलेला आहे याला आधी कवटाळायचे या गरुडस्तभाला दासरस्तभ असे आणखी एक नाव आहे आणि त्या नावामागे एक करुणकथाही आहे. पुरदरदास हा कन्नड सतश्रेष्ठ पढरपुरात वास्तव्य करून होता विठ्ठलभक्तीत तो सदैव रगलेला असे पढरपुरात एक नर्तकी होती एके दिवशी विठ्ठलाला तिचे नृत्य पाहण्याची इच्छा झाली तो पुरदरदासाचे रूप घेऊन तिच्या घरी गेला नर्तकी त्याच्यापुढे नाचली देवाने प्रसन्न होऊन तिला आपल्या हातातले ककण दिले. दुसऱ्या दिवशी ते नाहीसे झाल्याचे पुजाऱ्यांना कळले शोध करता करता ते नर्तकीच्या हाती दिसले. ती म्हणाली, मला हे पुरदरदासाने दिले पुजाऱ्यानी

पुरदरदासाला पकडून आणले. चोर म्हणून त्याला एका खाबाला बाधले पुजारी त्याला झोडपू लागले. देवाला ते सहन झाले नाही तो आकाशवाणीने बोलला पुरदरदासाला सोडा मी त्याच्या रूपाने ते ककण नर्तकीला दिले होते आणि तुम्ही माझ्या भक्ताला ज्या खांबाला बांधले, त्याची आजपासून पूजा करा.

गरुडखाबाचे कवटाळणे झाल्यावर त्याच्या शेजारच्या वाटोळ्या रगशिळेवर दोन्ही कान धरून प्रदक्षिणेत गिरकी घ्यायची मग रुप्याचा दरवाजा ओलाडून चौखावीत पाऊल टाकायचे आत शिरताच उजव्या हाताला नजर वळवली तर भिंतीच्या मोठ्या फडताळात विठोबाचे शेजघर दिसेल. रुप्याचा पलग अन् त्यावर गाद्यागिरद्या असा तो थाट आहे अष्टौप्रहर विटेवर उभा असणारा देव शेजघरात निद्रा घ्यायला कसा काय येतो, असा प्रश्न विचारू नका. ही देवाची गरज नसून भक्ताची हौस आहे

चौखांबीच्या पुढची जागा ती कमान तिच्यातून सरळ गर्भागारात प्रवेश करायचा आधी नामस्मरण, मग चित्तशुद्धी नतर ज्ञान आणि ज्ञानाने मोक्ष अशा साधन मार्गाप्रमाणेच हा विठ्ठल-दर्शनाचा प्रवास आहे.



गर्भागारात पुढेच एक वर्तुळासारखी पितळी पत्र्याची दाडी आहे तिच्यामागे दगडी चौथरा वर रुपेरी चवरडोल आणि त्याच्या आत ‘ विटेवरी उभा कटेवरी हात ’ अशी एक कृष्ण-पाषाणाची मूर्ती काळा असून ‘ पाडुरग ’ तो हाच प्रेमळ, भोळे, भाविक याचा कैवल्यदानी श्रीविठ्ठल तो हाच ज्ञानेश्वराचा ‘ बाप रखुमादेवीवरु ’ तोही हाच. तुकोबांनी अतरी उल्हासून स्तोत्र केले ते याचेच.

‘ देवा, माउलीहून तू मायाळू चद्राहून शीतल, पाण्याहून पातळ. अमृत तूच निर्माण केलेस, पण तू त्याहून गोड गोड आहेस तुला कशाची उपमा देऊ ! तुझ्यापुढे वाचाळपणा नको. तुला निवात नमन करून चरणी माथा ठेवावा हेच बरे ’

विठ्ठलमदिर म्हटले, की देवाच्या दोन्ही बाजूना राही–रुक्मिणी दिसायच्याच. निदान एकटी रखुमाई तरी. यावरून पढरपुरातही तसेच दिसेल

अशी कोणी कल्पना करू नये इथे देव एकटा आहे रुक्मिणी आहे, पण ती त्याच्या मागे वायव्य कोपऱ्यात तिथे तिला स्वतंत्र मंदिर आहे. रुक्मिणी यादव राण्यावर रुसून या दिंडीरवनात येऊन बसली प्रिय पट्टराणीचा रुसवा, त्यामुळे देवाला 'करमेना घडी' असे झाले. देव तिला शोधीत इथवर आला वाटेत दिसला भक्त पुंडलीक त्याने फेकली वीट ती रुक्मिणीशेजारी पडायची ती जरा अलीकडे पडली. त्यामुळे देवाला तिच्यावर तिष्ठत उभे राहणे भाग पडले 'पुंड्या' त्याला विटेवरून उतरीत नाही आणि रुक्मिणी आपला रुसवा सोडून जरा अलीकडे सरकत नाही त्यामुळे दोघेही 'यथास्थित'च राहिली.

रुक्मिणीसमोर दीपमाळ आहे कथा कीर्तने प्रशस्तपणे चालतील असा सभामंडपही आहे, देवाचे बडवे, तसे तिचे उत्पात स्वतंत्रपणे तिचे सर्व उपचार चालवतात रुक्मिणीच्या सभामंडपाच्या पायऱ्या चढून वर आल्यावर एक ओटा लागतो तिथून सोळखांबीत प्रवेश करताना समोरच्या भिंतीत एक शिलालेख आहे देवस्थानाला देणग्या देणाऱ्या चौऱ्यायशी दात्यांचा त्यावर नामनिर्देश आहे वस्तुत इतिहासाच्या जिज्ञासूने अभ्यासदृष्टीने पाहण्याचा तो विषय, पण सांप्रत यात्रेकरूकडून पैसा काढण्याचे ते एक साधन बनले आहे· नुसत्या लेखाला कोण विचारणार ! म्हणून त्यावर देवीची मूर्ती बसवली गेली. चौऱ्यायशीचे चौऱ्यायशी लक्ष केले आणि बडवे येत्याजात्याला सांगत सुटले. 'या शिळेला पाठ घासा तरच तुमचा चौऱ्यायशी लक्ष योनींचा फेरा चुकेल ' श्रद्धाळू माणसाच्या मनात चौऱ्यांयशीच्या फेऱ्याचे एक सूक्ष्म भय असते, त्याचाच नेमका फायदा बडव्यानी घेतला आहे राकट तशाच नाजूक पाठी सतत वर्षानुवर्षे घासल्या जाऊन आजमितीस त्या शिलालेखाचा वरचा अर्धा भाग 'स्वच्छ' झाला आहे इतिहासाची याहून क्रूर थट्टा दुसरी कोणती असू शकेल !

सोळखांबीच्या दक्षिण दरवाजाला तरटी दरवाजा म्हणतात. तिथे एक तरटीचे झाड आहे. त्याच्या मुळाशी एक करुण गंभीर असा इतिहास आहे. आधुनिक पिंगला कान्होपात्रा ही सौंदर्यलंपट अशा यवनबादशहाचे धरणे आलेले पाहून मंगळवेढ्याहून धावत सुटली ती सरळ इथे आली तिच्या जिवावर आकांत आला होता तिने देवाला दंडप्रणाम घातला अन् आपल्या पंचप्राणांचे बिऱ्हाडे मोकळे केले. पांडुरंगाने तिला आपल्या मांडीस कायमचा आश्रय दिला

आणि त्याच वेळी हे झाड उगवले असे सांगतात. यात्रेकरू त्याच्या फांद्यांना माळा घालतात आणि पाने प्रसाद म्हणून नेतात. झाडाखाली कान्होपात्रेची मूर्ती बसवलेली आहे.

पांडुरंगाचा हा प्राकार अशा अनेक घटनांचे आणि पौराणिक कथांचे स्मरण घडवतो व्यंकटेशाचे दर्शन घडले की त्याचे स्तोत्र आठवते. राहीला पाहिले की कृष्णप्रेमाला पात्र ठरलेल्या त्या रमणीवर मराठी शाहिरांनी चढवलेले ते कवनाचे 'शिणगार' आठवतात सत्यभामेला पाहून पारिजातकाचे स्मरण होते अन्नपूर्णेपुढे माथा नमवताना, वाराणसीत सर्वांना जेवू घातल्यावर मगच मुखी ग्रास घेणारी ती विश्वजननी साक्षात् पुढे उभी राहते. पितळी कुत्र्यावर आरूढ झालेली ती काळभैरवाची मूर्ती पाहताच, हा विश्वेश्वराचा कोतवाल पंढरीस कोणत्या कामासाठी आला असावा अशी पृच्छा होते.

महाद्वारावरच्या एका लेखावरून ते रखमाजी अनंत पिंगळे यांनी शके १५४० मध्ये बांधल्याचे कळून येते सोळखांबी सुमारे दीडशे वर्षांपूर्वी दौंडकर नावाच्या कोण्या श्रीमंत भक्ताने बांधल्याचे सांगतात. देवळाचे शिखर भोरच्या संस्थानिकांनी शके १७५२ मध्ये बांधले अशी माहिती मिळते. रुक्मिणीचा सभामंडप निजामाचा दिवाण चंदुलाल याच्या देणगीने बांधला गेला आहे. मुख्य मंदिराबद्दल आधुनिक संशोधनात पुढे आलेली माहिती श्री. शं गो. तुळपुळे सांगतात --

'स्थापनेच्या वेळी मंदिर अगदी लहान होते हा 'लान मडु' हळूहळू वाढत गेला. शके ११५९ मध्ये त्यास होयसळ यादवापैकी वीर सोमेश्वर याने कर्नाटकातील एक गाव दान दिला. शके ११९२ मध्ये या देवळात किंवा देवळाच्या आवारात आप्तोर्याम यज्ञ करण्यात आला. शके ११९५ मध्ये पांढरीफडमुख्य, प्रौढप्रताप चक्रवर्ती श्रीरामचंद्र देवराव यादव व त्याचा करणाधिप हेमाद्रिपंडित यांनी पुढाकार घेऊन या देवळाची वाढ केली आणि देवस्थानाची त्याच्या कीर्तिस साजेल अशी व्यवस्था लावून दिली. देवळाचा विस्तार शके १२२५च्या सुमारास पुष्कळच झाला '

असे हे मंदिर आणि त्याचा प्राकार तो पाहून झाल्यावर उरते ती नगर प्रदक्षिणा काशीच्या पंचक्रोशी प्रदक्षिणेसारखीच ही प्रदक्षिणा आहे ती केल्याशिवाय अन्य देवतांचे दर्शन कसे होणार अन् क्षेत्राचे विशालत्व तरी

कसे कळणार ! कासारघाटावरचे नामदेवाचे मदिर प्रशस्त अन् स्वच्छ आहे थोडा वेळ तिथे बसावेसे वाटते. नामदेवाच्या पूर्वील निवासस्थानावरच ते उभारले आहे.

नामदेव हे त्या काळी पढरीचे भूषण होते त्याने जरी देवाच्या 'पायी घातली मुकुंड ' तरी तो देवाजवळ आपला बोज राखून होता. स्वत कीर्तन करावे अन् देवाला पुढे नाचवावे असा त्याचा अधिकार होता त्याची त्याला जाणीवही होती 'आम्ही भक्त तरी तू भक्तवत्सल' म्हणून तो देवाला बजावीत असलेला दिसतो 'वेद–शास्त्र–पुराणांनी उबगून तुला सांडले आणि अशा तुला आम्ही भक्तानी हृदयकमळी धरले, हे तू विसरू नकोस' असे देवाला जाणवून द्यायलाही तो कमी करीत नाही

देवाने हे सर्व उपकार जाणून नामदेवाला 'माथा मुकुट' केले होते. तो निजांगी त्याची साकडी निवारीत असे देवाचा अन् त्याचा साक्षात सवाद चाले नामदेवाची अनन्यशरणता कनिष्ठिकेवर मोजली तर 'अनामिका सार्थवती बभूव' असे पुन्हा एकदा म्हणावे लागेल.

दत्तघाटावर विप्रांच्या मठात शाळिग्रामशिळेची जी दत्तमूर्ती आहे, तिचे वैशिष्टच हे की, सहा हात, पण शिर एकच पढरपुरात इतकी नयनाभिराम मूर्ती दुसरी नाही उत्तरेस वाळवंटाच्या कडेला लखुबाई बसली आहे लखुबाई म्हणजे रुक्मिणी 'रलयोरभेद' हा व्याकरणाचा नियम तिचे लहानसेच हेमाडपंती देऊळ आहे सभोवती चिंचाचे वन असल्यामुळे जनात असूनही ती विजनवासिनी वाटते गाभाऱ्यात तिची चतुर्भुज मूर्ती आहे इथे तांबडा अन् काळा असे दोन मारुती आहेत त्यात काळ्या मारुतीची प्रतिष्ठा अधिक एकनाथांचे पणजोबा भानुदास ते विजयनगरच्या कोण्या राजाने तिकडे नेलेल्या विठ्ठलाला परत आणण्यासाठी निघाले तेव्हा स्वीकृत कार्यात यश मिळावे म्हणून त्यानी या मारुतीची स्थापना केली त्यामुळे वारकरी मडळीला हा मारुती प्रिय आहे. दिंडी निघाली असता याच्या दारी दोन अभग म्हटल्याशिवाय ते पुढे जात नाहीत याच्याजवळच रावणाच्या जबू माळयाला मारणाऱ्या मारुतीची दुसरी मूर्ती आहे तिला शेंदूर माखीत नाहीत म्हणूनच ती काळी राहिली आहे श्री खाजगीवाल्यांच्या वाड्यात राही, रखुमाई अन् विठ्ठल अशा तीन सुवर्ण-मूर्ती आहेत आषाढी-कार्तिकीला रथातून मिरवणूक निघते ती याच मूर्तींची.

पंढरपुरात संतमहंतांचे मठही काही थोडे थोडके नाहीत पूज्य सानेगुरुजींनी अस्पृश्यांना मंदिरप्रवेश मिळावा म्हणून जे प्राणपणाचे उपोषण मांडले ते स्टेशनजवळच्या तनपुरे महाराजांच्या मठात. या सर्व मठांतून भजने, कीर्तने चालतात


आता मुख्य राहिले विष्णुपद आणि त्याच्याजवळचे गोपाळपूर. विष्णु-पदाचा सोळा खांबी दगडी मंडप चंद्रभागेच्या पात्रातच आहे पुंडलिकाच्या देवळापासून त्याचे अंतर मैलाच्या आतच भरेल वाटल्यास वरच्या रस्त्याने जावे अथवा जलमार्ग स्वीकारावा यात्रेकरू बहुधा दुसराच पसंत करतात तेवढीच जलप्रवासाची गंमत पुंडलिकाजवळ त्यासाठी कितीतरी नावा डुलत असतात. तुम्ही वाळवटात पाय ठेवलात की एखादा गुहकाचा वंशज ‘ चलायचं का गोपाळपूरला ? ’ म्हणत पुढे येतो पुंडलीक हे या नावाड्याचे दैवत, चंद्र-भागा हे जीवन आणि होडी हे साधन

नावाड्याशी भाड्याची रक्कम ठरवून आम्ही चार-पाच यात्रिकांनी होडीत पाय ठेवला तेव्हा सायंकाळचे पाच वाजले होते पाठोपाठ एक बडवे गृहस्थ आपल्याकडच्या काही यात्रेकरिणींना घेऊन होडीत चढले त्या तमिळ ललनांच्या सहास्य कंकणध्वनीने आमची नाव मुखर बनवली होडी अर्ध्या वाटेवर पोचली असेल नसेल तोच [illegible] बडवे तीराकडे पाहात एकदम उद्‌गारले ‘ अरे ते पाहा कासव. त्या कडेच्या आडव्या खोडावर बसले आहे आपण त्याला पकडू चल मला ते हौदात सोडायचे आहे ’

आणि एखाद्या नखरेल कंचनीप्रमाणे आमच्या नावेने एकच गिरकी घेतली. नाव उलटी चालू लागली. त्या कासवाला मराठी कळत होते आणि या माणसाचा कावाही उमगला होता होडी काठाला घसटली अन् बडवे आता पंजा टाकणार तोच डुबुक झाले आणि कासवाच्याऐवजी त्याचा अभाव तेवढाच त्या खोडावर उरला ‘ ब्रह्म सत्य जगन्मिथ्या ’ अशा आविर्भावाने बडवे अन् नावाडी यांनी एकमेकांकडे पाहिले.

पण ही त्यांची कारवाई आम्हाला बरीच महागात पडली एवढ्या अवधीत चाहूल लागू न देता गनिमी काव्याने एक कृष्णमेघ आमच्या डोक्यावर चढला होता त्याने आपले भांडारही फोडले होते मी वर पाहून मनाशी म्हटले, ‘ बोलून चालून शरदातला मेघ हा. करील थोडासा शिडकाव अन् जाईल

तोंड ' गोरे ' करून पण आज, आज त्याचे औदार्य शिगेला आले. आम्ही फक्त अगतिक झालो नदीच्या पात्रात, ऐन मध्यावर, उघड्या नावेत, ब्रह्मांडकटाहाखाली आम्ही सगळे प्रतिकारशून्य होऊन धाराताडन सोशीत होतो. आम्हा पुरुषाचे सोडा; पण नावेतल्या त्या ललनांची अवस्था दयनीय होती सकोचून, आक्रदून त्या अगदी कळचा झाल्या होत्या.' मी हळूच म्हणालो 'नवऱ्याने मारले अन् पावसाने झोडपले, तर तक्रार कोणाकडे कराल.' त्यांनी आपले लज्जेतले



सुखदु ख एकमेकींना खेटून सामायिक करून घेतले मेघाला ' अकारूणकारुणिक ' म्हणून गौरविणारा तो सस्कृत कवी यावेळी त्यांच्यापुढे आला असता तर त्या भामिनींच्या भुवयांची कमान खासच चढली असती.

विष्णुपदाच्या पायरीला होडी टेकली आणि आम्ही अक्षरश अगावरचे कपडे पिळले ते विष्णुपद म्हणजे गयेच्या विष्णुपदाची लहानशी प्रतिकृती आहे त्यात गाईंची पावले, देव जेवला ती दगडी वाटी आणि देवाची समचरण अन् देहुडाचरण पदचिन्हे आहेत या विष्णुपदावर पितरांच्या उद्देशाने पिंडदान करून यात्रेकरू गयाश्राद्धाचे पुण्य मिळवतात

विष्णुपद आणि किनारा याना जोडणारा एक लहानसा सेतू आहे त्यावरून पलीकडे जाऊन आम्ही गोपाळपूरची वाट चालू लागलो. आता पाऊस ओसरला होता आणि पूर्वेच्या आकाशात एकावर एक अशी दोन इद्रधनुष्ये उगवली होती, गडद निळ्या पार्श्वभूमीवर सप्तरगाची दुगुणी शोभा विलसली होती बापाने रागाच्या भरात मुलाला आधी बेदम झोडपावे अन् मग पश्चाताप पावून मुलीनी खाऊ चारावा तशीच आमची गत आभाळाने केली होती नुकतेच आमचे अग वाळत होते, त्यामुळे त्या धनुष्याच्या कमानीला बाण तर जोडलेला नाहीना, अशा साशक नजरेनेच मी वर पाहू लागलो

गोपाळपूर ही लहानशी वाडी आहे भुईकोटासारखे तिथे जे एक दगडी

देवालय आहे, ते पाहण्यासाठीच तिकडे जायचे

देहुडा चरणी वाजवितो वेणू ।
गोपिकारमणु स्वामी माझा ।।

हे नामदेवाने केलेले वर्णन याच मूर्तीचे असावे आषाढी-कार्तिकी पौर्णिमेला इथे मधल्या चौकात काला होतो वारीची सगळी यात्रा त्यावेळी तिथे लोटते. काल्याचा प्रसाद घेतल्याशिवाय वारकऱ्याला पंढरपूर सोडण्याची परवानगी नसते.

गोपालकृष्णाच्या मागच्या बाजूला त्याचे श्वशुर भीमकमहाराज आपल्या लेकीसह उभे आहेत रुक्मिणीचा रुसवा फिटून तिचा अन् श्रीहरीचा दूध पाण्यासारखा समेट झाला तो इथेच मंदिराच्या प्राकारात यशोदेचा 'उखळ, मुसळ, जाते' असा सगळा संसार मांडून ठेवलेला आहे तिथेच आग्नेयीला तळघरात नामयाची जनी आहे. तिचे स्वैंपाकघर, खाट आणि गोधडी तिथे दाखवतात याच जनीने 'प्रेमसूत्र दोरी' लावून पीतांबर नेसलेल्या देवाला आपल्यामागे रानोमाळ गोवऱ्या वेचायला लावले होते. महाराष्ट्राच्या या मीरेपुढे माथा नमवताना मी म्हटले, 'तुझ्या हरिप्रेमाचा एक कण जरी मला दिलास, तरी मी कृतार्थ होईन'

गोपाळपुराजवळ पुष्पावती ही 'कृष्णा' भिवरेला भेटते. मंदिराच्या गच्चीवरून मी तिचे पात्र लांबवर न्याहाळले पण तिथे एकही 'पुष्प' मला कुठे दिसेना दिसली ती बिनखडयाची गाळीव गुळगुळीत माती

आम्ही जसे होडीने गेलो, तसेच परत आलो. किनाऱ्याला पाय लागला तेव्हा धूपारतीची वाद्ये वाजू लागली होती मी धूपारतीला उपस्थित राहिलो आणि पागोटे घातलेला, सुवर्णमुकुट चढवलेला, सुवेष, सालंकृत 'बरवा पांडुरंग' डोळे भरून पाहिला. आता मोकळ्या देवाचे दर्शन राहिले होते. ते दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी घडले.

उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद उत्तिष्ठ गरुडध्वज ।
उत्तिष्ठ कमलाकांत त्रैलोक्यं मंगलं कुरु ।।

हा मंत्र म्हणून प्रथम उपाध्यायाने देवाला जागे केले. पुजाऱ्याने देवाचे पाय धुऊन नवे गंध लावले मग काकडा आरती सुरू झाली.

अनुपम्य नगर पंढरपूर सीमा मनोहर ।

संताचे माहेर अव्यक्त आदिमूर्ती परब्रह्म साकार।
विटेवरी उभे नीट कटि ठेवुनी कर।
जयदेवा पांडुरंगा जय आनंदकंदा।
आरती ओवाळीन पुंडलीकवरदा।

जमलेल्या भक्तसमुदायाने सुरात सूर मिळवून ही आरती म्हटली मग पुजाऱ्याने देवाची वस्त्रे उतरली. मूर्ती आपादमस्तक अनावृत झाली जरा अधिक जवळीक करून मी ते समग्रध्यान न्याहाळू लागलो मूर्ती ज्या विटेवर उभी आहे, तिच्या खाली पालथे कमळ आहे. देवाचे दोन्ही हात कटेवर असले तरी त्याची ठेवण वेगळी आहे डावा हात एका शंखाच्या पोटात आहे उजवा हात कमलनालासह उताणा आहे कमलकलिका मांडीवर टेकली आहे कमरेत तिपेडी मेखला आणि गळ्यात कौस्तुभ उजव्या हृदयावर श्रीवत्सलाञ्छन. कानातली मकरकुंडले स्कंधभागावर विसावलेली मुखमुद्रा लांबट. दही, दूध, लोणी नित्य आस्वादिल्यामुळे जणू गाल थोडे फुगीर मुळाशी कंगोरा असलेला उभट पण अगदी टोपीसारखा मुकुट.

पण साधु संत म्हणतात, की तो मुकुट नसून ते माथा शिवलिंग आहे. 'विठोने शिरी वाहिला देवराणा' असे समर्थांनी म्हटले आहे विठ्ठल म्हणजे विष्णू अन् मुकुटरूप तो शिव हरिहराचे ऐक्य दाखवणारी ही कल्पना निःसंशय हृदयंगम आहे, पण एका कट्टर शैव गोसाव्याला हे ऐक्य पटले नाही

१८७३ सालची ही घटना हा गोसावी दर्शनाच्या मिषाने देवळात आला त्याने कफनी खाली झाकून उपायन आणले नव्हते, तर आणला होता एक धोंडा. तो त्याने सरळ देवाच्या पायावर घातला मूर्ती दुखावली आणि ती नीट उभी राहावी म्हणून मग त्या पायाच्या मागे टेकण द्यावे लागले विठ्ठलाच्या पायावर नव्हे, तर असंख्य भागवताच्या हृदयावरच घाव होता तो पण थोडक्यात निभावले हा गोसावी शैव असो नाहीतर शाक्य असो, पण दुसऱ्याची दैवते मोडून आपले दैवत श्रेष्ठ ठरवता येत नाही, हे त्या बिचाऱ्याला समजले नसावे पाषाणाची मूर्ती फोडता आली तरी हृदयातली मूर्ती कोण फोडू शकेल !

पंढरपूरच्या या पांडुरंगाने विजयनगरचा प्रवास केला होता किंवा कसे, या विषयी विद्वानांनी चर्चा केल्या आहेत संतचरित्रकार महीपती सांगतो, की

विजयनगरच्या रामराजाने पंढरीची विठ्ठलमूर्ती तिकडे नेली आणि भानुदासाने ती परत आणली. पण भानुदासाचा निर्याणकाल शके १४३५ किंवा ३६ असे मानतात, तर रामराजा शके १४६५ पर्यंत काही हालचाल करीत असल्याचे इतिहास कबूलच करीत नाही तेव्हा हे कसे जमायचे ? अर्थात तो रामराजा नसून कृष्णदेवराय असावा, हे दुसरे मत पुढे आले. भानुदासाशी समकालिक असलेला तोच आहे अनेक ठिकाणाहून अनेक मूर्ती आणवून त्याने विजय-नगरात पुजेला लावल्या होत्या असे पुरावेही मिळतात. त्यावरून विठ्ठल-मूर्तीचा ' उचलथा ' ही तोच असणे शक्य आहे

पण ही कल्पना एवढ्यावरच थांबली नाही भानुदासाला मूर्ती परत मिळाली, ती मूळचीच मिळाली का नवी बनवलेली, असे आणखी तिला पख फुटले कारण विजयनगरात म्हणजे आजच्या हंपीत एक विठ्ठलमूर्ती सापडली असून ती आजच्या पंढरपूरस्थ मूर्तीहून अधिक सुंदर आणि कलापूर्ण आहे. सांप्रतची पंढर-पूरची मूर्ती विशेषशी सौष्ठवपूर्ण नाही

इतिहासाच्या प्रांतात भरकटलेले माझे मन एकदम वास्तवात आले ते उपाध्यायाने म्हटलेला पंचामृताचा मंत्र ऐकून त्याने दुधाचा तांब्याच देवाच्या मस्तकावर उपडा केला. त्या दुग्धधारा मुखावरून, खांद्यावरून, हृदयावरून, कोपरावरून, खाली घरंगळत देवाच्या पायाभोवती घोटाळू लागल्या मातृ-स्तनीच्या दुधाचा एक ' बोगळ ' तान्हुल्या रामाच्या मुखातून गळला आणि हृदयावर पाघळला, तर लगेच मोरोपंताना उत्प्रेक्षा सुचली–

मंदाकिनीचा गगनी प्रवाह तो
चंद्रप्रभापांडुर काय वाहतो ।

पण इथे तर मेघश्याम सगळाच्या सगळा दुधाने धवळलेला मी पाहत होतो. मी आता कोणती उत्प्रेक्षा करू ! अन् मला गद्य माणसाला सुचणार तरी काय ? खरे पंचामृतस्नान मी त्या दिवशी पाहिले नाही तर संध्येच्या पळीत सगळे एकत्र करून मीही घरच्या देवाला म्हणतच होतो, ' पंचामृतै स्नपयिष्ये ! '

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातला सर्वांत मोठा संप्रदाय आहे वारी म्हणजे खेप दर एकादशीला अथवा आषाढी-कार्तिकीला पंढरीच्या खेपा करणारा तो वारकरी कर्नाटकातसुद्धा विठ्ठलभक्तीचा बराच प्रसार आहे

हरिदास, कनकदास अन् त्यांचे अनुयायी मिळून दासकूट बनते हे दासकूट वैष्णव असून विठ्ठलाचे भक्त आहे माध्व म्हणजे वीर वैष्णव. विठ्ठलस्वामी म्हणून तेही पांडुरंगाला भजतात. त्यामुळे पंढरपूर हे महाराष्ट्रातले एक प्रयाग बनले आहे

प्रयागला केवळ गंगा यमुनांचाच संगम झाला नाही, तर वैदिकांची यज्ञसंस्था अन् अवैदिक द्रविडांची पूजासंस्था यांचाही संगम झाला पंढरपुरातही मराठी संस्कृती अन् कन्नड संस्कृती यांचा तसाच संगम झाला आहे सकल संतांनी कबूल केले आहे, की विठ्ठल मुळात ' कानडा 'च आहे. विठ्ठलच नव्हे; तर भक्तिमार्गसुद्धा कानडाच आहे भक्ती स्वमुखाने नारदाला सांगते, की मी ' वृद्धिं कर्नाटके गता ! '

याच भक्तिमार्गाचे पूर्ण विकसित रूप म्हणजे भागवत धर्म. भगवत्प्राप्तीचा एकमात्र उपाय म्हणजे भक्ती, असा भागवतधर्माचा सिद्धान्त आहे. ही भक्ती मुक्तीहूनही वरिष्ठ आहे इतर आध्यात्मिक लोक मुक्ती हे जीवनाचे परम श्रेय मानतात सर्व आस्तिक दर्शनांचा एकच उद्घोष — ' मुक्ती, मुक्ती ! ' पण भक्तांच्या दृष्टीने मुक्ती ही कःपदार्थ आहे तुकोबा देवाला म्हणतात, की ' मुक्ती तुझी तुला लखलाभ असो, आम्हाला आपली तुझी भक्तीच बरी. ' मुक्ती ही भक्तीच्या घरची बटीक, असेच संत समजतात या विचारसरणीत एक रहस्य आहे ज्ञानाच्या द्वारे ब्रह्मानंद लाभतो हे खरे, पण ब्रह्मानंद हा रस नसून भक्ती हा मात्र रस आहे त्यामुळे तो आस्वादनीय ठरतो भक्तीचे अधिष्ठान प्रेम या प्रेमातच तल्लीन होऊन राहणे सारे भक्त पसंत करतात.

हा भागवतधर्म श्रीहरीने उद्धवाला उपदेशिला देव म्हणतो, ' सर्व कर्मे परमेश्वरासाठी करावी त्याच्याच ठिकाणी मन जडवावे साधूंचे वास्तव्य असलेल्या पुण्यक्षेत्रात राहावे भगवद्‌भक्तांच्या आचाराचे अनुकरण करावे. ' सर्वं विष्णुमय जगत् ' ही भावना जोपासावी काया-वाचा-मने निष्ठापूर्वक भगवंताची उपासना करून सर्व कर्मे परमेश्वरार्पण करावी. '

हा धर्म ' बहु सोपा ' याच्यात सोवळ्या-ओवळ्याचा अतिरेक नाही, कर्मांची कटकट नाही, की तंत्राची भानगड नाही. म्ह[illegible] तो आचांडाल सर्वांना सुलभ आहे सर्वांना पावक आहे वारकरी जसा साधा भोळा, तसाच

त्याचा देवही आणि त्या दोघांना जोडणारा दुवा म्हणजे 'रामकृष्ण हरी' हा मंत्र. तो सुद्धा तुळशीच्या माळेसह फार सोप्यात मिळतो

पुंडलिकामुळे पंढरपुराचे माहात्म्य वाढले. पण त्या आधी काय होते ? मला एक लोकगीत मिळाले आहे. त्यात नामदेव विठोबाला विचारतो, 'तू इथे येण्याच्या पूर्वी इथे काय होते, कोणते तीर्थ होते, अन् त्याचे माहात्म्य काय ते मला सांग '

विठोबा सांगतो नामदेवाला, ऐक सांगतो तुला ।
सदाशिव पार्वती जाती पंचमीला वरुणाच्या भेटीला ।
जाता तहान लागली गिरिजेला, बोलली शिवाला ।
स्वामी पाणी पाजावं तुम्ही मला ।।

मग शंकराने त्रिशूळ भूमीत खुपसला अन् पाताळीच्या भोगावतीचे पाणी वर काढले. गिरिजा पाणी प्याली, तृप्त झाली. त्या तीर्थाचे मग सरोवर झाले. लोक त्यात स्नान करू लागले सर्वांचा उद्धार झाला. यमपुरी ओसाड पडली. साध्वी अहिल्येशी पापकर्म आचरून इंद्राच्या अंगाला सहस्र भगे पडली होती. ते पाप धुऊन टाकण्यासाठी देवांनी त्याला तीर्थयात्रा उपदेशिली त्याच्या हाती एक लोहदंड देऊन त्याला सांगितले, 'हा ज्या उदकात तरेल तिथे तुझी भगे जातील.' इंद्राला तसा अनुभव आला तो या ठिकाणी.

चार दिवसाच्या तिथल्या वास्तव्यानंतर परत फिरताना मनात हुरहूर दाटली. आपले काही तरी मागे राहिले आहे, असे सारखे वाटू लागले. राहिले होते ते मन आणि तेही चोरीस गेले होते. अशा चोऱ्या तिथे दिवसाढवळ्या [illegible] होत असाव्या उगाच नाही एका कवीने जनांना इशारा दिला—

मा यात पान्थाः पथि भीमरथ्या
दिगंबरः कोऽपि तमालनीलः ।
विन्यस्तहस्तोऽपि नितंबबिंबे
धूर्तः समाकर्षति चित्तवित्तम् ।।

'पथिकानो ! भीमा नदीच्या रस्त्याला जाऊ नका. तिथे एक सावळा

दिगंबर राहतो. त्याचे हात कटेवर असले तरी तो असा धूर्त आहे, की केव्हाच चित्तरूप वित्त चोरून घेतो.'

रात्री नऊ वाजता झिम्झिम् पावसात जणू देवाच्या कृपावृष्टीत भिजत आम्ही गाडीत चढलो. चंद्रभागेच्या पुलावर येताच वाटले, की भागवत-धर्माच्या या पुण्यसरितेचे एकवार जाल्यावेळचे दर्शन घ्यावे, पण ती तर अंधाराच्या सागरात विलीन झाली होती. पण एवढ्यात विद्युल्लतेच्या रूपाने जणू माझे भाग्यच उजळले. एक क्षणच; पण तो वक्रप्रवाह आणि ते वाळवट लखलखले. मी भावभक्तीचा अंजलिसपुट जोडला; पण तो मस्तकी टेकायच्या आतच दाटलेल्या तमाने तिच्यावर पुनश्च आच्छादन टाकले!

त्याचा देवही. आणि त्या दोघाना जोडणारा दुवा म्हणजे ‘ रामकृष्ण हरी ’ हा मंत्र. तो सुद्धा तुळशीच्या माळेसह फार सोप्यात मिळतो

पुडलिकामुळे पढरपुराचे माहात्म्य वाढले पण त्या आधी काय होते ? मला एक लोकगीत मिळाले आहे. त्यात नामदेव विठोबाला विचारतो, ‘ तू इथे येण्याच्या पूर्वी इथे काय होते, कोणते तीर्थ होते, अन् त्याचे माहात्म्य काय ते मला सांग ’

विठोबा सांगतो नामदेवाला, ऐक सांगतो तुला।
सदाशिव पार्वती जाती पचमीला वरुणाच्या भेटीला।
जाता तहान लागली गिरिजेला, बोलली शिवाला।
स्वामी पाणी पाजावं तुम्ही मला।।

.. ..

मग शकराने त्रिशूळ भूमीत खुपसला अन् पाताळीच्या भोगावतीचे पाणी वर काढले. गिरिजा पाणी प्याली, तृप्त झाली त्या तीर्थाचे मग सरोवर झाले लोक त्यात स्नान करू लागले. सर्वांचा उद्धार झाला. यमपुरी ओसाड पडली साध्वी अहिल्येशी पापकर्म आचरून इंद्राच्या अगाला सहस्र भगे पडली होती. ते पाप धुऊन टाकण्यासाठी देवानी त्याला तीर्थयात्रा उपदेशिली. त्याच्या हाती एक लोहदड देऊन त्याला सांगितले, ‘ हा ज्या उदकात तरेल तिथे तुझी भगे जातील ’ इंद्राला तसा अनुभव आला तो या ठिकाणी.

चार दिवसांच्या तिथल्या वास्तव्यानतर परत फिरताना मनात हुरहूर दाटली. आपले काही तरी मागे राहिले आहे, असे सारखे वाटू लागले राहिले होते ते मन आणि तेही चोरीस गेले होते. अशा चोऱ्या तिथे दिवसाढवळ्या अनादि कालापासून होत असाव्या उगाच नाही एका कवीने जनाना इशारा दिला--

मा यात पान्थाः पथि भीमरथ्या
दिगबर. कोऽपि तमालनीलः।
विन्यस्तहस्तोऽपि नितंबबिंबे
धूर्तः समाकर्षति चित्तवित्तम्।।

‘ पथिकांनो ! भीमा नदीच्या रस्त्याला जाऊ नका तिथे एक सावळा

दिगंबर राहतो त्याचे हात कटेवर असले तरी तो असा धूर्त आहे, की केव्हाच चित्तरूप वित्त चोरून घेतो '

रात्री नऊ वाजता झिम्झिम् पावसात जणू देवाच्या कृपावृष्टीत भिजत आम्ही गाडीत चढलो चंद्रभागेच्या पुलावर येताच वाटले, की भागवत-धर्मांच्या या पुण्यसरितेचे एकवार जातानाचे दर्शन घ्यावे, पण ती तर अंधाराच्या सागरात विलीन झाली होती पण एवढ्यात विद्युल्लतेच्या रूपाने जणू माझे भाग्यच उजळले एक क्षणच; पण तो वक्रप्रवाह आणि ते वाळवंट लखलखले. मी भावभक्तीचा अंजलिसंपुट जोडला; पण तो मस्तकी टेकायच्या आतच दाटलेल्या तमाने तिच्यावर पुनश्च आच्छादन टाकले!

०००

# २. दक्षिणकाशी – करवीर

कोल्हापूर हे एका काळचे दक्षिण महाराष्ट्रातले मोठे संस्थान त्याचे विलीनीकरण झाल्यावर आजमितीस ते एक जिल्ह्याचे ठिकाण म्हणून नांदते. करवीर क्षेत्र असे याचे पुरातन नाव. स्कंदपुराणाच्या सह्याद्री खंडात याचे माहात्म्य विशद केले आहे —

‘ करवीर देशाचा विस्तार दहा योजने असून हा देश दुर्गम आहे या देशाच्या मध्यभागी लक्ष्मीनिर्मित क्षेत्र आहे ते काशी-रामेश्वराहूनही पवित्र असून दर्शनमात्रे पापहारक आहे. ही देवांची अन् ऋषींची निवासभूमी आहे ’

प्राचीन शिल्पकलेचे ते एक उघड प्रदर्शन आहे वनशोभेची खाणी उघडून बसलेले डोंगर, त्याच्या अंगावरून ओघळणाऱ्या सरिता, उंच बळकट किल्ले-कोट आणि आभाळाचे आरसेच जणू असे विस्तीर्ण तलाव यांनी तिथल्या निसर्गाला रमणीय केले आहे.

उत्तरकाशी ही विश्वनाथाची नगरी तर दक्षिणकाशी ही आदिमायेची पुण्यपुरी. जगदंबेच्या साडेतीन पीठांपैकी करवीर हे मुख्य पीठ समजले जाते एकच आदिशक्ती गुणभेदामुळे तीन रूपांनी नटली आणि तीन ठिकाणी राहिली तमोगुणी महाकाली कलकत्त्यात आणि दक्षिणेस माहूर गडावर राहिली. रजोगुणी महासरस्वतीने उत्तरेस हिमाचल आणि दक्षिणेस तुळजापूर पसंत केले आणि सत्त्वागळी महालक्ष्मी ही करवीरनिवासिनी झाली.

महालक्ष्मी जगदंबा इथे सुखासुखी आली नाही. तिला शत्रुमर्दनासाठी इथे यावे लागले कोलासुर आणि त्याचे सगेसोयरे हे दैत्य मातले आणि इथल्या लोकांना उपद्रव करू लागले लोकांना त्यांनी जिणे नकोसे करून टाकले. महा-लक्ष्मीला मग त्यांची दया आली तिने या प्रांती प्रकट होऊन त्या असुराचा संहार केला आणि इथल्या लोकांना सुख-शांती दिली. या समरप्रसंगी तिने जो अद्भुत पराक्रम केला, तो पाहून लोकांनी तिला ‘ कोलासूर भयंकरी ’ असे बिरुद लावून टाकले. ती आली होती कैलासशिखरावरून. कार्यभाग उरकल्यावर

तिने खरे म्हणजे परत स्वस्थानी जायचे. पण तिला हा प्रदेश इतका आवडला, की ती इथलीच स्थायिक झाली

ती आली तसे तिचा मागोवा घेत सगळे सुरगण आले. समस्त तीर्थे आली तिचे अनुचर भैरवगणही आले. ऋषि-मुनीही याच मोहरेला लागले पराशराने पन्हाळ्यावर गुहा खोदली सिद्ध बटुकेशाने चिटक्या मिटक्या डोंगरावर आपली मठी उभारली. वाडी-रत्नागिरीचे शिखर केदारेश्वराने आपल्यासाठी निवडले. दत्तात्रेयाची मध्यान्हभिक्षा इथेच होऊ लागली. क्षेत्र आणि त्याचा परिसर अशा प्रकारे देवभूमी बनून गेला.

योगेश्वर श्रीकृष्णाची पावलेही या भूमीला लागली आहेत त्याच्या सगे बलरामदादाही होता. जरासंध आणि कालयवन यांच्या कात्रीत सापडलेले हे दोघे बंधू मथुरेहून पळत पळत खाली आले आणि एक रात्र करवीर मुक्कामी वस्ती करून पहाटेस गोमतपर्वताकडे गेले.

इ स च्या पहिल्या शतकात इथे आंध्रभृत्याची राजवट होती असे उत्खननात सापडलेल्या काही नाण्यांवरून समजते इ. स. २२५ ते ५५० या सव्वातीनशे वर्षांच्या काळात वाकाटक, कदंब, सेंद्रक आणि मौर्य अशा चार राजवंशानी इथे खादेपालट केले. पुढे हा प्रदेश चालुक्याच्या ताब्यात आला. सत्याश्रय पुलकेशी ( दुसरा ) हा एक लोकप्रिय राजा त्या वंशात जन्मला सगळे दक्षिण हिंदुस्थान त्याने पादाक्रांत केले होते अर्थात कोल्हापूरही त्यात आलेच आपला राज्यविस्तार सुव्यवस्थित चालावा यासाठी त्याने आपल्याच नात्यागोत्यातले लायक पुरुष निरनिराळ्या प्रांती सुभेदार नेमले होते त्यांपैकी कर्णदेव हा कोकणातल्या संगमेश्वरी राहून कोल्हापुरासह कोकणचा कारभार पाहात होता कोल्हापुरी काही काल क्षेत्रवास करून त्याने इ स ६३४ साली अंबाबाईचे आजचे गर्भागार उभारले, असा इतिहासज्ञांचा तर्क आहे. चालुक्याच्या साम्राज्यवैभवाच्या काळातच हे क्षेत्रही वैभवाला चढले आणि त्याला ‘ दक्षिणकाशी ’ ही गौरवाची उपाधी लाभली.

पुढे चालुक्यांना हुसकून शिलाहार आले शिलाहारांची घराणी तीन त्यापैकी एका घराण्याने कोल्हापूर प्रदेशावर आपली सत्ता जमवली. इ स ११८० पर्यंत त्याची कारकीर्द इथे गाजली शिलाहाराच्या वंशात अनेक महापराक्रमी राजपुरुष निपजले. मारसिंह हाही एक त्यापैकीच होता त्याच्या आमदानीत

कोल्हापूर प्रातात शाती अन् समृद्धी या जोडीने नादल्या मारसिहाने त्या काळी अनेक मदिरे उभारली अबाबाईच्या मदिराचा कलापूर्ण विस्तार यानेच केला त्याचा पुत्र गडरादित्य हाही अबाबाईचा मोठा भक्त होता मदिरावर कळस चढवण्याचे शलकृत्य त्यानेच केले अभिलेखात तो म्हणतो, की मला अबाबाईचा प्रसाद मिळाला आहे गंडरादित्य वैदिक धर्माचा प्रेमी होता, तसाच जैन-धर्माचाही त्याच्या काळात या प्रदेशात जैनाचाही बराच बोलबाला होता गडरादित्याने त्यांच्याही मदिराना मदत केली होती जैन लोक अबाबाईलाही भजत होते, पण त्यांच्या धारणेत तिचे नाव पद्मावती आहे

इ स. ११८० मध्ये शिलाहारांचे पर्व समाप्त झाले त्यांना खो देऊन देवगिरीचे यादव तिथे सत्तारूढ झाले. कोल्हापूरच्या इतिहासाशी सलग्न झालेला यादवांचा पहिला पुरुष सिंघणदेव हा होय. त्याच्या सत्ताकालात १२१८ मध्ये महालक्ष्मीच्या मंदिराला उत्तर बाजूने महाकालीचे अन् दक्षिण बाजूने महासरस्वतीचे अशी दोन मदिरे जोडली गेली. अबाबाईच्या मदिराचे महाद्वार भव्योत्तुग आहे पढरपूरचे महाद्वार हे महाद्वार वाटत नाही अबा-



बाईच्या महाद्वारात प्रवेश करताना मात्र आता आपल्याला आत काही तरी दिव्य भव्य पाहायला मिळणार आहे अशी कल्पना होते

आत शिरताच समोर सभामडप अन् डाव्या हाताला एका उंच दगडी चौथऱ्यावर दीपमाळांचे पचायतन डोळ्यात भरते. त्याला लागूनच एका पुष्करिणीत कारजे थुईथुई उडत असते जवळ उभे राहिले तर वाऱ्याने उडवलेले त्याचे कोंड्या-सारखे तुषारही अगावर घेता येतात पुढचा सभामंडप अली-कडच्या काळातला आहे अंबाबाईचे मदिर ताराकृती आहे ताराकृती याचा अर्थ ताऱ्याला जशा पाच किरणशलाका असतात, तसे मंदिराला पाच कोन असणे.

या शैलीला वेसर शैली असे नाव आहे. ही शैली नागर अन् द्राविड या मंदिर शैलींच्या मिश्रणातून निर्माण झाली. मात्र तरीही नागर शैलीपेक्षा तिच्यावर द्राविड शैलीचाच ठसा अधिक दिसतो. वेसर शैलीचा विशेष असा- बहुकोनी अर्थात ताराकृती चौथऱ्यावर मंदिराची उभारणी स्तंभही ताराकृती पायावरच उभारलेले. मध्यभागी मंडप अन् त्याला लागून दोन किंवा चार मंदिरे उभारलेली. विमानाचे शिखर चौरस अन् क्रमाने निमुळते होत जाणाऱ्या एकावर एक मजल्यानी चढत गेलेले. सर्वांच्यावर कळस याला म्हणायचे मंदिर-संकुल या मंदिर-संकुलावरील शिखरे मोठी आकर्षक दिसतात.

अशा प्रकारची ताराकृती मंदिरे होयसळाच्या राजवटीत दक्षिणेत उभारली गेली. चालुक्यांनी त्याचेच अनुकरण केले चालुक्याच्या कारकीर्दीत दंभोळ येथे दोड्डबसप्पा याचे जे मंदिर आहे त्याचा पाया तर ताराकृती आहेच, शिवाय वरचे सगळे बांधकामही ताराकृतीच आहे. अंबाबाईच्या मंदिरात वरील कित्येक गोष्टींची सामक्षा मिळते. ताराकृती मंदिरांना समोरून पक्षद्वार नसते अंबाबाईच्या देवळाचेही तसेच आहे. तिथे पक्षद्वारातून आत शिरावे लागते

आत प्रवेशताच आपण कोरीव खांबाच्या चक्रव्यूहात सापडतो जिकडे पाहावे तिकडे खांबच खांब ! काही सुटे तर काही भिंतीत घुसलेले. या खांबांची मोज-दाद करणे कठीण आहे करू नये असेही सांगतात ज्यानी हट्टाने तसा प्रयत्न केला, त्यांना त्यांना काहीतरी टोला बसला अशाही आख्यायिका सांगतात.

म्हणूनच मी त्या नादात पडलो नाही. म्हटले, विषाची परीक्षा घ्यावी कोणी ! आपण आपले सरळ जगदंबेपुढे उभे राहावे हे बरे ! गर्भागारातील उच्च वेदीवर अधिष्ठित अशा त्या पाषाणमूर्तीला भावार्द्र दृष्टीने न्याहाळून मी करसंपुट जोडला —

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।
नम प्रकृत्यै भद्रायै नियता प्रणताः स्म ताम् ।।

गर्भागारातला देखावा प्रसन्न पण गंभीर होता. देवीचा ' सकळै शृंगार ' केलेला होता. माथा मुकुट, गळ्यात हार अन् पुष्पमाला सुंदर साडीचोळी, पायात जोडवी पोल्हारे अन् पाठीमागे शोभवलेली प्रभावळ, असा तो सुवेश उभय बाजूच्या दीपप्रकाशात लकाकत होता. महालक्ष्मीला अलंकाराची उणीव म्हणजे सूर्याला प्रकाशाचा दुष्काळ असे म्हणण्यापैकी ठरेल. पण दागिन्यांच्या

या गर्दीमुळे तिचे अनलकृत मूलस्वरूप दर्शनाला दुर्लभ होते हीच काय ती उणीव देवीचे वाहन सिंह तो तिच्या मागे खडा आहे. मूर्ती चतुर्भुज. वरच्या दोन हातांपैकी उजव्या हाती गदा अन् डाव्या हाती खेटक खालच्या दोहोंपैकी उजव्या हातात पानपात्र अन् डाव्या हातात श्रीफल इथे श्रीफल शब्दाने नारळ नव्हे तर बेलफळ समजायचे.

आज हे मदिर उघडल्यापासून बद होईपर्यंत सदैव गजबजलेले असते कोल्हापुरात आलेल्या भाविक सुवासिनी देवीची ओटी भरल्यावाचून पुढे जात नाहीत देवीपुढे नेहमी खणानारळाचा ढीग जमत असतो तीर्थप्रसाद देताना पुजाऱ्याचे हात थकतात. देवीचे सगळे आजमितीस तिच्या महालक्ष्मी या नावाला साजेसेच आहे

पण इतिहासात असा एक दुर्भाग्याचा काळ आला, की देवीला अज्ञातवास पत्करावा लागला मुसलमानी अमदानीतला तो काळ. मुसलमानांनी तिच्या मदिराची नासधूस केली देवीला पुजाऱ्याच्या घरी अधारात लपून दिवस काढावे लागले. पुजारी करील तो नैवेद्य तोही लपून छपून केलेला, पण शिवरायाने महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना केल्यावर १७१५ साली देवीचा हा अज्ञातवास सपला. तिची गाजावाजाने राजेशाही थाटात पुनश्च मदिरात प्राणप्रतिष्ठा झाली माणसे स्वतत्र तर त्यांचे देव उजळमाथ्याचे ती गुलाम झाली की त्याच्या देवांनाही अवकळा, हा नियमच आहे. औरगजेबाच्या कारकीर्दीत काशीचा विश्वेश्वरही असाच ज्ञानवापीच्या कुबट पाण्यात जीव कोंडून घेऊन बसला नव्हता का ? शिवरायाच्या मनात या विश्वेश्वराला तिथून वर काढायचे मनसुबे शिजत होते, पण नियतीने त्यांना अल्पायुषी केले अन् ते मनसुबे प्रत्यक्षात उतरू शकले नाहीत.

मदिरातल्या प्रदक्षिणेचा मार्गही ताराकृतीच आहे. इथे मातुलिंग नावाचे एक शिवलिंग आहे पण त्याचे दर्शन घ्यायला मदिराच्या दुसऱ्या मजल्यावर जावे लागते. देवळावर देऊळ अशी ही विस्मयजनक रचना आहे. ते मातुलिंग थेट अबाबाईच्या मस्तकावर येते. तिथले मिणमिण जळणारे दिवे तिथे साचून राहिला अधार उजळायला समर्थ होत नाहीत तिथला कुबट दर्प आपणाला तिथे फार वेळ थाबू देत नाही तिथून गच्चीवर पाय ठेवला की श्वास मोकळा होतो गच्चीवरून सभोवती पसरलेल्या नगरीचे विहगम दर्शन होते.

अंबाबाईच्या उजव्या हाताला महाकाली एका स्वतंत्र मंदिरात विराजित आहे. तिच्या भेटीला जाण्याचा मार्ग मुख्य मंदिरातूनच आहे वाटेत श्रीचक्राचे स्थान लागते हे यंत्र एका काळ्या पाषाणावर कोरलेले आहे. त्याची थोडी माहिती घेतल्यावाचून पुढे जाणे प्रशस्त नव्हे

या चक्राला यंत्रराज ही पदवी आहे तंत्रमार्गात त्याचे विलक्षण माहात्म्य आहे त्रिपुरसुंदरी ही या चक्राची देवता देवी भवानी म्हणजेच त्रिपुरसुंदरी होय तिला त्रिपुरा विद्या असेही म्हणतात मध्य बिंदूच्या जागी त्रिकोण आणि त्याच्या भोवती नऊ आवरणे अशी त्याची रचना आहे त्रिकोणात अन् पाकळ्यात बीजमंत्राची मांडणी आहे चार दिशांना चार द्वारे आहेत शाक्तांचे वर्ग दोन. एक दक्षिण मार्गी अन् दुसरा वाममार्गी दोघेही श्रीचक्राचे उपासक फक्त उपासना पद्धतीत तेवढा फरक दोघेही 'श्रीचक्र शिवयोर्वपु ' ( श्रीचक्र म्हणजे साक्षात् शिव अन् शक्ती यांचे रूप ) असेच समजतात या यंत्राच्या मागे तांत्रिकांचे तत्त्वज्ञान उभे आहे एका वाक्यात सांगायचे तर जीवाला शिव-शक्तीच्या अद्वैताप्रत पोचून मोक्ष मिळवायचा असेल तर त्याला श्रीचक्राची नऊ आवरणे भेदून मुळापर्यंत जायला हवे. या मूळ ग्रंथातून श्रीचक्राच्या दर्शनाची फलश्रुती फार मोठी सांगितली आहे—

सम्यक् शतक्रतून् कृत्वा यत्फलं समवाप्नुयात् ।<br>तत्फलं लभते भक्त्या कृत्वा श्रीचक्रदर्शनम् ।।

'शंभर यज्ञ करून माणसाला जे फल मिळेल ते भक्तीने श्रीचक्राचे दर्शन केल्याने मिळते.'

श्री आद्य शंकराचार्य हे त्रिपुरसुंदरीचे उपासक होते. त्यांनी तिच्यावर एक भावगंभीर स्तोत्रही रचले आहे शंकराचार्यांच्या प्रत्येक मठात श्रीचक्र असते अन् त्याची उपासनाही चालते श्रीचक्राची आणखीही काही क्षेत्रे आहेत. विंध्यवासिनी क्षेत्रात भैरवकुंड, फरुकाबाद जिल्ह्यातल्या तिरवा येथील अन्नपूर्णा-मंदिर, काशीचे विश्वेश्वर मंदिर, तुळजापूर, कांचीचे कामाक्षीमंदिर आणि हिमालयातल श्रीनगर या ठिकाणी श्रीचक्राची स्थापना आहे याचा अर्थच असा, की एकाकाळी आसेतुहिमाचल तंत्रमार्ग फैलावला होता आणि तंत्र-साधक या श्रीचक्राची उपासना करीत होते.

मी त्या श्रीचक्राला प्रणाम केला, काही क्षण ते न्याहाळले आणि महा-कालीच्या सम्मुख उभा झालो. महाकालीचे मंदिर अंतर्बाह्य अलंकृत असून ते स्थापत्य शिल्पाचा एक सर्वांगसुंदर नमुना आहे तितकेच त्याच्या विरुद्ध दिशेचे महासरस्वतीचे मंदिर ओबड धोबड आहे सरस्वतीचे वर्णन ' चातुर्यकळा-कामिनी ' असे करतात पण इथे चातुर्यही नाही अन् कळाही नाही इथे सगळी कळा संहारशील कालीनेच आपल्या सेवेत राबवल्यामुळे सरस्वतीच्या वाट्याला काहीच उरले नाही. काली मंदिर उभारून झाल्यावर उरलेल्या साधनसामग्रीत कसेबसे हे मंदिर उभारून इथले स्थपती मोकळे झाले असावे. सरस्वतीला फक्त निवारा मिळाला एवढेच !

अंबाबाईच्या मंदिरावरच्या कटिबंधावर काही स्त्रीमूर्ती कोरून काढलेल्या आहेत. प्रत्येक मूर्ती कोणत्या तरी नृत्याचा आविष्कार करीत उभी आहे या मूर्ती लहान असल्या तरी रेखीव आहेत अशाच मूर्ती वेलूरच्या चन्नराय केशवाच्या मंदिरावर आहेत त्या इथल्यापेक्षा अधिक गुळगुळीत आहेत त्या ग्रामीण जीवनातील आशय व्यक्त करतात, तर या विदग्ध नृत्याचे पवित्रे दाखवतात. अंबाबाईच्या सेवेसाठी उपस्थित झालेल्या चौसष्ट योगिनी म्हणून त्यांची ओळख सांगितली जाते पण त्यांना योगिनी म्हणायला मन कचरते. चौसष्ट योगिनींपैकी शुष्कांगी, नरभोजनी, प्रेताक्षी, वाराही, दीर्घलंबोष्ठी, यांचे लालित्य अन् सौंदर्य त्यांच्या नावांवरूनच कळून येत नाही काय ? मग त्यांचा आणि या नृत्यांगनांचा मेळ कसा घालायचा ? त्यापेक्षा द्राविड लोक त्यांना ' मदनाच्या हातातल्या बाहुल्या ' म्हणतात, तेच अधिक समुचित अन् सरस वाटते. त्यातल्या काही मूर्ती मुसलमानी राजवटीत भग्न झाल्या होत्या. त्यांच्या जागी आता तशाच प्लॅस्टरच्या करून बसवल्या आहेत.

या मंदिराला दिशासाधन आहे. देवीचे मुख रेखीव पश्चिमेला आहे. सूर्य पूर्वेला उगवतो अन् पश्चिमेला मावळतो, हे प्रत्यक्ष सत्य असले, तरी ते काटेकोर सत्य नाही. वर्षातून फक्त दोनच दिवस सूर्याचा एक चक्र रथ खऱ्या पूर्व–पश्चिम रेषेवरून धावतो. या दोन दिवसांना विषुवदिन म्हणतात. इंग्रजी तारखा सांगायच्या तर मार्चची २१ आणि सप्टेंबरची २१ असे सांगता येईल. या दोन दिवशी संध्यासमयी सूर्यास्ताच्या आधी थोडा वेळ सूर्यकिरण मुख-मंडलावरच्या झरोक्यातून देवीच्या मुखावर पडतात ती कृष्णपाषाणाची

मूर्ती अंगावरच्या वस्त्राभरणांसह तेजाने पुजाळते सगळा गाभाराच उजळून निघतो. तो क्षणप्रकाश त्या बंदिस्त गर्भागाराच्या कोनाकोपऱ्यात घर करून बसलेल्या अंधाराला हुसकून काढतो. हे दोन्ही दिवस बहुधा देवीच्या उभय नवरात्रातच येतात आश्विनातले शारदा नवरात्र अन् चैत्रातले वासंतिक नवरात्र. त्या दिवसात यात्रा पुष्कळ असते आणि देवीच्या भक्तांना तिच्या किरणस्नानाचा हा सोहळा धणी पुरेतो पाहायला मिळतो.

अंबाबाईच्या प्राकारातून एक प्रदक्षिणा केली की शेषशायी, दत्तात्रेय, नवग्रह, विश्वेश्वर, काशी, मणिकर्णिका इ अनेक देवांचे अन् तीर्थांचे दर्शन घडते. कुठे बुवाबैरागी चिलमीशी मुखमीलन करून दाढीमिशांच्या रानातून धुराचे लोट सोडताना दिसतात कुठे ज्योतिषी पंचांगे उघडून पृच्छकांचे ललाटलेख वाचताना आढळतात कुठे ब्राह्मण पुरोहितांचे दुसऱ्या दिवशीच्या लघुरुद्राचे अथवा सप्तशतीच्या पाठाचे बेत कानांवर येतात कुठे नागरपुरध्रींचा कलरव कानी पडतो कुठे पुराणश्रवण घडते कुठे भिन्न भाषांचे आलापसलापही कर्णसंपुटात शिरतात. दुपारची 'जगन्नाथाची वेळ' सोडली तर हा मंदिरप्राकार नेहमीच जनाकीर्ण असतो



रोज पहाटे पाच वाजता जगदंबेची काकडआरती होते सकाळी षोडशोपचार समर्पिले जातात. दुपारी आरतीबरोबर महानैवेद्य होतो तिसऱ्या प्रहराच्या अखेरीस अलंकारपूजा होते. संध्याकाळी धुपारती आणि रात्री शेजारती शुक्रवारी जो तिथे पोचेल त्याला पालखीचा सोहळा पाहायला मिळतो नवरात्रात देवीचा महोत्सव होतो. हे नऊ दिवस म्हणजे देवीने महिषासुराशी मांडलेल्या तुंबळाचे स्मृतिदिन होत.

महिषासूर हा अतुंबळी असुरसम्राट होता अष्ट लोकपाळावरही त्याने आपली जरब बसवली होती सगळे मानव तर सोडाच; पण समस्त देवही त्याच्या छळाने त्रस्त अन् ग्रस्त झाले होते आपली या छळातून सोडवणूक व्हावी म्हणून ते मग परमात्म्याला लोटांगणी गेले त्याची ती असहाय दुरवस्था पाहून तीन्ही बड्या देवाच्या शरीरातून पुण्यप्रकोप उसळला. त्यानेच शक्तीचा आकार धरला देवांनी आपापली आयुधे तिच्या हाती दिली लगेच ती सायुध, सुसज्ज होऊन महिषासुराला सामोरी झाली. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हे घनघोर युद्ध चालले. अखेर त्या दिवशी तो जगाचा कर्दनकाळ देवीच्या हातून निवटला. ‘ जेव्हा जेव्हा दैत्य माजतील, तेव्हा तेव्हा मी अवतार घेऊन त्यांचे निर्दळण करीन ’ असे त्याच वेळी देवीने सर्व जगाला आश्वासन देऊन ठेवले

पुत्रान् देहि धन देहि सवान् कामाश्च देहि मे।
रूप देहि जय देहि यशो देहि द्विषो जहि ।।

ही सप्तशतीतली प्रार्थना तिथे सर्वत्र निनादत असते. पण मला मात्र जगदबेकडे इतकी आपस्वार्थी मागणी करवेना. नेहमी ‘ मे मे ’ काय करायचे ? बरे वाईट कसे का असेना, रूप मला जन्मत च मिळाले आहे. यश हे तर प्रयत्नाधीन सर्व कामना जर देवीनेच बसल्या जागीच पूर्ण केल्या, तर मग माझ्या हातांचा, बुद्धीचा उपयोग काय ? ते तर पुरुषार्थाचे मरणच ! ‘ शत्रूना ठार कर ’ असे विनवायला मला आधी शत्रूच नाहीत अन् असले तरी मी त्याचे मरण का चिंतावे ! माझ्या सस्काराना ते कुपथ्य ठरेल तेव्हा हे सगळे बाजूला ठेवून मी त्या त्रैलोक्यवरदायिनीला एवढेच मागितले –

त्रैलोक्यवासिनापीड्ये लोकानां वरदा भव ।

जुन्या राजवाड्यात तिथे आणखी एक अबाबाईचे मदिर आहे राज-घराण्यातल्या खाशा मडळीला निराबाध पूजा-अर्चा करायला मिळावी म्हणून ते उभारले गेले आहे आजमितीस तुम्ही तिथे गेलात तर मदिराच्या मधल्या चौकात हरणे, चित्ते, ढाण्ये वाघ, गवा रेडा असे पशुसमेलन तुम्हाला दिसेल. त्या वाघाना न भिता नि शकपणे पुढे जावे. कारण ते पशू पोटात पेढा भरून बसलेले आहेत कै छत्रपती राजाराम महाराज, यांनी ज्या धाडसी शिकारी

मारल्या, त्यांचे ते प्रदर्शन आहे. महाराजांनी यमाला दुसरे वाहन म्हणून तिकडे पाठवून दिलेला तो गवा रेडा इतका उग्र, मस्त अन् सर्वांगी भरदार आहे, की चर्मविशेष स्थितीतही त्याच्याजवळ जायला मन धास्तावते त्याच्या त्या उग्रतेतही केवढे सौंदर्य आहे, केवढा घाट आहे. सिंहाच्या गैरहजेरीत कामचलाऊ वनराज म्हणून त्याला खुशाल नियुक्त करावे.

कोल्हापुरात निरनिराळ्या तीर्थनामांचे अनेक लहानमोठे तलाव आहेत त्यापैकी बरेचसे सांप्रत बुजवून नामशेष केले गेले आहेत पद्माळे तळे म्हणजे पद्मालयतीर्थ ते आता घोडदौडीचे रगण बनले आहे कपिलतीर्थ आता महिषीदोहनाचे ठिकाण झाले आहे. रंकाळेपात्र अजून 'यथास्थित' आहे. रंकाळे तलाव पाहायला योग्य समय म्हणजे सूर्यास्ताच्या आधीची एक घटका त्याच्या दगडी कठड्याला टेकून पश्चिमाभिमुख व्हावे आणि मजा पाहावी वाऱ्याला हुंदडायला फार छान जागा आहे ती सुमारे तीन मैलाचा घेर असलेल्या त्या निळ्या गभीर जलाशयावर वाऱ्याने आघात केला, की लहरींचे लास्य सुरू होते त्यांनी फेर धरला, की पश्चिमाकाश त्यांच्यावर गुलालाच्या पिचकाऱ्या मारू लागते. पाण्याचा वर्ण पालटतो सगळे जलपृष्ठ लालीलाल होऊन जाते मधून मधून निळ्यातांबड्याचे एक निराळेच मिश्रण चमकू लागते. त्या जललहरी मग रासरसात सहनृत्य करण्यासाठी मावळतीच्या किरणानाही खाली ओढतात तेही पण त्यांच्यासंगे झुलायला लागतात भगवान् सविता ही क्रीडा सौम्य दृष्टीने थोडा वेळ पाहात राहतो पण त्याला फार वेळ सवड कुठली ! तोही वैश्विक नियमाने बांधलेला दुसरे गोलार्ध उजळण्यासाठी त्याला नेमल्या वेळी तिकडे जायचे असते तो गेला, की त्याच्या मागोमाग किरणजालही ओसरते गुलालाच्या पिचकाऱ्या थांबतात तळ्याच्या स्वाभाविक निळ्या वर्णात आभाळाची निळावती मिसळते. सगळीकडे गडद गांभीर्य पसरते. एवढा वेळ उजव्या हाताला प्रतिबिंबाच्या रूपाने आपले उलटे रूप दाखवणारा काठावरचा शालिनीमहाल पाण्यातून आपले अग काढून घेतो डाव्या हाताला पाण्यात उभारलेल्या सध्यामठात द्विजगणाच्या ऐवजी अंधारच गर्दी करतो. हळूहळू वाराही पडतो नाचून कुदून दमल्या भागल्या जललहरी हळूच आपोदेवींच्या कुशीत शिरतात मग मन म्हणते, 'चला, आता परतू या !'

रंकाळ्याजवळच एक भला मोठा नदी एका घुमटीत बसून राहिला आहे.

आम्ही गेलो तेव्हा त्याच्याभोवती गुडघाभर पाणी होते. नंदीपुढे शिवलिंग असायलाच हवे, अशा समजुतीने कोणीतरी त्याच्यापुढे लिंगस्थापना केली असावी त्यामुळे इथे धनी उघड्यावर अन् वाहान मंदिरात, असा उलटा प्रकार झाला आहे डौलदार ठाणमाण असलेल्या या नंदीचा ' मुखभग ' झालेला पाहून मनाला विषाद वाटला माझ्यासारखाच इतर अनेकानाही वाटला असेल. म्हणून कोणीतरी दुसऱ्या एका दगडाचा ओबडधोबड मुखाकार बनवून तिथे जोडला आहे

हा नंदी रोज गहूभर पुढे जातो अन् तिळभर मागे येतो अशी आख्यायिका सांगतात या गतीने जाऊन तो ज्या दिवशी पुढच्या रकाळ्यात उडी घेईल त्या दिवशी विश्वही प्रलयसागरात बुडणार आहे म्हणे ! मी गहू अन् तीळ यांचा आकार मनाशी कल्पिला, नंदी अन् रकाळे याचे चालू घडीचे अंतर मोजले आणि निःश्वास टाकला निदान माझ्या हयातीत तरी जगाचे काही बरेवाईट होणार नव्हते, पण त्याच वेळी मनात दुसरी एक पाल चुकचुकली. जगातली वाढती अनीती, चढता भ्रष्टाचार अन् माणुसकीचा ऱ्हास यांना उबगून या नंदिकेश्वराने आपली गती वाढवली अन् परागती थांबवली तर – ?

कुंभी, तुळशी अन् भोगावती या तीन नद्यांचा संगम कोल्हापुरापासून एका कोसावर झाला आहे त्या सरिता लहान असतील, पण त्यांचा तो संगम करवीर क्षेत्राला प्रयागरूप ठरला आहे. काशीच्या दशाश्वमेध घाटावर विधात्याने दहा अश्वमेध केले अशी कथा-पुराणे सांगतात. इतिहासकाळात या संगमावर गंडरादित्य या शिलाहार राजाने दहा सहस्रभोजने घातली होती. या संगमावर स्नानाला जायचे तर पंचगंगेवरून जावे लागते. तिथेच ब्रह्मगिरीची टेकडी आहे त्र्यंबकेश्वराजवळचा ब्रह्मगिरी वेगळा अन् हा वेगळा या टेकडीच्या पोटात फार मोठा इतिहास दडलेला असावा, असा सुगावा संशोधकांना लागला. डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिट्यूटने १९४५ साली तिचे उत्खनन केले. हे काम चार महिने चालले होते आंध्र शिलाहार, आणि बहामनी अशा तीन कालखंडातल्या अनेक वस्तू त्यात गवसल्या.

कसला तरी दिव्य अथवा भौम उत्पात होऊन तिथली पहिली वस्ती उठली. काही काल तो पंचगंगेचा तटप्रांत निर्मनुष्य झाला. त्या भूमीवर कालांतराने

मातीचा आणखी एक थर चढला पुनश्च कुठून तरी दुसरा मानवसंघ तिथे दाखल झाला त्याने तिथे वस्ती उभी करून संसार थाटला. कालचक्राच्या फेऱ्यात त्याचेही 'तीन तेरा' झाले त्या भूमीवर आणखी एक थर साचला जुन्या मानवाच्या गाडलेल्या संसारावर आणखी कुठल्या तरी भटक्या मानव संघाने आपले बस्तान बसवले. अशी साडीमाडी तीन वेळा घडली.

पुढे शेकडो संवत्सरांच्या माळा फिरल्या. त्या टेकडीला शिशिराने काकडवले, ग्रीष्माने तापवले आणि वर्षाऋतूने झोडपले पण ती टेकडी डगमगली नाही की दुभगली नाही. आपल्या उदरीचे गुप्त धन संशोधकांच्या हवाली करूनच तिने धरणीवर अंग टाकले

संशोधकाना खणता खणता एका ठिकाणी बऱ्याचशा पिचलेल्या बांगड्या सापडल्या त्या पाहून त्यांना वाटले असेल —

उत्पाताने जैं भिंतीचे सर्व बंध तुटले ।
नकळे त्यामधि किती जणींचे कांकण वाढवले ॥

फुटलेली खापरे पाहून ते म्हणाले असतील. 'किती तरी लोक नशिबावर खापर फोडीत इथून निघून गेले असतील,' तेलवातीविना दीनबाण्या दिसणाऱ्या किती तरी पणत्या वर आल्या मुसळावाचून उखळे सापडली. कितीक सुरया आणि त्याचे तुकडे आढळले कोण्या बिचाऱ्याच्या नशिबाला न लाभलेला एक ताईत मिळाला. शिजायच्या आधीच करपलेले मूठभर तांदूळ हाताला लागले. रोमन बनावटीची एक बैलगाडी आणि काही धातु-मूर्ती सापडल्या. त्या पाहून आद्यांच्या कारकीर्दीत रोमशी आपले दळणवळण असावे, असा तर्क संशोधकांना करता आला हे आणि इतर सर्व अवशेष आज-मितीस कोल्हापूरच्या वस्तुसंग्रहालयात व्यवस्थित मांडून ठेवलेले आहेत. बारीक डोळ्यांनी ते प्रदर्शन पाहायचे तर दोन तासाची तरी सवड घेऊन जायला हवे.

कोल्हापूरचा नवा राजवाडा सुंदर आहे, समृद्ध आहे अन् शहराच्या बाहेर चांगल्या हवेशीर जागी बांधलेला आहे, पण स्मरणात तो राहील तो नजीकच्या पशुसंग्रहालयामुळे. विशेषत. हरणाच्या अनेक जाती तिथे आहेत. त्यांच्या जोडीला धड पशू नव्हत, धड पक्षीही नव्हत असे काही शहामृगही दिसतात एका विस्तीर्ण जागेभोवती कुंपण करून त्या पशुपक्ष्याचे स्वातंत्र्य मर्यादित केलेले


मी त्या तृणपर्णाच्छादित भूमीला हात जोडले. त्या वास्तूचा महिमाच तसा होता तिने महाराष्ट्राला पाऊण लाख ' ग्रथ ' रचणारा एक भगवद्भक्त महाकवी दिला होता. पंताची आर्या म्हणजे रसिकांची गळसरी त्या वृत्तावर त्याचाच छाप त्यांनी वयाची पहिली दोन तपे इथे घालवली त्यांनी इथेच पाध्याच्या पाठशाळेत अध्ययन केले कोल्हापूरला गानसम्राट अल्लादियाखांचे स्मारक आहे. त्यांचा अर्धपुतळा उभारला गेला आहे हे ठीकच झाले असे मी म्हणेन. पण त्याही आधी इथे पन्हाळ्यावर महाराष्ट्रशारदेच्या या कंठमण्याचे स्मारक व्हायला हवे होते.

तिथून पुढे होऊन मी जेव्हा गडाचे चढउतार पायाखाली घालू लागलो, तेव्हा मला आंब्याच्या शेजारी फणस दिसले रसबाळथा केळीच्या रांगेत पोफळी दिसल्या घराच्या उतरत्या केंबळी छपरावर दोदिल तांबडे भोपळे लोंबताना आढळले. जास्वंदीच्या संगतीत सोनटक्क्याची झुडपे गवसली गोंड्याचे गवत तर सगळीकडेच उगवलेले पायाखालची वाट अरुंद अन् तांबडी मला माझ्या गोमंतकातल्या साटरे गडावर चालत असल्यासारखे वाटले पन्हाळ्याविषयी अंतरात कोवळीक दुणावली

**क्रीडावे मुक्तींनी माहेरी जेंवि लाडक्या मुलिंनी।**

ही पंताचीच उक्ती. मीही तसाच पन्हाळ्यावर स्वच्छंद वागलो

सज्जेकोठीजवळ जाताच काळतोंड्या रामदूतांनी आमचे स्वागत केले. रखवालदाराने दार उघडून आम्हांला वरच्या मजल्यावर नेले. आम्ही तिथे एक खिडकी पाहिली सिद्दी जोहाराचा गडाला वेढा पडला असता शिवाजीमहाराजांनी जिथून उडी मारून त्या यवनसरदाराच्या हातावर तुरी दिल्या ती ही खिडकी ती तूर्त बुजवलेली आहे महाराजांचे जिवावरचे साहसकर्म होते ते महाराजांनी



आहे. तिथे त्याच्यासाठी रान आहे, मैदान आहे, जलाशय आहे आणि वास-गृहेही आहेत

आम्ही तिथे पोचलो, तेव्हा सूर्य मावळून गेला होता अंधार पडायच्या आत त्या पशूंचे नक्तभोजन उरकण्याची पद्धत असावी नोकराने घंटा वाजवताच ते सगळे पशू एका लांब चौकोनी वेदीभोवती तुरुतुरू गोळा झाले जणू एखाद्या गुरुकुलातले शिस्त पाळणारे छात्रच. नोकराने भिजलेल्या धान्याची त्या वेदीच्या कडेकडेने रांग ओतली. एवढा वेळ कठड्याशी येऊन शेंगासाठी आमच्याकडे तोंड वेंगाडणारा तो आगंतुक शहामृगही आमच्याकडे पाठ फिरवून दोन तुर-काठ्यावर आपल्या देहाचे आडवे ओझे कसेबसे सावरीत सार्वजनिक भोजना-साठी तिकडे चालता झाला देवाच्या पंक्तीत राहू तसा तो शहामृग पंक्तीत घुसताच जवळच्या हरिण बालकांनी नाखुषी दर्शविली ती तिथून निघून दुसऱ्या जागी शिरली कसलीही कुरापत न निघता तो भोजनसमारंभ सावकाशपणे पार पडला. ती समाराधना पाहून न जेवताच माझे पोट भरले

कोल्हापूरला जाऊन पन्हाळगड पाहायचा नाही म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासाविषयी अनास्था दाखवल्यासारखे ठरले असते. म्हणून एका सुंदर सकाळी गंगावेशीतून निघणाऱ्या बसने मी तिकडे जायला निघालो पंचगंगेचा पूल ओलांडताच सगळीकडे उसाचे मळे दिसू लागले त्या इक्षुदंडांचे निळसर उंच तुरे वाऱ्यावर डुलत असलेले पाहून कविकुलगुरूने म्हटले असते, ' शरद-राजाच्या मस्तकावर चवऱ्या ढाळल्या जात आहेत ' शेते पिकायला आली होती. आसमंत हिरवा पिवळा दिसत होता दृष्टीला विषाद वाटेल असे कुठेच काही नव्हते. रत्नागिरीचा रस्ता सोडून आमची गाडी दुसऱ्या रस्त्याने डोंगर चढू लागली अन् अर्ध्या तासात दहा मैलांचे अंतर तोडून गडावर दाखल झाली.

मी उतरलो अन् प्रथम तिथल्या मराठी शाळेत गेलो. तिथल्या मुख्य गुरुजींची ओळख करून घेतली गड फिरून दाखवण्यासाठी त्यांनी मला एक वाटाड्या दिला मला इतिहासापेक्षा वाङ्मयाचे प्रेम विशेष त्यामुळे पन्हाळा म्हणताच मला कविवर्य मोरोपंताची आठवण व्हायची. मी निघतानाच पंताच्या वास्तूचे दर्शन घ्यायचे ठरवले होते मुख्य गुरुजींना मी तशी विनंती करताच ते स्वत. मजबरोबर आले तिथल्या मामलेदार कचेरीच्या जवळ एक पडिक उभे राहून ते म्हणाले, ' हे पंताचं जन्मस्थान. '


मी त्या तृणपर्णाच्छादित भूमीला हात जोडले. त्या वास्तूचा महिमाच तसा होता. तिने महाराष्ट्राला पाऊण लाख 'ग्रंथ' रचणारा एक भगवद्भक्त महाकवी दिला होता. पंतांची आर्या म्हणजे रसिकाची गळसरी त्या वृत्तावर त्याचाच छाप त्यांनी वयाची पहिली दोन तपे इथे घालवली त्यांनी इथेच पाध्यांच्या पाठशाळेत अध्ययन केले कोल्हापूरला गानसम्राट अल्लादियाखांचे स्मारक आहे त्याचा अर्धपुतळा उभारला गेला आहे हे ठीकच झाले असे मी म्हणेन पण त्याही आधी इथे पन्हाळ्यावर महाराष्ट्रशारदेच्या या कंठमण्याचे स्मारक व्हायला हवे होते.

तिथून पुढे होऊन मी जेव्हा गडाचे चढउतार पायाखाली घालू लागलो, तेव्हा मला आंब्याच्या शेजारी फणस दिसले रसबाळ्या केळीच्या रांगेत पोफळी दिसल्या घराच्या उतरत्या कौंबळी छपरावर दोंदिल तांबडे भोपळे लोंबताना आढळले जास्वंदीच्या संगतीत सोनटक्क्याची झुडपे गवसली. गोंड्याचे गवत तर सगळीकडेच उगवलेले. पायाखालची वाट अरुंद अन् तांबडी मला माझ्या गोमंतकातल्या साटरे गडावर चालत असल्यासारखे वाटले पन्हाळ्याविषयी अंतरात कोवळीक दुणावली.

क्रीडावे मुक्तींनी माहेरी जेंवि लाडक्या मुलिनी ।

ही पंताचीच उक्ती. मीही तसाच पन्हाळ्यावर स्वच्छंद बागडलो

सज्जेकोठीजवळ आताच काळतोंड्या रामदूतांनी आमचे स्वागत केले रखवालदाराने दार उघडून आम्हाला वरच्या मजल्यावर नेले आम्ही तिथे एक खिडकी पाहिली सिद्दी जोहाराचा गडाला वेढा पडला असता शिवाजीमहाराजांनी जिथून उडी मारून त्या यवनसरदाराच्या हातावर तुरी दिल्या ती ही खिडकी ती तूर्त बुजवलेली आहे महाराजांचे जिवावरचे साहसकर्म होते ते महाराजांनी



आपल्या पदस्पर्शाने पुनीत केलेल्या एका महालात मी उभा आहे, ही भावना मला सुखद वाटत होती


तिथून पुढे मी महाराजांनीच बांधलेल्या अंबरखान्याकडे गेलो अंबरखाना म्हणजे धान्याची तीन कोठारे गंगा, यमुना, सरस्वती अशी त्याची पवित्र नावे आहेत पंचवीस हजार खंडी धान्य त्यात साठवता येते असे तिथलाच फलक वाचून कळले गडावर मोठी शिबंदी संभाळायची आणि शत्रूचा वेढा पडला असता उपासमार टाळायची तर एवढा भक्कम पुरवठा हवाच आजमितीस ती रिती म्हणूनच भकास वाटतात. त्या आता वटवाघुळांच्या वसाहती झाल्या आहेत

वाघदरवाजाच्या जवळ गेल्यावर खाली एक मोठी घळ दिसते ती टोपाच्या आकाराची आहे. तिच्यात बकुळी, नारळी अन् जांभळी शेजारधर्म संभाळून राहिल्या आहेत घळीच्या पुढे डोळे फाटतील एवढा विस्तीर्ण भूप्रदेश त्यात वारणा नदीचा नागमोडीने वाहणारा निळसर पट्टा. तो त्या वेळी उन्हाने लकलकत होता वाघदरवाजापेक्षाही 'तीन दरवाजा' भव्य आहे त्याच्या कमानी कोरीव आहेत. खालून वर चढताना जी दर्शनी कमान लागते, तिचा एक लहानसा टवका उडालेला आहे सिद्दी जोहाराने उडवलेल्या तोफेची ती निशाणी असल्याचे सांगतात तीन दरवाजाजवळच 'अंधारबाव' आहे एखाद्या खल पुरुषाच्या अंतरंगासारखे तिचे अंतरंग काळेकुट्ट आहे नायकिणीचा सज्जा म्हणून जो एक पडका बुरुज दाखवतात, तिथून गडाची दुसरी बाजू चढायची असते वाटेत एका वृक्षाच्या घनदाट छायेत नागझरी झुळझुळते त्यापुढे पश्चिमाभिमुख पराशराची गुहा आहे हा पराशर म्हणजे मत्स्यगंधेचे कौमार्य भंगवून व्यासमहर्षीला जन्म देणारा ऋषी आर्यावर्त सोडून तो इकडे कशाला आला ते कळत नाही तो कदाचित त्या वंशातला एखादा पुरुष असावा गडाच्या दक्षिण बाजूला दुहेरी तटबंदी आहे ती बाजू आक्रमणाला सोपी म्हणूनच हा विशेष बंदोबस्त दिसतो पन्हाळगडाला एक धाकटा भाऊ आहे त्याचे नाव पावनगड तो मोठ्या भावाच्या जवळिकेने उभा दिसतो.

एका काळी हा गड म्हणजे राजकीय घडामोडीचे केंद्र होता तो आता इतिहास झाला वर्तमानात बोलायचे, तर पन्हाळा हे आता हौशी श्रीमंताचे थंड हवेतले विलासस्थान बनले आहे. जिथे एका काळी मर्द मराठे रणरंग उधळून गेले, तिथे आज सिनेमावाले तोंडाला रंग फासून प्रणयरंग खेळतात

नटनटव्या पाठशिवणीचा खेळ मांडतात अनेक चित्रपटाची बाह्यचित्रणे इथे होतात काळाची करणी विचित्र खरी !

ज्योतिबाचा डोंगर पन्हाळ्याजवळच असला तरी पन्हाळ्याचे निसर्गवैभव त्याला नाही कागदोपत्री वाडी रत्नागिरी असे त्याचे नाव आहे. बारा ज्योतिर्लिंगांची बारा उपलिंगे आहेत त्यांतले एक या डोंगरावर आहे कोलासुराचा संहार करण्यासाठी जगदंबा निघाली, तेव्हा तिने जमदग्नीकडून क्रोध मागून घेतला आणि कार्य पार पडल्यावर त्याची इथे स्थापना केली तो हा क्रोधमूर्ती ज्योतिबा किंवा जोतिबा ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचे हे कुलदैवत. इथले मंदिरही त्यांनीच बांधले आहे



चैत्री पौर्णिमेला इथे मोठी यात्रा भरते ज्योतिबाला भजणारा फार मोठा समाज महाराष्ट्रात आहे

कोल्हापूरच्या वायव्येला नऊ मैलावर हे स्थान येते वरच्या पठारावर एक भव्य दगडी कमान उभारलेली आहे पण जवळपास झाडपेड नसल्याने ती एखाद्या विराणीसारखी दयनीय वाटते ज्योतिबाच्या मंदिराकडे जाण्यासाठी या कमानीतून खाली उतरावे लागते कोल्हापूरच्या मंदिरात खांबांचा सुकाळ तसा इथे दीपमाळांचा. त्या सगळ्या ज्या रात्री पाजळत असतील, तेव्हा आकाशातल्या तारागणांनाही हेवा वाटावा असे ते दृश्य दिसत असेल तो प्रकाश तरी कसा ? रखरखीत अन् अंधारभक्षक नव्हे, तर गारुडी जसा हातातल्या काडीने जमाव बाजूला हटवीत खेळापुरेशी जागा मोकळी करून घेतो, त्याप्रमाणे अंधाराला हटवून स्वत साठी बनवणारा डोळ्यांना ताप देणारा नव्हे, तर स्निग्ध आणि मंद

खाली उतरून आम्ही मंदिरात प्रवेशलो. घंटा वाजवून देवाला जागे केले मग दर्शन घेतले. देवाची मूर्ती चतुर्भुज आहे. हाती खड्ग, पानपात्र, डमरू

अन् त्रिशूळ अशी आयुधे आहेत तो घोड्यावर बसून सचाराला निघतो या रूपदर्शनावरून कोकणातल्या रवळनाथाशी अन् जेजुरीच्या खंडोबाशी त्याचे नाते जोडता येते.

देवाचे मूळ नाव केदारलिंग किंवा केदारनाथ केदार म्हणजे क्षेत्र अर्थात शेतीचे वावर त्याचे रक्षण करणारा म्हणून केदारनाथ म्हणजे मुळात हा क्षेत्रपालश्रेणीतला कृषिदेव होता, हे सांगायला नको केदारविजय ग्रथाने त्याचे माहात्म्य वाढवून त्याला महाराष्ट्राएवढे मोठे केले

ज्योतिबाचे हे स्थान बरेच प्राचीन आहे यादवकाळाच्याही मागे त्याचे उल्लेख मिळतात महानुभावाच्या स्थानपोथीत अनेक केदारस्थाने निर्दिष्ट आहेत.

इथे रामलिंग नावाचे आणखी एक मदिर आहे रामलिंगाचा संबध परशुरामाशी पोचतो त्यामुळे त्याच्या मातेलाही यमाई म्हणून स्थान मिळाले आहे. त्याच्या पित्याच्या नावाचे जामदग्न्यतीर्थही इथे दाखवतात.

रविवार अन् पौर्णिमा हे इथले दिनविशेष त्यातही चैत्रीपौर्णिमेचे माहात्म्य अधिक.त्या दिवशी इथे लाखावारी यात्रा जमते देवावर गुलाल-खोबऱ्याचा वर्षाव होतो. ' ज्योतिबाचा चां ऽ ऽ ग भले ऽ ऽ ' या उद्घोषाने सारा डोंगर दुमदुमतो

मदिराच्या प्राकारातच एक व्यवस्थित बाधून काढलेला तलाव आहे तो तिथल्या गुरववस्तीला जीवन देतो गुरुव हे तिथले पुजारी आहेत तिथल्या स्वच्छ दगडी फरशीवरून हिंडत असताना मनात विचार आला, की वनश्री या देवावर रुसली का ? का सतप्त क्रोधमूर्तीच्या नि:श्वासांनी ती जळून गेली ? अलिकडच्या पालथाणाला यमाईने मात्र जागा छान निवडली आहे तिचा आसमंत आमराई अन् कळकीची बेटे यानी शोभवला आहे डोंगरवस्तीची गुरेढोरे तिच्या आश्रयाने चरतात, जवळच्या तळ्याचे गार, नितळ पाणी पितात आणि दुपारच्या वेळी गोठणीला बसून डुलक्या घेतात

परत फिरायला थोडा उशीर होता, म्हणून मी डोंगरावर खूप भटकलो सर्व बाजू हिंडलो सर्व दिशा अवलोकल्या काल पन्हाळ्यावरून मी ज्योतिबा पाहिला होता आज ज्योतिबावरून पन्हाळा पाहिला. म्हणजे काशीची कावड रामेश्वरला अन् रामेश्वरचा सेतू काशीला असाच मला तो प्रकार वाटला

चार दिवसाच्या कोल्हापूरच्या मुक्कामात शक्य झाले तेवढे हिंडून, पाहून मी नरसोबाच्या वाडीला जाणारी बस पकडली.

# ३. कृष्णातीरी नरहरी

विदर्भ देशातले कारजे हे गाव तिथे माधव आणि अबाभवानी असे एक पुण्यशील दांपत्य राहात होते त्यांच्या पोटी शुभ दिवशी एका बालकाने जन्म घेतला. मूल जन्मले, की ते 'ट्यँहाँऽऽ' म्हणून रडते या मुलाने त्या ऐवजी ओंकार उच्चारला आईबापांनी त्याचे नाव नरहरी ठेवले 'हा जगाचा सद्‌गुरू होईल' असे ज्योतिष्यांनी त्याचे भविष्य वर्तविले पण हा मुलगा सात वर्षांचा झाला तरी ओंकाराशिवाय शब्दच उच्चारीना. बापाला वाटले, पोरगे मुके आहे हा विद्या शिकणार कसा अन् विद्येवाचून, ज्ञानावाचून जगाचा सद्‌गुरू होणार कसा ?

मुंज केल्यावर तरी याला वाचा येते का पाहावे म्हणून बापाने तो घाट घातला. गायत्रीचा उपदेश झाला आई भिक्षावळ घालायला पुढे झाली अन् काय आश्चर्य ! मुलाने चक्क 'ॐ भवती भिक्षां देहि' म्हटले सगळे लोक आश्चर्यचकित झाले आईबापांना आकाश ठेंगणे वाटले माउलीचा जीव हरखून गेला. तिने कौतुकाने मुलाला म्हटले, 'आता तू ब्रह्मचारी झालास. यापुढे गुरुगृही राहून विद्याभ्यास करायचा. माधुकरी मागून जेवायचे'

तेवढी पडत्या फळाची आज्ञा नरहरीला पुरली. तो गृहत्याग करायला निघाला. माउलीचे आतडे पिळवटले 'कुठली बोलले' असे तिला झाले.

पण शब्द गेले होते नरहरी दीनोद्धारासाठी अवतीर्ण झाला होता. तो कोणाचीही विनवणी मानीना आईबाप कष्टी झाले पुत्रमोहात गुरफटले मग बटू नरहरीने त्यांना जवळ बसवून घेतले अन् तत्त्वज्ञान उपदेशिले त्यांचा मायामोह निरस्त करून तो घरातून बाहेर पडला. काशीक्षेत्री जाऊन त्याने कृष्णसरस्वतीनामक यतिवर्याकडून चतुर्थाश्रम स्वीकारला ब्रह्मचर्यातून एकदम सन्यास. मधले दोन आश्रम गाळले. 'यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्'

( ज्या दिवशी वैराग्य येईल, त्याच दिवशी प्रव्रज्या घ्यावी ) हा उपनिषदांचा आदेश त्याने पाळला. नतर सगळ्या तीर्थयात्रा केल्या मार्गात अनेकांना मार्गी लावले. एवढे करून 'नरसिंह सरस्वती ' या नावाने हा यतिवर्य कृष्णातीरी प्राप्त झाला. पुढे ज्या दोन ठिकाणी त्याने वास्तव्य केले, तीच दोन दत्तक्षेत्रे बनली. पहिले नरसोबाची वाडी अन् दुसरे औदुंबर

नरसिंह सरस्वती हा अलीकडच्या काळातला दत्ताचा दुसरा अवतार समजतात पहिला अवतार श्रीपाद श्रीवल्लभ हा होय अक्कलकोटचे स्वामी आणि माणिक प्रभू या सत्पुरुषानाही दत्तावतार मानण्याची प्रवृत्ती आहे

पहिल्याप्रथम दत्त हाच मुळी विष्णूचा सहावा अवतार आहे भागवतातल्य, अवतारमालिकेत त्याची गणना आहे. योगिराज, अत्रिवरद, दत्तात्रेया कालाग्निशमन, योगिजनवल्लभ असे सोळा अवतार विविध कारणासाठी दत्ताने घेतले वासुदेवानदसरस्वती अर्थात टेंबेस्वामी यांनी 'श्रीदत्तात्रेयषोडषअवतारा ' या ग्रथात या सोळाही अवतारांच्या कथा दिलेल्या आहेत श्री. रा चिं ढेरे पुढे सागतात – दासोपतांच्या परपरेतील उपासनेत या सोळाही अवताराचे जन्मोत्सव पाळले जातात. शिवाय दासोपतांनाही दत्ताचा सतरावा सर्वज्ञ अवतार मानून त्याचाही जन्मोत्सव साजरा करतात

अशा या थोर यतिवर्याचे दर्शन घेण्यासाठी आम्ही वाडीला चाललो होतो फार जुनी गोष्ट आहे ज्या बसने आम्ही कोल्हापुराहून निघालो होतो ती गॅसप्लँटवर चालणारी गाडी होती त्या दिवशी तिचे काहीतरी बिनसले होते. त्यामुळे सासरी जाणाऱ्या जुन्या काळच्या नववधूसारखी ती कूर्मगती बनली होती. म्हणूनच आम्हाला दोन्ही बाजूचा परिसर सथपणे पाहता येत होता. वाटेत दोही अंगी हळदीचे मळे पसरले होते. सभोवती दाट कुपण उभारून शेवरीच्या झाडांवर चढवलेल्या मळ्यातल्या पानवेली चिकाच्या पडद्याआड वावरणाऱ्या राणीवशातल्या रमणींसारख्या अर्धव्यक्त दिसत होत्या मधूनच एक दोन उठलेली गुऱ्हाळे दिसली इक्षुरसाचा गूळ होऊन बाजारात बसला होता आणि काळी थंड चुलखडे तेवढी जाग्यावर उरली होती मध्येच एका भुईमुगाच्या वावरात दोन वालि-सुग्रीवांचे वशज शेपट्या लांबवून समोरा-समोर बसले होते एकेक वेल उपटून मुळींच्या शेंगा सावकाशपणे खाण्याचे त्यांचे काम चालले होते शेताचा मालक जवळपास नसल्यामुळे त्यांचे चागलेच

फावले होते आमची एवढी मोठी गाडी घरघरत जवळून गेली; पण त्याना तिचे ढिम्म नव्हते जयसिंगपूर जवळ येऊ लागले तसतशी निसर्गश्री मागे राहू लागली. रखरखीत माळमैदानातून जाणारा तो रस्ता दत्तक्षेत्राकडे जात असूनही हिरमुसला दिसू लागला

जयसिंगपूर हे मिरज-कोल्हापूर लोहमार्गावरचे महत्त्वाचे स्टेशन आहे पूर्वीचे शिरोळ रोड होते, ते साधे होते; पण आताचे जयसिंगपूर प्रमाणबद्ध वसलेले असून रुबाबदार आहे. हवेच्या दृष्टीने तर उत्तमच लाबलाबची क्षय-रोगी माणसे हातापायाच्या काड्या घेऊन इथे येतात आणि काही महिने मोकळ्या हवेचा खुराक खाऊन जणू पुनर्जन्म मिळवतात इथून वाडी नऊ मैलावर येते

सकाळी ११ वाजता आम्ही वाडीला पोचलो आणि तीर्थोपाध्यायाचे घर गाठले आता थोड्याच वेळात आमची दत्तदर्शनाची कामना पूर्ण होणार होती

विश्वासलो दृढ मनी तुझिया पदासी
की वारिशील म्हणुनी मम आपदांसी।
तें दाविशील नयनीं कधि सांग बा रे
अद्यापि कां नरहरी करुणा नये रे॥

म्हणून मी दत्ताचे करुणाष्टक सायकाळच्या स्तोत्रपाठात आळवीत होतो पण आज त्याला करुणा आली होती इतर असंख्य तारले तसा आणखी एक 'शुद्ध दगड' तारणे त्याला अवघड नव्हते

'दत्ताला नैवेद्य अन् पचामृत करा' हे उपाध्यांचे सोयीस्कर सांगणे आम्ही तत्काळ मान्य केले प्रथम ते आम्हाला कृष्णेच्या स्नानासाठी घेऊन गेले त्या अरुंद दगडी बोळकडीतून एक दोन वळणे घेऊन आम्ही घाटावर उतरलो. हा घाट एकदम उतरता असून पायऱ्याही उच्च आहेत घाटाच्या मध्यभागी समतळ फरसबंदीवर दत्तपादुकाचे स्थान आहे इथला कृष्णेचा प्रवाह नेहमीच पादुकाच्या बाजूला झुकलेला असतो घाटाच्या पायथ्याशी दगामस्ती करीत कृष्णा इथून खाली वाहते ज्याचे पाय दमदार नसतील तो या प्रवाहाच्या जोराने लटपटल्या-शिवाय राहणार नाही सध्या शरद ऋतू सपत आल्यामुळे पाणी पलीकडच्या अंगाने बरेच ओसरले होते. वाळवट प्रत्यही अधिकाधिक कोरडे होत होते.

कमरेइतक्या पाण्यात उभे राहून मी बुडी मारली, अंग चोळता चोळता गंगालहरी सुरू केली. श्रीटेंबेस्वामींनी कृष्णालहरी रचली आहे अन् तिच्यात गंगेपेक्षाही कृष्णेचे माहात्म्य विशेष सांगितले आहे मी एकदा कधीतरी ती वाचली होती लक्षात राहिला होता तो एकच श्लोकार्ध —

मुखं ते सह्याध: सदयहृदय ते नरहरे.
पुरेऽप्यांध्रे नाभि: प्रपदयुगल प्राच्यविषये ।

'हे कृष्णे, तुझे मुख सह्याद्रीच्या पायथ्याशी वाई क्षेत्रात आहे तुझे हृदय नरसोबाच्या वाडीत आहे आंध्रप्रदेशात कुरुगड्डी येथे तुझी नाभी आहे. आणि भरतखडाच्या पूर्वभागात तुझे पदयुग्म आहे.'

सागराशी दोन ओघानी तिची मिळणी होते, यावरून स्वामीना ही चरण-युगलाची कल्पना सुचली असावी. अशा अनेक ललितोदात्त कल्पना त्या गीर्वाण-खडकाव्यात विखुरल्या आहेत

कृष्णा ही भारतातल्या महानद्यांपैकी एक आहे महाबळेश्वराच्या कडे-कपारीत तिचा उगम होतो कऱ्हाडला कोयना तिला उराउरी भेटते सांगली-जवळ वारणा, कुरुंदवाड जवळ पचगगा, विजापूर जिल्ह्यात मलप्रभा-घटप्रभा, रायचूरजवळ तुगभद्रा आणि नळकोंडा जिल्ह्यात मुसी, अशा सप्तसरिता तिच्याशी एकजीव होतात त्या आपले जीवन देऊन कृष्णेला समृद्ध करतात.



कृष्णेच्या तटप्रांती अनेक देव-देवतांचा निवास आहे म्हणून तिच्या स्नानाचे महत्त्व !

स्नान करून आणि धूतवस्त्र नेसून मी मदिराच्या प्रवेशद्वारात पादुकाच्या सम्मुख झालो. उपा-ध्यानी आमची म्हणून आणलेली पचामृताची सामग्री पुजाऱ्याच्या हाती दिली. देवस्थानच्या घरच्या पचामृतात आमचीही पचामृते मिसळली पुजाऱ्याने काही पिकलेली केळी त्यात मुरडून त्या सगळ्या

मिश्रणाचा पादुकांवर लेप दिला नंतर तो काढून पादुकांना हंडाभर उष्णोदकाचे स्नान घातले पादुका स्वच्छ झाल्या. त्यांचा स्वाभाविक कृष्णवर्ण तकाकू लागला

जेमतेम एका माणसाला आत जाता येईल, एवढाच तो लहानसा गाभारा आहे. पुजारी त्याच पद्धतीने आत गेला कोरडे वस्त्र घेऊन त्याने पादुकांसह ती सगळी शिळा पुसून टिपून काढली बारक्या करवदाएवढ्या गंधाच्या गोळ्या करून त्याने पादुकांवर प्रत्येक बोटाच्या जागी एकेक अशा ठेवल्या हिरवी तुळशीदळे आणि फुले यांची त्यावर कलापूर्ण रचना केली.

वाडीच्या पादुकांना 'मनोहर पादुका' म्हणतात या नावाची सत्यता त्याक्षणी प्रत्ययाला आली. वाटले, की त्यावर एकवार मस्तक घासावे. पण कायदा आड आला पुजाऱ्याशिवाय अन्य कोणी पादुकांना स्पर्श करायचा नाही. किंवा दुरून पाणीही घालायचे नाही, असा अलीकडे तिथे निर्बंध आहे. जे काय पूजोपचार करायचे, ते पुजाऱ्याच्या हस्ते.

एवढ्या अवधीत माझ्या अवतीभोवती भक्तगणाची दाटी झाली काही समोर ठाण मांडून बसले काहींनी उभ्या उभ्या करसंपुट जोडले. काहींनी डोळ्यांची कमळे फुलवून पादुकांकडे टक लावली. कारण देवाची महापूजा सुरू झाली होती प्रत्येक उपचारसमर्पणाच्या वेळी 'श्रीगुरुदेवदत्त' असा भक्ति-गद्‌गद नामघोष होऊ लागला पूजा समाप्त झाल्यावर माझ्या बरोबरच किती तरी हात प्रसादासाठी पुढे झाले. प्रदक्षिणा करणारे सेवेकरीसुद्धा त्याच साठी थांबून गर्दीत घुसले.

दत्तमंदिर म्हटले, की क्षेत्रमाहात्म्य ऐकून आपल्या कल्पनाचक्षूपुढे एक भव्य आकार उभा राहतो. पण इथे तसे काहीच नाही. एक लहानशी ओवरी अन तिच्यामागे सामान्यसे औदुंबराचे झाड. प्रथम मला जरा हिरमुसल्यासारखे झाले, पण मग मी विचार केला दत्तराजाला एवढे बस्स आहे हवी कशाला ती विशाल मंदिरे अन् ती हड्याझुंबरे! पण अलीकडे या मंदिराचा विस्तार करण्याचे काम चालू झाले आहे.

दत्तराज योगी आहे, अवधूत आहे, निरंजन आहे. शाण्डिल्योपनिषदाने त्याचे ध्यान योगिरूपातच सांगितले आहे —

दत्तात्रेयं शिवं शातमिंद्रनीलनिभ प्रभुम् ।
आत्ममायारत देवमवधूतं दिगंबरम् ।
भस्मोत्धूलित सर्वांगं जटाजूटधर विभुम् ।।

'दत्तात्रेय हा शिव आहे, शांत आहे त्याची कांती इद्रनीलमण्यासारखी आहे. तो प्रभू आहे तो आत्ममायेच्या ठिकाणी रत असून दिगबर अवधूत आहे'

दत्तात्रेय हा योग आणि तत्र याचा आचार्य मानला जातो. अवधूतोपनिषद आणि जाबालदर्शनोपनिषद यातील बोध दत्तप्रणीत आहे अवधूतगीतेचा वक्ता तोच आहे त्रिपुरेच्या उपासनेची तांत्रिक पद्धती त्यानेच बसवली परशुरामकल्पसूत्र हा ग्रथ रचून त्यात तत्रशास्त्राचे सार त्यानेच सागून टाकले

दत्तात्रेय हा गुरू आहे आपण त्याला दत्तगुरू असेच संबोधतो यदू, आयू, अलर्क, सहस्रार्जुन आणि परशुराम हे त्याचे पुराणकालातले शिष्य होत. त्याना ज्ञानोपदेश देऊन दत्तगुरूने कृतार्थ केले. कार्तवीर्याने दत्तात्रेयाकडून वर मिळवून त्या बळावर आपले राज्य निष्कटक बनवले, आणि आर्यावर्तातील भूमी निर्म्लेंच्छ केली, असे विष्णुधर्मपुराणात सागितले आहे दत्तात्रेयाचे अवतार-कार्य सागताना ब्रह्मपुराण म्हणते—

'दत्तात्रेय हा विष्णूचा अवतार तो क्षमाप्रधान आहे. वेद, कर्मकांड, यज्ञप्रक्रिया याचा लोप होऊ लागला चातुर्वर्ण्य विस्कळीत झाले. धर्म शिथिल झाला अधर्माला तेजी आली सत्य नष्ट झाले असत्य बोकाळले. त्यामुळे प्रजा ऱ्हास पावू लागल्या अशा वेळी श्रीविष्णूने दत्तावतार घेतला त्याने वैदिक मार्गाला उजळा दिला. यज्ञसस्थेला पुन्हा प्रतिष्ठा मिळवून दिली चातुर्वर्ण्य सुसघटित केले.'

तेव्हापासून 'अवधूतनिरजन श्रीगुरुदेवदत्त' ही घोषणा सर्वत्र दुमदुमू लागली. आताही माझ्या भोवतीचे भक्तगण तीच घोषणा गाजवीत होते मीही त्यातच सामील झालो प्रसाद घेऊन परतलो.

तिथून वर येऊन कृष्णेकडे तोंड केले, की घाटावरची गर्दी, कृष्णेचा प्रवाह, पलीकडचे विस्तीर्ण वाळवट, त्याच्यामागे मळया, आणि त्याही पलीकडे

औरवाड गाव एवढे विशालदर्शन घडते. औरवाड हे यवनबादशहाने इथल्या देवस्थानाला समर्पिलेले गाव आहे याचे पूर्वीचे नाव अमरापूर इथे अमरेश्वराचे प्राचीन देवालय आहे

पादुकाच्या वरच्या बाजूला हारीने काही सत्पुरुषाच्या समाध्या आहेत यात्रेकरू आत जातात, नमस्कार करतात अन् बाहेर येतात. प्रवेशद्वारावरचे त्या त्या सत्पुरुषाचे नाव वाचणारे थोडेच, अन् त्याच्याविषयी जिज्ञासा दाखवणारे अगदीच विरळा ! पण ते महाभाग यती-मुनी असे उपेक्षणीय नाहीत तिथले जाणते लोक एकेकाचे जीवनचरित्र कथन करतात, ते ऐकले की त्याच्या साधनेची अन् सिद्धीची माहिती मिळते भक्तिभाव जागृत होतो ती कृष्णाच तीर्थ नाही, त्या पापतापहर पादुकाच तीर्थरूप नाहीत, तर तपाचे निधी अन् योगाचे सागर असे हे महापुरुषही वाडीच्या क्षेत्राला तीर्थरूप ठरले आहेत

प. जनार्दनशास्त्री दीक्षित याची माझी ओळख झाली आणि एकदर वाडीचे माहात्म्य त्याना मी पुसले मी नामधारक आणि ते सिद्ध अशी जोडी जमली ते मला त्यातल्या एका समाधिमदिरात घेऊन गेले अन् सागू लागले

" हे रामचद्रयोगी कुठले कोण ते नकळे महान् योगिराज ! श्रीनरसिंह सरस्वती इथे वास्तव्याला येणार, हे योगसामर्थ्याने जाणून ते त्यांच्या आधी इथे आले अन् अश्वत्थातळी येऊन बसले एका सिद्ध योग्याने दुसऱ्या सिद्ध यतीला इथे 'स्वागतम्' म्हटले रामचद्रयोग्यांनी काही काळ स्वामींची सेवा केली त्याच्या सहवासात अध्यात्मरसाची 'गुरुगोडी' घेतली आणि काळाची पावले आपल्याकडे वळलेली दिसताच ज्ञानेश्वराप्रमाणे जीवतसमाधी घेऊन काळावर मात केली ज्येष्ठ वद्य चतुर्दशी हा त्यांच्या समाधीचा दिवस ज्यावेळी कृष्णेला महापूर येऊन दत्तपादुका जलमग्न होतात, त्या वेळी देवाचे सेवेकरी या रामचद्रयोग्याची सेवा करून आपला नेम पुरा करतात. एवढा याचा अधिकार आहे "

" ही दुसरी समाधी नारायणस्वामींची हे तासगावाजवळच्या विसापूरचे गार्ग्यगोत्री ब्राह्मण याच्या घरात अग्निहोत्र होते पत्नीच्या अकाली निधनामुळे ते समाप्त झाले लगेच दोन मुलींना घेऊन हे तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले प्रपचउपाधी सपल्यामुळे त्याना आता परमार्थाची ओढ लागली होती. ईश्वराच्या साक्षात्कारासाठी त्याचा जीव तळमळू लागला होता त्याच निदि-

ध्यासात त्याचे भ्रमण चालले होते अखेर एक दिवस त्याना इथे येण्याचा दृष्टान्त झाला इथे येऊन त्यानी पादुकाची सेवा सुरू केली अतरीच्या दृढ निष्ठेने ते दत्तमहाराजाना प्रिय झाले चतुर्थाश्रम घ्यावा असे मनात येताच एका रात्री साक्षात् दत्तमहाराजानी प्रकटून याना सन्यासदीक्षा दिली तुकोबारायाप्रमाणे यांनी सदेह वैकुठगमन केल्याचे सागतात. परलोकाच्या प्रस्थानापूर्वी महाराजानी त्याना वरप्रसाद दिला. ‘ आजपासून माझ्या पूजेच्या आधी तुझी पूजा होईल ’ अजूनही हा नेम चालतो पुजारी प्रथम नारायण-स्वामींच्या पादुकांवर पाणी घालतो आणि मगच खाली श्रीच्या पूजेला येतो. अगोदर शेजारती इथे आणि मग खाली ”

“ आता या मौनीस्वामींच्या समाधीचे दर्शन घ्या या महाभागाने अखड बारा वर्षे अनवाणी काशी-रामेश्वर यात्रा केल्या. पुढे वाडीस आले. बारा वर्षे ‘ महामौन्य ’ धरून राहिले त्यांचे खरे नाव देवाला ठाऊक लोक त्यांच्या मौनावरून मौनीस्वामी म्हणूनच त्याना ओळखीत इथल्या वे. मू रामभाऊ कवीश्वर याच्या करवी शके १८१३ मध्ये त्यानी एक मोठा यज्ञ केला. या यज्ञासाठी देशोदेशीचे अग्निहोत्री आणि शास्त्री-पडित जमले होते. दक्षिणेतील बहुतेक राजेरजवाडे उपस्थित झाले होते. करवीर इलाख्यातील सगळे दूध बारा वाटांनी इथे येत होते. चहूकडून द्रव्याचे ओघ वाहात येत होते अग्नी-पुढचा निर्माल्याचा ढीग काढला, तर त्यातून पाच हजार रुपये निघाले अवभृथस्नानासाठी निघताना मौनीस्वामीची हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली शुक्लतीर्थापासून कुरुदवाडच्या घाटापर्यंत माणसांची नुसती खेचाखेच झाली होती यजमानांचे स्नान होताच हत्तीवरचा ध्वज आडवा करण्यात आला त्या सकेतासरशी हजारो मस्तके कृष्णेच्या प्रवाहात बुडून निघाली.. अशी कीर्ती आहे या मौनीस्वामीची ”

“ हे आणखी एक स्मारकस्थान दिसते ते वासुदेवानद सरस्वतींचे. यानाच लोक टेंबेस्वामी म्हणत. टेंबे हे त्याचे आडनाव होते हे सावतवाडीजवळच्या माणगावी इ स १८५४ मध्ये जन्मले वडील दत्तोपासक होते तोच वारसा यांना मिळाला हे ज्योतिषी होते, व्युत्पन्न होते, तसेच सिद्धमत्रही होते पत्नीच्या निधनानतर यानी सन्यास घेतला काही काल इथे सेवा करीत राहिले. इथे त्याना साक्षात् दत्तमहाराजाकडून मत्रोपदेश मिळाला. दत्त-

भक्ताच्या मालिकेत याचे स्थान मोठे आहे. लोक यांना दत्ताचे अवतारच समजत. यांनी दत्तमाहात्म्य वाढविण्यासाठी अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथ लिहिले महाराष्ट्रात दत्तोपासना वाढविण्यात याचा सिंहाचा वाटा आहे "

ज्या घाटावर श्रींच्या पादुका आहेत, तो घाट जनार्दनस्वामींच्या आज्ञेवरून एकनाथमहाराजांनी बांधला आहे वाडी अन् कुरुंदवाड याच्यामध्ये कृष्णा-पंचगंगा संगम झाला आहे नरसिंह सरस्वती इथे बारा वर्षे राहिले. चौसष्ट योगिनी गुप्तरूपाने प्रवाहाखालच्या आपल्या मंदिरात नेऊन त्यांना भोजन घालीत अशी कथा आहे या योगिनींना श्रींची परम भक्ती होती इथून जाताना त्यांच्या आग्रहासाठीच स्वामींनी आपल्या वाळूच्या पादुका करून इथे स्थापल्या. त्यांच्या पूजेअर्चेसाठी बहिरभटाची नेमणूक केली. हा बहिरभट म्हणजे जवळच्याच आलास गावचा भारद्वाजगोत्री ब्राह्मण वाडीच्या सगळ्या पुजाऱ्यांचा मूळ पुरुष हाच

चातुर्मास्य सोडून दर शनिवारी रात्री इथे श्रींची पालखी निघते. गाणगापुरी गुरुवाराचे महत्त्व आहे. सहस्रार्जुनाला गुरुवारी आणि जनार्दनस्वामींना शनिवारी दत्ताचा उपदेश मिळाला म्हणून हे दोन वार दत्तसंप्रदायात पवित्र ठरले आहेत

वाडीला गुरुद्वादशीची यात्रा मोठी, पण वर्षातला कोणताही दिवस यात्रेवाचून इथे सुना जात नाही. रंजले गांजले जीव इथे अनेक कामना धरून येतात पिशाच्चबाधा झालेल्या दुर्दैवी माणसांना बहुधा इथेच आणण्यात येते संध्याकाळी आरतीच्या वेळी धुपाचा वास दरवळला, की झडपणी झालेल्या माणसाच्या अंगात वारे संचरते कोणी घुमू लागतात, कोणी खांब पकडतात, तर कोणी 'सोडव रे सोडव रे' अशा आर्त हाका फोडतात. ते अंग घुसळणे, ते दात ओठ खाणे, ते कर्कश चीत्कार, असले त्यांचे चाळे सुरू झाले, की ज्याचे काळीज हरणाचे असेल, त्याच्या अंगावर काटाच उभा राहायचा खऱ्याखोट्याची शहानिशा करायला आलेल्या संशोधकाचेही अशा वेळी काळीज धडकत असेल दत्ताची कृपा झाली, की भुते पळतात, माणसे मुक्त होतात आणि पुनश्च आपापल्या संसाराला लागतात, असे अनुभव कित्येक लोक इथे सांगतात

साधकांना गोळाभर अन्न सुखेनैव मिळावे म्हणून कित्येक संस्थानिकांनी

इथे अन्नछत्रे ठेवली होती, पण संस्थाने विलीन झाली अन् त्याबरोबरच इथले अन्नदानही संपुष्टात आले. जी स्थिती वाडीची, तीच औदुंबरची.

नरसोबाच्या वाडीला जाणाऱ्या यात्रेकरूने त्याच प्रवासात औदुंबरही साधून घ्यावे. कारण ही दोन्ही क्षेत्रे तशी जवळ आहेत आणि एकाच महापुरुषाच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहेत मी तसाच विचार केला आणि औदुंबरचे प्रस्थान ठेवले.

# ४. औदुंबराच्या छायेत


औदुबर क्षेत्र दक्षिण रेल्वेच्या पुणे-मिरज मार्गावर आहे. भिलवडीला उतरायचे अन् तिथे एखादा टांगा ठरवून पुढे जायचे. तिथून औदुबर अवघे चार मैल आहे

भिलवडीला आम्ही उतरलो, ती सूर्यास्ताची वेळ होती दरदाम ठरवून आम्ही टांग्यात चढलो. टांगेवाला चाबूक हालवीत एकेक उतारू आणून भरू लागला. एका खेपेत त्याला चार खेपांची वसुली करायची होती असे दिसले मी मोजायला सुरुवात केली. सहा-सात-आठ ! कोणाला खरे वाटायचे नाही; पण त्याने एकूण नऊ माणसे कोंबली. यात मूल एकही नव्हते आणि एवढा अतिरिक्त भार ओढीत टांगेवाल्याचा तो श्यामकर्ण औदुबरच्या रस्त्याला लागला

आजही मला त्या गोष्टीचे आश्चर्य वाटते ठराविक आकाराच्या त्या वाहनात आम्ही नऊ माणसे बसलो कशी ? योगमार्गातली एवढी अणिमा सिद्धी आम्हाला कुठून प्राप्त झाली ? त्या टांग्याची धाव मोडली कशी नाही ? तो घोडा बसला नाही कसा ? आणि आम्ही सगळे हातपाय ‘ धड ’ घेऊन मुक्कामाला पोचलो कसे ?

रक्तवस्त्र पांघुरलेला पश्चिम आकाशातला तो तेजोगोल क्षणाक्षणाला अधिकाधिक सौम्य होत क्षितिज जवळ करीत होता जणू कसल्या तरी अनामिक भयाने त्याचे बिंब थरथरताना दिसत होते. आमच्या काळजाचीही अवस्था तीच होती कृष्णेच्या पात्रातल्या फरशीवरून अंधार पडायच्या आत आम्हाला परतीर गाठायचे होते तशाही परिस्थितीत जिवाची तमा न बाळगता आम्ही टांगेवाल्याला आळवीत होतो ‘ बाबा रे, जरा तुझे घोडे दामट. ’

आम्ही प्रवासी तर असे बहाद्दर, की एकाच्याही पिशवीत विजेरी नव्हती. आगपेटी असती तरीही पडत्याला 'काडीचा आधार' झाला असता



आता चक्क अंधार पडला होता अबा, दुलानितली वगैरे सप्तकृत्तिकांचा पुंज क्षितिजावर आला होता ती चंद्राची पट्टराणी रोहिणीही त्याच्या वरच्या अंगाला लुकलुकत होती, पण तो लुकलुकता प्रकाश आम्हाला सन्मार्ग दाखवू शकत नव्हता. आमची आंधळ्यांची माळ बनली होती कसेबसे धडपडत, ठेचाळत आम्ही एकदाचे औदुंबरात पोचलो कविवर्य सुधांशू यांचे घर वरच्याच अंगाला होते आम्ही त्यांच्या दारी अकल्पित अतिथी बनलो खऱ्या कवीच्या विशद अंतःकरणाने त्यांनी आमचे स्वागत केले. चहापाणी व्यवस्थित झाले.

आज शनिवार म्हणजे पालखीचा वार होता. आम्हाला ती पर्वणीच वाटली. हातपाय धुऊन पालखीच्या सोहळ्यात भाग घेण्यासाठी आम्ही खाली उतरलो. पालखी नुकतीच निघाली होती अन् पहिल्या टप्प्याचे पद सुरू झाले होते—

धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची।
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥

वाडीच्या मानाने इथे यात्रा कमी अर्थात् थाटमाटही कमीच पालखी-बरोबर नित्याचे सेवेकरी आणि यात्रेकरू मिळून जेमतेम पंचवीस माणसे असतील, पण वाडीपेक्षा इथे काही निराळाच परिणाम मनावर होतो, असे अनुभवाला आले. पालखीच्या मागोमाग आम्ही प्रदक्षिणा करू लागलो

त्यावर टांगेवाल्याने आम्हाला एखाद्या मन्याच्या रुबाबात गभीर आश्वासन दिले.

'तुम्ही राव काळजी करू नका मी अधार पडायच्या आत तुम्हाला नक्की पोचवतो तुम्ही जर माझ्याशी भाड्यासाठी घासाघीस केली असती तर माझा घोडाही आखडला असता अहो, " द्याव तस घ्याव "


" खर आहे बाबा तुझ म्हणण." आम्ही एकमुखाने त्याला पाठिबा दिला न देऊन सागतो कोणाला ! 'सुसरबाई तुझी पाठ मऊ !' आम्ही गमती-गमतीने त्याच्याशी बोलत होतो तोही चेडू टोलवावा तसा आमच्या गमतीची परतफेड करीत होता पोटार्थी असूनही त्याची मान ताठ होती. कदाचित ते सातारा जिल्ह्याचे पाणी असावे तो स्वाभिमानी असावा किंवा आमच्या अगतिकतेचा फायदा घेत असावा

पण काहीही असले तरी त्याने सहोक्ती अलकार साधला एवढे खरे ! सूर्य क्षितिजाखाली बुडाला अन् आम्ही टांग्यातून उतरलो अवघडलेले अग अन् हातपाय झाडून झटकून लगेच आम्ही कृष्णेच्या पात्राकडे उतरते झालो.

कृष्णेला पायउतार होता तिच्या पात्रातली ती फरशी दोन अडीच हात रुद होती पण तिच्यावर शेवाळ दाटले होते त्यामुळे पाय निसटत होते पाणी पुरुषी गुडघ्याच्यावर होते. खालच्या खळाळावर पश्चिमाकाशाचा आरक्त साध्य रग हळुवारपणे पसरला होता उजवी बाजू निळी गभीर होती आमच्या-मध्ये जे सडे होते, ते सुलभपणे पैलपार झाले. जे परिग्रही होते त्याना पुनश्च 'पाणिग्रहण' करावे लागले लग्नातली सप्तपदी भूमीवर अन् गृह्याग्नीच्या भोवती तर ही शतपदी खळाळत्या जोरकस जलधारेमधून सप्तपदीच्या वेळचे रोमाच अनाघ्रात सुखाचे तर या वेळचे रोमांच सूक्ष्म भयाने अन् थडीतल्या शीत स्पर्शाने उठलेले. काहीही असले तरी माझ्या सोबत्यांनी आपापली 'जबाबदारी' अक्षरशः 'पार' पाडली. आम्ही सगळी सुखरूप पैलतीर गाठून उभे राहिलो. कोणीतरी विनोदाने म्हटले, 'सगळी माणस मोजून घ्या एकदा !'

देवाच्या पायाशी पोचायला अजून अर्धा मैल वाट तुडवायला हवी होती. ती वाट शेताच्या बाधाबाधाने होती अन् तितकीच काट्याकुट्याचीही होती.

आम्ही प्रवासी तर असे बहाद्दर, की एकाच्याही पिशवीत विजेरी नव्हती आगपेटी असती तरीही पडत्याला 'काडीचा आधार' झाला असता



आता चक्क अंधार पडला होता अबा, दुलानितल्ली वगैरे सप्तकृत्तिकांचा पुंज क्षितिजावर आला होता ती चंद्राची पट्टराणी रोहिणीही त्यांच्या वरच्या अंगाला लुकलुकत होती, पण तो लुकलुकता प्रकाश आम्हाला सन्मार्ग दाखवू शकत नव्हता आमची आंधळ्यांची माळ बनली होती कसेबसे धडपडत, ठेचाळत आम्ही एकदाचे औदुंबरात पोचलो. कविवर्य सुधांशू यांचे घर वरच्याच अंगाला होते आम्ही त्यांच्या दारी अकल्पित अतिथी बनलो खऱ्या कवीच्या विशद अंतःकरणाने त्यांनी आमचे स्वागत केले. चहापाणी व्यवस्थित झाले

आज शनिवार म्हणजे पालखीचा वार होता आम्हाला ती पर्वणीच वाटली. हातपाय धुऊन पालखीच्या सोहळ्यात भाग घेण्यासाठी आम्ही खाली उतरलो. पालखी नुकतीच निघाली होती अन् पहिल्या टप्प्याचे पद सुरू झाले होते—

धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची ।
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥

वाडीच्या मानाने इथे यात्रा कमी. अर्थात् थाटमाटही कमीच पालखी-बरोबर नित्याचे सेवेकरी आणि यात्रेकरू मिळून जेमतेम पचवीस माणसे असतील, पण वाडीपेक्षा इथे काही निराळाच परिणाम मनावर होतो, असे अनुभवाला आले. पालखीच्या मागोमाग आम्ही प्रदक्षिणा करू लागलो

दाटलेल्या अंधारात अन् वृक्षांच्या परिवारात ती शुभ्र मेघडबरी दत्तपादुका हृदयात साठवून बसली होती शंकराचे ध्यान धरून हिमाचलावर अहोरात्र तप'श्चर्या करणाऱ्या गौरीसारखी ती मला वाटली आणि ते वरचे निळे स्वच्छ आकाश त्या लहानग्या घुमटीवत मला फक्त दत्ताच्या पादुकाच दिसत होत्या, तर गगनांगणात 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ती'च्या जन्माचे समग्र आख्यान मांडले होते. उत्तरेला सारथिपुंजातला ब्रह्महृदयाचा तो ठळक तारा म्हणजे विष्णू. त्याच्या दक्षिणेस असलेला अग्नी म्हणजेच महेश जवळ रोहिणी नक्षत्राचा अधिपती मानलेला तो ब्रह्मा असे हे ब्रह्मा-विष्णु-महेश आपापल्या स्थानी विराजमान होते.

पण पुढे काय झाले ? एक दिवस स्त्रीहट्टापुढे निरुपाय होऊन अनसूयेच्या सत्त्वहरणासाठी त्यांना अत्रीच्या आश्रमात जावे लागले, पण झाला प्रकार उलटा त्या महासतीचे सामर्थ्य त्या तिघांच्या एकवटलेल्या सामर्थ्याहून आगळे ठरले. तिने त्यांना अबोध अर्भके बनवली अन् त्यांचा पाळणा लोंबवला चार पायांचे लंब चौकोनी मृग नक्षत्र जर पाळण्याच्या जागी कल्पिले, तर त्याच्या मधला इषुत्रिकांड ही तीन गोजिरी बालके म्हणता येतील. दुसऱ्या प्रकाराने बोलायचे तर जीव हा अविद्येच्या घोंगडीत गुरफटलेला, तर ईश्वर हा मायेची शाल पांघुरलेला दत्तोपासनेत घनिष्ठ संबंधाने असलेली त्रिपुरसुंदरी ही मायाच आहे मृगाच्या ठिकाणी जर तिची कल्पना केली, तर आतला इषुत्रिकांड म्हणजेच मायोपाधिक 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ती' दत्त म्हणता येणे सहज शक्य आहे दत्ताच्या चित्रात नेहमी आढळणारी कुत्रीही तिथे गगनमंडळात आहेतच. एक लुब्धक मंडळाची श्वानाकृती अन् दुसरा प्रश्वा.

हा सगळा देखावा दक्षिणाकाशात चमचमत होता. मार्गशीर्ष पौर्णिमेचा प्रदोष हा दत्ताचा जन्मकाल आहे त्या दिवशी सूर्यास्ताला दत्तजन्माचा गुलाल उधळत असता वर मृगाचा पाळणा आतल्या तीन बाळांसह पूर्व क्षितिजावर झुलू लागतो

दत्त हा मोठा का ? तर तो अयोनिसंभव आहे राम-कृष्ण हे एकट्या विष्णूचे अवतार तर, दत्त हा ब्रह्मा-विष्णु-महेशाच्या अंशापासून अवतीर्ण. म्हणूनच त्याला 'तीन शिरे सहा हात' असे लोकविलक्षण रूप प्राप्त झाले. हेच आजचे त्याचे सर्वपरिचित ध्यान आहे.

पण दत्तात्रेयकल्पात त्याचे मूळचे ध्यान सांगितले आहे ते असे–'दत्त हा एकमुख अन् चतुर्भुज आहे त्याचा वर्ण हिमगौर आहे एक हात व्याख्यानमुद्रेत अन् दुसरा गुडघ्यावर टेकवलेला आहे वरच्या दोन हातात दोन कमळे आहेत नेत्र अर्धोन्मीलित आहेत ' दत्ताचे हे ध्यान म्हणजे योगध्यान होय



हा योग त्याला शंकराने उपदेशिला त्यासाठी दत्ताला गौतमीच्या तीरावर दीर्घ तप करावे लागले म्हणजे तपावाचून काही लाभत नाही, ही भारतीय संस्कृतीची धारणा दत्ताच्या बाबतीतही अपवाद ठरली नाही

दत्तसंप्रदायात ध्यानासाठी दत्ताचे सगुण रूप स्वीकृत असले, तरी पूजा मात्र मूर्तीऐवजी पादुकांचीच होते. औदुंबर, नरसोबाची वाडी अन् गाणगापूर ही तीन सुप्रसिद्ध दत्तक्षेत्रे तीन्ही ठिकाणी पादुकाच आहेत या संबधात एक वेगळा विचार श्री रा. चिं ढेरे यांनी मांडला आहे –

मूर्ति-मंदिरांचा विध्वंस करणाऱ्या यवनांच्या अत्याचारापासून आपल्या श्रद्धास्थानांना सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यांच्या उपास्य प्रतीकाशी काहीसे साम्य दाखविण्यासाठी शिलाखंडावर निर्माण केलेल्या पादुकांची उपासना दत्त संप्रदायातील मोठ्या व्यक्तींनी हेतुपूर्वक रूढ केली असावी.

पालखी झाल्यावर दत्तमहाराज शयनस्थ झाले आणि आम्हाला निद्राधीन व्हायला मोकळीक झाली सकाळी उठलो तरी थंडीची हुडहुडी कमी होईना पण दर्शन करायचे तर स्नान करणे भागच होते म्हणून घाटाची वाट धरली कृष्णेत बुडी मारणे जिवावर आले. पण ती मारताच मात्र एक नवी ऊब ताबडतोब अंगात संचरली जे पोहणारे होते, त्यांनी चार हात मारून त्या अथांग निळ्या डोहाचा बहुमान केला बाकीचे पिशवीत आणलेल्या भुईमुगाच्या शेंगा डोहातल्या माशांना टाकू लागले माशांची ही झुंबड उडाली. मासे भले

लठ्ठ होते. कारण त्याना रोज खुराक मिळत होता. त्यांच्या दुहेरी अग्राच्या शेपटचा पाण्यात लवलवत होत्या. त्यातला एखादा जवान गडी अगाचे धनुष्य करून जलपृष्ठावर उसळी मारी अन् पुनश्च तळठावात घुसे. त्याच्या त्या कसरतीचे कौतुक किती म्हणून करावे ! त्या थव्यात श्रीहरीच्या मकरकुडलांना शोभतील अशा मध्यम आकाराच्या मासोळ्याही चुळबुळत होत्या इथल्या परिसरात कोणीही माशासाठी गळ टाकायचा नाही असा दडक असल्यामुळे यात्रेकरूना त्यांचे कौतुक पाहता येत होते.

त्या मत्स्यक्रीडेवर खिळलेली दृष्टी निग्रहाने बाजूला घेऊन मी कृष्णेच्या पात्रात दूरवर फिरवली केवढा विस्तीर्ण तो डोह ! पाणी जणू हालतच नव्हते खाली वाहतच नव्हते एकच कृष्णा, पण नरसोबाच्या वाडीला ती अवखळ बनते, तर इथे सकल्प-विकल्पाचा उपशम झाल्यावर स्थितप्रज्ञ जसा शांत, गभीर होतो, तशी तिची अवस्था होते वरून सूर्यताप होतो, म्हणून ती कढत नाही आत मोठमोठ्या सुसरी सुरसुरतात म्हणून ती उबगत नाही परिसरातल्या मळ्या महामूर पिकतात, म्हणून ती उपकार सागत नाही आणि वर्षाकालात महापुरामुळे श्रीच्या पादुका बुडतात अन् मग तिथे चिखलाचे थरावर थर दाटतात म्हणून ती खत करीत नाही

घाटावरून मंदिराकडे येत असताना कवी सुधाशू यांनी चार ओळीत त्या परिसराचे वर्णन ऐकविले—

> **खालुनी वाहते करुणा परमेशाची**
> **अन् तीरावरती बसली माय जगाची ।**
> **वटवृक्ष वरी सोडून जटा भूमीस**
> **प्राचीन वसे जणु मूर्ती योगीशाची ।।**

सुस्नात होऊन दत्ताला प्रदक्षिणा घालीत असताना सभोवतीच्या ओवऱ्यात दोघे अनुष्ठानी गुरुचरित्राचे पारायण करताना दिसले. ही पारायणे कदाचित सकाम असतील, कदाचित मोक्षाच्या उद्देशानेही असतील. कोण त्यांना विचारणार ! एवढे खरे, की तपावाचून काही लाभत नाही तप करावे, निग्रहाचे बळ गाठी बाधून ईश्वराचे अधिष्ठान मिळवावे आणि मग ' सर्वभूतहिते रत ' होऊन कार्यक्षेत्रात उतरावे असे आपली सस्कृती सागते विधात्याला सृष्टी निर्मायची होती, पण साधन सापडेना, सामग्री गवसेना तो सभ्रांत

झाला. नारायणाला शरण गेला तेव्हा नारायणाने शून्याच्या गाभाऱ्यात शब्द घुमवले, ते 'तप, तप' हेच.

दत्तात्रेयाचे एकेक शिष्य तपःसाधनेचे मेरुमदार होते तो कार्तवीर्य सहस्रार्जुन दत्तकृपेसाठी देहाची आटणी करीत बसला होता भार्गव परशुरामही तसाच मदालसेचा पुत्र अलर्क याने माहूर येथे स्वत चे शिरकमल दत्तचरणी वाहिले होते. सव्वा लाख 'गीतार्णव' रचणाऱ्या दासोपंतांनी प्रथम बारा वर्षे सह्याद्रीवर अन् नतर बारा वर्षे गोदाकाठी उग्र तप आचरले होते. जनार्दन-स्वामी देवगडावर जी साधना करीत, तीही याच तोलाची होती या सर्व निष्ठावत भक्तावर गुरुकृपा बरसली होती टाकळीस पुरश्चरण करीत असता दत्तात्रेय रामदासस्वामींच्या पुढेही प्रकटले होते त्या योगिराजाने स्वामींना अपूर्व योगसिद्धी देऊन 'समर्थ' असे सार्थ नाव त्याना दिले होते.

सोवळ्या ओवळ्याच्या बाबतीत दत्तसप्रदाय कडक असला तरी तो प्रपचाला पराङ्मुख करणारा नाही बहुतेक प्राचीन दत्तभक्त रजोगुणी क्षात्र वृत्तीचेच आढळतील. दत्तात्रेयाने निरनिराळ्या भक्तांना केलेल्या उपदेशाचे सार पाहिले, तर त्याला लोकोपकारार्थ कर्मयोगच अभिप्रेत दिसतो

दत्तावतार तसा प्राचीन आहे नरसिंह सरस्वतीच्या पूर्वी महाराष्ट्रात आणि त्याबाहेरही दत्तोपासना रूढ होती नाथ सप्रदाय हा या देशातला एक पुराणपथ तो सर्व भारतभर गाजत होता. तो सप्रदाय अवधूत आहे, तसा दत्तही अवधूत आहे 'अवधूत निरजन श्रीगुरुदेवदत्त' हा दत्तभक्ताचा उद्घोष असतो नाथयोग्याचे अन् दत्ताचे काही लागेबाधे दिसतात नाथजोगी सचारात आपल्या सगे कुत्री बाळगीत दत्ताची चार कुत्री हे चार वेद आहेत, अशी भाविक धारणा. पण ती पटण्याजोगी नाही ती दत्ताच्या अवधूत वेषात सचार करण्याची सामक्षा आहे नाथपथात योगसाधनेला, तसेच गुरुसस्थेलाही प्राबल्य आहे ही दोन्ही तत्त्वे दत्तसप्रदायातही तितक्याच महत्त्वाची आहेत म्हणूनच त्या सप्रदायाने दत्ताला उपास्य मानले नाथसप्रदायात दत्त-गोरक्ष भेटीच्या अन् सवादाच्या अद्भुत कथा ऐकायला मिळतात श्री रा चिं ढेरे सागतात की गिरनार येथील दत्तस्थान नाथपथाच्याच प्रभावाखाली आहे

नाथसप्रदायाप्रमाणेच महानुभाव सप्रदायानेही दत्ताचे महिमान वाढविले तशा अर्थाने पाहायचे, तर महानुभाव हा दत्तसंप्रदायच आहे त्याची परपरा

दत्तात्रेय–चांगदेव राऊळ–गुंडम राऊळ–चक्रधर अशी चालले. 'या मार्गासी श्रीदत्तात्रेयप्रभू आदिकारण' असे पंथसंस्थापक चक्रधर याने स्वतःच सांगून ठेवले आहे त्याच्या 'पंचकृष्णां'त दत्तात्रेयाचाही समावेश आहे

मात्र दत्तोपासनेचा संप्रदाय बनला, तो नरसिंह सरस्वतीच्या पासून शालिवाहन शकाच्या चौदाव्या शतकाच्या मध्यावर त्यांचा अवतार झाला त्या वेळी उभा महाराष्ट्र यवनसत्तेच्या टाचेखाली होता हिंदुजनता अतित्रस्त झाली होती पोटी भय बाळगून जीवन कठीत होती कोणी पुसता नाही, कोणी आपंगिता नाही 'अशी सर्वत्र अशरणता. त्यामुळे देवा-धर्मावरचा विश्वासही डळमळला होता

अशा या दुर्धर लोकस्थितीत अवतरून नरसिंह सरस्वतीनी पीडित जनतेला धीर दिला. अनेक प्रसंगी आपल्या योगसामर्थ्याचा साक्षात्कार दाखवला. असंख्य लोकांना दुःखमुक्त केले स्त्री-पुरुषांना सोज्वळ आचारधर्म उपदेशिला हिंदूवर तशीच अहिंदूवरही आपल्या तपोबलाची छाप पाडली. खुद्द बेदरचा मुसलमान बादशहाही एके प्रसंगी स्वामींना शरण आला. त्याच्या पायाला फोड झाला होता अन् दुखणे विकोपाला गेले होते नरसिंह सरस्वतींच्या पायाशी आल्यावरच त्याचे दुखणे बरे झाले


शके १३८० या वर्षी स्वामींची अवतारसमाप्ती झाली त्यानंतर सुमारे शंभर वर्षांनी ५३ अध्यायाचा गुरुचरित्र हा ग्रंथ सरस्वती गंगाधराने रचला हा ग्रंथ दत्तसंप्रदायाचा वेद ठरला हा ग्रंथ दत्तभक्ताच्या घरी कपाटात न राहता देवघरात बसतो भागवत ग्रंथाच्या सप्ताहापेक्षाही गुरुचरित्राचे सप्ताह अधिक वाचले जातात

औदुंबराच्या छायेतून मी मंदिरप्रदक्षिणा करीत होतो लहानमोठे अनेक औदुंबर या क्षेत्राचे नाव सार्थ करतात दत्ताला औदुंबर प्रिय आहे वड-पिंपळाप्रमाणेच औदुंबरही पावन आहे ऐतरेय ब्राह्मणात याच्या फळाना 'मधु' म्हटले आहे क्षत्रिय कुमाराच्या हाती उपनयनात औदुंबराचाच दंड दिला जातो यज्ञप्रसंगी यूप उभारीत, तो याच वृक्षाचा. 'दर्वी' हे यज्ञपात्रही याचेच करीत औदुंबर हा यज्ञकर्मात सर्व औषधींचा प्रतिनिधी होऊ शकतो इष्ट वृक्षाच्या समिधा मिळू शकल्या नाहीत, तर 'तद्भावे' औदुंबराच्याच वापरतात

देवळाच्या वरच्या भागाला एक 'आजोबा' वड आहे आम्ही गेलो त्या दिवशी त्याच्यावर शुकगणाची महा परिषद भरली होती हिरव्या पर्णसभारात त्यांच्या लाल लाल चोची मनोज्ञ रंगसंगती दाखवीत होत्या त्यांची फडफड सुरू होती, त्या अर्थी परिषदेचा अध्यक्ष अजून यायचा असावा

त्या वडाच्या खालून जाणाऱ्या वाटेने आम्ही ब्रह्मानंदस्वामींच्या मठाकडे गेलो हठयोगाचे आचार्य असलेले हे स्वामी इ स. १८२५ मध्ये इथे आले इथेच त्यानी समाधी घेतली हे मठस्थान शांत आहे, प्रसन्न आहे आणि पावनही आहे त्याच्याच समोर कृष्णेच्या पात्रात सिद्धमठ आहे. पण उन्हाळ्यातसुद्धा त्याच्यावर गुडघाभर पाणी असते यावरून असे अनुमान करता येते, की पूर्वी तो मठ तीरावर असावा आणि नदीचा प्रवाह दत्ताच्या चरणाजवळ सरकल्यामुळे त्या मठाला जलसमाधी मिळाली असावी 'पुरा यत्र स्रोत पुलिनमधुना तत्र सरिताम्'( पूर्वी जिथे प्रवाह होता तिथे आता नदीचे वाळवंट बनले आहे) असे भवभूती म्हणाला, ते निसर्गाच्या अशा उलथापालथी पाहूनच

दुपारी भोजन उरकून आम्ही भुवनेश्वरीच्या दर्शनाला जाण्यासाठी नावेत बसलो नाव सुसाट निघून पैलतीरास थडकली. भुवनेश्वरीचे स्थान औदुंबराच्या पूर्वेस आहे जुनाट देऊळ, पुजाऱ्याशिवाय मनुष्यवस्तीचा अभाव आणि झाडाझुडपाचे नावसुद्धा नाही त्यामुळे देवद्वारी टेकल्यावर लगेच तिथून उठावेसे वाटते ही त्रिभुवनाची ईश्वरी इथे अनाथासारखी दिसते आमच्या मार्गदर्शकाने आम्हाला गाभाऱ्याजवळ एका जागी बोट दाखवून सांगितले, की इथे खाली भुयार असून ते भिलवडीच्या घाटापर्यंत



गेले आहे आम्ही 'हो का?' म्हटले, पण विश्वास ठेवला नाही. कारण

भुयाराच्या अशा कथा आम्ही अनेक ठिकाणी ऐकल्या होत्या शनिवार वाड्यातून पर्वतीपर्यंत एक भुयार आहे अशी दतकथा आम्ही पुण्यातसुद्धा ऐकत नाही का ?

या भुवनेश्वरीजवळ एक उग्र गंभीर घटना घडल्याची इतिहासात नोंद आहे करवीर क्षेत्रातला एक ब्राह्मण मतिमंद होता. आपल्याला विद्या यावी अशी त्याला फार तळमळ होती ते गुरुगृही जमेना म्हणून तो भुवनेश्वरीकडे आला तिथे तपाला बसला बराच काळ लोटला, तरी भुवनेश्वरी प्रसन्न होईना. ब्राह्मण अगदी निकरावर आला देवीपुढे आपली जीभ हासडायला निघाला मग मात्र देवीने त्याला दर्शन दिले. ती म्हणाली, 'ब्राह्मणा, नदीच्या पलीकडे जा तिथे औदुंबरातळवटी एक महातापसी बसला आहे त्याचे पाय धर तो तुझ्या मनीचे आर्त पुरवील '

हा तापसी म्हणजे नरसिंह सरस्वती. गुप्तरूपाने काही काल आत्मचिंतनासाठी त्यांनी हे औदुंबरवन निवडले होते, पण भुवनेश्वरीने या मतिमंद ब्राह्मणाला त्यांच्याकडे धाडून त्यांना उघडकीस आणले तो मूढ ब्राह्मण केवळ स्वामींच्या वरदहस्ताने वेदशास्त्रसंपन्न झाला ही वार्ता सर्वत्र पसरली. अन् मग काय ? जो तो आपले दैन्य-दुःख घेऊन स्वामींकडे धावू लागला.

भुवनेश्वरीच्या दारातून आम्ही भिलवडी स्टेशनाची मोहोर धरली ती पाऊलवाट शेतातून जात होती त्या काळ्याशार भूमीत अन्नपूर्णा हसून डोलत होती. दोन्ही बाजूंनी लवून आलेल्या भरघोस जोंधळ्याच्या कणसांना हळुवार हातांनी दूर सारीत आम्ही चालत होतो ते मोतीदाणे पाहात असता, भारतात अन्नाचा दुष्काळ आहे या गोष्टीवरचा विश्वासच क्षणभर उडाला आमच्या भोवती कोसन् कोस पसरलेली विस्तीर्ण शेतेच शेते त्यात मुख्य पिकाच्या आश्रयाने कडधान्ये आणि भाजीपाला तयार होत होता.

भर दुपारची वेळ मोकळ्या निळ्या घुमटाखालची पायवाट वर 'नक्षत्र' तापलेले आणि आम्ही स्टेशनकडे चाललेले. स्टेशन भागातली छपरे दिसत होती. पण कितीही चालले तरी ती जवळ येईचनात सुपारीचे खांड चघळूनही घशाची कोरड कमी होईना एवढ्यात डाव्या बाजूच्या शिवारात दोन झोपड्या दिसल्या आम्ही पाण्याच्या आशेने नकळत तिकडे वळलो झोपड्याच्या दारात बैल मध्यान्हीची डुलकी घेत होते जवळच चार दोन उघडी पोरे बागडत

होती. पाहुण्याचा जमाव एकाएकी उपस्थित झाल्याने झोपड्यांतून बाहेर आलेल्या बायकांच्या डोळ्यांत आश्चर्य ओथबले.

आम्ही पाणी मागितले. त्यांनी जवळच्या विहिरीकडे बोट दाखविले. लहानशीच, पण मोट चालणारी विहीर होती ती. आत उतरायला घसरडी वाट होती. पाणी बर्फ घातल्यागत गार होते. 'कांतायते स्पर्शसुखेन वारि' (स्पर्शसुखाने पाणी जणू कांतास्पर्शाची आठवण करून देत आहे) असेच एखाद्या कवीने त्याचे वर्णन केले असते. ते थोडेसेच पिऊन आमची तृषा हरली. अधिक प्यालो ते लोभ सुटेना म्हणून आता स्टेशन अगदी जवळ आले होते. पण आता ते आणखी लांब असते तरी आम्हाला त्याची पर्वा नव्हती. मी त्या विहिरीकडे पुन्हा एकदा वळलो अन् तिला कवीचा आशीर्वाद ऐकवला.

हे कूप त्वं चिरंजीव स्वल्पतोये बहुव्ययः ।

'हे कूपा, तू चिरंजीव हो कारण तुझे जल अल्प असूनही तू ते उदारपणे खर्च करतोस.'

# ५. पंचवटीच्या परिसरात

नासिक-पचवटीच्या यात्रेसाठी आम्ही पुण्याहून निघालो, ते दिवस वसत ऋतूचे होते आगगाडीपेक्षा बसने जाणे सोयीस्कर म्हणून आम्ही तोच मार्ग पत्करला खेड, नारायण-गाव, सगमनेर, सिन्नर या गावावरून हा रस्ता नासिकला जातो. प्रथम पुष्पोद्गम, नतर नवपल्लव, त्यापुढे भ्रमरसमुदाय आणि त्याहीवर कोकिळ-कूजन अशा क्रमाने वसत ऋतू अवतीर्ण होतो, असे सस्कृत कवी म्हणतात पण आमची बस जात होती तो रस्ता मात्र या वर्णनाला एकदम प्रतिकूल होता सगळीकडे रुक्ष अन् रखरखीत ! जिथे वनाचाच अभाव, तिथे वसताने अवतरायचे कसे अन् आपला विलास दाखवायचा तरी कसा ?

सगमनेर जवळ येऊ लागले तोच मध्यान्हाचे काव्य तळपू लागले. पाया-खाली जमीन काळी डोक्यावर आकाश निळे झाडी नसल्यामुळे हिरव्या रगाचाच तेवढा दुष्काळ ! गावाच्या आश्रयानेसुद्धा झाडे वाढली नव्हती. एका ठिकाणी जवळच्या नदीचे पाणी ढोसून गुरेसुद्धा उन्हातच गोठणीला बसली होती. सगळ्या घरावर सकाळपासून सध्याकाळपर्यंत ऊन्हच ऊन्ह लहानपणी एखाद्याने खोडी काढल्याची तक्रार घेऊन आजीकडे गेलो, की ती म्हणायची 'थांब हू ! आपण त्याच घर ऊन्हात बांधू.' उन्हात घर ही केवढी जबर शिक्षा असली पाहिजे, हे त्या गावावरून जाणता येण्यासारखे होते

उन्हाच्या जोडीला कढत वारेही डोळे अन् कानशिले भाजीत होते धुरळा तर लोटांनी उठायचा अन् गाडीत घुसायचा गोदावरीच्या आधी त्यानेच आम्हाला सचैल स्नान घातले. नाकात, तोंडात, डोळ्यांच्या पापण्यावर तोच एक पदार्थ बाहेर उन्हाळा, आत धुरळा, त्यामुळे जीव कासावीस होऊ लागला.

नासिक हे द्राक्षांसाठी प्रसिद्ध तेव्हा म्हटले, शहराच्या जवळ पोचल्यावर तरी आमची बस द्राक्षाच्या मळ्यातून जाईल पण ते स्वप्नच ठरले एवढ्यात

नासिकरोड स्टेशन आले. आता फक्त ४–५ मैल जायचे होते आणि रस्ताही चागला होता कोर्ट, कचेऱ्या, शाळा यांच्या इमारतीवरून आमची बस मुक्कामावर येऊन थडकली तब्बल साडे सहा तासांनी आम्ही नासिक क्षेत्रात पदार्पण केले.

मुक्कामावर पोचताच जेवण तयार असल्याची सूचना मिळाली 'शत विहाय भोक्तव्यम्' (शभर गोष्टी बाजूला टाकून आधी जेवावे) हे सुभाषित पोटातल्या भुकेने मला सुनावले, पण पुढचा चरण निराळेच सांगत होता– 'सहस्र स्नानमाचरेत्?' (हजार गोष्टी बाजूला टाकून स्नान करावे) त्या हजारात जेवणही आलेच मी नासिकला केवळ भोजनभाऊ म्हणून थोडाच गेलो होतो! भूक खवखवली होती, हे खरे, पण त्या बरोबरच यात्रेकरूंच्या अगी न कळत येणारी तितिक्षा मलाही आली होती.

म्हणून मी धोतर-पचा खाद्यावर टाकून सरळ नदीची वाट धरली नासिक शहर हे नदीकाठी वसले असल्यामुळे कोणताही उताराचा रस्ता शेवटी नदीलाच जाऊन मिळतो

वस्तुत पचवटीच्या बाजूने असलेल्या रामकुडावर जाऊन स्नान करण्यात खरे यात्राफल पण हे माहीत असूनही मी ती गोष्ट त्या वेळी टाळली. रिकाम्या पोटी तीर्थोपाध्यायांच्या चक्रव्यूहात सापडण्याची माझी तयारी नव्हती नासिक अन् पचवटी यांना जोडणारा 'सेतुबध' जिथून सुरू होतो, तिथेच सुदर-नारायणाच्या मदिराकडून मी खाली उतरलो तिथे छाया होती अन् पाणीही भरपूर होते त्यामुळेच गावातली कित्येक अवखळ मुले तिथे जलक्रीडा करायला आली होती नगरपालिकेने 'जलरक्षक' म्हणून नियुक्त केलेला एक पजाबी निर्वासित त्याना दटावीत होता, 'बाहेर व्हा' म्हणत होता.

मी सुस्नात होऊन शुद्ध मराठी मत्राने ओंजळ भरून अर्घ्य दिले–

तुज हृदयगम रवें विहगम भाट
सकाळी आळविती।
तरु तीरींचे तुजवर वल्लीपल्लव
चामर चाळविती।
तुझ्या प्रवाही कुंकुम वाही बालरवी
जणु अरुणकरी।

जय सजीवनि ! जननि पयोदे
श्रीगोदे भवताप हरी ॥


राजकवी चद्रशेखराच्या 'गोदागौरवा'तल्या या पदपक्ती आहेत या निमित्ताने त्यांच्या सस्कारवती वाणीतून एक प्रसन्न पावन काव्यगगा अवतीर्ण झाली आहे. गोदामाईची असाधारण भक्ती तिच्यातून वाहते जगन्नाथ पडिताची जशी सस्कृत गगालहरी तसाच हा चद्रशेखरांचा 'रसिके अक्षरे मेळविलेला' मराठी गोदागौर व जगन्नाथ हा हाडाचा पडित. अतरातली उद्धाराची तळमळ व्यक्त करीत असताही पांडित्याने त्याची पाठ सोडली नाही. त्याने गगामातेशी भक्तिवादाबरोबरच युक्तिवादही माडला आहे कारण ती त्याची जित्याची खोड पण चद्रशेखर मात्र गोदेकडे कोणताही युक्तिवाद न करता आपला अनन्य भक्तिभाव तिला समर्पून मोकळे झाले आहेत

माझे ते स्तोत्र ऐकून तो मुलाना दटावणारा 'भय्या' मजकडे आला मला वाटले, आपल्यालाही हा आता काही तरी सुनावणार. 'चलो, हटो यहासे' म्हणणार. पण त्याचे डोळे उग्र नव्हते उलट ते काहीसे तरळलेच होते. त्याला मी कोणी तरी निराळा वाटलो असेन. जवळ येऊन त्याने 'कोण कुठले ?' म्हणून माझी चौकशी केली हातातली लाठी टाकून आणि घटकाभर आपला सेवाधर्म विसरून तो एका पायरीवर बसला मी न विचारताच त्याने आपली कर्मकहाणी सुरू केली. साठीच्या घरात गेलेल्या पण दणकट हाडापेराच्या त्या वृद्धाच्या डोळ्यांतून आसवांचे थेब त्याच्या करड्या दाढीवर साडू लागले फाळणीच्या वेळचा तो हाहाकार! ते सैतानी क्रूर थैमान ! त्या पजाबी भय्याचे देशात दुकान होते चार गडीमाणसे पदरी होती मुलगे होते अन् सुनाही होत्या पण अचानक सैतानाची धाड आली मुलांची हत्या झाली सुनांची विटबना झाली होत्याचे नव्हते झाले वाचला तो हा म्हातारा संसाराला मुकलेला. घरादाराला पारखा झालेला

हे सारे राक्षसपुराण तो मला ओल्या डोळ्यानी सागत होता त्याची पजाबी मला कळायला कठीण जात होती माझी मराठी त्याला तशीच वाटली असेल पण जिभेच्या भाषा भिन्न असल्या तरी हृदयाची भाषा सर्वत्र एकच असते आणि ज्याची माणुसकी शाबूत आहे, त्याला ती कळायला उशीर लागत नाही. त्याचे सोलीव दु ख मी जाणले. माझी सहानुभूती त्याने जाणली. पण त्याला

माझ्याकडून हवी होती ती 'ओली' सहानुभूती ती मिळताच त्याने मला एक सलाम ठोकला अन् आपली लाठी उचलली मी मनात म्हटले, 'काही नुकसान झाले नाही एवीतेवी मी स्नानविधीची दक्षिणा कोणाला तरी देणारच होतो 'देशे काले च पात्रे च –'

भाविक असो वा तार्किक असो, कोणालाही गोदास्नानाची अपूर्वाईच वाटेल गोदावरीला 'दक्षिणगंगा' असे म्हणतात. गंगा आणि गोदा या दोघींचाही शंकराच्या जटेशी संबंध असल्यामुळे त्या 'शांभवी' आहेत भाविकांची तर अशी धारणा आहे, की दोघींचे संदेश एकमेकींना पोचविणारा एक मध्यस्थ गुप्त प्रवाह भूगर्भातून असला पाहिजे या महानदीला गंगेच्या खालोखाल, क्वचित गंगेपेक्षाही वरकड मानतात रेवातीरी तप करावे, गंगातीरी देह ठेवावा आणि कुरुक्षेत्रात दान करावे, अशी त्या त्या क्षेत्राची महती आहे पण या सगळ्या गोष्टी एका गोदातीरी केल्या तरी तेच पुण्यफळ लाभते, असा स्कंदपुराणाचा निर्वाळा आहे. उगम, मध्य आणि शेवट अशा तीन्ही ठिकाणी ती सारखीच पावन आहे



गोदावरीला महाराष्ट्राची 'सरस्वती' म्हणायचा एक रसिक संकेत आहे. खोल अर्थाने पाहिले तर ती अध्यात्माचीही रसगंगा आहे. तिच्यातून वाहतो, तो जलसंभार नव्हे, तर विशुद्ध सत्त्वगुण हिच्या तीरावर जे सारस्वत निर्माण झाले, ते विश्वात्मैक्याचे आणि जिवाशिवांच्या सामरस्याचे हिच्या तीरावरचे खग - मृग आणि पात्रातले दगडगोटेसुद्धा विश्वप्रेमाची मंगलसूक्ते गात असतील

गंगेच्या काठी तप पोसले. यमुनातीरी प्रेम दाटले. नर्मदाकिनारी योग वाढला कृष्णाकाठी सामर्थ्य तळपले आणि गोदातीरी भक्तिज्ञानाचा एकमेळ साधून मनुष्यमात्राला मोक्षाचे महाद्वार खुले करणाऱ्या एका महान् संस्कृतीचा विस्तार

झाला महाराष्ट्रातला भागवतधर्म हिचेच स्तन्य पिऊन पुष्ट झाला आहे तिच्या काठची नासिक आणि पैठण ही दोन नगरे संस्कृतिकेंद्रे म्हणून सातवाहनाच्या काळापासून प्रसिद्ध आहेत

त्र्यंबकेश्वरी ब्रह्मगिरीवर हिचा उगम झाला वस्तुत: पश्चिम समुद्र तिला अगदी जवळ म्हणजे पन्नास मैलांवर होता तिच्या दोन धाकट्या बहिणी- वैतरणा अन् दमणगंगा यांनी हे जवळचे ‘स्थळ’ पसंत केले आणि पश्चिम अंगाने झेंप टाकली पण गोदावरीने मात्र वेगळा विचार केला. तिला सागर- मिळणी साधायची होतीच, पण त्या आधी एका विशाल भूपृष्ठाचे सौंदर्य वाढवायचे होते तट प्रदेश समृद्ध करून जनांचे दैन्य दूर करायचे होते

म्हणून तिने पूर्व समुद्राच्या बाजूने नऊशे मैलाचा दीर्घ प्रवास पसंत केला ती प्रथम एकटीच ध्येयमार्गावर आरूढ झाली पण वाटेत तिला आणखी काही जीवींच्या सांगातिणी भेटल्या. प्रथम दारणा भेटली नंतर प्रवरा मिळाली पुढे बाले घाटातली मांजरा जवळ आली अजंठ्याच्या डोंगरात जन्मलेल्या पूर्णेनेही तिचीच कास धरली. सिरोंचा येथे प्राणहितेने तिच्यात आपला प्राण- रस मिसळला. नंतर इंद्रावती आणि शबरीही भेटल्या या संगमानंतर गोदावरीने आपली दिशा बदलली ती दक्षिणवाहिनी झाली. साधकाच्या मार्गात काम- क्रोध, तसे मोठमोठे पर्वत त्या मार्गात तिला आड पडले. पण तिने त्याच्याशी चांगलाच सामना दिला अनेक नद्यांच्या जलौघाची संघशक्ती तिच्या पाठीशी असल्यामुळे तिने त्या पर्वतांना फोडीत, तोडीत राजमहेंद्रीचे मैदान गाठले तामिळनाडच्या राज्यात आल्यावर तिने आपल्या एका प्रवाहाचे सात प्रवाह केले अन् जणू सप्तहस्तांनी सागराला मिठी घातली ती जनसेवेत कृतार्थ होऊन सागराकडे आली होती म्हणून सागराने या वरवर्णिनीला लहरींच्या अनंत करांनी कुरवाळले. त्याच्या संतत हास्यात तिचेही हास्य मिसळले.

नासिक क्षेत्राला या गोदावरीनेच महत्त्व मिळवून दिले आहे भारतातील पंच महातीर्थांत त्याची गणना होते याला ‘पश्चिम काशी’ असेही म्हणतात दोन हजार वर्षांपूर्वी टॉलेमी नावाचा एक इजिप्शियन प्रवासी आपल्या भारत- यात्रेत नासिकला आला होता क्षेत्र अन् व्यापारीपेठ अशा दोन्ही अंगी नासिक क्षेत्र गाजत असल्याचे तो सांगतो. ‘नासिका’ असा त्याने याचा उल्लेख केला आहे. पतंजलीच्या महाभाष्यात ‘नासिक्य’ असे त्याचे नाव आढळते.

युगमानाप्रमाणे त्याला अनेक नावे मिळाली आहेत. कृतयुगात याला पद्मनगर म्हणत. त्रेतायुगात त्रिकंटक म्हणून ओळखीत. द्वापरात जनस्थान म्हणून नावाजीत. आजचे नासिक हे 'नवशिख' शब्दाचा अपभ्रंश असल्याचे सांगतात. याच्या आसपास नऊ टेकड्या असल्यामुळे याला नवशिख म्हणत असावे. बहुजनांना कदाचित ठाऊक नसेल, पण मुसलमानी अमलात त्यांनी याचे 'गुल्शनाबाद' असे नवे नामकरण केले होते. औरंगजेबाच्या एका सुभेदाराने इथली पंचवीस देवळे पाडून एकचतुर्थांश शतकृत्य केल्याचे इतिहास सांगतो.

गोदावरीच्या दक्षिण तीरावर नासिक अन् उत्तर तीरावर समोरच पंचवटी आहे. दोन्ही क्षेत्रे समान योग्यतेची आणि प्रातःस्मरणीय आहेत. पंचवटीत प्रभू रामचंद्राने आपली पर्णकुटी उभारली होती. रामाच्याही पूर्वी कितीतरी वर्षे विंध्य ओलांडून अगस्त्य मुनी दक्षिणेत उतरला होता. [illegible] त्याने 'दक्षिणापथ' तयार केला होता. दक्षिण दिशेला आर्यांना वाहती वाट करून देण्याचे श्रेय अगस्त्यालाच दिले पाहिजे. पंचवटीपासून दोनच योजनांवर त्याचा आश्रम होता. अत्रस्थ आर्येतरांनी त्याच्या या आक्रमणाला कसून विरोध केला असला पाहिजे, पण अगस्त्य तलवार घेऊन आला नव्हता, तर प्रेमाचा महामंत्र घेऊन आला होता. त्याने हळूहळू आर्येतरांचा विरोध शमवला. त्या मूळ वस्तीकरांबरोबर त्याने सौरस्य निर्माण केले. एक विशाल संस्कृती त्याच्यापाशी होती. ती देऊन त्या आर्येतरांना 'आर्य' करून टाकले. हा सर्व प्रदेश अगस्त्याने कसा निर्वैर बनवला ते खुद्द रामानेच लक्ष्मणाला सांगितले आहे. गोदावरीच्या उत्तर तीराला गौतमतीर अन् दक्षिण तीराला वसिष्ठतीर म्हणतात. त्यावरून या दोघां ऋषिप्रवरांनीही अगस्त्याच्या या सांस्कृतिक कार्याला हातभार लावला असावा असे अनुमान निघते. ब्रह्म-क्षत्राच्या सहकारानेच दक्षिणेतल्या या आर्यवसाहती सुप्रतिष्ठित झाल्या. त्यांनी मूळ रहिवाशांचे निर्मूलन केले नाही, तर त्यांचा आपल्या जयिष्णू संस्कृतीत समावेश करून टाकला.

प्रभू राम आपला वनवास पुरा करण्यासाठी कदाचित दुसरीकडेही कुठेतरी गेला असता, त्याला कैकेयीने काही पंचवटीतच राहायचा निर्बंध घातला नव्हता. पण अगस्त्यऋषीने त्याला इथली गोडी उत्पन्न केली. तो रामाला म्हणाला, 'इथे हरणे असंख्य आहेत. फळामुळांचीही वाण नाही. वृक्ष घनदाट

आहेत. शिवाय गोदावरीसारख्या महानदीचे सान्निध्य आहे तेव्हा तू जन-स्थानातच राहा आणि आमच्या यज्ञयागांचा विध्वंस करणाऱ्या राक्षसाचा उच्छेद कर '

रामरायाने त्या तपोवृद्ध मुनींचा आदेश शिरोधार्य मानला पंचवटीत आश्रम उभारून त्याने पित्याचे वचन आणि राक्षसाचे निर्दालन ही दोन्ही कार्ये एकाच वेळी पार पाडली त्या दिवसापासून आजतागायत पंचवटीत राममहिमा गाजून राहिला आहे

पण ही झाली पुराणकालीन गोष्ट इतिहासाचा धागादोरा कुठपासून सापडतो, हे पाहायचे तर आंध्रभृत्यांच्या राजवटीपासून प्रारंभ करावा लागेल या आंध्रभृत्यानाच पुढे सातवाहन अशी संज्ञा लाभली. हे सातवाहन सूर्यवंशी म्हणजे रामाच्याच वंशातले होते. महाराष्ट्रातला पहिला ऐतिहासिक महावंश तो हाच. सनपूर्व २०० ते इ स. २०० पर्यंत यांनी महाराष्ट्रवर अधिराज्य केले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी डोंगर पोखरून लेणी खोदली गेली, ती यांच्याच सत्ताकालात. सातवाहनानंतर त्या भागाची सत्ता आभीरांच्या हाती गेली अजनेरीचा किल्ला हे त्यांचे मुख्य ठाणे होते सहाव्या शतकाच्या प्रारंभी हा प्रदेश चालुक्यानी हस्तगत केला त्यानंतर आले राठोड त्यांची पहिली राजधानी मयुरखंडी येथे उभी झाली. त्यानंतर देवगिरीच्या यादवांची अमदानी सुरू झाली. त्याचा काळ फिरल्यावर मुसलमानी सत्ता तिथे आली त्यांच्या कालात या क्षेत्राची पडझड होऊन त्याला अवकळा आली त्या नंतर अठराव्या शतकाच्या मध्यावर पेशव्यांनी त्याचे मुख उजळ केले पेशवाई बुडून इंग्रजाचा अमल जारी झाला असला तरी त्याच्या कारकीर्दीत या क्षेत्राच्या महात्म्याला धक्का लागला नाही

नासिक-पंचवटीत जी कलापूर्ण मंदिरे आहेत, त्यातले एक सुंदर नारायणाचे हे १७५६ साली सरदार चंद्रचूडानी बांधले मी जिथे स्नानाला उतरलो होतो, तिथे वरच्याच बाजूला ते असल्यामुळे मी प्रथम तिकडे वळलो खरं सांगायचे तर मला देवापेक्षा देवळाचीच उत्सुकता अधिक होती.

प्रवेशद्वारात उभा राहिलो तर त्यानेच माझी दृष्टी खिळवली कोरीव नक्षीने खच्चून भरलेला असा तो दरवाजा आहे. खाली दोन बाजूना दोन कीर्तिमुखे, त्यांच्या बाजूला दोन पार्षद, चौकटीवर घुमटीत कोरलेला लंबोदर

गजवदन, त्यावर दगडी झडप आणि त्याहीवर सुदर मेहरप. तिथल्या नक्षीतला रेखीवपणा आणि समतोलपणा मुक्तकठाने प्रशसावा असा आहे या मदिराला दिशासाधन आहे मार्चच्या २१ तारखेला उगवत्या सूर्याचे किरण सरळ सुदर नारायणाच्या पायांवर पडतात या मदिराच्या ततोतत समोर नदीच्या पलीकडे कपालेश्वर मंदिर येते कपालेश्वराच्या मदिरातून सुदर नारायणाच्या गर्भागारातला दिवा दिसतो, असे सागतात. कपालेश्वराचे नाव अनायासे आले, तेव्हा इथेच त्याला दोन वाक्सुमने वाहून पुढे जावे हे बरे।

कपालेश्वर रामकुडाच्या जवळ आहे उचावर असल्यामुळे बऱ्याच पायऱ्या चढून वर जावे लागते वरून गोदावरीचे विहगम दर्शन चांगले होते प्रदक्षिणा करताना प्राकारातल्या पिंपळाची सळसळ कानी पडते. कपालेश्वराचे वैशिष्ट्य हे, की त्याने आपले वाहन चरायला सोडले आहे. ज्याच्या शिंगांमधून शिव-दर्शन घेण्याचा सकेत, तो नदी त्याच्यापुढे नाही. तो नसायला पुराणकाळात एक सबळ कारण घडले आहे

ब्रह्मदेव आणि शकर या दोघात एकदा कसली तरी गभीर चर्चा सुरू झाली तिच्यात विधात्याच्या युक्तिवादापुढे शकराचा टिकाव लागला नाही. त्याने 'शेष कोपेन पूरयेत्' केले आणि क्रोधाच्या भरात विधात्याच्या चार मस्तकापैकी एक मस्तक सरळ धडावरून खाली उतरवले. पण ते ब्रह्मकपाळ सरळ वर उडाले आणि शिवाच्या अगाला चिकटले ते कसे झाडून टाकावे ही शिवाला विवचना पडली. त्या ब्रह्महत्येच्या परिमार्जनासाठी तो बरीच तीर्थ-क्षेत्रे हिडला पण कुठेच काही घडले नाही शिव वैतागला, उबगला अशा स्थितीत वेड्यासारखा हिंडत असता तो एका रात्री एका झोपडीजवळ विसावला तिथे एक सवाद त्याच्या कानी पडला एक ढवळा बैल आपल्या आईला सांगत होता –

" आई, माझा धनी मला फार छळतो आहे पाहीन, पाहीन अन् एक दिवस त्याचा काटा काढीन "


त्यावर आई त्याला म्हणाली,

" बाबारे, तुला ब्रह्महत्या लागेल. "

" ऊ त्यात काय मोठसं! गोदावरीत स्नान केल, की ब्रह्महत्या जाते, हे मला ठाऊक आहे "

वळचणीला उभ्या असलेल्या शंकराने हा संवाद ऐकला. तो त्या बैलोबाच्या मागावर राहिला बैलाने उक्तीप्रमाणे कृती केली अन् गोदावरीत बुडी मारली तो छळवादातून सुटला, तसाच ब्रह्महत्येच्या पापातूनही. शंकराने हे प्रत्यक्ष पाहिले त्यानेही पाठोपाठ बुडी मारली. त्यासरशी त्याच्या अंगाला चिकटलेले ब्रह्मकपाळ गळून पडले शिवाला आनंद झाला बैलाच्या जातीने आपल्यावर उपकार केले म्हणून त्याने बैलाला आपल्या सेवेतून मुक्त केले

पंचवटीतले नारोशंकर राजेबहाद्दर यांनी बांधलेले रामेश्वराचे मंदिर ही



तर एक अजब कलाकारी आहे इतके कुसरीचे देऊळ नासिक पंचवटीत दुसरे नाही. जिथे दृष्टी जाईल तिथेच ती पागळून राहते अंतर्भागापेक्षा बहिर्भागावर मन अधिक जडते जसे दक्षिणेतील ह ळे बी ड - बे लू र येथे गेलेल्या माणसाचे होते, तसे. काय पाहू अन् काय नको ! मंदिराच्या बाह्य कटिबंधावर खाली कोरीव नक्षीची जाळी तिच्यावर त्याच लांबीची चंचुपुरात मौक्तिक-माला घेऊन उभी असलेली मयूरपंक्ती. त्यावरही तशीच कीर्तिमुखाची ओळ दृष्टी वर केली तर चारी दिशांना पाषाणमूर्ती गोसावी दिसले कुठून एवढे आले कोणास ठाऊक ! ते पद्मासन घालून बसले आहेत एका हाती जपमाळ. दुसऱ्या हाती पोथी. म्हणजे केवळ धुनी पेटवून गांजा ओढीत बसणारे नव्हेत, तर ज्ञानसाधक मस्तकी जटाभार. त्यांच्यापैकी काहींचे हात काळाने विच्छिन्न केले आहेत, पण तरीही त्यांचा आसनबंध सुटलेला नाही.

या नारोशंकर मंदिराच्या बाह्यभागाचे आणखी एक आकर्षण म्हणजे प्राणि-संमेलन वाघ, वानर, हत्ती अशा अनेक प्राण्यांची तिथे हजेरी लागली आहे हिंदुसंस्कृती केवळ माणसापुरती मर्यादित नसून तिचे भावनात्मक लागेबांधे

पशु-पक्षी, वृक्ष-पाषाण, इथवर पोचले आहेत. संस्कृतीच्या व्यापकत्वाचे हे एक प्रमुख लक्षण. ते या नारोशंकराभोवती ठळकपणे दिसते.

मंदिराच्या भोवती ११ फूट उंचीचा तट आहे. त्यावर तीन कोपऱ्यांत तीन सुबक मेघडंबऱ्या दिसतात. चौथ्या कोपऱ्यावरही होती, पण कोणत्या तरी साली गोदावरीने महापुरात नेली म्हणे ! 'नारोशंकराची घंटा' हा आता वाक्प्रचार झाला आहे. एखादी बाई सतत चढ्या सुरात बोलत असली तर तिला नारोशंकराची घंटा म्हणतात. याच देवळापुढे ती आहे. वसईच्या संग्रामात तिथल्या पोर्तुगीजांच्या चर्चवरून ती काढून आणलेली आहे. तिच्यावर १७२१ असा आकडा आहे. तटावरून चढून जाऊन एखाद्या लहान पोरालासुद्धा तिचा 'घणाण घणाण' नाद उठवता येईल. नारोशंकराच्या देवळात यात्रेकरूंची जा-ये खूप असली तरी पंचवटीतले मुख्य मंदिर मात्र हे नव्हे.

तो मान आहे काळ्या रामाचा. कोणताही यात्रेकरू या रामाचे दर्शन घेतल्यावाचून क्षेत्र सोडीत नाही. मी तिथे पोचलो ती वेळ रात्रीच्या पहिल्या प्रहराची होती. मंदिरात सर्वत्र प्रकाश पसरला होता. राजीवलोचन श्रीराम भक्तभाविकांना नेत्रोत्सव करण्यासाठी सुवेष, सालंकृत होऊन उभा होता. त्याची मुखमुद्रा न्याहाळताना वाटले, की तो जणू मला म्हणत आहे, 'तू आलास ? ठीक झालं. मी तुझीच वाट पाहात होतो.'

स्थानाचा प्रभाव का मनातला भाव कोण जाणे ! पण त्या मूर्तीपुढे कर-संपुट जोडून उभा राहताच हृदयस्थ आत्माराम सुप्रसन्न झाला हे मात्र खरे ! रामचंद्र या जोड शब्दात रम् धातू आहे. त्याचा अर्थ रमवणारा असा होतो. 'रामो रमयतां वरः' आणि चंद्र आहे तो तर आल्हाददायक. 'सप्तलोकैकवीर' ही रामप्रभूची बिरुदावली असली, तरी त्याचे दर्शन वृत्तींना चेव आणीत नाही, तर अंतःकरण शांत आणि समाहितच करते.

मी त्या मूर्तीवर डोळे जडवले. पाहता पाहता तिथले देऊळ अदृश्य होऊन त्या जागी एक पर्णकुटी उभी झाली. सभोवती वेतांची बेटे डोलू लागली. वृक्ष-वेली बहरल्या. कडेवर घडा घेऊन जानकी त्या पर्णकुटीतून बाहेर आली. तिची रातोत्पलासारखी आरक्त नाजूक पावले गोदावरीच्या दिशेने चालू लागली. तिने पाणी भरून आणून नुकत्याच स्वहस्ते लावलेल्या बालतरूंचे शिंपणे सुरू केले. कृष्णसार हरणे तिच्याकडे धावत आली. ती तिच्या कामात

गोड अडथळे आणू लागली शिपणे सपते न सपते तोच तिचा 'आर्यपुत्र' रघुकुलतिलक तिथे आला तो शिकार करून दमून भागून आला होता त्याला श्रमपरिहारासाठी जरा वेळ अंग टाकायचे होते. त्यासाठी तो लताकुंजाकडे वळला, तसा सीतामाईने त्याचा मागोवा घेतला तिने आपली 'सुवृत्त' माडी रामरायाला उशी केली गोदेच्या तरंगावरून आलेल्या शीतल वायुलहरींनी त्याच्या मुखावरचे घर्मबिंदू सुकवले त्यासरशी रामाची नेत्रदळे आपोआप मिटली

हा एक भावप्रसंग मनात विलसला. उल्हासला, एवढ्यात दुसऱ्या एका दारुण घटनेने त्याची जागा घेतली

मारीचमामा मायामृग होऊन तिथे आला सीतेला त्याच्या सोनेरी कातड्याची काचोळी करावीशी वाटली रामाने त्या मायामृगाचे रहस्य तिला समजावून सांगितले, पण सीतेला ते पटेना शेवटी स्त्रीहट्टापुढे रामाला मान झुकवावी लागली रामाने त्या मृगाचा पाठलाग आरंभिला. पाठोपाठ रावण याचक वेषाने तिथे दाखल झाला. त्याने सीतेला अलगद उचलले आणि लंकेचा आकाशमार्ग धरला अकल्पितपणे विपरीत घडले. राम परत येतो तो आश्रम सुना! सीता कुठे दिसेना अन् हाकेला प्रतिसादही देईना त्याच्या मनात कुशंकाचे काहूर उठले सीता हातची गेली असे त्याला वाटले राम प्रियावियोगाने कासावीस झाला. वृक्ष-पाषाणांना मिठ्या मारीत सैराट भटकू लागला डोळ्यांत अश्रुधारा अन् मुखात 'हा सीते!' असा करुण विलाप! मुक्या वेलींनी दक्षिण दिशेचे पल्लव हालवून रामाला सीतेचा मार्ग सुचवला. आश्रमहरिणींनी मुखातले दर्भकवल टाकून दक्षिणेकडे टक लावली; पण रामाला उमज पडेना तो दिवसभर खूप भटकला आणि रात्री निराश होऊन एका शिलाखंडावर आडवा झाला. सृष्टीवर पसरलेले सौम्य, रुपेरी चांदणे पाहून त्याने लक्ष्मणाला म्हटले,

"लक्ष्मणा, अरे उन्हात काय बसला आहेस वेड्यासारखा, असा सावलीत ये"

"दादा, हे ऊन आहे का? तू असा कसा भ्रमलास? हे तर चांदणं पसरलं आहे तो पाहा आकाशात मृगलांच्छन चंद्र—"


"काय म्हणालास? मृग? मग माझी मृगनयना कुठे?"

आणि रामाला पुनश्च शोकाचा उमाळा आला. 'हाय! माझी सीता! जनकराजाची लाडकी कन्या! वडिलांची आवडती सून!'

मज राजकन्यके तू वरुनिया पावलीस न सुखाते।
खाते हे चित्ताते सांगू कोणास मी स्वदुःखाते ॥

रामरायाचा हा वियोग-विलाप सर्व महाकवीनी हृदयातल्या द्रवाने लिहिला आहे अयोध्येतल्या सिंहासनाधिष्ठित राजा रामापेक्षा पचवटीतला वनवासी राम माझ्या भक्तीला अधिक पटतो त्याच्या देवपणातले माणूसपण इथेच प्रकट झाले आहे

काळचा रामाचे हे वैभवशाली मदिर ओढेकर जहागिरदारानी बाधले आहे. १७८२ साली त्याच्यावर कळस चढला त्या आधी पुरते एक तप त्याचे काम चालले होते रोज दोन हजार माणसाचा त्यासाठी घाम गळत होता. तेवीस लाख रुपये त्या कामी खर्च झाले या मदिरावर कलाकुसर नाही. आहे तो भव्यपणा अन् डोळ्यात भरण्यासारखा नितळपणा त्याला लागलेले एकजात सगळे दगड रामशेजेच्या डोगरावरुन आणलेले आहेत मदिराभोवती दगडी प्राकार असून त्याला लागून चारी दिशाना अग्रशाळा बाधलेल्या आहेत समोरचे मारुतीचे मदिरही मुख्य मदिराला साजेसच आहे सहज एक गोष्ट मनात आली पचवटीत असताना रामरायाला मारुतीचा परिचय घडला नव्हता तेव्हा इथे मारुती नसता तरी चालले असते



नासिक पचवटीतली ही बहुतेक सारी मदिरे पेशवाईच्या काळातली आहेत. आपली पवित्र क्षेत्रे मुसलमानांच्या तावडीतून सोडवण्याचे महत्कृत्य पेशव्यांनी इथे तडीला नेले छत्रपती शाहूमहाराजांनी दक्षिणेत आल्यावर मोगलसम्राटा-कडे त्र्यबकेश्वराची मागणी केली होती पण तिला वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या पेशव्यांच्या मनात ही गोष्ट सलत होती. १७५० च्या सुमारास त्यांनी

नासिक अन् त्र्यंबक ही दोन्ही क्षेत्रे मराठी राज्यात आणली त्यासरशी तुडवली गेलेली सांस्कृतिक भावना पुनश्च उसळून वर आली पेशव्यांचे अनेक सरदार, जहागिरदार क्षेत्राची अवकळा घालवण्यासाठी पुढे सरसावले त्यांनी आपली संपत्ती शतधारांनी इथे ओतली पाडलेल्या जागी पुनश्च नव्या, सुंदर मंदिरांची उभारणी झाली महाराष्ट्राचे कलावैभव पुनश्च तळपू लागले स्वाभिमानावरची काजळी झडली यात्रिकांचे विषारी शल्य उपटून निघाले.

इथली प्रसिद्ध मंदिरे हेमाडपंती आहेत हेमाडपंताचे शुद्ध नाव हेमाद्री तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात हा यादवांच्या राज्यात करणाधिप होता. आपल्या कारकीर्दीत शेकडो मंदिरे उभारून त्याने लोकांच्या भक्तिभावाला बहर आणला त्याने मंदिररचनेची जी एक विशिष्ट पद्धती स्वीकारली, तिला पुढे हेमाडपंती असे नाव पडले अशा मंदिरांचे दगड सांधण्यासाठी चुना वापरलेला नसतो भूमितिशास्त्राला अनुसरून काटकोन, त्रिकोण, चौकोन अशा आकारात दगड कापायचे आणि एकमेकात घट्ट बसवायचे. त्यामुळे मंदिराला सहज कंगोरे निर्माण होतात दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराच्या खांबावर, घुमटावर अन् सभामंडपात रामायण-महाभारतातले प्रसंग कोरलेले असतात चालुक्य, द्रविड आणि जैन शिल्पातले काही प्रकार या पद्धतीत एकत्र आढळतात पूर्वकाळातल्या हेमाडपंती देवळात मूर्तींची विपुलता दिसते, तर उत्तरकालीन मंदिरात काटकोन-त्रिकोणांचे काम अधिक आढळते नासिक-पंचवटीतल्या या मंदिरांची रचना पुढीलप्रमाणे सांगता येईल—

समोर महाद्वार. बाजूची दोन पक्षद्वारे प्रत्येक द्वारावर द्वारमंडप आणि वर त्याला शोभेशी बैठी घुमटी त्यापुढे चौरस सभामंडप त्यावरही अंतर्गोल असा एक घुमट त्यामागे वाटोळे देवाचे गर्भागार त्यावर चौकोनी उंच निमुळते शिखर द्वारमंडप कमी रुंद असतो आणि गर्भागाराची रुंदी सभामंडपापेक्षा अधिक असते अशा विषम रचनेचे हे बांधेसूद शिल्प किती प्रेक्षणीय असते, ते पाहिल्यावाचून कळायचे नाही

नासिकक्षेत्रात बारा महिने यात्रा असते भरतखंडातल्या सर्व भाविकांना हे क्षेत्र पावन वाटते दर बारा वर्षांनी सिंह राशीला गुरू येतो, तेव्हा तर यात्रिकांचा महापूर लोटतो उभे वर्ष नासिकचे वातावरण गोदेच्या जयघोषाने दुमदुमत असते त्या वर्षी गंगायमुनादी सप्त सरिता दक्षिणेतल्या या गोदा-

ताईच्या घरी पाहुणेराला येतात, असे पुराणात लिहिले आहे 'सिंहस्थ पर्वणी' म्हणतात, ती हीच प्रयागला कुंभमेळा तसे नासिकचे हे सिंहस्थ

गोदावरीतले रामकुंड ही इथली स्नानाची अन् श्राद्धादी विधींची जागा सकाळपासून तो तिसऱ्या प्रहरापर्यंत रामकुंडाभोवती दाटी असते आबालवृद्ध तिथे आपले मलिन देह बुडवून काढतात पुलाखालून पात्रात एक पाट खोदून रामलक्ष्मणाच्या कुंडात पाणी नेलेले आहे एवढ्या महात्म्याचे हे रामकुंड, पण त्या मानाने ते विस्तृत नाही, तसे होण्याची गरज आहे पण आजवर त्या गोष्टीकडे कोणी लक्ष दिलेले नाही कित्येक सुपुत्र आपल्या पितराची उद्धरगत व्हावी म्हणून त्याच्या अस्थी याच कुंडात आणून विसर्जित करतात घाटावर ठायी ठायी श्राद्धाचे पिंडदान चालते. मण मण वजनाच्या आपल्या तांबड्या वह्या पोटाळून 'गंगापुत्र' मोक्याच्या जागा धरून बसलेले असतात त्यांची पोटार्थी नजर चौफेर भिरभिरत असते.

मी कुंडावर स्नानाला गेलो त्या सिंधी यात्रिकाचा बराच मोठा पाळा तिथे उपस्थित झाला होता घाटावरच त्यांच्या काही मुलांची 'जनोई' ( मुंज ) चालली होती स्थंडिलावर अग्नी सिद्ध झाला होता. बाजूला लाकडी उपकरणे मांडलेली होती मेखलाबंधन केलेल्या बटूभोवती नातलग स्त्री-पुरुषांचे घोळके बसले होते. त्याला नव्या वस्त्राभरणांनी भूषवीत होते. ते दृश्य जितके-लोभसवाणे तितकेच शेजारी चाललेले प्रकार निर्दय होते. काही सिंधी आई-बापांनी त्याच पर्वणीत आपल्या मुलींचेही चौल उरकून घ्यायचे ठरवले होते दोन-अडीच वर्षांच्या त्या कोवळ्या मुलींच्या मस्तकावर नापिताचा वस्तरा खराखरा चालत होता. त्या पोरी हातपाय झाडून आक्रंदत होत्या तो कोरडा घाट अश्रुधारांनी भिजवीत होत्या. पण त्यांच्या आयाबायांनीच त्यांना गच्च दाबून धरले होते त्यांना पुण्य गाठी बांधायचे होते तेवढा वेळ काळीज दगडाचे बनवणेच भाग होते ते संस्कारकृत्य जेव्हा 'सफाई' उरकले, तेव्हा मातृहृदयाला पान्हा फुटला मग त्या मुंडित अर्भकांची आजारणी गोंजारणी सुरू झाली घाबरून, यातना भोगून अर्धमेली झालेली ती अश्राप बाळे मग सुटकेचा श्वास सोडून आयांच्या उराशी बिलगली

काळ्या रामाच्या देवळापासून जवळच एका वटवृक्षाच्या छायेत सीता-गुंफा आहे तिच्या मुखावर एक धर्मशाळा बांधलेली आहे तियला हक्कदार

असलेला गोसावी तीन पैसे घेऊन लोकांना गुहेत सोडतो त्या निरुंद विवर-मार्गातून आत उतरताना बसून घसटत, घसटतच जावे लागते जाणारा माणूस येणाऱ्याचा मार्ग बंद करतो सात आठ पायऱ्या उतरल्यावर एका मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाशात राम-लक्ष्मण-सीतेच्या मूर्ती दिसतात त्याच गुहेला खाली डाव्या हाताला दुसरा एक फाटा फुटलेला आहे त्याच्या मुळाशी एका शिव-लिंगाचे दर्शन घडते तिथे हवा आत शिरायला दुसरी वाट नाही; पण तरीही जीव घाबरा होत नाही खर-दूषणांच्या समरप्रसंगी रामप्रभूने आपली चित्कला जानकी इथे लपवून ठेवली होती, असे सांगतात. या गुहेतून रामशेजेच्या डोंगरापर्यंत एक भुयार खोदलेले आहे अशी किंवदंती आहे. पण या बाबतीत खऱ्या खोट्याची शहानिशा कोण करणार !

मी गुहेतून बाहेर पडलो आणि पंचवटीच्या पूर्वेला तपोवनाकडे निघालो पादत्राणे एका सुरक्षित ठिकाणी ठेवली होती, ती घ्यायची विसरलो. खडे, काटे पायात रुतायला लागले, तेव्हा त्यांची आठवण झाली. पण झाले ते एका अर्थी योग्यच झाले ' विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम ' (तपोवनात प्रवेश करताना विनीतवेष असावे) असे कालिदास सांगतो. राजा दुष्यंत कण्वाच्या तपोभूमीत पाय ठेवताना रथातून खाली उतरला होता मग मला निदान अनवाणी तरी जाणे भागच नव्हते का ?

हे ऋषींचे तपोवन असले तरी प्राचीन काळी इथे राक्षसांचाही मोठा तळ होता ते कधी प्रच्छन्नपणे तर कधी उघडपणे इथे नासधूस करीत होते खर, दूषण आणि त्रिशिरा या तीन मातबर सेनापतींच्या आधिपत्याखाली चौदा हजार निवडक राक्षससैन्य रावणाने इथे ठेवून दिले होते दक्षिणेतील वालि-सुग्रीवाधिष्ठित वानरराज्य त्याकाळी महाबळी होते उत्तरेकडच्या आर्य राष्ट्रांचा तर रावणाला नेहमीच धाक वाटत होता या नर-वानराची हात-मिळवणी झाली तर आपल्या पोटावर पाय यायला उशीर लागणार नाही, हे रावणाने धूर्तपणे ओळखले होते. म्हणूनच त्याने या उभय राष्ट्रांच्या मध्ये ही राक्षससैन्याची पाचर ठोकली होती. रामापूर्वी ही पाचर कोणत्याही आर्य वीराला उपटून टाकता आली नाही. दशरथासह अनेक सूर्यवंशी राजांनी त्या बाबतीत खूप प्रयत्न केले होते, पण या राक्षसांचा रोमही त्यांना वाकुडा करता आला नाही रामप्रभूने मात्र हे काम लीलया करून टाकले

बऱ्याच आधुनिक सुशिक्षिताचा पुराणातल्या अनेक गोष्टींवर विश्वास नसतो. तदनुसार ते राक्षसजातीवरही विश्वास ठेवीत नाहीत 'पुराणातल्या अद्‌भुत गप्पा' अशा शब्दानी ते त्याची सभावना करतात, पण धरतीमाता एखाद्या वेळी आपल्या ठेवणीतून अशा काही चिजा बाहेर काढते, की माणसाची अश्रद्धा पार झडून जावी. १८९० साली याच गोदावरीच्या तीरावर एक खाण उपसली गेली आणि तिच्यात मानवशरीराचे काही अजब अवशेष हाती लागले. त्यात जी एक डोक्याची कवटी सापडली, तिची रुदी तीन हात होती दोन दात गवसले ते अर्ध्या फुटाहून अधिक लांब होते. रामायणात राक्षसाचे वर्णन करताना पुढील श्लोकार्थ लिहिला आहे—

ते बलाहकसंकाशा महाकाया महाबलाः

'राक्षस हे काळ्या मेघासारखे, महाकाय अन् महाबली आहेत'

या वर्णनाशी मिळता जुळता असा हा भूगर्भीय पुरावा आहे आजमितीस हा मुद्देमाल ब्रिटिश म्युझियममध्ये सुरक्षित आहे

सीतागुफा, तपोवन, पेशव्यांचा वाडा, महाकालीचे मदिर, मुसलमानी राजवटीचे अवशेष, आणि इतर बऱ्याच गोष्टी पाहून होईतो सध्याकाळ झाली विश्रामसुखासाठी मी पुनश्च गोदातीरी दाखल झालो. पात्रातल्या 'भव्य शेंदूर लेपन' मारुतीच्या पायापाशी आसन ठोकले या मारुतीला दोन्ही बाजूनी मुखे आहेत पचवटीला सम्मुख असलेला मारुती करसपुट जोडून नम्र आहे. कारण त्या दिशेला त्याचा स्वामी आहे. नासिककडे तोंड करून असलेला तोच हनुमत जबुमाळ्याच्या मस्तकावर पाय देऊन उभा आहे. पहिली बाजू दास मारुती अन् दुसरी बाजू वीरमारुती.

नासिक हे समुद्रसपाटीपासून सुमारे दोन हजार फूट उचीवर आहे. त्यामुळे ते स्वभावतःच थड प्रकृतीचे आहे. तशात सायकालीन वसतवायूच्या लहरी अन् त्याहीवर पौर्णिमेचे पिठोरी चांदणे, मग श्रमपरिहाराला काय उशीर! नेमके यावेळी मला कविश्रेष्ठ चंद्रशेखर आठवले त्यांनी आपल्या गोदागौरवात पुढील पक्ती सहजपणे लिहून टाकल्या आहेत—

मधुमासामधि मधुर हवा ती
स्पर्श मधुर तव मधुर चवी,

सायप्रातः सेवियली ती
साखर वानिल केंवि कवी ?

गोदावरीचा यशवंतमहाराजाचा घाट तरी केवढा विस्तीर्ण ! हजारो माणसांनी ऐसपैस बसावे अन् भरल्या सभा ऐकाव्या या घाटावर सदैव बाजार मांडलेला असतो रात्र झाली, की शेकडो दिवे झगमगू लागतात गिऱ्हाइकांची झुंबड लागते अस्पष्ट कोलाहल अनुस्यूतपणे उठत असतो त्यातच मंदिरा-मंदिरांतले घंटानाद मिसळतात उन्हाळ्यात पात्र कृश झाले, की पात्रातल्या बैठ्या दगडी बांधावरून माणसे 'ऐलथडी पैलथडी' करीत असतात मधून मधून साचलेल्या पाण्यात आभाळातली नक्षत्रे तीर्थोपाध्यांचा डोळा चुकवून स्नान करीत असतात

असे हे जिवाला समाधानाचे डोल आणणारे वातावरण त्यामुळे माझ्या हृदयात सुखाची 'भुईचाफी' उगवत होती कितीतरी वेळ मी हरवल्यागत त्या पात्रातच बसून होतो. मला वाटले, की एखादे प्रेमळ दांपत्य चांदण्यातल्या भोजनासाठी इथे यावे. त्याच्या संगे मुलेबाळेही असावी इथल्याच एखाद्या स्वच्छ, प्रशस्त शिलाखंडावर मंडलाकार पंगत बसावी. सोडलेल्या शिदोरीत चंद्रामृताचे कोवळे कण मिसळून त्या भोज्य पदार्थांची चव दुगुणी व्हावी आणि अशा त्या प्रीतिभोजनात आगंतुकपणे पुढे होऊन आपणही एखादा प्रेमग्रास मागून घ्यावा मग त्या रसिक कुटुंबाला म्हणावे, 'मधु मधु मधु ! सुमधु, सर्वात्र मधु !' पण हे सगळे कल्पनेचेच खेळ ठरले. हे जागेपणीचे स्वप्न मला सपाटून भूक लागल्याचे सुचवीत होते आता तिथून उठणेच भाग होते

दुसऱ्या दिवशी सकाळी टांगा ठरवून मी पांडवलेण्याचा मार्ग धरला पण मला लेण्यांची उत्सुकता असली, तरी टांग्याच्या घोड्याला ती नव्हती खरे म्हणजे त्या मुंबई-आग्रा हमरस्त्यावर त्याने चौखूर पळायला हवे होते पण त्याचे आपले रुटूखुटू तिकडे जाताना मात्र वाटेत द्राक्षाचे मळे दिसले द्राक्षाचा हंगाम आता उलगत आला होता पण तरीही कालिदासाच्या उपमा गुच्छा-सारखे किंवा जयदेवाच्या अष्टपद्यासारखे रसीले द्राक्षघड वेलींवर लोंबत होते खाऊन तृप्ती मिळविण्याची सोय नव्हती, पण 'नयनसुख को निवारयति!'

बराच वेळ रखडल्यानंतर आम्ही अशा एका जागी आलो, की डाव्या उजव्या हाताला डोंगराचे सुळकेच सुळके त्यातल्याच एका 'मध्यस्था'च्या पायथ्याशी

आणून टांगेवाल्याने आम्हाला उतरवले त्या डोंगराला मध्यभागी एक लांबच्या लांब खाच दिसत होती दहा बारा मिनिटात मी तेवढी चढण चढलो. नासिकच्या नैर्ऋत्येला पाच मैलावर मी उभा होतो आणि माझ्या डोळ्यासमोर चोवीस लेणी हारीने खोदलेली होती पाहायला कुठून प्रारभ करावा हाच मला सभ्रम पडला आणि त्याचा निर्णय होण्याच्या आतच समोरच्या एका गुहेत मी अभावितपणे ओढला गेलो. त्या गुहेला बाहेर पडवी होती, भरदार खाब होते आणि त्याना यशोदेच्या घुसळणाऱ्या डेऱ्यासारखी बैठक होती


काळा कातळ फोडून या गुहा खोदलेल्या आहेत. काही उथळ तर काही राक्षसाच्या बेंबीसारख्या खोल. काही निरुद तर काही राजवाड्यातील दिवाणखाना शोभतील अशा एक दोन ठिकाणी मधल्या दालनाला दोही अगी लहान लहान ओवऱ्या दिसल्या सनपूर्व दोनशे वर्षांपासून तो इसवीसनाच्या चौथ्या शतकापर्यंत तब्बल सहाशे वर्षे ते खोदकाम अखड चालले होते केवढा विशाल दीर्घोद्योग ! जणू दुसरा भगीरथ प्रयत्नच !

ख्रिस्तशकापूर्वी नासिक क्षेत्राला फार मोठे राजकीय महत्त्व असले पाहिजे. कारण सगळ्या दक्षिणेसाठी एक धर्ममत्री राहात होता. त्यातले एक लेणे त्याने खोदले आहे दुसरे एक त्या काळच्या धान्यव्यापाऱ्यांनी निर्मिले आहे. ही सगळी कामगिरी बौद्ध धर्मीयाची आहे. पांडवाचा या लेण्याशी सबध जोडणे, हे इतिहासाचे परपरागत अज्ञान समजले पाहिजे ही सर्व लेणी बौद्धांच्या हीनयान पंथाच्या भद्रयान उपपथाची आहेत भिक्षूच्या निवासासाठी ती बनवली गेली होती या लेण्यातल्या मूर्ती बुद्ध अन् बोधिसत्त्व यांच्या आहेत पण त्याची खरी ओळख न पटल्यामुळे लोकांनी त्या पांडवांच्या मूर्ती ठरवून टाकल्या.

अगदी पहिल्याच लेण्यात पशूच्या मजेदार आकृती कोरलेल्या आहेत. आपल्याच मागच्या पायाचे इद्रगेळ कुरतडणारा बैल, नरभक्षक वाघ, उधळलेला गजराज, स्वतःच्या खुराने स्वतःचेच तोड ओरबाडणारे हरिण, या आणि अशाच अनेक आकृती प्रेक्षकांचे मन वेधून घेतात गमत अशी की हे सर्व पशू स्थिर नसून गतिमान आहेत. कोणत्यातरी उद्योगात आहेत

दुसऱ्या एका लेण्यात दुतर्फा खाबांच्या मध्यभागी एक बुद्धस्तूप आहे दुसऱ्या एका खोल अन् रुद लेण्यात महाकाय बुद्धप्रतिमा आहे. दोन्ही पाय एका

कमळावर सोडून भगवान् बुद्ध त्या ठिकाणी उच्चासनावर अधिष्ठित आहे.



आजही त्या डोंगराच्या पायथ्याशी बुद्धाचा कोणीतरी पुजारी असावा तो बुद्धाच्या शेजारी दिवा तेवता ठेवतो आणि दारातल्या पांढऱ्या चाफ्याची चार फुले त्याला वाहतो एका लेण्यात शिवलिंगही आहे. ही लिंगस्थापना गुप्तकाळातली असावी त्या ओसाड, शिलामय डोंगराच्या काळजात द्रव असेल अशी कल्पनाच करवत नव्हती पण एका कपारीत निर्मळ, थडगार पाणी पाहून मन शीतल झाले

इथल्या भिंतींवर अन् खांबांवर मिळून प्राकृत भाषेत सत्तावीस शिलालेख कोरलेले आहेत मी ते वाचण्याच्या भरीला पडलो नाही कारण माझ्या आधीच इतिहास-पंडितांनी ते वाचून विवंचिले आहेत त्यातला एक नमुना दाखवून पुढे जातो —

सादनवाहनकुले कन्हे राणिनी नासिककेन समणेन महामातेन लेण कारित ।

' सातवाहनकुलातला कृष्ण राजा राज्य करीत असता नासिक येथील श्रवण महामात्याने लेणे कोरविले, ' हे त्याचे बाळबोध भाषांतर

क्रमांक तीनच्या लेण्यात सातकर्णी आणि त्याची माता गौतमी या दोघांचे वर्णन आहे. दहाव्या लेण्यात उषवदात या क्षत्रप राजाचा शिलालेख असून त्यात त्याने तीन लाख गाईंचे दान केल्याचा उल्लेख आहे या गाई त्याने एकाच ठिकाणी दिल्या का अनेक ठिकाणी दिल्या ? एकाच वेळी दिल्या का अनेक वेळी मिळून दिल्या ? दान घ्यायला हे तीन लाख ब्राह्मण कुठून आले असतील ? हे सर्वच प्रश्न अनुत्तरित आहेत आणि त्यामुळेच त्यांना कल्पनारम्यत्व आले आहे उषवदात हा मोठा दानी हे खरे !

तियून बऱ्याच अतरावर आणखी एक सुळका डोंगर दिसतो. त्याला गजपथ म्हणतात त्यातही काही लेणी आहेत अन् ती चांभारलेणी म्हणून प्रसिद्ध आहेत वस्तुत' ही जैनांची लेणी आहेत त्याना चाभारलेणी का म्हणू लागले ते कळत नाही या लेण्यात त्याच्या पार्श्वनाथ या तीर्थकराची मूर्ती आहे अकराव्या बाराव्या शतकात इथे जैन धर्माची बरीच चलती होती. त्याच काळात ही लेणी खोदवली गेली नासिकच्या उत्तरेस पाच मैलावर हे ठिकाण येते.

कोल्हापूरच्या ब्रह्मगिरी प्रमाणेच इथेही गाडगे महाराजाच्या धर्मशाळेजवळ असलेल्या एका पुराण्या गढीचे उत्खनन झाले आहे प्राचीन काळी नासिक येथे पक्की वसती असल्याचे पुरावे त्या उत्खननातून उपलब्ध झाले आहेत इथे जी घरे सापडली, त्याची बांधणी पक्क्या विटांची अन् उत्कृष्ट होती घरातल्या जमिनी वाळू अन् करड्या रगाचा चिखल याच्या मिश्रणाने सारव-लेल्या होत्या. सनपूर्व तीनशे ते चारशे वर्षे या काळातली काही मातीची भांडी अन् लोखडी शस्त्रेही इथे सापडली सनपूर्व दोनशेच्या सुमाराची म्हणजेच सातवाहनकालीन काही कौलेही गवसली त्याच काळातला नारळाच्या आकाराचा एक चबूही मिळाला

नासिकहून परत येताना सिन्नरच्यापुढे एका खेडेगावात जत्रा भरली होती झाडाझुडपाच्या बारक्या डहाळ्या तोडून आणून देवळापुढे मांडव घातला होता. जवळच्याच मोठ्या माळावर एक अभिनव स्पर्धा चालली होती लहान पण भरीव चाकाचा एक एक बैठा गाडा त्याच्या धुरेला एका अगाला बैल अन् दुसऱ्या अगाला घोडा हातात कासरा धरून वर एक तगडा जवान उभा असे ते विचित्र वाहन मैदानातून पळत होते घोडा आणि बैल. दोघांच्या आकारात आणि स्वभावात महदतर त्या दोघांना एका जोखडाखाली आवळून पळायला लावण्यात कल्पकता तर खरीच, पण चातुर्य त्याहून अधिक होते सभोवती लिबोणीच्या झाडाखाली ग्रामीण प्रेक्षक पुजक्या पुजक्यांनी बसून ती दौड डोळे ताणून पाहात होते आमची बस थोडा वेळ तिथे विसावली म्हणून मीही तो खेळ पाहू शकलो

त्या मैदानाचे भले थोरले रिंगण घेऊन तो गाडा मूळ ठिकाणी येत होता बैलाचे पाय आखूड अन् बाधा अटकर त्यामुळे घोड्याच्या गतीशी मेळ जमवणे त्याला जमत नव्हते. घोड्याला नाखुषीनेच आपल्या गतीचा सकोच करावा

लागत होता दोघेही आपापल्यापरी कुचवत होते, पण त्याना असहकार मात्र पुकारता येत नव्हता कारण त्यांचा 'दादा' आसूड फडफडवीत वर उभा होता महाराष्ट्राचे ते कणखर मनगट मधेच कासरा खेचीत होते अन् मधेच सैल सोडीत होते तळपत्या उन्हात तो मर्द गडी घामाने नुसता निथळत होता

पण त्याने आपला प्रयोग पुरा केला. लोकांनी 'भले भले' म्हणून, आरोळ्या ठोकून अन् टाळ्या पिटून त्याचा 'उदोकार' केला लोकांचे कौतुकाचे कटाक्ष झेलीत त्याने खाली उडी टाकली. त्या दोन्ही मुक्या प्राण्यांची पाठ थोपटली खरोखर उत्साहाला शीग आणणारे दृश्य होते ते आमची बस तिथून निघाली तरी माझ्या दृष्टीपुढे तेच दृश्य तरळत होते

आपण शहाणेसुरते लोक महाराष्ट्रात राहतो महाराष्ट्राचा अभिमानही बाळगतो, पण आपण खऱ्या अर्थाने महाराष्ट्र पाहिलेलाच नसतो. महाराष्ट्राचा आत्मा कोणकोणत्या पाकळ्यांनी फुलतो, ते आपल्याला बऱ्हशी अज्ञातच आहे

# ६. ब्रह्मगिरीचा महिमा

नासिक आणि त्रिंबक. ही दोन्ही नावे इतिहासकालापासून जोडीने उच्चारली जातात यात्रेकरू ही दोन्ही क्षेत्रे एकाच वेळी करतात, पण मला मात्र नासिकच्या पाठोपाठ त्रिंबक करता आले नाही मी दुसऱ्या खेपेला ज्येष्ठमासी मृगनक्षत्र लागण्यापूर्वी तिथे गेलो नासिक ते त्रिंबक हे अवघे अठरा मैलाचे अतर आहे अलीकडच्या चार मैलावरची बाणगगा ही या क्षेत्राची पूर्व सीमा मानलेली आहे

बाणगगेच्या आधी अजनेरी पर्वत लागतो. हा डोंगर ज्याने एकदा पाहिला त्याच्या तो चिरकाल स्मरणात राहील. कारण त्याच्यावरची ती काळी महाकाय वानरी. आपल्या बछड्याला उराशी धरून ती पाठमोरी बसली आहे कदाचित तिला आपल्या पुत्राला पाजायचे असेल आणि आल्यागेल्याला ते दिसू नये म्हणून तिने पाठ फिरवली असेल

ही वानरी हालत नाही की डोलत नाही. ती निळ्या आभाळाखाली राहते आणि वाऱ्याचे झोत जगते याच ठिकाणी दीर्घ तप आचरून वज्रकौपीन हनुमताला जन्म देणाऱ्या अजनीचे निसर्गाने उभारलेले हे एक पाषाणरूप स्मारक आहे असे म्हणतात मूळचा हा इद्रपर्वत पण अजनीच्या इथल्या वास्तव्याने त्याचे मूळ नाव लोपले आणि आजमितीस तो अजनगिरी म्हणजेच अजनेरी म्हणून प्रसिद्ध आहे

हा एक गिरिदुर्ग आहे तीन बाजूना कडे तुटलेले असल्यामुळे तिथून वर चढायचा प्रयत्न करणाऱ्याला त्याच्याही वरची स्वर्गाची पायरी चढावी लागेल दक्षिणेची बाजू तेवढी सुगम आहे आज तिथे वेळुवन निर्माण झाले असले आणि कारवीच्या झुडपानी दाटी केली असली, तरी जुन्या काळी आभीर राजांची ही राजधानी होती इथून ते नासिक, खानदेश या प्रदेशावर राज्य करीत असत

आध्रांच्यानतर सात आभीर राजे होऊन गेले, असा विष्णुपुराणात उल्लेख आहे. या सातात ईश्वरदत्त हा राजा आपला प्रभाव गाजवून गेला याने महान पराक्रम करून क्षत्रपाचा पराभव केला आणि सगळ्या पश्चिम भारतावर आपली सत्ता स्थापली आठव्या शतकात काही लोक गुजरातेत आले तेव्हा तिथे सर्वत्र आभीरांचे राज्य होते असे इतिहास सागतो. भारतेतिहास या ग्रथात आभीर वशातल्या सोळा राजांनी २२७ वर्षे राज्य केले असे म्हटले आहे आभीरांच्या विषयी अनेक दतकथा ऐकायला मिळतात या सर्व गोष्टींचा विचार करता आभीर राजवश इ स च्या पहिल्या पाच शतकात भारतात नांदून गेला असे कळते. अजनेरी पाहताना हा इतिहासही थोडा लक्षांत घ्यायला हवा

त्रिबक हे पुरातन क्षेत्र खरे, पण प्राचीन काळी इथे मनुष्यवस्ती नव्हती. सुमारे ५०० वर्षांपूर्वी या खेडयाची स्थापना झाली पण तेही ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी वसल्यामुळे देवापासून थोडे दूरच होते त्र्यबकेश्वर त्याकाळी ' वृक्षवल्ली आम्हा सोयिरी बनचरे ' असे मानून राहिला होता झाडावरून स्वाभाविकपणे गळणारी फूलपत्री अन् ' द्विज ' गणाच्या किलबिलीचे मंत्र, हीच त्याची यामपूजा होती नागमोडी वाट अन् चोराचिलटांचे भय यामुळे दर्शनाला येणारे यात्रेकरू अजनेरीला मुक्काम करीत, तिथून सकाळी जमावाने त्र्यबकेश्वराच्या दर्शनाला जात आणि क्षेत्रविधी करून सध्याकाळी पुनश्च अजनेरी गाठीत

या क्षेत्राचा खरा उदयकाल आला तो पेशवाईत नानासाहेब पेशव्यांनी आपल्या उत्तुग कीर्तीला साजेसे त्र्यबकेश्वराचे मदिर बांधले. त्रिकाळ पूजेचीही व्यवस्था केली. जोगळेकर आडनावाच्या एका गृहस्थाला तिथला कारभारी नेमले त्याने अनेक ब्राह्मण आणि सेवेकरी देवाच्या सेवेसाठी तिथे गोळा केले मग ब्रह्मगिरीच्या पायथ्याचे खेडेही तिथून उठले अन् देवाच्या सान्निध्यात आले. क्षेत्र माणसांनी गजबजले. सुरक्षितही झाले

कुशावर्त हे इथले मुख्य तीर्थकुड ते होळकर सरकारचे फडणवीस पारनेरकर यांनी आठ लक्ष रुपयांवर उदक सोडून बाधून काढले १८६६ साली इथे नगरपालिका स्थापन झाली प्रत्येक यात्रेकरूकडून चार आणे कर वसूल केला जाऊ लागला. १८७१ साली काशिनाथपत थत्ते याच्या खटपटीने नासिक ते

त्रिंबक अशी पक्की सडक तयार झाली. यन्त्रयुग सुरू होण्यापूर्वी या सडकेवर बैलगाड्या यात्रेकरूंची ने-आण करीत असत रस्ताभर ढवळ्या-पवळ्याच्या गळ्यातले घुंगुर निनादत असत आजमितीस मोटारीची कर्कश ' शिंगे ' वाजतात

संध्याकाळी चौथ्या प्रहरी मी तिथे पोचलो. देवळाच्या तटाजवळच गाडी थांबली. इथेसुद्धा पहिली धूळभेट झाली, ती शिवाची नव्हे, तर शिवगणांची शृंगी, भृंगी, रिटी, तुंडी वगैरे कैलासावरचे शिवगण या क्षेत्रात तीर्थोपाध्या-यांच्या रूपाने अवतरले असल्याचे स्कंदपुराणात लिहिले आहे हे तीर्थोपाध्ये अनेक वर्षांच्या सरावाने जातीच नव्हे; तर पोटजातीसुद्धा ओळखण्यात तरबेज झाले आहेत. माझ्या पुढे उभा राहिलेला उपाध्याय कोकणस्थ होता अन् मी त्याच जातीचा आहे हे त्याने नक्की हेरले होते

माझे कुळगोत्र आणि पूर्वजांची नामावळ विचारून घेऊन त्याने आपले वहीखाते उघडले पण त्यात कोणाचाच मागमूस लागेना वस्तुत तेवढ्यावर त्याने मला सोडायचे, पण तसे न करता तो क्षेत्रातल्या पौरोहित्याचे नवे अधिकारपत्र लिहून देण्याबद्दल हटून बसला मी त्याला शिताफीने टाळले आणि पुढे जाता जाता मोरोपंतांच्या शब्दात स्वत ला शाबासकी घेतली —

जेणे न चित्रगुप्ता लावु दिला टाक आपुल्या वहिला।

श्री. गोपाळराव मराठे या सद्गृहस्थाच्या घरी मी उतरलो माझे आगत-स्वागत केल्यावर ते मला म्हणाले,

' अजून थोडा दिवस आहे तेवढ्यात तुम्ही नीलपर्वतावर जाऊन या तसेच त्र्यंबकेश्वराकडे उतरा तोवर प्रदोषपूजेचा समय होईल '

नीलपर्वत नावाची ही टेकडी गावाच्या उत्तर सीमेला लागून आहे दगडी पायऱ्या बांधलेल्या असल्यामुळे चढायला सोपी आहे विराट् त्र्यंबकाची ही डावी मांडी समजली जाते दत्त अवधूत आणि परशुराम या दोघांनीही इथे तप केले. परशुरामाने इथे नीलकंठेश्वराची स्थापना केली पश्चिम सागर मागे हटवून कोकणाची भूमी तयार करण्याचे मनोरथ परशुरामाने इथेच बसून केले असतील का ? केवढा अद्भुत अन् क्रांतिकारक प्रयोग होता तो !

त्याला लागणारे सामर्थ्य आणि वरप्रदान ज्वालामुखीच्या रूपाने याच त्र्यबकेश्वर ज्योतिर्लिंगाने दिले असेल का ?

कारण हे स्थान कोकण आणि मावळ यांच्या सीमारेषेवरच आहे

नीलपर्वतावर नीलांबिका देवी आहे ती स्वयभू अन् त्यामुळेच ओबडधोबड आहे पूजकानी तिलाच कानडोळे तयार करून इतर भागाला शेंदूर माखला आहे तिच्या डाव्या हाताला मटबा देवीचे लहानसे मदिर आहे 'मटबा' या शब्दाची व्युत्पत्ती 'माता अबा' अशी असू शकेल काय ? ही नीलाबिक म्हणजे तरी कोण ? कोण्या अज्ञात काळी ज्वालामुखीतून उद्‌भवलेली आणि गगनाच्या निळावतीला चाटू पाहणारी निळी अग्निज्वाळा तर नव्हे ?

याच देवीच्या शेजारी नग्या साधूचा 'दसनाम आखाडा' आहे यात्रिकाच्या कडून देवीच्या बरोबरच त्या साधूनाही ताबडी पांढरी नाणी मिळतात देवीची पत्रावळ तिथे याचा द्रोण ! मी प्रदक्षिणा करून आणि देवद्वारीच्या डेरेदार बकुळीखाली थोडा वेळ विसावून खाली निघालो माझ्यापुढे काही गुर्जरी ललना उतरत होत्या आणि सुरात सूर मिळवून आपल्या 'डाकोरजी'च्या बाललीलांचे कोणते तरी गाणे म्हणत होत्या. मला वाटले, त्रिपुरविजयाची गाणी गात गात किन्नरींचा समुदायच हिमाचलाच्या शिखरावरून खाली उतरत आहे फक्त वेणुरध्रातून सप्तस्वराच्या रूपाने बाहेर पडणाऱ्या वाऱ्याची साथ आणि मेघांच्या धिमधिमत्या मृदगाचा ताल इतकीच काय ती उणीव !

मी त्र्यबकेश्वराच्या मदिरात येण्यापूर्वीच सूर्याने पश्चिमेच्या मदिरात पाऊल टाकले असले, तरी अजून तिने दार लावून घेतले नव्हते आरक्त सधिप्रकाश सर्वत्र खेळत होता. तेवढ्या अवधीत मला सगळे पाहून घेणे शक्य होते ते दिवस आगोटीचे होते. ढगांची टेहेळणीपथके गगनात इतस्तत सचरू लागली होती त्यांचा म्होरक्या एक कृष्ण मेघ नेमका देवळाच्या माथ्यावर रेंगाळला होता कालिदासाच्या यक्षाने 'कुठे काय कर' ते विज्ञापून पाठवलेला सदेशहर मेघ तो हाच असावा काय ? आता प्रदोषकाळी शिवशकर ताडव आरभील. मग हा त्याच्या पाठीवर इवरून त्याची ओले गजचर्म पांघुरण्याची गरज भागवील आणि ही त्याची शिवभक्ती पाहून प्रसन्न झालेली पार्वती त्याच्यावर कौतुकाचे कटाक्ष फेकील.

मी महाद्वारातून प्रवेशून गाभाऱ्यापर्यंत पोचलो. आत समया तेवत होत्या उदबत्त्या घमघमत होत्या मधोमध अभिषेकपात्र टांगलेले होते, पण त्याखाली शिवलिंग मात्र दिसत नव्हते मी म्हटले, अभिषेक काय नुसत्या शाळुंकेलाच ? पण खरा प्रकार तसा नव्हता.

इथे शिवलिंग शाळुंकेच्या वर नाही, तर घागरभर पाणी मावेल एवढ्या उखळासारख्या खोलगट जागी आहे आणि तेही एक नसून अंगुष्ठमात्र अशी तीन आहेत ब्रह्मा-विष्णु-महेश ! रज-सत्त्व-तम ! विधाता-पाळिता-संहर्ता ! असे हे त्रिक आहे त्यात त्र्यंबकेश्वर महादेव मुख्य त्याच्या मस्तकावर एक लहानशी चीर आहे तिच्यातून गंगेचा द्रव निघत असतो खळगा पुसून टिपून कोरडा केला तरी थोड्याच वेळात त्यात पुन्हा पाणी साठते तिथूनच कधी काळी सिंहनाद उठतो क्वचित् प्रसंगी ज्वालाही उमटतात. लिंगस्थान तापून निघते पंचामृताच्या घागरी ओतल्या तरी त्या कुठल्याकुठे गडप होतात काही वेळाने मग त्रिपुरांतक शांत होतो ज्वाला अदृश्य होतात. मग पूर्वी ओतलेला गोरस उद्‌गाररूपाने बाहेर निघतो. चिकित्सक म्हणतात, की ' खाली भूगर्भात ज्वालामुखी असला पाहिजे ' भाविक म्हणतात, ' ज्वालामुखी कसला ? त्र्यंबकाने तिसरा अंबक म्हणजे डोळा उघडला असला पाहिजे त्यातूनच या ज्वाला निघतात '

माझ्या दर्शनाच्या वेळी तसले काही नव्हते. मी ऐकलेली कथा त्या वेळी माझ्या मन चक्षूपुढे उभी झाली होती. मी वसिष्ठमुनीचा वैदिक मंत्र म्हणत साष्टांग नमस्कार घातला —

त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम् ।
उर्वारुकमिव बंधनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात् ।।

' त्रिभुवनाचा पिता, पुण्यगंध, पुण्यकीर्ती आणि समृद्धिवर्धक जो ईश्वर, त्याच्या प्रीत्यर्थ आपण यजन करू या हे ईश्वरा, एखादी काकडी देठापासून खुडावी, त्याप्रमाणे मला मृत्यूच्या पाशातून सोडवून दूर ठेव, पण अमरत्वा-पासून मात्र दूर ठेवू नको. '

आंगिरस कुत्साने एक रुद्रसूक्त रचले असून ते मला पाठ येत होते. मी त्याचा पाठ सुरू केला. ' रुद्र म्हणजे साक्षात् पराक्रम. किती सुंदर त्याचा

जटाभार । भुजदंड कसे वज्रासारखे दणकट तो गौर वर्ण आहे त्याचा किरीट प्रकाशमय आहे तो नाना रूपे धारण करतो. त्याच्या हातात धनुष्यबाण आणि गळ्यात पुष्पहार शोभतात तो सिंहासारखा उग्र असून त्याचा क्रोध जाज्वल्य आहे '

गृत्समद ऋषीला त्याच्या स्वरूपाचे अन् स्वभावाचे पूर्ण आकलन झाले आहे त्याला अनुसरून तो शिवशंकराकडे मागणी मागतो स्वत साठी नव्हे, तर सर्व जनासाठी ' हे रुद्रा, पुत्र, पौत्र आणि सेवक याच्यासह आमची अभिवृद्धी कर आम्हाला ओषधि-वनस्पतीचे ज्ञान दे तू वैद्यांचाही वैद्यराज आहेस तू आमच्या जखमी सैनिकांचे घाव बुजव आमच्यावर अभीष्ट सिद्धींचा वर्षाव कर. आमच्यातली द्वेषबुद्धी नष्ट कर. आमच्या ज्ञानसूर्यावर कधीही आभाळ येऊ देऊ नको '

ही स्तोत्रे आणि या प्रार्थना वैदिक ऋषींनी केलेल्या असल्या तरी वैदिक आर्यांना लिंगपूजा मात्र मान्य नव्हती भग-लिंग हे पूजनीय प्रतीक म्हणून स्वीकारायला वैदिक ऋषींचे संस्कारी मन तयार नव्हते लिंगपूजकाचा ते तिटकाराच करीत ' शिश्नपूजक आमच्या सत्कर्मात विघ्ने न करोत ' अशा त्याच्या स्पष्ट प्रार्थना आहेत

पण पुढे परिस्थिती अशी आली, की जे निंद्य, त्याज्य ठरवले, तेच ग्राह्य म्हणून वैदिकांना स्वीकारण्याची पाळी आली वैदिक आर्य सोडले, तर भारतात आणि इतर अनेक देशात त्या काळी लिंगपूजा प्रचलित होती. पृथ्वी-तलावर सर्वत्र लिंगपूजकांचाच भरणा होता. या गोष्टीच्या सामक्षा आजही जगभर सापडतात भारतातही बहुसख्य जाती जमाती लिंगपूजकच होत्या बारा ज्योतिर्लिंगे ही इथल्या आदिवासींची प्रमुख क्षेत्रे असली पाहिजेत सण, उत्सव, पर्व इत्यादी प्रसंगी त्या त्या भागातले लोक या ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाला जात असले पाहिजेत.

पुढे वैदिक आर्य भरतखंड व्यापू लागले ते आर्यावर्तातून पूर्वेकडे पसरले अन् दक्षिणेतही उतरले या विस्तारक्षेत्रात त्यांचा लिंगपूजकाशी हरघडी प्रसंग येऊ लागला. वैदिकांचे विचारही बदलू लागले एवढ्या मोठ्या जनसमूहाशी कायमचा दुरावा ठेवण्यापेक्षा त्याला प्रेमाने वश करून आपल्या संस्कृतीत आणणे हेच हितावह ठरेल, असे त्याना वाटू लागले सर्व जनसमूहांना

स्वीकारायचे, आपल्या धर्मसंस्थेच्या राज्यात आणायचे, तर त्यांच्या उपास्य देवतेसह त्यांना जवळ करणे भाग होते त्यांची लिंगपूजा आपली म्हणणे भाग होते


आर्यांनी लिंगपूजा स्वीकारली आणि पुढची गोष्ट म्हणजे त्यांनी तिच्यातला ग्राम्यपणा काढून टाकला शाळुंका हे भगाचे प्रतीक नसून यज्ञवेदीचे आहे आणि तिच्यावरचा शिव हा लिंगाचे प्रतीक नसून यज्ञीय अग्नीच्या ज्वालेचे प्रतीक आहे अशी नवी कल्पना त्यांनी बसवली मूळच्या भग-लिंगपूजकांचे मनही जसजसे विकसित होऊ लागले, तसतशी त्यांच्याही उपासनेतील लिंग-विषयक ग्राम्य कल्पना धुतली जाऊ लागली अशा रीतीने कालांतराने लिंग-पूजेचे पूर्णतया पवित्रीकरण झाले आर्यांनी आपला रुद्र आणि आर्येतरांचा लिंगदेव यांना एकरूप करून टाकले. वेदातले रुद्रवर्णन लिंगावर आरूढ केले यजुर्वेदातल्या रुद्राध्यायाच्या पठनाने लिंगावर अभिषेकाची धार पडू लागली

पूर्वकाळी ही लिंगे भव्योत्तुंग असत. काशीविश्वेश्वराचे प्राचीन लिंग सत्तर हात उंचीचे होते अशी माहिती मिळते कित्येक ठिकाणी एखाद्या गिरी-शिखरालाच शिवलिंग मानल्याचे दिसून येते कैलासाचे गौरीशंकर शिखर हे त्यांपैकीच एक आहे. त्र्यंबकच्या ब्रह्मगिरीचे पाच उभे सुळके आहेत, तेही लिंगरूपच असून, सद्योजात, वामदेव, ईशान, अघोर आणि तत्पुरुष अशी त्यांची नावे आहेत. या सर्वांना मिळून विराट् त्र्यंबकेश्वर म्हणतात.

पुढे बौद्ध धर्माची देशव्यापी लाट उसळली बौद्धांनी धनिक श्रेष्ठींच्या औदार्याच्या बळावर मोठमोठे विहार बांधले डोंगर पोखरून प्रशस्त, सुंदर आणि कलाकुसरीचे चैत्य आकाराला आणले पुढच्या काळात त्यामध्ये स्तूप आणि बुद्धमूर्ती स्थापल्या गेल्या त्याच अनुरोधाने नंतर हिंदू देवतांचीही मंदिरे निर्माण होऊ लागली. त्यातच शिवोपासकांनी आपल्याही आराध्य लिंगासाठी मंदिररचना आरंभली एखादे गिरीशिखर किंवा साठ-सत्तर हात उंचीचे शिवलिंग अर्थातच अशा मंदिरात बसणे शक्य नव्हते त्यामुळे प्रतीका-एवढे मंदिर मोठे करणे अशक्य असेल तर मंदिरात मावेल, शोभेल अशा बेताने प्रतीकच लहान करणे हा उपाय सोयीस्कर ठरला अशा रीतीने भक्तपराधीन शिवशंकर ‘ घरासा खा पाहुणा ’ ठरला

इतर देवतांची प्रतीके निर्माण होण्याआधी शिवाचे प्रतीक निर्माण झाले. म्हणूनच त्याला आदिदेव अशी सज्ञा मिळाली पुढे आर्य-अनार्य सकेत एकत्र करून त्या घटकद्रव्यानी शिवाला सगुण-साकार बनवण्यात आले.

कैलास ही शिवाची वतनवाडी ठरली स्मशान ही क्रीडाभूमी झाल्यामुळे चिताभस्माचे चर्चन त्याच्या ‘ कपाळी ’ आले पाच मुखे, तीन डोळे त्याच्या शरीराला जडले गळ्यात नररुडाच्या माळा, अगावर नागभूषणे, आणि मस्तकी गगा असे त्याचे ध्यान ठरले. ‘ रोदयति सर्वमन्तकाले इति रुद्र ’ (अतकाळी सर्वांना धाई धाई रडवतो म्हणून तो रुद्र) ही व्याख्या जमेस धरून विश्वाच्या सहारणीचे कार्य त्याच्याकडे सोपवले गेले त्याच्या भोवती अनेक कथाचा पट विणण्यात आला तो ‘ भोळा सांब ’ ठरला या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून हळूहळू आर्य वैदिकाच्या अत करणातील शिवाविषयीचे परावेपण लोपून रामायण-महाभारतकाली शिवशकर पूर्णपणे शरण्य झाला आणि सर्वांच्या हृदयात भरून उरला



त्र्यबकेश्वर वीतराग जोगी आपल्या अकिचनपणाचा त्याला अभिमान आहे. ‘कौपीनवत' खलु भाग्यवत ’ असे तो समजतो. बहुजनसमाजाच्या देवाने असेच असले पाहिजे त्याने बेल मिळाला नाही, तर निर्गुडीच्या पत्रीवरच समाधान मानले पाहिजे, पण पेशव्यांनी त्याला इथे श्रीमंत केले आहे वार्षिक बारा हजारावर त्याचे उत्पन्न आहे मदिराला सोन्याचे पाच कळस आहेत सुवर्णाचा पंचमुखी मुखवटा आहे त्याचा सणावारी घालायचा रत्नजडित किरीट अलकारिक भाषेत बोलायचे तर पृथ्वीमोलाचा आहे. हा किरीट मूळचा म्हैसूरचा मुसलमान शासकानी तो दिल्लीला नेल

आणि पुढे पेशव्यांनी त्यांच्या जामदारखान्यातून खेचून आणून त्र्यंबकेश्वराच्या मस्तकी कृतार्थ केला

देवदर्शन करून मी प्रदक्षिणेसाठी बाहेर आलो बाहेरून पाहताना मला दिसले, की हे मंदिर श्रीयंत्राकार आहे नासिक येथील मंदिरांप्रमाणे हेही हेमाडपंतीच आहे भोवती तट आहे हजारो लोक सुखेनैव बसू शकतील, असे चारी बाजूंनी पटांगण आहे इथली स्वच्छता तावडतोब लक्षात येते आपण पुण्यक्षेत्रात आलो आहो हे मनाला बळेबळे शिकवावे लागत नाही

देवासमोर शुभ्र पाषाणाचा नंदी आहे मागच्या बाजूला निर्मल जलाची पुष्करिणी आहे अभिषेक हा शंकराचा सर्वांत आवडता उपचार 'जलधाराप्रिय शिव' हे त्या विषयीचे वचन कधीकाळी विश्वकल्याणासाठी प्राशन केलेल्या हालाहलाचा दाह शमवण्यासाठी त्याला मस्तकावर पाण्याची धार धरलेली हवी असते

अगाच अभिषेकासाठी एक ब्राह्मण त्या पुष्करिणीतल्या जलाच्या घागरी देवळाच्या पृष्ठभागी एका कगोऱ्याजवळ नेऊन ओतीत होता हा काय प्रकार आहे, ते पाहण्यासाठी मी जवळ गेलो देऊळ बांधतानाच तिथे एक दगडाची पन्हळ ठेवलेली आहे आणि बाहेरच्या बाजूस एक लहानसे कुंड केलेले आहे त्यात पाणी ओतले, की ते पन्हळीच्या द्वारे सरळ जाऊन गाभाऱ्यातल्या हौदात साठते

पूर्वेला मंदिराचे मुख्य द्वार असून त्या बाजूला कोरीव नक्षीकाम देखणे आहे पक्षद्वाराच्या घुमट्यांना बाहेरच्या बाजूने कमळे कोरलेली आहेत ती पाषाणाची असूनही कोमल, नितळ अन् टवटवीत दिसतात फक्त उणीव काय ती सुगंधाची पण त्या बाबतीत त्या शिल्पकारांचा इलाज नव्हता कारण 'तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः!' ते काम फक्त विधाताच करू शकला असता

नगारखान्याच्या महाद्वारातून बाहेर पडतो, तर तिथे काही गुजराती स्त्री-पुरुषयात्रिकांचा घोळका उभा होता दोन क्षेत्रोपाध्ये आपापल्या गलेलठ्ठ वह्या दाखवून त्या लोकांना आपापल्या घरी ओढण्याचा प्रयत्न करीत होते एकजण सांगत होता, 'हे पाहा! तुमच्या वडिलांचे नाव माझ्या वहीत आहे' पण यात्रिकांना ते पटेना त्यातला मोठा पुरुष म्हणाला, 'तारु नाम खोटु छे!'

उपाध्या म्हणाला. 'खोटुं केम ? खरू छे ! ' मी मनात म्हटले, 'नामरूपे सगळीच खोटी आहेत त्यासाठी ही तोंडातोंडी कशाला ? त्यापेक्षा नाम-रूपातीत जो त्र्यबकेश्वर, त्यालाच शरण जाणे बरे नाही का ? '

दुसऱ्या दिवशी सकाळी एक मार्गदर्शक बरोबर घेऊन मी ब्रह्मगिरीच्या वाटेला लागलो सकाळ सुंदर होती मनात उल्हास होता शरीर ताजेतवाने होते. त्याने पहाड चढण्याची हिंमत बांधली होती एका मैलाचा फेरा वाचवून माझा वाटाड्या मधल्या वाटेने मला नेमका पायथ्याशी घेऊन जाणार होता करवंदीच्या जाळीमधून आमची पाऊलवाट जात होती. पायथ्याच्या टेकड्या-वर मधून मधून काळे चौकोनी चट्टे दिसत होते तिथल्या डोंगरी शेतकऱ्यांनी पालापाचोळा जाळून ती जमीन भाजून ठेवली होती. पावसाच्या पहिल्या ओलीवर ते त्यात नाचणी पेरणार होते

सपाट शेतात भात अन् डोंगरावर वरी-नाचणी ही इथली मुख्य पिके आमच्या गोव्यातही हीच पद्धत आहे पण तिथला तो प्रयोग महान आणि सामुदायिक असतो बारके बारके उचवटे चढून आम्ही एका आमराईत आलो आणि उभ्या ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी ठाकलो आता पुढचे पाऊल टाकायचे ते ब्रह्मगिरीच्या देहावर. कल्पना येताच मन चरकले आणि याला कारण पुराणात वाचलेली एक कथा –

एक दिवस ब्रह्मा-विष्णू एकत्र आले. सुखसंवाद करीत असता ब्रह्मदेवाने आढयता मिरवली 'शिवमहिमा अगम्य म्हणतात ना ? पण मी तो जाणला आहे ' विष्णूला नवल वाटले 'असंख्य वर्षे तप आचरूनही मला जे आकळले नाही, ते तुला सहजासहजी कसे कळले ? ' त्याने विचारले चर्चा होता होता प्रश्न निकरावर आला कोणाचे कोणाला पटेना. मग त्या दोघांत पैज ठरली विष्णूने शिवाच्या चरणांचा ठाव पाहावा अन् विधात्याने मस्तकाचा शोध घ्यावा जो स्वीकृत कार्यात यश मिळवील तो आपणा दोघात श्रेष्ठ

दोघेही आपापल्या मार्गांनी निघाले काही काळाने विष्णू निराशा पदरी घेऊन परतला ब्रह्मदेवाचीही तीच गत झाली होती, पण त्याने बेधडक थाप मारली 'मी शिवमस्तकावर फूल वाहून आलो. हवी तर या धेनूची अन् केतकीची साक्ष घे ' विष्णूचा त्या गोष्टीवर विश्वास बसणेच शक्य नव्हते त्याने ते प्रकरण खुद्द शिवापुढे नेले सर्वसाक्षी ईश्वराला विधात्याची लबाडी

उमगली 'ज्या अर्थी तू असत्याचा आश्रय केलास, त्या अर्थी आजपासून तू अपूज्य ठरशील.' शंभू शापवाणी वदला. ब्रह्मदेवाचा अहंभाव डिवचला गेला त्याने क्रोधाने फुफाटत शंकराला प्रतिशाप दिला 'तू पृथ्वीवर जड पर्वत होऊन पडशील !'

मी आता या पर्वतावर चढायचे म्हणजे ज्याच्या चरणी ललाट घासायला आलो, त्यालाच पायदळी तुडवायचे, पण ऐनवेळी तत्त्वज्ञानाने हात दिला. 'पर्वत जर शिवरूप, तर मीही तसाच नाही का ? 'तत्त्वमसि' हे वाक्य काय सांगते ?'

तुजमज ऐशी परी। जैसे तरंग सागरी।

सागराच्या पृष्ठभागावर लाटा उचंबळतात, पण तिथे कोणावर कोण चढले ? कारण दोन्ही मिळून एकच जल चढण्याची क्रिया मानायची, तर आपणच आपल्या खांद्यावर चढलो असे म्हणावे

झाले, शंका आली तशी गेली मी चढायला प्रारंभ केला पंजाबातल्या दोन उदारधी धनवंतांनी १९०८ साली पाचशे पायऱ्या बांधून हा ब्रह्मगिरी सुगम केला आहे पूर्वी पुष्कळसे यात्रेकरू ब्रह्मगिरीला दुरूनच नमस्कार करीत. पण आज सामान्य शक्तीच्या माणसालाही तो अल्पायासाने चढता येतो. ज्यांना एवढीही धमक नसते किंवा ज्यांचा खिसा गरम असतो, त्यांच्यासाठी इथे पाळणे मिळतात खांद्यावर पाळण्याचा दांडा अन् हातात आधारदंड घेऊन इथले कोळी चालती-बोलती 'ओझी' वर नेऊन खाली आणतात

पण ब्रह्मगिरी असा खटनट आहे, की ठराविक जागी तो ओझ्याचे पाळणे वर चढूच देत नाही. 'पैशाने बस ऊठ' करणारा नवकोट नारायण असला तरी त्याला पाळण्यातून उतरून त्या शिडीसारख्या उभ्या शेदीडशे पायऱ्या स्वतःच्या पायांनीच चढाव्या लागतात

आम्ही थोडेसे चढतो तोच आजूबाजूच्या कपारीतून काही माकडे पुट्पुटू बाहेर आली अन् त्यांनी आमची पाठ धरली माझ्याकडून काहीतरी 'च्यांवम्याव' मिळेल या आशेने ती येत होती, पण माझा खिसा रिकामा होता गावातून निघताना मला कोणी सुचवले असते, तर मी रिक्त हस्ताने आलो नसतो बिचाऱ्यांची किती निराशा झाली ! दोघा माकडांनी खालच्या

झाडावर बेघून माझ्याकडे तुच्छतेने पाहिले ' ती पाहा. खालून आणखी माणसे वर येत आहेत. तू दिले नाहीस तर ती देतील !'

डोंगर चढताना मधून मधून सिंहावलोकन करण्यात मोठी गमत असते



टप्प्याटप्प्याला नवे नवे प्रदेश दिसू लागतात. क्षितिजाचा घेर वाढतो. आपण जगापेक्षा उच झाल्याची ऐट चढते क्षणभर विश्रांती मिळाल्याने धापावणारे काळीजही प्रकृतीवर येते खालून पाहताना ब्रह्मगिरीची मेखला शोभेल, असा हिरव्या झाडीचा पट्टा ज्या ठिकाणी दिसत होता, तिथे आता आम्ही येऊन पोचलो होतो खालच्या भागाचे ढग वितळले होते एवढा वेळ धूसर दिसणाऱ्या त्रिबक गावावर प्रकाशाचा स्रोत पडत होता वृक्षशिखराच्या फटीतून किरण-बाण खाली घुसत होते अपर्णेचे वाटोळे आरसे शोभतील असे खालचे गौतमालय आणि गंगासागर हे तलाव तेजाने निथळत होते सूर्यनारायणाचा तो ' चिद्विलास ' खरोखरीच नेत्रदीपक होता पण तो फार वेळ टिकला नाही नव्या दमाच्या मेघानी आक्रमण करून सूर्याला आच्छादून टाकले

मी पठार गाठले अन् समुद्रसपाटीपासून सव्वा चार हजार फूट उच्च झालो. तिथल्या वाऱ्याच्या वाहणीत एक निराळेच चैतन्य अनुभवायला मिळाले विचार केल्याअती ते वायूचे प्रयाग होते. देशावरचा अन् कोकणातला असे दोन वारे त्या ठिकाणी उराउरी भेटत होते उभयताचे द्वैत मोडत होते. कोकणातल्या वाऱ्याने हापूस आब्याचा अन् रसाळ फणसाचा स्वादुगध आपल्या देशावरच्या भावाला उपायन म्हणून आणला असावा देशावरच्या वाऱ्याने

कशाची बरे प्रतिभेट आणली असेल ! कोकणचा वारा 'झू ऽऽझू ऽऽऽ' करून सागरताडवाच्या फेसाळ गोष्टी आपल्या दादाला सांगत होता देशावरचा भाऊ गोदाप्रवाहाचे आणि मावळभूमीचे इत्थभूत वर्तमान त्याला निवेदीत होता आणि मी ? मी त्या येरयेरांच्या मिळणीत जी आनदकल्लोळाची वेणी पडत होती, तिच्यातला एक पेड बनून झुलत, लहरत राहिलो होतो.

पूर्वेला शिवाजीमहाराजांच्या शिलेदारांची खाण असलेली मावळभूमी दिसत होती पश्चिमेला तुटलेले कडे, विखुरलेल्या टेकड्या आणि गभीर दरीखोरी अशा स्वरूपात ठाणे जिल्ह्यातली कोकणभूमी दृष्टिपथात येत होती. मी जिथे उभा होतो, तिथून पूर्वेला अतराअतरावर अनेक डोंगर मधेच उपटले होते. सर्वांची तऱ्हा एक – पूर्व बाजूने उतार अन् पश्चिम बाजूने तुटलेली कड या डोंगराच्या जाडीमध्ये आणि उभारणीमध्ये आश्चर्यकारक समता आहे. सर्वांची पठारे रुद, समतळ अन् सारख्या उचीची एखाद्या विस्तीर्ण फरसबदी गच्चीचे मधले चिरे खालून कोणीतरी वर उचलावे, तशी या पर्वतश्रेणींची रचना आहे. हे पर्वत जन्माला घालताना धरतीमातेला हृदयभेदक प्रसववेदना सोसाव्या लागल्या आहेत सह्याद्रीचा हा सगळा पश्चिम भाग कोण्या अज्ञात काळी झालेल्या ज्वालामुखीच्या प्रचड स्फोटातून वर आलेला आहे ही उत्पाती डोंगरबाळे लटपटून पडू नयेत, म्हणून भूमातेने त्याना एका बाजूने मायेचा हात दिला आहे काळ्या फत्तराच्या उच सुळक्याना पूर्वेच्या बाजूने मातीच्या टेकड्या चिकटलेल्या दिसतात, ते मागाहून पृथ्वीने आपले उचललेले अग होय या स्फोटापूर्वी पश्चिमसागर खरोखरीच सह्याद्रीचे पाय धूत होता

युगयुगे घेउनी लोळण पायावरी
गिरिकडे कशाची सागर विनती करी

हे श्री काणेकराचे काव्य एकाकाळी यथार्थ वचन होते, पण या आकस्मिक उत्पाताने समुद्राचा तळ उचलला आणि पाणी मागे रेटले गेले सह्य आणि समुद्र याच्यामध्ये एका नवीन भूमीची पट्टी तयार झाली. अपरान्त असे तिला नाव मिळाले ठाणे जिल्ह्यात ही पट्टी रुद आहे आणि खाली निमुळती झाली आहे यावरून स्फोटाचे मुख्य केद्र या भागातच असले पाहिजे हे अनुमानाने जाणता येते आणि त्याला भूगर्भशास्त्राचा दुजोराही मिळतो

ब्रह्मगिरीच्या या मुख्य पठारालाच किल्ला अशी सज्ञा आहे आज तिथे

किल्ल्यासारखे काही दिसत नसले, तरी एका काळी याला बावीस बुरूज अन् बारा गेटा होत्या रणझुजार पुरुष या किल्ल्याला अजिक्य अन् अभेद्य समजत. यादव राजानी हा आणि असेच काही किल्ले आजूबाजूच्या मुलखयावर उभारून आपले राज्य बळकट केले होते पण अशा अभेद्य किल्ल्यावर यादवांचे आधारलेले राज्य, सघटनेचा अभाव आणि फदफितुरी या दुर्गुणामुळे कोलमडून पडले. शिवाजीमहाराजाचा जन्म झाला त्याच वर्षी हा किल्ला शहाजहानने काबीज केला १७२० साली त्याच्यावर निजामाचे आधिपत्य आले पुढे १७५२ सालात मराठ्यांनी तो आपल्या ताब्यात घेतला.

पेशव्याच्या अमदानीत हा किल्ला चागल्या स्थितीत होता आणि इथे शिबदीही होती त्यानतर इग्रजाची धाड आली खालून मारा करणाऱ्या इग्रज सैन्याला वरच्या थोड्याशाच सैन्याने बराच काळ दाद दिली नाही; पण अखेर इथेही फितुरीच भोवली आणि पेशव्याना किल्ला इग्रजाच्या स्वाधीन करावा लागला त्रिबककिल्ला पडल्याची धास्ती इतरानीही घेतली आणि याच्यासारखे इतर सोळा बळकट किल्ले यत्किंचितही प्रतिकार न होता इग्रजाच्या हाती पडले

ब्रह्मगिरीच्या पलीकडच्या पालथणाला थोडे खाली उतरल्यावर आपण



मूळ गगेच्या स्थानी पोचतो गौतमऋषीच्या पापक्षालनासाठी शकराच्या आज्ञेने गगा इथे अवतरली. याच भागात प्राचीन काळी गौतमऋषीचा आश्रम होता. मावळात भात पिकविण्याचा पहिला यशस्वी प्रयोग केला तो गौतमानेच. आजूबाजूला अवर्षण झाले तरी या भागात पाऊस भरपूर पडे गौतमाने पेरलेले महामूर पिके इतर ठिकाणी दुष्काळाने पिडलेले ऋषि-मुनी गौतमाच्या तपोभूमीत आसरा घेत त्याच्याबरोबर शेतीतही राबत.

एक दिवस एक रोडकी गाय गौतमाच्या शेतात घुसली. पोटरीस आलेले भात आडव्या जिभेने चाटू लागली हाडाच्या शेतकऱ्याला हे कसे सहन व्हावे ? त्याने मुठीतला एक दर्भ तिच्या अंगावर फेकला. पण त्याचे दुर्दैव असे, की तो दर्भ जणू तीक्ष्ण शर ठरला त्याने त्या गाईचा प्राणच घेतला. गोहत्येचे पातक म्हणजे पंचमहापातकांपैकी एक गौतमाचे काळीज गलबलले आत्मराज निस्तेज झाला

आता या महापातकापासून मुक्त व्हायचे कसे ? धर्मवेत्त्या ऋषीकडे जाऊन त्याने विचारणा केली त्यांनी गौतमाला शंकराची आराधना उपदेशिली अनेक वर्षे देहाचे काष्ठ करून त्याने महादेवाला आळवले मग शिव प्रसन्न झाला ‘ वर ब्रूहि ’ म्हणाला गौतमाने त्याच्या जटेतली गंगा मागितली शिवाने गंगेला आज्ञापिले ‘ गंगे, खाली उतर अन् या तपोधनाचे पाप धुऊन टाक. ’ गंगा तयार होईना तिला शिवाची जवळीक सोडवत नव्हती शिवाने खूप आर्जवे केली , पण ती निष्फळ ठरली

शेवटी शंभुमहादेव खवळला त्याने आपल्या जटा झिंजुडल्या, आपटल्या गंगा निरुपायाने खाली आली गौतम तिच्या स्नानाने गोहत्येच्या पापातून मुक्त झाला गौतमासाठी आली म्हणून लोक तिला गौतमी गंगा म्हणू लागले पुढे हे तिचे नाव मागे पडले गोदावरी या नावाने ती विख्यात झाली


सांप्रत एका औदुंबराच्या खाली एका खोलगट कुंडात, पाऊलसुद्धा बुडणार नाही, इतक्या प्रमाणात ही मूळगंगा इथे दिसते मी तिच्या जलाने नेत्रस्पर्श आणि मार्जन केले आणि वर आलो इथून थोड्याशा अंतरावर एका दगडावर काही रेषा उमटलेल्या दिसतात, त्याच शंकराच्या आपटलेल्या जटा होत

हीच गौतमी गंगा गिरिगर्भातून प्रवास करून पर्वताच्या पूर्व भागाला प्रकटली लोकांनी त्या गंगाद्वारावर गायमुख बांधले त्याच्या वरच्या बाजूला गंगेची मूर्ती स्थापून तिच्यावर छोटेसे मंदिरही उभारले दोन उंच कडे एक-मेकांना भेटले आहेत, अशा संधीत हे गंगाद्वार आहे डाव्या कड्यावरची शिळा थेट घुबडाच्या आकाराची आहे ब्रह्मगिरी याच ठिकाणी खरा ‘ रौद्र ’ दिसतो. ठिबकणाऱ्या गंगेच्या शेजारचे वराहतीर्थ डोंगराच्या कपारीत आहे ते जितके पाण्याने भरलेले आहे, तितकेच अंधारानेही त्याला लागूनच कोलंबिका देवी उभी आहे

गंगाद्वारापुढून एक पायवाट गोरक्षनाथाच्या गुहेकडे जाते ज्ञानेश्वर ज्याना ‘ योगाब्जिनी सरोवरू ’ म्हणून गौरवतात, त्या गोरखनाथाची मूर्ती पाहून सगळ्या नवनाथाची मालिका डोळ्यांपुढे उभी राहते शिवापासून त्याची परपरा सुरू होते ते शकराला आदिनाथ म्हणतात शिव हे नाथाचे उपास्य आणि योग हे साधन उपास्य देवतेचे अनादि क्षेत्र आणि योगसाधनेला अनुकूल असे एकान्त स्थळ या दोन्ही दृष्टींनी नाथपथी यांची त्रिबक आणि ब्रह्मगिरी या स्थानांवर भक्ती आहे

गोरखनाथाचा एक शिष्य गहिनीनाथ. तो ब्रह्मगिरीवरच कुठल्या तरी गुहेत वास्तव्य करीत होता. महाराष्ट्रात नाथप्रसद्रायाची परपरा सुरू करणारा हा पहिला पुरुष होय हा अयोनिसभव आहे. हा एका चमत्कारिक घटनेतून जन्मला

बाल गोरखनाथ मत्स्येंद्रांच्या समागमे हिंडत होता एकदा तो काही मुलात मिसळला त्याच्याबरोबर तोही मातीच्या मूर्ती घडवू लागला त्याला गुरू-कडून मत्र मिळाला होता हातात मातीचा गोळा अन् तोडात मत्र अशा स्थितीत जी मूर्ती घडली, तिच्यात चैतन्य सचरले ते सजीव बालक निर्माण झाले तोच हा गहिनीनाथ



अशाच एका योगायोगाने गहिनीनाथाला निवृत्तिनाथ हा शिष्य लाभला निवृत्तीचे वडील विठ्ठलपत मध्यरात्री चारी मुलाना बरोबर घेऊन ब्रह्म-गिरीला प्रदक्षिणा करीत होते एवढ्यात अचानक पाऊस सुरू झाला त्यातच वाघाची डरकाळी उठली. मुले भयाने इतस्तत पागली. त्यापैकी एक चुकलेले लेकरू म्हणजेच निवृत्तिनाथ, गहिनीनाथाच्या गुहेत पोचला गहिनीला अनायासे एक सच्छिष्य लाभला. ती घटना त्यासाठीच

जणू घडली होती गहिनीनाथाने त्याला सात दिवस आपल्या गुहेत ठेवून घेतले. संप्रदायाची दीक्षा दिली 'तत्त्वमसि' चा उपदेश केला, आणि अशा प्रकारे त्याची ज्ञानदृष्टी उघडून त्याला परत पाठवले

पुढे तोच उपदेश निवृत्तीने ज्ञानेश्वराना केला. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या भागवत धर्मात नाथपथाचा योग हळुवारपणे शिरला. योग अन् भक्ती याचे भागवतधर्मात सहज मीलन झाले

शेवटी निवृत्तिनाथ समाधी घेण्यासाठी ब्रह्मगिरीलाच गुरुचरणापाशी आला. गगासागर तलावावर निवृत्तिनाथाचे समाधिमदिर आहे. मला त्या स्थानाची विलक्षण ओढ होती पण ज्या उल्हासाने मी ते पाहायला गेलो, तो उल्हास प्रत्यक्ष दर्शनाने ओसरला भावना विरजली. लक्षावधी भागवतधर्मीयाच्या परम गुरूचे हे स्थान इतके अचेतन, अव्यवस्थित आणि उपेक्षित दिसेल, अशी मी कल्पना केली नव्हती प्रसादाच्या ऐवजी विषाद घेऊनच मी तिथून बाहेर पडलो

गगाद्वारापासून साडेसातशे पायऱ्या उतरून मी खाली आलो होतो एवढी सगळी तीर्थे, स्थळे करून कुशावर्तावर येईतो अकरा वाजून गेले होते. तिथे यात्रेकरूची विधियुक्त स्नाने, दाने चालली होती. या क्षेत्रातले मुख्य तीर्थ ते हे. ब्रह्मगिरीवर उगम पावलेली गौतमी गगा म्हणजेच गोदावरी भूगर्भातून इथे प्रकट झाली आहे कुशानी अभिमत्रून गौतमाने तिला इथे बाधून टाकले म्हणून हे कुशावर्त. हे कुड सर्व बाजूनी सुबद्ध असून उन्हाळ्यातही यात भरपूर पाणी असते पण सांप्रत त्र्यबकच्या नगरपालिकेने कुडात उतरून स्नान करायला बदी घातली आहे बादल्या भरून घ्याव्या अन् वरच्या बाजूला फरशीवर स्नान करावे क्षौर, पिंडदान वगैरे धर्मकृत्ये इथे करायची असतात या तीर्थाच्या परिसरात अनेक देव-देवताची दाटी आहे त्र्यबकेश्वर दर सोमवारी पालखीत बसून इथेच स्नानासाठी येत असतो.

याच्याजवळच गगामदिरासमोर कनखळ तीर्थ आहे गौतम ऋषीचे भाल कुटण्याचे हे उखळ अशी समजूत आहे कोणीतरी वृद्ध यात्रेकरू स्नान करून वस्त्र पालटताना श्लोक म्हणत होता –

गगाद्वारे कुशावर्ते त्र्यंबके नीलपर्वते।
स्नात्वा कणखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ।।

त्या वृद्धाचा जर पुनर्जन्म टळला असेल तर माझा तरी का म्हणून शिल्लक उरावा ?

आता पाय अगदी थकले होते कुशावर्ताहून मुक्कामाच्या जागी जाईपर्यंत-सुद्धा देहाचा भार सोसण्याची त्यांची तयारी नव्हती मी घरी आलो अन् चक्क आडवा झालो. ज्याच्यावर मी दोही अंगी चढून उतरलो होतो, तो ब्रह्मगिरी तिथल्या माडीवरून दिसत होता त्याच्याकडे पाहात असता मला वाटले, मी आज ज्येष्ठात इथे आलो तो आषाढात आलो असतो तर –

भरून आलेल्या आकाशाखाली घनगर्जवृष्टीत हा विराट त्र्यंबकराज हाता-हातावरून धाराप्रवाह खाली लोटून देत असलेला मला पाहायला मिळाला असता पठारावर त्याच्याच वर्णाचे मेघ दाटून राहिल्यामुळे कधी तो आहे त्यापेक्षा अधिक उच्च दिसला असता आणि वर्षून विरल अन् शुभ्र झालेल्या ढगाच्या प्रावरणाखाली कधी तो गूढरम्यही वाटला असता

# ७. सज्जनगड

सज्जनगडावर जाण्यासाठी आम्ही साताऱ्याला पोचलो, तेव्हा ओळखीचे काही लोक भेटले. ते आम्हाला म्हणाले, 'दासनवमी सोडलीत. सगळा उन्हाळा घालवलात अन् सज्जनगड चढायला आलात ते ऐन पावसाळ्यात. या दिवसांत तिकडे जाणे कठीण असते.' त्या रात्री ज्या चार सरी कोसळल्या त्या पाहता त्यांचे म्हणणे खरे होते, हे मला पटले, पण आम्हाला सोबत मिळणार होती. तिथल्या आयुर्वेदिक विद्यालयातल्या काही विद्यार्थ्यांनी आमच्या संगे गडावर येण्याचे कबूल केले होते. म्हणून मी निर्धास्त होतो. सकाळी ठरल्या वेळी दोन टांगे घेऊन ते विद्यार्थी आमच्या मुक्कामी दाखल झाले आणि माझा मावळता उत्साह जाग्यावर आला.

आम्ही टांग्यात स्थानापन्न होताच टांग्याचे श्यामकर्ण डोंगरचढणीला लागले. बोगद्याच्या पलीकडे गेलो मात्र, एवढा वेळ दृष्टीआड असलेले एक निराळेच जग आमच्यापुढे विस्तारले. डोंगर, दऱ्या, नांगरटीची जमीन अन् मधून मधून तुरळक झाडीत जानपद वस्ती, असे त्याचे स्वरूप होते. सपाटीवर येताच घोड्यांनी आपल्या चालीची दुगुण केली.

दुतर्फा जांभळीच्या झाडांमधून आमचा रस्ता जात होता. घोसांनी लटकणारी आपली मधुर फलसंपदा जात्या-येत्याच्या मुखी लावून ती झाडे नुकतीच अकिंचन झाली होती. आजूबाजूच्या शेतातल्या पेरण्या उरकल्या होत्या. धरित्रीच्या अंगावर हिरवे रोमांच उगवले होते. भाताच्या शेजारी बाजरीवर येत होती. मधेच एखाद्या पट्ट्यात ज्वारीचे नवांकुर लसलसत होते. वायुलहरी त्यांना 'डोलबाई डोल' करीत होत्या. पाऊस झोडपील का ऊन ताव देईल,

लण झाकोळील का जनावर चाटील, यापैकी कसलीच काळजी त्या अंकुराना दिसत नव्हती.

वाटेत लागलेल्या पहिल्या गावात डाव्या हाताला एक देऊळ दिसले. टांगेवाला म्हणाला, 'ही पदुबाई बर का!'

पदुबाई म्हणजे पद्मजा लक्ष्मी असावी बहुधा शेजारचे भरलेले तळे पाहून मी टांगेवाल्याला विचारले, 'हे तळे नेहमीच असे तुडुंब असते का?' तो म्हणाला, 'एका काळी ते तसे होते, पण एक दिवस एक 'बाहेरची बाई' त्याला शिवली आणि त्याचे पाणी एकदम आटले' जाता जाता एका लोककथेचा एक कण त्याने माझ्या पदरात टाकला होता रजस्वला स्त्रीच्या स्पर्शाने तळे आटणे, हा कल्पनाबंध भारतभरच्या लोकसाहित्यात आढळतो. त्याचा इथेही प्रत्यय आला अशा अनेक लोककथा इथल्या जनपदांतून अन् डोंगरवस्तीतून ऐकायला मिळत असतील. कोणी तरी साहित्याचे हे मूलधन गोळा करणे जरूर आहे वाङ्मयाची आवड असलेल्या विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हे क्षेत्र नांगरले तर महामूर पीक हाती लागेल.

आणखी थोडे पुढे गेल्यावर दोन उपऱ्या वसाहती दिसल्या. टांगेवाल्याने माहिती पुरवली, की तिथे गोसावी राहतात गवताच्या आड चटयांची पाले दाटीवाटीने उभी करूच ते तिथे राहिले होते एवढे मैदान मोकळे असताना लहानशा जागेत पुंजका करून राहण्यात त्यांची संघभावना दिसत होती त्यांच्या पालाची तोंडे एका दिशेला नसून वेगवेगळ्या दिशांना होती त्याचा अर्थ असा, की कुठल्याही दिशेने संकट डोकावले तरी ते नजरेतून सुटू नये रानात बसायचा प्रसंग आला तर गुरेसुद्धा कोणत्यातरी उपजत प्रेरणने मंडलाकार बसतात मग ही तर माणसेच शिवाय वारंवार स्थलांतर करणारी, अनोळख्या जागी जाणारी.

खण किंवा रंगीत कापडाचे तुकडे काठीला बांधून त्यांनी ते ध्वज हारीने उभे केले होते गोसाव्यांची वस्ती ओळखण्याची ती मुख्य खूण. ही माणसे आजूबाजूच्या गावात भिक्षेसाठी हिंडतात अन् मिळालेले शिळेपाके बाहेरच्या बाहेर खाऊन मगच त्या ध्वजदर्शित रेषेच्या आत येतात. बाहेरचे उष्टेपाष्टे आत आणल्यास त्यांना ते बाधते म्हणे!

गोसावी हा वर्ग महाराष्ट्रात जागोजाग दिसतो. त्याबाहेर सबंध भारतभरही त्याचा आढळ होतो. या वर्गात अनेक जातीच्या लोकांचा भरणा आहे.

याचे कारण ज्याला इच्छा असेल त्याला दीक्षा घेऊन गोसावीपथात शिरता येते गोसाव्यामध्ये मठधारी अन् घरबारी असे दोन प्रमुख वर्ग आहेत मठधारी आपापल्या मठात सन्यस्त वृत्तीने राहतात अन् केवळ भिक्षेवर निर्वाह करतात घरबारी हे त्यातले गृहस्थाश्रमी लोक तेही भिक्षा मागतात पण त्याच्यातले बरेचसे लोक व्यापार उदीम करणारे आहेत महाराष्ट्रातले गोसावी एक वेगळीच भाषा बोलतात तिच्यावर गुजरातीची छाप आहे त्यावरून हे लोक गुजरात-राजस्थान या भागातून इकडे आले असावेत, असे वाटते.

गोसाव्यात सात मठ अन् बावन मठ्या आहेत. पूर्वीच्या गोत्र-प्रवराचा विसर पडल्याने आता मठी हेच त्यांच्यातल्या वेगळेपणाचे निदर्शक ठरले आहे. समान मठीच्या घराण्यात ते लग्नसबध करीत नाहीत

उरमोडी नदीच्या पुलावर आणून टागेवाल्यानी आम्हाला उतरवले. पुढचा रस्ता ढोपरभर चिखलाचा असल्यामुळे टांग्याना तो दुर्गम होता ते आणखी थोडे पुढे गेले असते तर भारतीय युद्धात भूमीने रथचक्र गिळल्यामुळे कर्णाची जी अवस्था झाली, तीच त्याचीही झाली असती सातारा ते सज्जनगडाचा पायथा या सहा मैलाच्या अतरापैकी पाच मैल अतर आम्ही तोडले होते. आता सज्जनगड आमच्या समोर उभा होता. शेतातली एक पायवाट धरून आम्ही पुढच्या मोहरेला लागलो पण ती पायवाट एका ओढचात उतरून गडप झाली. तिथेच एक शेतकरी भेटला अन् त्याने आमची चूक दुरुस्त केली. ' भलतीकडेच आलात तुम्ही. आता असे तिरके वर चढा म्हणजे तुम्हाला रस्ता भेटेल '

चूक खरी, पण ती आमच्या पथ्यावर पडली तिने आमची अर्ध्या मैलाची पायपीट वाचवली होती अन्यथा पायथ्याच्या गजवडी गावाला वळसा घालून आम्हाला यावे लागले असते. आम्ही डोगर चढू लागलो आणि एवढा वेळ झिमझिम करणाऱ्या पावसाला एकदम जोर चढला. आडव्या तिडव्या जल-धारांनी तो सडसड आम्हाला झोडपू लागला हातातल्या छत्र्या केवळ ' ओझ्याला काळ ठरल्या कपडे भिजून अगाला बिलगले. पाऊस चुकवण्या-साठी एखाद्या झाडाखाली जावे, तर त्याचे ओघवळे पावसापेक्षाही टपोर. शेवटी एकेक पाऊल पुढे टाकीत राहणे हेच श्रेयस्कर ठरले

माझी लहानपणची आठवण जागृत झाली आमच्या आंबेड्याला पच-क्रोशीची सामुदायिक श्रावणी व्हायची. तिच्यातला स्नानविधी केवळ मार्जनावर

न उरकता आम्ही त्यासाठी गावाबाहेरच्या एका ओढ्यावर जात असू वरच्या धारा थपताच खाली ओढ्यात बुड्या मारीत असू मग ऋषींची पूजा अन् देव-पितरांचे तर्पण करून पुढच्या उपाकर्मासाठी परतत असू येतानाही बहुधा पाऊस असायचाच आमचे ओलेते अंग त्याने पुन्हा भिजवून काढायचे तशा त्या जलवृष्टीत वैदिकाचे माध्याह्न सवनात पर्जन्यसूक्त सुरू व्हायचे –

**पर्जन्याय प्रगायत दिवस्पुत्राय मीळ्हुषे ।**
**स नो यवसमिच्छतु ।।**

'आकाशपुत्र पर्जन्याचे यशोगान करा आम्हाला धनधान्य देण्याची त्याला इच्छा होवो तीन्ही भुवने या पर्जन्याच्या आधारावर जगत आहेत सर्व औषधींमध्ये हा फलबीज ठेवतो म्हणूनच चराचराचा प्राण याच्यामध्ये राहतो हाच माझ्या सद्धर्माचे शतावधी वर्षे रक्षण करो '

दहा वाजायच्या सुमारास आम्ही गडाच्या महाद्वारात पोचलो हे द्वार आग्नेयी दिशेला आहे ते ओलाडताच आणखी एक कमान लागते आणि पुढे गडाचे पठार सुरू होते पन्हाळा अन् ब्रह्मगिरी यांची पठारे नुकतीच मी पायदळी घातली होती. त्या मानाने हे अगदीच त्रुटित आहे त्याचा घेर सहाशे फुटांपेक्षा अधिक नाही. उंची तर अवघी हजार फूट सह्याद्रीचे जे लहान लहान फाटे सातारा जिल्ह्यात पसरले आहेत त्यांतल्याच एकावर हा किल्ला बांधलेला आहे.

गडावर यायला परळीच्या बाजूने आणखीही एक वाट आहे पण ती बिकट असल्यामुळे बहुतेक यात्रेकरू 'धोपट मार्गा सोडू नको' या तत्त्वाचाच अवलंब करतात.



हा किल्ला कोणी आणि केव्हा बांधला, याविषयी इतिहास मूक आहे मात्र दक्षिणेत मुसलमानाचा अमल सुरू होण्यापूर्वी तो अस्तित्वात होता, एवढे समजते कदाचित तो इ स च्या दहाव्या किंवा अकराव्या शतकात शिलाहार राजांनी बांधला असण्याचा संभव आहे. साताराचा

२०६०८



अजिमतारा किल्ला व परळीचा हा गड हे दोन किल्ले या भागातले जय-विजय शोभतात दोन्ही बहुधा एकाच काळचे असले पाहिजेत शिवाजीमहाराजानी १६७३ त हा आणि याच्या पाठोपाठ अजिमतारा असे दोन्ही किल्ले विजापूरकराच्या हातातून हिसकून घेतले

समर्थ रामदास हे शिवाजीमहाराचे गुरू ते त्या वेळी कृष्णेच्या खोऱ्यात जिथे बरे वाटेल तिथे राहात होते महाराजांना वाटले, समर्थांच्या वास्तव्याला हे स्थान चागले आहे निवांत, निर्वेध आणि सुदर शिष्याने गुरूपुढे तसा प्रस्ताव माडला गुरूने त्याला मान्यता दिली.

समर्थ गडाचे रहिवासी झाले त्यांनी महाराष्ट्राच्या सतमडळीला गडावर पाचारण केले मोठा सतमेळा जमला यावनी शब्दानी कान विटलेल्या गडावरच्या झाडापेडांना ‘ बरवा नामघोष ’ ऐकायला मिळाला. भजनाचे फड रगले. कथा-कीर्तनातल्या निरूपणात परमार्थाची शीग लागली या मेळाव्याला शिवाजीमहाराजही उपस्थित होते सताची ती प्रेमळ, पवित्र रसवती कानानी पिऊन शिवरायाचा आत्मा सर्वांगी पुष्ट अन् प्रसन्न झाला ही अध्यात्मसपदा लुटून आणि सतसज्जनांचे अक्षै आशीर्वाद पदरी बाधून शिवाजीमहाराज आपला कर्मयोग आचरण्यासाठी निघून गेले इतक्या मोठ्या सख्येने सज्जनाचा गडावर एक मास रहिवास झालेला पाहिल्यावर या किल्ल्याला सज्जनगड ’ असे नाव ठेवणे महाराजाना उचित वाटले.

पूर्वी होता अस्वलगड आता झाला सज्जनगड पण या गडाचे बारसे एवढ्यावरच सपले नाही. शिवाजीमहाराजाच्या अवसानानतर औरगजेबाने दक्षिणेत जोराची मुसडी मारली या भागात येऊन त्याने साताऱ्च्या अजिमताऱ्याला वेढा घातला. परशुराम त्रिबक प्रतिनिधी हे त्या वेळी सज्जनगडावर कारभारी होते अजिमताऱ्यावरच्या आपल्या शिबदीला त्यानी इथूनच रसद पुरवली पुढे तेच सकट सज्जनगडावरही ओढवणार, हे ध्यानी घेऊन त्यांनी इथले रामपचायतन वासोटा किल्ल्यात नेऊन ठेवले आणि समाधीचे दार चिणून टाकले मोगलानी हाही किल्ला सर केला बादशहाने त्याचे नाव ‘ नवरसतारा ’ ठेवले. पण चक्रनेमिक्रम एवढ्यावर थाबतो थोडाच ! पुढे राजारामाच्या कारकीर्दीत याच परशुराम त्रिबकाने पुनश्च या गडावर भगवे निशाण फडकवले वासोट्याहून मूर्ती परत आणल्या त्याची विधियुक्त स्थापना केली.

समाधीचे द्वार उघडले. आणि त्या निमित्त मोठे अन्नसतर्पण करून ते गडाखाली उतरले

आमची पावले त्याच समाधीस्थानाकडे वळली मदिरापुढे अशोक वृक्ष बरेच आहेत पण ते फुलाना मात्र पारखे आहेत आमच्या कोकणातली अशोकाची झाडे फुलांच्या घोसानी डवरून येतात लांब देठाचे, बारीक पण जाड पाकळ्यांचे आणि लाब केसर असलेले ते पीतरक्त फूल उपेक्षणीय नसते त्यातल्या मकरदाच्या भोजनासाठी तांबडे मुंगळे तर त्या झाडांवर आपली वसाहतच उभारतात. देशावरचे अशोक फुलत नाहीत ते बहुधा नर असावे

त्या वृक्षराजीखालून पुढे होऊन आम्ही देवद्वार गाठले तिथे एका चौथऱ्यावर गणपतीबाप्पा आहे अन् तो चक्क देवाकडे पाठ करून बसला आहे तो देवावर रुसला असेल, का यात्रिकाचे स्वागत करण्यासाठी सामोरा झाला असेल ? तो ‘बृहदुदर’ तर आहेच, शिवाय त्याचा नाभीप्रदेश पुढे येऊन खाली वळला आहे. गणपती बहुधा महाद्वाराच्या चौकटीवरच बसतो.पण इथे महाद्वारच नसल्यामुळे त्याला जमिनीवरच बैठक मारणे भाग पडले आहे देऊळ दगडी तर सभा मडप लाकडी आहे सभोवार कमानी असून त्यावर घुमट आहेत गाभाऱ्यात रामपचायतन विराजत आहे



आम्ही गाभाऱ्याच्या दाराशी उभे राहून दर्शन घेत असता भूगर्भातून रुद्राच्या नमकाचे स्वर कानी पडू लागले कुठून येत होता तो वेदध्वनी ? कुठून म्हणजे, समर्थांच्या समाधी-स्थानातून आम्ही उभे होतो त्याच्याच खाली भुयारात ते स्थान होते सभामडप संपून दगडी चौथरा लागतो तिथे मधोमध आत जाण्याचा निरुद दरवाजा होता ‘करी मस्तक ठेंगणा’ हा उपदेश ध्यानी आणून

आम्ही आत प्रविष्ट झालो. प्रथम एक चौकोनी मोकळी जागा आणि पुढे समाधीचा गाभारा. भुयार म्हणजे जणू अंधाराचे काळीज एका समईचा तिथे काय पाड लागणार ! आत काही तरी आहे एवढेच ती 'धाकुटी दीपकळी' सांगू शकत होती त्या रुद्र म्हणणाऱ्या बुवाने दुसरी एक वात पेटवून हातात धरली, तेव्हा कुठे आमच्या डोळ्यांवरचे पटल उडाले

आमच्या समोर आता एक लांबट चौकोनी शिळा होती. तिच्यावरच अभिषेकाची धार गळत होती सभोवती चार माणसांना प्रशस्तपणे वावरता येईल इतका अवकाश होता. मी दाराबाहेरूनच करसंपुट जोडला –

**शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे**
**वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे**
**कवी वाल्मीकासारिखा मान्य ऐसा**
**नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा ॥**

मला अगदी अनावरपणे वाटले, की दोन्ही भुजा पसरून त्या समाधीला कवळावे पण मी सुस्नात होऊन आलेला असूनही 'श्रुतिस्मृति पुराणोक्त' सोवळा नव्हतो आळंदीला ज्ञानेश्वर माउलीच्या चरणाजवळ मी जी सलगी करू शकत होतो, ती त्याच परिस्थितीत इथे करणे मला अशक्य होते दोन स्थळांमधलाच नव्हे, तर दोन पंथांमधलाही हा ठळक भेद आहे सोवळ्या ओवळ्याच्या कटाक्षाने पूजास्थानाबद्दल आदर वाटत असेल; पण आदर म्हणजे थोडेसे भयच ते भयाच्या सावटात प्रेमाची वाढ खुंटते, हे सत्य विसरता येणार नाही.

**'रामदास गुरु माझे आई ।**
**मजला ठाव द्यावा पायी ।'**

हे भजन आपणच जन्माला घातले आहे ना ? मग आईच्या चरणी मिठी घालायला सोवळे नेसून यावे लागते का ? देवाजवळ एक वेळ चालेल, पण संताजवळ तरी सोवळ्याचा निर्बंध नसावा असे मला प्रामाणिकपणे वाटते

ज्ञानेश्वरांचीही समाधीच, आणि रामदासांचीही समाधीच पण दोहोत खूप अंतर आहे. आळंदीला ज्ञानेश्वर सदेह समाधीत गेले आहेत तर इथे

समर्थांच्या दहनभूमीवर हा चिरा निर्माण झाला आहे नेत्रपाती न लववता मी तो समाधीचा चिरा न्याहाळू लागलो ती समाधी अन् तिच्यावरची ती राममूर्ती अलीकडच्या बहुतेक देवमूर्ती राजस्थानातून येतात आणि त्या संगमरवरी असतात ही मूर्ती तामिळनाडमधून आली आहे अन् ती कृष्ण पाषाणाची आहे.


समर्थ एकदा तंजाऊरला गेले होते तिथली कलाकारी त्याना आवडली राम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान अशा चार मूर्ती आपणासाठी करवून घेण्याबद्दल त्यांनी मल्हार निबदेव यांना आज्ञा केली. त्याने त्या करवून घेतल्या अन् केशव नि:स्पृही याच्या बरोबर गडावर पाठवून दिल्या शके १६०३ माघ वद्य पंचमीस त्या गडावर आल्या श्रीचे मुखावलोकन करून समर्थांना परम समाधान झाले त्यांनी त्या आपल्या शेजघरात तात्पुरत्या मांडल्या त्यांना त्यांची विधिपूर्वक प्रतिष्ठा करायची होती. पण . . .

पण तो योग नव्हता. समर्थांना देवाने ' बोलावणे ' धाडले. चार दिवसानंतर माघ वद्य नवमी उजाडली. समर्थ म्हणाले, ' आज आमचे महाप्रयाण! ' भर दुपारचा समय समर्थांना अस्वस्थ वाटू लागले ते पलंगाखाली उतरले. उत्तरेस मुख करून बसले समोर रामरायाची मूर्ती होतीच. त्यानी तिच्यावर दृष्टी खिळवून ध्यान धरले शिष्यवृंद गलबलला अश्रू ढाळू लागला आता आपण पोरके झालो असे त्याला वाटले. समर्थ त्या शिष्याना म्हणाले, ' यापुढे माझ्या दासबोधात मला पाहा ! ' आणि त्यानी बाहेर उभारून सर्वांना आशीर्वाद दिला.

आणि मग तो शेवटचा क्षण ! जितका उदात्त तितकाच गंभीर ! रामनाम त्या क्षणी वैखरीवर येणार नसेल तर जन्मभराची साधना वायाच गेली असे व्हायचे ' राम, राम, राम ! '

तीन वेळा स्मरण केले
अंबर अवघे गजिन्नले ।
रामनामें कोंदाटले । जिकडे तिकडे ।।
ध्वनी जाली संपूर्ण
जाला अवतार हो पूर्ण .

या जागी पूर्वी एक खड्डा होता. कल्याणाने एकदा समर्थांना विचारले होते, 'हा खड्डा बुजवायचा का ?' समर्थ म्हणाले होते, 'नको हाही कामी येईल ' समर्थांचा गर्भित हेतू ओळखून शिष्यानी त्याच्या देहाला इथेच अग्निसंस्कार केला आणि आश्चर्यांची गोष्ट अशी की तिसऱ्या दिवशी रक्षा सावडताना हा समाधीचा चिरा हाताला लागला



पण याला मधोमध चीर कशी ? अशनिपात झाला असेल का ? का आकाशीची वीज आली भेटायला ? वीज नाही, पण पट्टशिष्य कल्याण आला होता कल्याण म्हणजे सेवाधर्माचे जागते दैवत ! शिष्योत्तम कसा असावा असे कोणी विचारले, तर खुशाल कल्याणस्वामीकडे बोट दाखवावे. समर्थांच्या अवतारसमाप्तीच्या वेळी तो जवळ नव्हता. ती वार्ता त्याला काही दिवसांनी समजली त्याच्या गुरुभक्तीला ते आव्हानच होते. आपण जवळ नसताना गेली ! गुरुमाउली अवतार संपवते म्हणजे काय ! आपली सेवा-शुश्रूषा काय फुकटच गेली तो जिथे होता तिथून धावत धडपडत गडावर आला त्याने त्या चिऱ्याजवळ धरणे धरले मुखी गुरूचे नाम आणि आसनमांडी घट्ट. असे काही दिवस गेले समर्थांच्या आत्म्याचा निरुपाय झाला शिष्याच्या 'जीवातळी जीव अथरणाऱ्या सदगुरूला प्रकृतीचा नेम सोडून सदेहपणे प्रकट व्हावे लागले चिरा दुभंग झाला आणि त्यातून समर्थांची मूर्ती वर आली कल्याणाला गुरुदर्शन झाले त्याचे धरणे सार्थकी लागले अद्याप ती साक्षात दुभंगल्या चिऱ्याच्या रूपाने तिथे कायम आहे याच समाधीवर मागाहून मंदिर उभारले गेले त्यामुळे आपोआपच ते भुयार बनले. दर्शन करून दुसऱ्या जिन्याने आम्ही वर आलो

प्रदक्षिणा करताना वायव्येला आणखी एक समाधी दिसली. ती आहे समर्थ-शिष्या वेणाबाईची. त्यांचे माहेर कोल्हापुरात सासर मिरजेत बाळपणीच वैधव्य शिरावर आदळले आप्तेष्टांनी जाचले निंदकांनी कूट खाल्ली जगणे असह्य झाले. पूर्वसंचित बळकट होते म्हणूनच त्यांना समर्थांची भेट झाली जे पाय एकदा लाभले ते त्यांनी आयुष्यभर सोडले नाहीत समर्थांच्या आधी त्यांच्या डोळ्यादेखत निर्वाण साधून त्या भाग्यवती ठरल्या

मदिरआकारातून आम्ही बाहेर निघालो मध्यान्ह जवळ आला होता, पण आभाळ मेघाच्छादित असल्यामळे वेळ ‘ घनश्याम सुदरा ’ चीच वाटत होती पावसाने मघली सुट्टी घेतली होती तरी सूर्यदर्शनाचा अजीबात रग दिसत नव्हता. माझ्या ऐवजी एखादा वैदिक ऋषी असता, तर त्याने म्हटले असते, ‘ पणीनी इद्राच्या धेनू चोरल्या ’ म्हणजे मेघानी सूर्यकिरण चोरले झाडे अग झाडीत होती वारा म्हणत होता ‘ पावसाने तुमची वस्त्रे भिजवली का ? मग मी आता ती वाळवून देतो ’ त्याने वस्त्रे वाळवली खरी, पण अगात हिव भरले त्याचे काय ? क्षणाक्षणाला रोमाच उठत होते, पण तरीही आम्ही फिरत होतो तिथे एक महत भेटला. समर्थ ज्या ठिकाणी राहात त्या मठात त्याने आम्हाला नेले. मठाचा जीर्णोद्धार सुरू होता त्याने आम्हाला शेजघराच्या दाराशी उभे केले. तो आत गेला आणि तिथून एकेक वस्तू बाहेर आणून आम्हाला दाखवू लागला. ‘ हे समर्थांचे वल्कल हा जरीचा फेटा . हा लोटा ’

वल्कलाची घडी होती ते सुमारे तीन चार हात लांबरुद असल्याचे महंताने सागितले ते हाताला जाड पण मऊ मऊ लागले हिमालयाच्या यात्रेत त्याना ते मिळाले असावे समर्थांचा एक मोठा थोरला बदामी आकाराचा पानाचा डबा आहे समर्थांना कफाची व्यथा असल्यामुळे ते पान खात असत पाच सहा घागरी पाणी सहज मावेल असा एक हडा महताने पुढे काढला तो म्हणाला ‘ कल्याणस्वामी उरमोडी नदीवरून हा हडा भरून गडावर आणीत ’ विश्वास ठेवायला मी जरा आढेवेढे घेऊ लागलो पण मन म्हणाले ‘ श्रद्धस्व ! तुझ्या ताकदीवरून तीनशे वर्षापूर्वी दह्यादुधाची अघोळ करणाऱ्या त्या लोकांची ताकद तू अजमावू नको ’

नतर महताने काढली एक कुबडी. ती उभ्याने काखेत धरण्याची आहे समर्थांची उची किती असेल, तिचा अदाज ह्या कुबडीवरून करता येतो ती

निदान पावणसहा फूट तरी असली पाहिजे. पण ही कुबडी दिसते तितकी भाबडी नाही ती 'शस्त्रगर्भा भगवती' आहे तिच्या पोकळीत एक दुधारी असिलता दबा धरून बसली आहे काखेखाली ठेवायचे लाकडी अर्धवर्तुळ हीच तिची मूठ आमच्या बरोबरीच्या एका विद्यार्थ्याने खसकन् ती बाहेर ओढली. पवित्र्यात उभे राहून दोन हात करण्याचा आविर्भाव दाखवला. तरुण रक्त शस्त्रासाठी किती उत्सुक असते, ते त्याच्या मुद्रेवरून कळले

शिवाजीमहाराजानी एका सौदागराकडून तीनशेसाठ होन देऊन ते शस्त्र विकत घेतले होते पण एक गणक भास्कर त्याना म्हणाला, 'महाराज हे शस्त्र अलौकिक खरे, पण ते तुमच्याजवळ नसावे एखाद्या सत्पुरुषाच्या हातीच ते शुभलक्षणी ठरेल' महाराजानी त्या भविष्यवाणीचा उपमर्द केला नाही ते शस्त्र समर्थांच्या हाती देऊन ते मोकळे झाले.

समर्थ त्याच खोलीत भुईवर अथरुण घालून झोपत शिवाजीमहाराज आणि शिष्यमडळी यानी त्याना आग्रह करून पलगावर झोपायला लावले होते हल्लीचा पलग नवा असून त्याचे चांदीचे पाय तेवढे तत्कालीन आहेत. तिथेच भिंतीला टेकून समर्थांची एक जुनी तसबीर उभी आहे. जुन्यात जुनी तसबीर ती ही, असे सागतात याच मठात रामाचा महानैवेद्य होतो गडावरचे सेवेकरी इथेच भोजन करतात खालचे परळी गाव या मठाला इनाम आहे त्यातून हा भोजनप्रबध आणि देवस्थानाचा खर्च चालतो

मदिर प्राकाराच्या बाहेर देवाकडे तोंड करून उभे राहिले असता उजव्या हाताला आक्काबाईची समाधी आहे ही समर्थांची दुसरी पट्टशिष्या समर्थांच्या मागून तशा त्या धामधुमीच्या काळातही गडावरचा देवस्थानाचा कारभार तिने सुसूत्रपणे चालवला, हे तिचे कौतुक

मदिराच्या समोरच थोड्या अंतरावर सोनाळे तळे आहे. काळ्या कातळाने वेढलेले ते तळे म्हणजे बाणभट्टाच्या अच्छोद सरोवराचा एक तुकडाच वाटते समर्थांच्या स्नान-सध्येला उदड पाणी यानेच दिले असेल त्याची निर्मळता पाहून वाटते, की 'बाहेरी कर्मे क्षाळिला। भीतरी ज्ञाने उजळला' अशा सत्पुरुषानेच यात पाय बुडवावे.

तिथून पुढे येऊन जरा खाली उतरले, की उजव्या अगाला देवीचे देऊळ आहे समर्थांनीच ही देवी इथे स्थापली. आत शिरताच डाव्या हाताला एक

ओटा आहे समर्थ त्याच्यावर बसत. इथे बसूनच ते उपास्य देवतेचे चिंतन करीत असतील

समर्थांच्या काळी उभ्या भारतात कृष्णभक्तीला बहर आला होता प्रांतो-प्रांती अनेक कवी राधा-कृष्णांच्या लीला आळवीत होते सान्या वातावरणात ' राधा-कृष्ण, राधा-कृष्ण ' असा भजनध्वनी निनादत होता. पण समर्थांची दृष्टी खोल होती त्यांना या देशात काहीतरी वेगळे घडावे, भारत यवनाच्या गुलामीतून मुक्त होऊन निजतेजाने तळपावा असे वाटत होते वर्तमानाला ते पारखे नव्हते आता गोपीसगे रासक्रीडा करणारा मुरलीमोहन थोडा मागे राहू दे त्या ऐवजी शिंग फुकून रणक्रीडा करणारा कोणीतरी देव पुढे येऊ दे असे त्यांना वाटले म्हणून त्यांनी श्रीराम हे आपले उपास्य दैवत ठरवले समर्थांचा उपास्य राम हा कोदडधारी होता आता अनुकूल कालाची वाट बघत बसण्याचे दिवस सपले आता ' घाव घाली निशाणी ' असे व्हायला हवे. कोंडी फुटायला हवी. वैदिक ऋषींनी आणि राजांनी आपली विजयाकांक्षा सफल करण्यासाठी वज्रधारी इद्र हा आपला राष्ट्रीय देव बनवला. समर्थांनी त्याच कारणासाठी देवबधविमोचक अशा धनुर्धारी रामाचे मूर्तिप्रतीक लोकांच्या पुढे उभे केले रामायणातले युद्धकाड मराठीत अनुवादून रामप्रभूचा पराक्रम लोकांच्या हृदयात बिंबवला दानवकुल विध्वंसक रामाच्या जोडीनेच जितेंद्रिय, बलवताचा महामेरू आणि स्वामिकार्यसाधक अशा मारुतीची उपासना समजात रूढ केली महाराष्ट्रात अकरा मारुतीची स्थापना करून त्यानी दुर्बलांना, नि:सत्त्वांना बलोपासनेच्या मार्गाला लावले

समर्थ सर्वांना ऐक्याचा महाराष्ट्रधर्म शिकवीत अखड सावधानता उपदेशीत ' केल्याने होत आहे रे ' हा महामत्र शिकवीत कोणतीही चळवळ करायची तर आधी ' हृदयात राम ' आणला पाहिजे, असे बोधीत. जागोजाग मारुती तसे जागोजाग मठ उभारून त्यांनी अभ्युदयप्रधान अशा धर्माचा प्रचार आरंभिला. मठांसाठी महत निर्माण केले त्यांचे हे मठ म्हणजे ती लोकशिक्षणाची विद्यापीठेच होती एकेक महत म्हणजे धर्मध्वज होता त्यागी, सयमी, सेवक अन् चतुर ! हरिकथेतून राजकारण करणारा सर्वविषयी सावध असणारा !

शके १५३० मध्ये जांब गावी एका कुलकर्ण्याच्या घरी समर्थांनी जन्म घेतला आश्चर्याची गोष्ट ही की द्विजांनी ' सावधान ' म्हणताच लग्नमडपातून

पळालेले समर्थ जीवनातून मात्र पळाले नाहीत विराट संसार करण्यासाठी त्यांनी नवराबायकोचा बेतशीर संसार मांडायच्या आधीच मोडला टाकळीस बारा वर्षे पुरश्चरण करून त्यांनी 'भगवंताचे अधिष्ठान' मिळविले तपाच्या जोडीने विद्याही साधली विद्येबरोबरच बलही संपादिले

मग ते तीर्थयात्रेला निघाले त्या निमित्ताने सारे भरतखंड 'चक्षुर्वै सत्यम्' अवलोकिले या भ्रमतीत त्यांना काय दिसले ? उत्तरेस मोंगलांचा धिंगाणा दक्षिणेत फिरंग्याचा जाळिता मारिता धर्मच्छल ! आणि त्यांच्या स्वतःच्या महाराष्ट्रात आदिलशाही, कुतुबशाही, अशा अनेक विधर्मी शाह्यांचा उपद्रव। महाराष्ट्र उरी घाव लागून निचेष्ट पडला होता. महाराष्ट्राचे राष्ट्रपणच भंगले होते स्वाभिमान मरगळला होता. माणुसकी मरणाच्या पथाला लागली होती

अशा परिस्थितीत अनुभवानी समृद्ध आणि विचारानी परिपक्व होऊन, समर्थ कृष्णातीरी वास्तव्याला आले धर्मसंस्थापनेचा उद्योग करायला त्यांना कृष्णातीर पसंत पडले. काय होते कृष्णातीरी असे विशेष ? त्या भागात स्वराज्याचा अरुणोदय झाला होता शिवसूर्य दिशीमासी प्रखर होत होता हिंदवी स्वराज्याचे तोरण तिथेच बांधले गेले होते समर्थांना वाटले, की आपली खरी गरज इथे आहे भूमी तापून भाजून तयार आहे महाराष्ट्र धर्मांचे बीज इथे चांगले रुजेल, चांगले फोफावेल

ते रानावनात हिंडत डोंगरकडे वळधत घळीत विश्रांती घेत. पाहात, विचार करीत, मार्ग शोधीत लोक त्यांची ही अवधूत वृत्ती पाहून त्यांना 'पिसाट रामदास' म्हणू लागले पण त्यांचे दैवी स्वरूप लवकरच जनांना प्रतीत झाले जनसमुदाय त्यांच्या भोवती गोळा होऊ लागला आपली दैन्य दुःखे डोळ्यात पाणी आणून त्यांना निवेदू लागला. जुलूम-जबरदस्तीच्या कर्मकहाण्या त्यांना ऐकवू लागला समर्थ आपल्या धीरोदात्त अमृतवाणीने त्या गांजलेल्या जनांना आश्वासन देऊ लागले –

धीर धरा धीर धरा तकवा
हुडबडू गडबडू नका ।
काळ देखोनी वर्तावे
सांडावे भय पोटिचे ।।

अशी सगळी दैना दुरवस्था पाहात असताना समर्थांच्या डोळ्यापुढे एकच पुरुषार्थी व्यक्ती होती, ती म्हणजे शिवराय त्याचा सारा जीवभाव शिवाजी-महाराजावर जडला होता 'तुझा तू वाढवी राजा' म्हणून ते तुळजा भवानीला अनन्यभावे प्रार्थीत भवानीने त्याची प्रार्थना ऐकली रामप्रभूने त्याच्या मनीचा हेतू सफळ केला दास्यमुक्त महाराष्ट्र त्यानी याच सज्जनगडावरून पाहिला त्यांचे रामराज्याचे स्वप्न सुवर्णाचे पख लावून महाराष्ट्रभूमीवर उतरले !

आमचेही सज्जनगड पाहण्याचे वाञ्छित सफल झाले तिथे नवीनच निर्माण झालेली पुष्पवाटिका पाहून आम्ही परतीच्या मार्गाला लागलो. आम्हाला आता पायी पायी सातारा गाठायचा होता, पण पावसाची सर केव्हा थांबेल याची वाट पाहात आम्हाला देवीच्या देवळात थांबावेच लागले. नतर देवळा-जवळच्या कड्यावर आलो तर आमच्यासमोर तसलाच एक डोंगर उभा होता फळ्यावर काढलेल्या खडूच्या रेघासारखे लहान लहान जलप्रपात त्याच्या-वरून खाली धावत होते एक दोन तीन ! किती म्हणून मोजावे ! काही अवखळ मुलासारखे धडाधड उड्या घेत होते, तर काही नागमोडी वळणानी उतरून खालच्या खोऱ्यात पसरत होते

मेघराजाच्या स्नेहसौजन्याने सगळे डोंगर मृदू झाले होते शुभ्र पण विरळ मेघपटलांनी काही डोंगराभोवती गूढरम्यता निर्माण केली होती जणू कवि-कुलगुरूची व्यजनाच – शब्दाच्या तलम झिरझिरीत प्रावरणातून अर्धस्फुटपणे डोकावणारी, काही टेकड्याच्या दरीमुखातून धूर निघावा, तशी अभ्रे वर उठत होती ती पाहून एखाद्या नव्या नैयायिकाने अनुमान माडले असते. 'पर्वतो वह्निमान् धूमात् !'

आकाश जणू ठेंगणे झाले होते ते डोगरमाथ्यावर डवरले होते त्याच्यात कृष्णमेघाचे लोंढेच्या लोंढे घुसत होते. खाली उरमोडी नदी तांबडा पूर वाहवीत होती आकाशाचे औदार्य पृथ्वीच्या पोटात मावत नव्हते ती ते ओढ्याना अन् नद्याना समर्पीत होती. मला वाटले, अशाच एखाद्या उच्चस्थानी उभे राहून मुक्तेश्वराने पर्जन्याचे असले धारानृत्य पाहिले असेल आणि त्याला पुढील दिव्योत्तुग कल्पना स्फुरली असेल –

**की पृथ्वीखड त्या शाळुका ।**
**अनेक पर्वत शिवपिंडिका ।**

इंद्रे मांडिले अभिषेका।
जलधारा वरसुनी ॥

आमच्या कड्याच्या खाली जे दुसरे एक ठेंगणे पठार होते, त्यावर गुरे सथपणे चरत होती गुराखी 'स्थाणुर्वा पुरुषो वा' म्हणतात तसा त्या गुराच्या मागे निश्चल उभा होता आम्हाला वरून फक्त त्याची कांबळ्याची खोळ तेवढी दिसत होती काळे आकाश, धूसर डोंगर, हिरवी झाडे, दुधिया रंगाचे जलप्रपात आणि तांबूस भूमी, अशी ही वर्षाऋतूची रंगपंचमी मांडली होती. केवढे विशाल, गंभीर दर्शन! केवढे नेत्रांचे संतर्पण! ... इतर कोणत्याही ऋतूत आम्ही इथे आलो असतो, तर आम्हाला हे 'रसार्द्र' निसर्गकाव्य दिसले नसते. जेवढे कष्ट अधिक तेवढे फळही मोठे!

# ८. मोरगावचा मयूरेश्वर

आम्हा कोकणच्या माणसांना गणरायाचे कौतुक सर्वांत अधिक. वर्षाच्या सगळ्या सणांत गणेशचतुर्थी हा सण मोठा आम्ही गाणपत्य नसलो तरी गणरायाच्या प्रतिवार्षिक आगमनाने आम्हाला जो उत्साह येतो, तो वर्णायला त्याच्याचकडून मती मागून घ्यावी लागेल. आंब्याचे टाळे, कागोण्या, कुडेफळे, शुभ्र शिवंदले, पिकल्या पोफळांचे घसघशीत घोस आणि कालोद्‌भव फळफळावळ आम्ही मांडवी झकास शोभवतो तिच्या खाली मखर करतो अन् त्यात गणरायाची स्थापना करतो समयाच्या स्निग्ध प्रकाशात गणराज प्राणप्रतिष्ठित झाला, की आमची मस्तके त्याच्यापुढे अपार श्रद्धेने विनम्र होतात कोकण्या 'गडी' मुलखावर असला तरी गौरी-गणपतींना घरी ओढून यायचाच असा सामान्य संकेत आहे. कुळवाडी-माळवाडी त्या दिवसात नाचून, गाऊन आपला भक्त्युद्रेक शमवतात गोव्यातले लोक तर दिवाळीची प्रतिष्ठा न बाळगता गणेशचतुर्थीलाच फटाके उडवून मोकळे होतात.

बारा ज्योतिर्लिंगे, तसे अष्टविनायक या आठही स्थानी विघ्नविनायक निरनिराळ्या नावानी नांदतो मोरगाव हे यापैकी गणपतीचे आद्य क्षेत्र समजतात. इथला गणराज हा मयूरेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे प्राकृत लोकांनी त्यांनाच 'मोरया' बनवले आहे भीमेच्या काठी सिद्धटेकावरचा तो सिद्धिविनायक कुलाबा जिल्ह्यातल्या पाली गावी त्यालाच बल्लाळेश्वर अशी संज्ञा मिळाली आहे. कर्जत खोपोली रस्त्यावर महड गावी तो वरद विनायक बनला आहे जुन्नरजवळच्या लेण्याद्री डोंगरांत त्याने गिरिजात्मज हे नाव घेतले आहे त्याच तालुक्यातल्या ओझर गावी तो विघ्नेश्वर बनला आहे पुण्याजवळ थेऊर गावी तो चिंतामणी झाला आहे आणि घोडनदीच्या रस्त्यावर रांजणगावी तो गणपती या नावाने विख्यात आहे

असे हे सगळे अष्टविनायक ही सर्व स्थाने महाराष्ट्रातच असल्यामुळे गणपती हे महाराष्ट्राचे प्रमुख दैवत ठरले. महाराष्ट्रात मारुतीचे माहात्म्य प्रस्थापित होण्यापूर्वी 'गाव तिथे गणपती' असा प्रकार होता 'ते सवाद-चतुष्पथींचे । गणेश जाहले' या ज्ञानेश्वराच्या उक्तीवरून त्या काळी प्रत्येक चवाठ्यावर गणपती अधिष्ठित असावा, असे अनुमान करता येते.

वर उल्लेखिलेली गणेशक्षेत्रे ही जशी गणरायाची निवासस्थाने, तशीच ती गाणपत्यांची तपःस्थानेही आहेत. एकच गणराज भक्तांना वर देण्यासाठी आणि दुष्टांचे दमन करण्यासाठी नाना नाम-रूपांनी त्या त्या ठिकाणी अवतरला आहे

भाद्रपदाप्रमाणेच श्रावणाचेही गणपतीच्या उपासनेत महत्त्व आहे गाण-पत्यांना श्रावणात मासव्रत असते. शुद्ध पक्षातली विनायकी चतुर्थी हे विशेष पर्व मी म्हटले, मोरगावात जायचे तर या पुण्यकालातच गेलेले बरे! त्या दिवशी दुपार होण्यापूर्वी आम्ही मोरगावाला जाण्यासाठी बस पकडली. वाटेत प्रथम सासवड अन् नतर जेजुरी लागली. पुणे जिल्ह्यात सह्याद्रीची बाजू सोडली, तर वनश्रीचे दुर्भिक्षच आहे. पण ठायीठायीच्या फलसंपदेने या बाबतीतले 'न्यून ते पुरते' केले आहे. अंजिराची झाडे फताड्या पानांची दिसत असली, तरी त्याच्या फळांचे माधुर्य कोण नाकारू शकेल! मोसबीची झाडे तर ठेंगणी अन् सर्वांगी भरलेली दिसतात आपली फळे ती मोठ्या डौलाने अंगाखांद्यावर खेळवतात.त्याच्यावरून दृष्टी काढली की ती डाळिंबीच्या झाडावर जाते त्या 'तन्वी श्यामा' अगनांना आपल्या फळाचा भार झेपतच नाही मुळी!

जेजुरीहून मोरगाव फक्त दहा मैलांवर आहे. तिथल्या श्री. सखारामपत सोमणाच्या ओटीवर पडशी टाकून आम्ही चौथ्या प्रहरी देवदर्शनाला गेलो. आमच्या आधीच थोडा वेळ मुबईहून एक कुटुब तिथे आले होते आणि त्याने मोरयाची महापूजा बांधली होती गळ्यात मदारमाला, वर नवे क्षौम वस्त्र, कपाळी रेखीव गध, मस्तकी दूर्वांची जुडी आणि पुढे फळे, नारळ असा तो पूजेचा थाट होता. 'पेरूनि शेता जाइजे' तसा आम्हाला 'पूजोनि देव' पाहायला मिळाला. मी हात जोडून ध्यान धरले–

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम् ।
रदं च वरद हस्तैर्बिभ्राण मूषकध्वजम् ।
रक्तं लंबोदर शूर्पकर्णक रक्तवाससम् ।
.. . ..

आकाराला येऊनही निराकारपणा न सोडणारी ती तुंदिल मूर्ती किती सुंदर आहे ! धावत्या दृष्टीक्षेपात तिचे सौंदर्य प्रतीत होणार नाही. त्यासाठी थोडा वेळ नजर स्थिर करायला हवी. सिंदूराचा लेप घेऊन तिला सर्वांगी पुष्टी लाभली आहे. पण खरी मूर्ती ती ही नव्हेच ती मृत्तिका, लोह आणि रत्न यांच्या अणूंची असून दृश्य मूर्तीच्या मागे अदृश्य आहे. तिला अदृश्य कोणी अन् का केले ते सांगितले पाहिजे.

द्वापर युगाच्या अंती तीर्थयात्रा प्रसंगाने पांडव इथे आले होते. पुढे कलीचा प्रादुर्भाव होणार अन् त्यात मूर्ती सुरक्षित राहील की नाही याची शंका, या विचाराने त्यांनी मूळ मूर्तीपुढे ताम्याचा भक्कम पत्रा बसवला आणि लोकांच्या दर्शनासाठी त्याबाहेर एक नवी मूर्ती स्थापली.



या आख्यायिकेतले पांडव कल्पित असतील, पण बाकीची आख्यायिका खरी मानायला हरकत नाही. परधर्म अन् परवयांच्या देवमूर्ती याच्याविषयी क्रूर, विध्वंसक असहिष्णुता बाळगणाऱ्या यवनांच्या आघातापासून मूर्तीचे संरक्षण व्हावे म्हणून एखाद्या दूरदेशी व्यवस्थापकाने मूळ मूर्तीचे असे गोपायन केले असणे शक्य आहे एवढे कशाला? या देवळाभोवतीचा उंच कोट पाहिला म्हणजेही माझ्या विधानाला पुष्टी मिळते

हा कोट बेदरच्या बादशाहीत जामदारखान्यावर नियुक्त असलेले श्री. मोरेश्वर केशव गोळे या गृहस्थानी उभारला त्याला चारी कोनावर चार लहानसे मिनार वाटतील असे स्तभ उभे केलेले आहेत. मधेच डोके वर काढणारे शिखर जर दुर्लक्षित केले तर दुरून पाहणाऱ्याला हे देवस्थान एखाद्या मशिदीसारखे वाटेल यातही चकवण्याचाच उद्देश असला पाहिजे विधर्मी राज्यकर्त्यांकडून आपली देवस्थाने अक्षत आणि अभग्न राखण्यासाठी त्या वेळच्या बुद्धिमताना काय काय क्लृप्त्या लढवाव्या लागल्या असतील, ते एक त्यांच्या देवालाच ठाऊक !


इतक्या लहानशा खेडेगावाला एवढे मोठे देऊळ 'नाकापेक्षा मोती जड' वाटते. पेठेच्या तोंडाशी येताच दोन बाजूना दोन दीपमाळा, मधे एक जय-स्तंभ, तिथेच चौघडा आणि त्याच्याच खाली मूषकराजाचे महाबिल दिसते. पुढच्या दोन हातात गुडलड्डू घेऊन बसलेले हे गणराजाचे वाहन दहा पायल्या दाणे सहज आपल्या पोटात रिचवू शकेल मी मनात म्हटले, हा उदीर दगडाचा आहे म्हणून ठीक, अन्यथा बारा महिने तेराकाळ गावातल्या लोकाना विनायकीचा उपास घडवला असता याने उदराच्या पुढे बराच उच दगडी चौथरा आहे त्यावर पुढेच एक भला भक्कम नदी गणरायापुढे मोहर धरून बसला आहे मी म्हटले, 'नंदीचे इथे काय प्रयोजन ? हा आपल्या धन्यावर रुसून त्याच्या पुत्राकडे आपले गाऱ्हाण मांडायला आला असेल काय ?' त्या वेळी खुलासा झाला नाही पण नतर क्षेत्र महात्म्य वाचताना ते प्रकरण मिळाले

इथून सुमारे पाच कोसावर भुलेश्वर नावाचे एक शिवस्थान आहे. तिथल्या ग्रामस्थानी आपल्या देवळासमोर बसविण्यासाठी हा नदी दुसऱ्या एका गावी घडवायला लावला होता एका मोठ्या गाड्यावर चढवून गावकरी त्याला घेऊन चालले होते मोरगावावरूनच त्यांची वाट होती. पण आश्चर्य वर्तले ते असे गणरायाच्या दारावरून जात असता तो गाडा एकाएकी मोडला. दुसरा आणला त्याचीही तीच गत झाली. लोकाना वाटले, की गाड्याना नदीचे वजन पेलत नसेल. म्हणून त्यानी तो नंदी तासून घासून लहान करायचे ठरवले. पण त्याच रात्री नदीने त्या ग्रामस्थांना स्वप्नदृष्टान्त दिला. 'मला तिकडे नेण्याचा प्रयत्न करू नका. तो साधणार नाही. मला इथे गणपतीच्याच पुढे बसायचे आहे ' त्यामुळे लोकांचा निरुपाय झाला. त्यानी त्याची इथेच स्थापना

केली आणि ते निघून गेले मग तो उघड्यावर बसतो, हे पाहून त्याला निवारा करणे क्रमप्राप्त झाले ते काम कोण्या पानसरे नावाच्या वाण्याने केले

ही आख्यायिका नदीप्रमाणेच घडवली गेली असेल गणपतीच्या पुढे नदी या अनपेक्षित दृश्याचा खुलासा सांगण्यासाठी तिची निर्मिती झाली असेल पण निराळ्या एका तत्त्वज्ञानानेही या गोष्टीचा खुलासा होऊ शकतो

सांप्रत आपण गणपतीला शिवपरिवारातली देवता मानतो तो शिवपुत्र असल्याचेही आपणास ठाऊक आहे पण वेदकालात शिव आणि गणेश या दोन्ही देवता एकच होत्या नावे भिन्न; व्यक्ती एक जो गणेश तोच शिव अन् जो शिव तोच गणेश! 'त्वं रुद्र' असे अथर्वशीर्षात म्हटले नाही का? तात्त्विक दृष्टीनेच नव्हे, तर दैवतशास्त्राच्या दृष्टीनेही ते खरे आहे दोघांतले साम्य अन् साधर्म्य सहज कळावे इतके ठळक आहे भाली चंद्र, तृतीय नेत्र अन् नाग-भूषणे ही शिवाची तीन वैशिष्ट्ये ही तिन्ही गणेशमूर्तीलाही लागू आहेत



गणपतीला भालचंद्र म्हणतात ध्यानश्लोकात त्याला त्रिनेत्रही म्हटले आहे गणपतीच्या कमरेभोवती नागबंध आहेच

शिवाने हालाहल प्राशन केले आणि त्याच्या सर्वांगाचा दाह सुरू झाला तो शमविण्यासाठी त्याने सर्प अंगावर घेतले अन् मस्तकी शीतल चंद्र धारण केला गणपतीनेही तेच केले आहे अनलासुराचे भक्षण करून त्याला ठार मारल्यावर गणपतीचा देह जळू लागला. म्हणून त्यानेही सर्प, चंद्र इत्यादी शीतल वस्तू देहावर धारण केल्या ही कथा गणेशपुराणात आहे शिवाचे नटराज हे रूप सर्वपरिचित आहे. त्या रूपात शिव तांडव नृत्य करतो

गणपतीलाही नृत्याची आवड आहे नृत्यगणपती हे त्याचे रूप मूर्तिकलेचे एक मोठे आकर्षण आहे

रुद्र-शिव अन् गणपती याच्या अभिन्नत्वाचा आणखी एक पुरावा तैत्तिरीय संहितेने नोंदून ठेवला आहे. हा पुरावा उदरासबधीचा आहे 'हे रुद्रा, उदीर हा तुझा पशू आहे' असे एका मत्रात म्हटले आहे उदीर हा गणेशाचा पशू असल्याचे गणेशविज्ञान सांगते पण तोच वरील मत्रात रुद्रपशू ठरला आहे म्हणजे वाहनाच्या बाबतीतही हे ऐक्य जाणवते

पुराणांतरीही शिव-गणेशाच्या अभिन्नत्वाचे पुरावे विखुरलेले आहेत.गणपती हा साक्षात् रुद्रच आहे असे वराहपुराण म्हणते त्रिपुरान्तक हे खास शिवाचे विशेषण. पण अग्निपुराणात ती उपाधी गणेशाला लावली आहे वायुपुराणात लंबोदर अन् गजकर्ण ही गणपतीची विशेषणे शिवाला लावली आहेत

उपासनेतही हे ऐक्य दृष्टिगोचर होते. शिवाप्रमाणेच गणेशाचीही पूजा लिंगरूपात होते दक्षिण कोकणात गणपतीच्या पूजेपूर्वी त्याच्या आसनाखाली शिवाची पूजा करतात, असे श्री. पु. रा बेहेरे यांनी सांगितले आहे.

शिव-गणपतीचे हे अभिन्नत्व गुप्तसाम्राज्याच्या काळात मोडले. त्या काळात पुराणांची वाढ झाली दैवताच्या सबधातही नवे सकेत, नव्या कथा निर्माण झाल्या पुराणांनी गणपतीला शिवपुत्र म्हणून शिवापासून वेगळे काढले अर्थात् तरीही शिवाचे काही बिघडले नाही 'आत्मा वै पुत्रनामासि' असे उपनिषदानीच सागून ठेवले आहे

मोरगाव येथील गणपतीपुढच्या नदीचे स्पष्टीकरण अशा प्रकारे देता येते.

नदीच्या चौथऱ्यापुढे देऊळ आणि त्याचा प्राकार याचा दुसरा दगडी चौथरा लागतो तो पहिल्याहून थोडा उच आहे महाद्वारातून आत जाताच आणखी दोन दीपमाळा आणि त्यापुढे देऊळ आहे. सभामडप, मध्यगृह अन् गाभारा मिळून सगळे देऊळ पाषाणाचे आहे तटाच्या आतल्या अंगाला लहान लहान ओवऱ्या आहेत ओवऱ्यांपुढे प्रदक्षिणेची चिरेबदी वाट आहे बेल, शमी, आवळी ही गणपतीची आवडती झाडेही प्राकारातच आहेत शिखरावरच्या प्रत्येक कोनाड्यात गाणपत्य पुराणातले कथाप्रसग चित्रित केले आहेत

देवदर्शन करून प्रदक्षिणेला निघाले, की प्रथम देवाच्या उजव्या हाताला मंदिराला चिकटून नग्नभैरवाचा कौलारू मडप लागतो नग्न भैरव हा भैरव-

गणाचा दादा आहे वाराणसीत काळभैरवाचे जे काम तेच इथे नग्न भैरवाचे. तो इथला क्षेत्रपाल आहे देवळाच्या पृष्ठभागी आदिशक्तीची पाषाणमूर्ती आहे. तिच्या प्रेमभावाला भुलून गणपती इथल्या कल्पवृक्षाखाली साजिरे गोजिरे शिशुरूप घेऊन प्रकट झाला वस्तुत ते झाड तरटीचे आहे, पण देवीचे वाञ्छित त्या खाली साकार झाले म्हणून त्याला कल्पवृक्ष ही पदवी लाभली

या प्राकारात लहानमोठ्या गणेशमूर्तीचे वैपुल्य आहे रामाने लिंग स्थापले तो रामेश्वर, सोमाने स्थापले तो सोमेश्वर, हा जसा शिवभक्तीचा एक प्रकार, तसाच इथे गणपतीच्या बाबतीत दिसतो एखाद्या भक्ताने यावे, अनुष्ठान करावे, साक्षात्कार घ्यावा आणि जाताना आपल्या नावाने एक गणेशमूर्ती स्थापून निघून जावे

इथे समर्थ रामदास आणि तुकोबा यांनी स्थापलेले गणपती आहेत, पण समर्थ गणपतीबरोबरच मारुती अन् तुकोबा राहीरखुमाईसहित विठ्ठल ही आपली आवडीची उपास्ये इथे उभी करायला विसरले नाहीत 'सुखकर्ता दुखहर्ता' ही गणपतीची लोकप्रसिद्ध आरती याच मोरयापुढे समर्थांच्या मुखातून जन्म पावली असे सांगतात

देवाच्या डाव्या हाताला विघ्नहराची ओवरी आहे या ओवरीशी एका परमहंस पुरुषाचे नाव निगडित आहे सत्पुरुषाचे वास्तव्य नसेल, तर केवढेही मोठे क्षेत्र पोरके भासते सत्पुरुष हे क्षेत्राचे प्राणच होत शके १५२० च्या सुमारास सौराष्ट्रातल्या सोरटी सोमनाथाहून एक सिद्धयोगी इथे क्षेत्रवासासाठी प्राप्त झाले. ते महान गाणपत्य होते, आचार्य होते त्याना गणेशयोगींद्र म्हणत. त्यांनी ओवरीत राहून बारा वर्षे गणपतीची आराधना केली त्याच्या मनातून मुद्गल पुराणावर टीका लिहून गाणपत्य सप्रदायाला नव्याने उजळा द्यावा असे फार होते. पण मूळ प्रतच कुठे गवसेना त्यांनी ती मिळविण्यासाठी पुष्कळ परिश्रम केले ते यशस्वी होत नाहीत असे दिसल्यावर गणपतीलाच साकडे घातले

भक्ताचे आर्त व पुरवील तर तो देव कसला! गणपतीने मग एके दिवशी एका ब्राह्मणाच्या रूपाने ती पोथी योगींद्रांच्या हाती आणून दिली त्याचे काम झाले या देवस्थानाच्या ऊर्जितावस्थेत गणेशयोगींद्राचा फार मोठा हात आहे तट आणि सभामडप उभारणारे श्री गोळे हे त्याचेच शिष्य होते

योगींद्रांच्या आज्ञेवरून श्रीमत अमृतराव पेशवे यानी देवळाचे महाद्वार बांधले बाजीरावाने चौघडा ठेवला.

या ओवरीच्या भिंतीवर गणेशयोगींद्रानी स्वहस्ते काढलेली गणेशलीलाची कितीतरी चित्रे अजून पाहायला मिळतात. एक सिंदूरलिप्त गणपतीही त्या ओवरीत आहे शेवटी शेवटी ते दिवसातला बराच काळ समाधिस्थितीतच राहात. सिद्धेश्वर नावाचा एक पट्टशिष्य त्यांची सेवा करी. गणेशयोगींद्रांच्या वास्तव्यामुळे अनेक विद्वान आणि सत्पुरुष या ठिकाणी आले कितीतरी धर्मचर्चा आणि तत्त्वचर्चा रगल्या. शके १७२७ माघ वद्य दशमीला त्यानी समाधी घेतली. त्याच्या मागुन तीन वर्षांनी त्याचा शिष्य सिद्धेश्वरही बांधलेली आहे.

या क्षेत्राशी आत्मनाम कायमचे निगडित करणारे दुसरे सत्पुरुष म्हणजे चिंचवडचे मोरया गोसावी चौदाव्या शतकात यांचा जन्म झाला आणि तोही नवसा-सायासानेच. वामनभट्ट शाळिग्राम यानी याच मोरगावात तप केले आणि वयाची पन्नाशी उलटल्या-वर ते पुत्रवान् झाले. आठव्या वर्षी मोरया गोसाव्याचे उपनयन झाले थोड्याच वर्षांत ते घनपाठी वैदिक झाले गणेशाच्या प्रसादाने जन्मलेला पुरुष गणेशभक्त झाला नसता तरच नवल थेऊर येथे त्यांनी गणपतीची उग्र आराधना



केली गणाधीश त्यांजवर तुष्टला लोक त्यांना गणेशाचा अवतार समजू लागले. मूळचे आडनाव शाळिग्राम, पण लोक त्यांना 'देव' म्हणू लागले. आणि तेच पुढे त्यांच्या वंशाचे आडनाव झाले त्यांनी दर चतुर्थीला मोरगावची

एका वारीत करानदीत स्नान करताना त्याना एके दिवशी अभोगत एक गणेशमूर्ती हाती लागली करेच्या तीरी शमीवृक्षाखाली त्यानी तिची पूजा केली 'सर्वशाक' आणि पोळी याचा महानैवेद्य दाखवला पुढे श्रींच्या आज्ञेवरून त्यानी मूर्ती चिचवडला नेऊन तिथे तिची स्थापना केली एक नवे गणपतीसस्थान उभारले. पुढे ते वर्षातून दोनदा म्हणजे माघी – भाद्रपदी चतुर्थीसच मोरगावी येऊ लागले. तीच प्रथा पुढे त्यांच्या वशजानीही चालू ठेवली. आजही मोरगावची सर्व व्यवस्था चिचवड संस्थानातूनच होत असते

देवदर्शन झाल्यावर तीर्थदर्शन ओघानेच आले गावाला लागूनच करा नदी वाहते. सिहगडाच्या पूर्वेस पाच मैलांवर ही उगम पावते अन् पुरदर भीमथडी करीत पन्नास साठ मैलांचा प्रवास करून बारामतीच्या आग्नेय कोपऱ्यात नीरेला मिळते. आम्ही गेलो, तर पात्र बरेचसे कोरडे दिसले 'श्रावण–भाद्रपद वर्षा ऋतू' हे तिने फक्त पचागातच वाचायचे. दुर्दैवाने अशा एका भूभागातून तिला वाटचाल करावी लागते, की ज्यावर जेमतेम बारा इचांपेक्षा अधिक पाऊस पडत नाही. त्यामुळे तिला तारुण्याची पुष्टी अन् मस्ती क्वचितच लाभते. कलाशेष चद्र शोभत असला, तरी सुकून ओहळासारखी झालेली नदी मात्र शोभत नाही. उलट ती दयनीयच वाटते. ती मनावर पुण्य सस्कार उमटवू शकत नाही.

आम्ही करेच्या काठाकाठाने जरासे हिंडलो. जवळच्याच एका शेतात मोट चालू होती तिच्या कोवळ्या कुरकुरीबरोबरच बैलांना आळवणारे शेतकऱ्याचे सगीतही सुरू होते. शहरातले मोटारीचे पोंगे आणि लोकांचा गोंगाट ऐकून आंबलेल्या कानांना ते जनपदातले सनाद सगीत मोह घालीत होते.

एवढ्यात कुठून तरी 'मोरोपताची केकावली' अकल्पितपणे कानी पडली मग माझ्या लक्षात आले, की इथला गजराज मयूरवाहन आहे. इथे मोराची बरीच वस्ती आहे बरोबरीचे गृहस्थ म्हणाले, 'अहो, इथले मोर आमच्या परसदारीसुद्धा येतात. शेंगादाण्याचे आमिष दाखवले तर पिसारा फुलवून नाचतातही.'

यावेळी एकाएकी त्याना वाचा फुटायला एक कारण घडले. सूर्यमडलावर मेघांनी आच्छादन टाकले होते तो सगळा प्रदेश मेघच्छायेत आला होता त्या बिचाऱ्या तिर्यक्‌जीवाना वाटले असेल की आता पाऊस पडेल अन् आपला

पिसारा ओला होईल त्यांना कोणीतरी सागणे भाग होते, की सगळी माणसे सज्जन नसतात, तसे सगळे मेघही उदार नसतात. पण सागून तरी उपयोग काय ? मोराचे हे मूढपण सनातन आहे प्राचीन काळी हिमालयात जाणाऱ्या दिलीप राजाचा रथध्वनी ऐकूनही या मोराना मेघगर्जनेचाच भास झाला होता आणि षड्जसंवाद करणाऱ्या केका ओकून त्यांनी आता जसे माझे तसे त्यावेळी दिलिपाचे मन रिझवले होते

नदीकडून परत आल्यावर मी इथल्या योगींद्रमठाकडे वळलो त्याच्या शिष्यपरपरेतल्या गाणपत्यांनी हा मठ स्थापला आहे मठपतीची भेट घेतल्या-वर त्यानी मला क्षेत्रासबधी पुष्कळ गोष्टी सागितल्या –

मोरगाव हे पुरातन क्षेत्र आहे याला ‘ भूस्वानद ’ असे दुसरे नाव आहे. इथला गणराज हा स्वानदेश आहे पाच देवांना वर देणारा म्हणून तो ‘ पचदेववरद ’ झाला आहे त्रेतायुगात मिथिला प्रदेशात सिधुदैत्य माजला. त्याने सर्व देवांना ‘ त्राहि भगवन् ’ केले. त्याच्या बदीतून मुक्त होण्यासाठी देवानी स्वानदेश गणरायाची आराधना केली गणरायाने सिधूला देवाचे संकट निवारले गणराज या क्षेत्री परत येण्यासाठी निघाला असता सिधुदैत्याचा सेनापती कमलासूर याने त्याला गाठले दोघांचे तुबळ युद्ध झाले. गणपतीने त्रिशूळ फेकून त्याचे मस्तक उडवले, ते इथे येऊन पडले गणराज इथे आला आणि त्याच मस्तकाचे आसन करून त्यावर अधिष्ठित झाला. .

बोलता बोलता गृत्समद ऋषीचा उल्लेख निघाला हा वैदिक ऋषी पहिला गाणपत्य समजला जातो ‘ गणाना त्वा गणपतिम् – ’ हा गणपतिपूजनातला सर्वप्रसिद्ध मत्र या गृत्समदालाच स्फुरला पण गृत्समदाने प्रार्थिलेला हा गणपती त्या काळी गजवदन नव्हता, तर ब्रह्मणस्पती होता. तो विघ्नेश नव्हता, तर विघ्नेश होता अजून त्याला हत्तीची सोंड लागायची होती. ती पुढे सूत्र-कालात लागली. तो प्रसग असा घडला –

एके दिवशी पार्वतीने आपल्या अगीच्या उटण्याचा एक द्वाररक्षक बनवून त्याला दाराबाहेर उभे केले आणि ती आत स्नानाला गेली. थोड्या वेळाने शिव तिथे आला त्याला आत जायचे होते, पण या रक्षकाने त्याला अडवले धन्यावर चाकराची कुरघोडी म्हणजे काय गोष्ट आहे ! शिवाला क्रोध आला आणि त्याने झटक्यात त्या रक्षकाचे डोके उडवले पण शिव कठोर झाला तरी

पार्वतीचे मातृहृदय मृदू होते तिने त्याला जिवंत करण्याबद्दल शिवाजवळ आग्रह धरला. मग शंकराने गजासुराचे मस्तक तोडून आणले अन् त्याच्या धडावर बसवले पार्वतीचा तो मानसपुत्र अशा प्रकारे गजवदन झाला.

शैवांची शिवरात्र, वैष्णवाची एकादशी तशी गाणपत्याची चतुर्थी या चतुर्थीत एका रहस्याचे सूचन आहे. चतुर्थी म्हणजे जागृती, स्वप्न, सुषुप्तींच्या पलीकडची तुरीयावस्था, जीवाचे परम साध्य त्या दिवशी चंद्र पाहायचा नाही, म्हणजे चंद्राकडे पाठ करायची चंद्र ही मनाची संतती आहे. 'चंद्रमा मनसो जात !' ग्रहमालेत चंद्र सगळ्यात द्रुत गतीचा, तर शरीरात मनही तसेच चंचल हे मन जेव्हा उन्मन होईल, तेव्हाच तुरीयावस्था सिद्ध होते साधूने 'खळाची व्यकटी मोडावी' तसे गणेशोपासनेने मनाचे मनपण मोडून तत्त्वाशी गाठ घालायची गणेश हेच 'प्रत्यक्ष तत्त्व' आहे तो अथर्वोपनिषदाचा कर्ता सांगतो—'ऋतं वच्मि, सत्यं वच्मि !' गणेश संप्रदायातला हा गुरुगम्य ठाव आहे.

लिंगपूजेप्रमाणेच गणेशपूजाही एका काळी भूतलाच्या बऱ्याच मोठ्या भागावर रूढ होती जावा, बाली इत्यादी बेटांत, अमेरिकेतल्या मॅक्सिको प्रांतात, त्याचप्रमाणे आशिया खंडात इतरत्रही ज्या गणेशमूर्ती किंवा त्याची कोरीव चित्रे संशोधकांनी उजेडात आणली आहेत, त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. लॅटिन संस्कृतीतली 'जानुस' ही देवता आणि आपला गणेश, यांच्यातले वर्णसाम्य उपेक्षणीय नाही आपण जसा घराच्या किंवा मंदिराच्या मुख्य द्वारावर गणपती कोरतो, तसेच लॅटिन लोकही आपला जानुस कोरीत.

तिबेटात गणपतीला नारीरूपात भजतात तिबेट, चीन, जपान या देशांत गणेशोपासना पोचली, ती बौद्धांच्याद्वारे. तांत्रिक बौद्ध धर्मात तिला स्थान होतेच खुद्द तथागत बुद्धाने आपल्या शिष्यांना 'गणपतिहृदय' उपदेशिले होते अशी माहिती मिळते पण पुढच्या काळात मात्र हीनयानी बौद्धांनी गणपतीला बुद्धाचे वाहन बनवून त्याची मानखंडना केली आहे.

ब्रह्मा आणि शिव यांनी गणेश निर्माण केला आणि एका उपद्रवी गणाचे आधिपत्य देऊन त्याला जगात विघ्नाचे पीक पिकवायला सोडून दिले मानव गृह्यसूत्रात याचा दाखला मिळतो पहिल्या प्रथम देव-दैत्यांच्या समुद्रमंथन-प्रसंगी मंदराचलाची 'रवी' सागराच्या तळाशी दडपून त्याने आपले विघ्न-

कर्तृत्व जाहीर केले. स्कद, विशाख, मेष, शकुनी, पूतना इत्यादी विनायकगण मुलाना बालग्रह उत्पन्न करतो, असे स्कदपुराणात म्हटले आहे

पण पुढे मानवी मन जसजसे उन्नत होत गेले, देवता विज्ञानात जसजशी प्रगती झाली, तसतसे गणराजाचे विघ्नकर्तृत्व दृष्टीआड होऊन विघ्नविनाशक अन् सकल्पसाधक म्हणून तो भक्त जनांना प्रिय, पूज्य ठरला प्रत्येक कार्यारंभी त्याचे पूजन होऊ लागले. ग्रथकार आपला ग्रथ निर्विघ्न शेवटास जावा म्हणून त्याचेच मगल करू लागले दशावतारी नाटकात प्रथम त्याचेच सोंग येऊ लागले कवनात 'पहिले नमन' त्यालाच होऊ लागले लग्न-मुजीत, घाणा भरतेवेळी सुवासिनी त्यालाच प्रथम नमू लागल्या.

गणपतीला सकल विद्यांचा स्वामी समजतात 'ग म भ न' ची शिक्षण-पद्धती सुरू होण्यापूर्वी आपण विद्यारंभी धूळपाटीवर 'श्रीगणेशा' गिरवीत होतो, त्याचे कारण गणपतीचे विद्यादातृत्व हेच होते गणपती लेखणीच फर्डा हे आपल्याला महाभारतावरून कळते वेदव्यासांनी आपला 'जय' ग्रंथ लिहिण्यासाठी त्यालाच पाचारून आणले होते.

पण गणपतीने व्यासमहर्षींना एक अट घातली की 'मी लिहीन, पण माझी लेखणी थांबता कामा नये' त्यावर व्यास म्हणाले, 'ठीक आहे पण श्लोकाचा अर्थ समजल्यावाचून तू लेखणी ओढता कामा नये' आणि मग व्यास मधे मधे एखादा कूट श्लोक रचू लागले. गणपतीला त्याच्या अर्थाशी झगडत ठेवायचे आणि तेवढ्यात पुढचे बरेच श्लोक रचून टाकायचे, अशा क्रमाने त्यानी तो ग्रथ गणपतीकडून लिहवून घेतला या इतिहासावरून प्रज्ञावंत असा तर्क चालवतात, की त्रिविष्टपात म्हणजे तिबेटात लेख नावाचे गणेशोपासक-लोक लेखनकलेत प्रवीण असावे आणि आपली लेखनकला आपण त्याच्या कडून सपादली असावी

वेदात्यांनी तर गणपतीला वाङ्मयाच्या तळाशी आणि नादाच्या मुळाशी नेऊन बसवले आहे योगविद्येत तो जसा मूलाधार चक्रावर अधिष्ठित आहे, तसाच वाग्विद्येत तो ओंकाररूप आहे ओंकार हे सर्व शब्दजाताचे मूळ असून ते गणेशाचे एक विशेष नाम आहे ॐ आडवा असतो, तो जर उभा केला, तर तिथे गजवदनाची प्रतीती येते आणि म्हणूनच ज्ञानेश्वरआपल्या मगलाचरणात म्हणतात—

हे शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ती सुरेख ।
जेथे वर्णवपु निर्दोष । मिरवित असे ।।

तांडव नृत्य करीत असता डमरूतून जी चौदा प्रत्याहारसूत्रे उमटली, ते गण आणि त्यांचा स्वामी म्हणजे शिवपुत्र गणपती प्रणवोपासना आणि गणेशोपासना ही साक्षात् ब्रह्मविद्या आहे. गणपतिअथर्वशीर्ष वर वर ऐकले तरी या गोष्टीची कल्पना येऊ शकेल गणपतीच्या अनेक नावांचा अर्थ अध्यात्मपरच लावलेला आहे वक्रतुंड या नावातले वक्र ती माया आणि तुंड ते ब्रह्म लंबोदरा शब्दाची व्युत्पत्ती नाथमुखाने ऐकण्याजोगी आहे—

तुजमाजी वास चराचरा । म्हणोनि बोलिजे लंबोदरा ।
यालागी सकळाचा सोयरा । साचोकारा तू होसी ।।
सुखाचे पेलले दोंद । नाभीं आवर्तला आनंद ।
बोधाचा मिरवे नागबंद । दिसे सन्निध साजिरा ।।

गणपतीचा वर्ण तांबडा. त्याला रक्त वस्त्र, रक्त पुष्प, रक्तचंदन यांचीच आवड. ऐतिहासिकाचा तर्क असा, की गणपती आणि तत्सम वन्य देव हे बलिदान केलेल्या पशूच्या रक्ताने रंगलेले आहेत.

गणपती हा ग्रहमालेतल्या मंगळाचे प्रतीक असावे असा एक समज आहे अंगारकी संकष्टीला महत्त्व आले ते त्यामुळेच पण खगोलात जर गणपतीचे साधर्म्य शोधायचे, तर मंगळाला वगळून सूर्याकडेच जावे लागेल. अथर्वशीर्षात हे नाते स्पष्ट दाखवलेले आहे. 'त्वं विष्णुस्त्वं सूर्यः' हे ते वचन पूर्व क्षितिजावरचे आरक्त सूर्यमंडळ हे गजमुख आणि मोतिया रंगाचे प्रभामंडळ हा त्याचा झळाळता किरीट (Corona) समजावा या प्रभावलयाचा काही भाग उंच असतो आणि काही आखूड असतो या आखूड भागाला 'कानी कुंडले' समजावी सूर्याच्या खग्रास ग्रहणाच्या वेळी हा देखावा सामान्य दृष्टीलाही दिसू शकतो सूर्याभोवती कंकच नावाचे एक आवरण वेढून आहे त्यातून लक्षावधी मैल लांबीचे एक तेजःशृंग उपटते, तीच गणपतीची सोंड 'सर्वं जगदिदं त्वत्तो जायते' हे गणपतीचे वर्णन एकट्या सूर्यालाच लागू पडते सूर्य हाच विश्वाचा जनक आहे.

हे झाले गणपतीच्या विभूतिमत्त्वाचे दिव्य अंग ते जितके प्रतिभाशाली तितकेच त्याचे लौकिक अंगही मनोज्ञ आहे. संस्कृत कवींनी त्यातले माधुर्य

चाखून आमच्यासाठीही ठेवून दिले आहे कैलास शिखरावर शिव-पार्वतीच्या संसारात तो अबोध बालरूपाने लुडबुडतो. शिव हा कर्पूरगौर. पार्वती चाफेगोरटी दोघांच्यामध्ये उभा राहून हा त्या दोघांच्या वर्णावर आरक्त छटा चढवतो उरी प्रेम दाटून बाळाचा पापा घेण्यासाठी दोघांनी दोन बाजूनी मुखे जवळ आणली की या खट्याळाने आपले मुख एकदम मागे घेतलेच म्हणून समजावे

एके दिवशी याने आपल्या एकदंताने नागाचे वारूळ पाडले. त्यासरशी आतल्या नागोबाने फणा बाहेर काढली तिच्यावरील मण्याचे किरणजाल उंच उठावले. या अपक्व बुद्धीच्या बालकाला वाटले, की तो एक रत्नाचा खांबच आहे. तो त्या खांबावर आपले गंडस्थळ घासायला निघाला. आणि काय ! मयसभेतल्या दुर्योधनासारखी त्याची फजिती झाली. आईबापांना मग हसता पुरेवाट !

गणराजाला कमलनालाची आवडी विशेष. शिवाच्या मस्तकी रेखामात्र चंद्रकोर त्याने पाहिली. त्याला वाटले की ते कमलनालच आहे स्वारी गेली की त्याला झोंबायला. पण चंद्रकोर तर त्याच्या हाताला आली नाहीच; उलट शिवाच्या तिसऱ्या भालनेत्राचे चटके मात्र बसले तशात जटाबंधनातला नागही फुस्कारून उठला. मग काय, एकदम किंकाळीच ! पार्वतीने धावत येऊन हृदयाशी घट्ट धरले, तेव्हा कुठे बाळाने डोळे उघडले. मोदक खायचा तरी त्याला एक पुरत नाही, एकवीस लागतात

मात्र आपल्या मातेच्या अनेक संकटांत तिच्या उपयोगी पडून तो पुत्र-धर्माला जागला आहे. गंगेच्या सवतीमत्सराने आईचा जीव पोळतो आहे हे कळून आल्यावर त्याने गंगेला कैलासावरून काढून ब्रह्मगिरीवर पाठवून दिले. त्यामुळेच पार्वतीला त्याचा विलक्षण लळा आहे. गणेशचतुर्थीला तो मनुष्य-लोकी आला, की पाठोपाठ चार दिवसांनी गौरी भूतलावर उतरते. आपल्या लेकाला घेऊनच ती परत निजलोकी जाते.

भारतीय मूर्तिकलेत अन् चित्रकलेतही गणपतीला दोन, तीन, चार क्वचित पाचही तोंडे दाखवली गेली आहेत त्रिमुख मूर्ती जपानमध्ये अन् चतुर्मुख मूर्ती कंबोडियात आढळतात. पुण्याच्या मंगळवार पेठेत त्रिमुख गणपतीचे मंदिर

आहे पचमुखी गणपतीच्या मूर्ती अन् चित्रेही भारतात काही ठिकाणी दिसतात असे एक चित्र श्रीनगरच्या वस्तु-संग्रहालयात आहे

गणपतीला एक ते तीन दात असतात त्याचे डोळे दोन खरे, पण तंत्र-मार्गात त्याला तिसरा भालनेत्र लाभला आहे त्याच्या माडीवर शक्ती असते. तिचा उजवा हात त्याच्या गळ्याभोवती लपेटलेला असतो डाव्या हातात बत्ताशांचे भांडे असते.

प्रारभी गणपती हा द्विभुज होता त्याच्या एका हाती परशू अन् दुसऱ्या हाती मुळा असे पुढे मूर्तिविज्ञानाच्या विस्तारात त्याला चार, आठ, दहा अन् क्वचित सोळाही हात लागले कित्येकदा गणपतीच्या हाती डाळिंब असते ते प्रजनन आणि समृद्धी याचे प्रतीक समजावे मूर्तिकलेच्या संभारात गणपती कधी समभग अवस्थेत, कधी पद्मासनावर अधिष्ठित तर कधी नृत्यमुद्रेतही आढळतो डाव्या सोंडेचा अन् उजव्या सोंडेचा असे गणपतीचे दोन प्रकार आहेत तुम्ही आम्ही सगळे डाव्या सोंडेचा गणपतीच पुजतो उजव्या सोंडेच्या गणपतीची उपासना कडक असते म्हणतात काही विशिष्ट घराण्यानाच तो लाभला आहे मोरगावचा गणपती उजव्या सोंडेचाच आहे.

मला थोड्या वेळाने परत निघायचे होते माझी अथर्वशीर्षाची 'एक-विशी' ही सपत आली होती. गुरवाने प्रक्षाळपूजा केलेली ती दोंदिल गणेशमूर्ती माझ्या हृदयसिंहासनावर आरूढ होऊ लागली होती या मूर्तीवरचा थरायरानी चढलेला सिंदूरलेप सुमारे शभर वर्षांनी निखळून पडतो, असे गुरवाने मला सांगितले शके १७१० मध्ये हे लुकण झडल्याबद्दल तिथे एक श्लोक प्रसिद्ध आहे त्यानतर शके १८०४ मध्ये पुनश्च ते लुकण झडले. या लुकणाच्या आतली मूर्ती कशी दिसत असेल, याबद्दल मनाचे उगीच चाळे सुरू झाले त्याच बरोबर आणखी एक जिज्ञासा. पाडवानी लपवलेली ती मूळ मूर्ती कशी दिसत असेल ? या मदिराच्या खाली असलेल्या भुयारात एका काळी या प्रदेशावर राज्य करणारा सुगीत राजा समाधी लावून बसला आहे कृतयुग लागल्यानतर तो समाधीतून उठून पुनश्च वर येणार आहे अन् राज्य करणार आहे. या दंत-कथेतले रहस्य काय ? मरू नावाचा एक राजा योगारूढ स्थितीत कलापग्रामा-मध्ये बसला असून कलियुगाच्या अखेरीस तो पुनश्च सूर्यवंश चालू करणार

आहे, असा भागवतातही एक उल्लेख आहे. वरील दोन्ही आख्यायिका एकाच जातीच्या आहेत.

भारतीय युद्धानंतर भारत देशात जवळ जवळ ' निर्वीर मुर्वीतलम् ' अशी अवस्था आली होती. सर्व जनता आपल्या भवितव्याबद्दल साशंक झाली होती तिच्या मुखावर एकच प्रश्नचिन्ह उमटून राहिले होते – आता आमचा त्राता कोण ? .. मला वाटते, अशा वेळी खचलेल्या समाजमनाला त्या काळच्या भविष्यवेत्त्यांनी वरीलसारख्या आख्यायिका रचून धीर दिला असेल माणूस आशेवर दिवस काढतो हे काय सांगायला हवे !

# १. मल्लारी मार्तंड

'दुजा, बिजा, तिजा' अशी म्हण आहे. एखाद्या कार्याला दोनदा मुहूर्त लागला नाही, तर तिसऱ्या खेपेसही काही आडमेळे येते, अशी भाविक समजूत आहे आमचे जेजुरीला जाण्याचे दोन बेत फसले. पण तिसरा मात्र सिद्धीस गेला कोजागरी पौर्णिमेनंतर एके दिवशी सकाळी आम्ही जेजूरीच्या स्टेशनवर उतरलो लगेच एक छकडेवाला चाबूक नाचवीत पुढ आला त्याला वाटले असेल की आमचे पाय शाबूत नसतील म्हणून त्याने फक्त एका मैलासाठी तोडभर भाडे सांगितले. भंडाराचा आडवा नाम लावून पुढे आलेल्या एका क्षेत्रस्थ भटजीबुवांनी फक्त खालच्या देवाची भेट करून आणण्यासाठी अडीच रुपये मागितले

पण आम्हाला तेवढ्यावरच थांबायचे नव्हते. तिथून वरच्या कडेपठारावर चढून वरच्या देवालाही भेटायचे होते त्यासाठी कोण्यातरी मार्गदर्शकाची गरज होती. अखेर आम्हाला एक शाळकरी मुलगा भेटला. त्याचे नाव होते छबन शाळेतल्या विद्यार्जनापेक्षा आम्हाला हिंडवून आणण्याचा हा व्यवसाय त्याला 'तूर्तदान महापुण्य' ठरणार होता.

स्टेशनपासून एक मैल चालून आम्ही गावाच्या सीमेत पाय ठेवला. नगरपालिकेच्या दवाखान्यावरून उभ्या रस्त्याला लागलो एका घराच्या भिंतीला दोन नवी गाडीची चाके उभी करून ठेवलेली दिसली. तो बहुधा गाडीकारखाना असावा. पुढे एका घरावर वाचनालयाची पाटी दिसली, पण ते होते शिवणकामाचे दुकान भंडार विकत घेण्यासाठी आम्ही एका दुकानापुढे थांबलो. त्याच्या वरच्या बाजूला पंधरवड्याच्या रेशनसाठी तळपत्या उन्हात स्त्री-पुरुषांची रांग पाहिली

भंडार म्हणजे हळदीची पूड पंढरपुरी बुक्क्याचे, करवीरात कुंकवाचे, तसे जेजुरीत हळदीचे माहात्म्य. भंडार कागदातून मिळत नाही. तो खोबऱ्याच्या

वाटीतून घ्यावा लागतो. भंडाऱ्याबरोबरच खोबरेही खपावे म्हणून सर्व दुकानदारांनी संगनमताने अमलात आणलेली ही युक्तीही असू शकेल

चढत चढत गडाखालच्या महाद्वारापर्यंत आम्ही गेलो अन् पाषाणनदीच्या पाठीकडून उजव्या हाताला वळलो. छबन म्हणाला, 'रानच्या रस्त्याने आधी कडेपठारावर जाऊ अन् मग तिथून खालच्या गडावर येऊ' आम्ही म्हटले, 'तथास्तु !' मटकी, हुलगे यांच्या शेतातून आमची पायवाट जात होती मधूनच ती एखाद्या निर्जळ ओहळात शिरे, मधूनच वर येई, अन् पुन्हा खाली जाई.

डोंगराच्या पायथ्याशी काही पडके दगडी चौथरे दिसले. गतवैभवाची खंत करीत आयुष्य कंठणारी कोण्या देवाची एक पाषाणमूर्ती दिसली तिच्यावर मोजक्याच एक-दोन वृक्षानी भक्तिप्रेमाची सावली धरली होती जवळच एक 'बारव' होती. तिथेच ढोपरी कोपरी पुढे सरकायचा प्रयत्न करणारा एक कृश-दीन जलप्रवाह होता हे सगळे पाहिल्यावर वाटले, की प्राचीन काळची धर्मपुत्र लवादी सात ऋषींची तपोभूमी हीच तर नसेल !



होय. याच भागात त्या ऋषींचे आश्रम होते. इथेच त्यांनी जपतपसाधन मांडले होते. भिजवून वृक्षशाखांवर वाळत टाकलेल्या त्याच्या वल्कलातल्या जलधारा इथेच गळत होत्या याच डोंगरावर त्याचे शिष्यगण कंदमुळे खणायला जात होते. इथून उठलेले यज्ञधूमाचे लोट सरळ अंतराळ गाठीत होते इथेच मुनिकन्या वृक्षवल्लीचे शिंपणे करीत होत्या अश्वत्थ-औदुंबराना बांधलेल्या पारांवर वेदघोष आणि शास्त्रचर्चा गाजत होत्या.

पण अशा या शांत, निर्वैर आश्रमस्थानावर मणि-मल्ल या दोन दैत्यांची धाड पडली आणि एका घटकेत सगळे उद्ध्वस्त झाले !

हिरण्याक्ष-हिरण्यकश्यपू, रावण-कुंभकर्ण, सुंद-उपसुंद, या जशा प्रमत्त

असुराच्या जोडया, तशीच ही मणि-मल्लाची जोडी. त्या दोघाचे फक्त परस्परावर प्रेम होते आणि उभ्या जगाशी वैर होते स्वार्थासाठी किंबहुना आपला बलकंडू शमवण्यासाठी ते या प्रातातल्या निरागस जनतेचे काळ झाले होते ऋषि-मुनींवर तर त्याचा विशेष डोळा कारण ते पुण्यमार्ग वाढवीत होते. देवाचे सामर्थ्य वाढवीत होते. जेव्हा छळवाद असह्य झाला तेव्हा ते आपले गाऱ्हाणे घेऊन ब्रह्मदेवाकडे गेले तो म्हणाला, 'आपल्या हातून हे काम रेटायचे नाही. तुम्ही वैकुंठपतीला गळ घाला ' ते विष्णूकडे जाताच त्याने त्याना कैलासाची वाट दाखवली कैलासनाथाने मात्र त्याचे गाऱ्हाणे ऐकले आणि त्या ऋषिमुनींना अभयवचन दिले.

आणि मग दैत्यनिर्दालनासाठी मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी रविवार या दिवशी शिवशकर मार्तंड भैरवाच्या रूपाने इथे अवतरला तो येताच त्याला साह्य करण्यासाठी सगळा स्वर्गच खाली उतरला. गणपती मोरगावी करा नदीचा किनारा सभाळून बसला 'पुरदर' इद्राने सासवडच्या पर्वतश्रेणीवर मोर्चे लावले. आसमतातल्या शिवारातून देवसेनेचे तळ पडले. दैत्याची चहूबाजूनी कोंडी झाली आणि मग..

एवढ्यात माझी विचारमालिका एकदम तुटली. माझ्या पायाजवळच्या एका बसकर झुडपातून एक इवलेसे पाखरू फर्ररदिशी उडाले अन् जमिनीत तिरकस घुसणाऱ्या तीराप्रमाणे मागच्या एका दुसऱ्या झुडपात शिरले लावा पक्षी होता तो जाणाऱ्या माणसाचा पाय जवळ जवळ अगावर पडेपर्यंत जागचे हालायचे नाही, हा त्याचा जातिस्वभाव !

आता आम्ही कडा चढू लागलो होतो आमच्या डाव्या हाताच्या डोंगरावर ओहोळाच्या चऱ्या इकडून तिकडून निघाल्या होत्या. मधेच एकत्र येऊन एकमेकीत गुतल्या होत्या आणि पुन्हा विलग होऊन पायथ्याला उतरल्या होत्या चढताना लागलेला श्वास थाबवण्यासाठी मी एका ठिकाणी उभा राहिलो सौंदर्यदर्शनासाठी भुकेलेली माझी दृष्टी तेवढ्यात सर्वत्र भिरभिरून आली पण तिला काही गवसलेच नाही. चोहोकडचे डोंगरसुद्धा जणू मुडन केलेले सन्याशीच ! फक्त काषायवस्त्र तेवढे वजा करायचे आजूबाजूस त्रिधारी निवडुग 'मी' म्हणून वाढला होता जणू मणि-मल्लांचे मरून पडलेले दानव सैनिकच कोणत्या तरी सजीवनी मत्राने परत जिवत झाले होते

मात्र अशाही स्थितीत निसर्गाच्या योजकतेची करामत दिसली. काही निवडुगावर शतावरीच्या नाजूक हिरव्यागार वेली चढून विस्तारल्या होत्या एखाद्या कुलवधूने आपल्या पतीचे दुर्गुण झाकून टाकावे तसे त्यानी त्या निवडुगाचे काटे झाकून टाकले होते काहींच्या अगभर दुसऱ्या एका वेलीवर चार पाकळ्याची शुभ्र फुले बहरली होती ती नुसतीच सुदर नाहीत, तर सुगधीही आहेत, हे वारा आमच्या नाकाशी येऊन हळूच सागत होता. या लतावधूनी असले हे काटेरी वर कसे पसत केले हेच नवल होते पण त्या तरी करतील काय ? त्या मालिनीतीरावरच्या कण्वाश्रमापुढील भाग्यवत वेली थोड्याच होत्या ! सगळेच ' निर्वीरमुर्वीतलम् ' तिथे जो कोणी मिळाला, तो सही !

डोंगराच्या कटिप्रदेशापर्यंत चढल्यावर भडार उधळलेली एक खडकाळ जागा दिसली छबन म्हणाला ' घोडेउड्डाण ' म्हणतात, ते हे. या शब्दामागे इतिहासाची किनार असलेली एक दतकथा आहे—

सुपेमुक्कामी खैरे पाटील यांच्या वशात भाव्या नावाचा एक पुरुष निपजला तो खडोबाचा एकात भक्त होता दर रविवारी निघायचे, करा नदी पार करायची अन् जेजुरी गाठायची मग कडेपठार चढायचे अन् खडोबाची पूजा करून परत फिरायचे. सूर्य—चद्रांच्या विश्वभ्रमणाप्रमाणे त्याचा हा नेम कैक वर्षे अखडित चालला होता तारुण्य ओसरले, पोक्तपण सपले आणि शरीर जराजर्जर झाले, तरीही त्याने आपला नेम मोडला नव्हता. अखेर एका रविवारी मात्र त्याने कळवळून देवाला म्हटले,

' देवा, खडेराया ! किती उचावर राहिला आहेस रे ! थकलो मी आता, पुढच्या रविवारी नाही यायला जमणार ! आजच धाप लागली अन् पाय लटपटले ! "

एवढे बोलता बोलताच त्या वृद्ध भक्ताला मूर्च्छा आली आणि त्याच क्षणी खडोबा अश्वारूढ होऊन इथे आला आणि त्याने त्या म्हाताऱ्याची मूर्च्छा सावरली. वृद्ध डोळे उघडतो, तो साक्षात देव समोर उभा, पण त्याला दडवत घालण्याचीही वृद्धाला ताकद नव्हती ते पाहून देव त्याला आश्वासून म्हणाला,

' माझ्या प्रेमळ भक्ता ! यापुढे कडेपठार चढण्याचे कष्ट घेऊ नको. मी तुझ्यासाठी खाली येईन अन् गावाजवळच्या टेकडीवर राहीन '

एवढे बोलून देव घोड्यावर चढला आणि त्याच्या इशाऱ्यासरशी घोड्याने एकदम उड्डाण मारले. ती जागा ही

भाव्या गावाजवळच्या टेकडीवर जातो तो त्याला तिथे धनुष्याकृती एक लिंग दिसले देवाने आपले आश्वासन पुरे केले होते भाव्याचा हर्ष त्याच्या अस्थिपंजरात मावेना त्याने गावातल्या महाजनांना बोलावून आणून तो साक्षात्कार दाखवला लोक म्हणाले, ' बरे झाले तुझ्यामुळे आता आमचेही कडेपठार चढण्याचे श्रम वाचले ' आणि त्या दिवसापासून खालच्या टेकडीचे भाग्य उजळले

देव जरी खाली आला असला तरी तो वृद्धा – बाळासाठी, आमच्यासाठी नव्हे तेव्हा आम्हाला वर चढणेच भाग होते. आम्हाला वाटले होते, की गोल टेकडी गाठली की लगेच कडेपठार लागेल. पण कसचे काय ! तो केवळ ' शाखाचंद्र न्याय ' होता तिथून मधल्या एका डोंगराच्या माथ्यावरून बरेच पुढे गेल्यावर मग कडेपठार भेटणार होते.

' बारा कोसांवर भाषा बदलते ' म्हणतात पण निसर्गरचना बदलायला डोंगरमाथ्याची लहानशी रेषासुद्धा पुरेशी होते. एका बाजूला सगळा निवडुंग तर दुसऱ्या बाजूला सगळ्या पिवळ्या फुलवती कण्हेरी हा देखावा निश्चितच आश्चर्यजनक होता तो सगळा उतार जणू कुठल्यातरी परिसस्पर्शाने सोन्याचा झालेला मी पाहात होतो जशा काही त्या नववधू कण्हेरी पिवळी ' अष्टपुत्री ' पांघरून बोहल्यावर चढण्यासाठी सजून राहिल्या आहेत इतर सगळी झाडे-झुडपे खुरटी, मग यांच्याच मुळात एवढा जीवनरस कोणी आणून ओतला ? हीच तेवढी फुले धमक अन् रसरशीत का ? खंडोबाला पिवळा रंग प्रिय का असावा, हे खालपासून वर येईपर्यंत मी मनात विवचीत होतो. त्याचे उत्तर मला इथे मिळाले, पण लगेच दुसरा प्रश्न उभा राहिला. इथला आसमंत पिवळा म्हणून देवाने त्याच रंगाची आवडी धरली, का देवाच्या इच्छेनुसार निसर्गानेच आपला कायापालट केला ?

आम्ही त्यातली काही फुले देवाला वाहण्यासाठी तोडून घेतली आणि कडेपठारावर पाय ठेवला उजव्या हाताला छोटेसे देऊळ दिसले. ते रामाचे आहे हे पुढे उभ्या असलेल्या हनुमताने सांगितले तिथून मुख्य देवळाचा पार्श्वभाग दिसू लागला पांढऱ्या चाफ्याच्या झाडाखालून आम्ही प्रवेशद्वारात ठाकलो

आम्हाला पाहताच कळकट कपडयातला एक म्हातारा गुरव लगबगीने देवळात घुसून स्थानापन्न झाला मध्यान्हाच्या ऐन उन्हातून आम्ही बदिस्त जागेत, गेलो होतो त्यामुळे आसनमांडी घालून बसलेली, शिंदेशाही पगडी घातलेली खडेरायाची वस्त्रवेष्टित पाषाणमूर्ती दिसायला काही क्षण जावे लागले आम्ही भडार उधळला, फुले वाहिली, खोबऱ्याचा तुकडा दक्षिणेसह पुढे ठेवला आणि अजलिसपुट जोडून खाली बसलो आमच्या समोर दोन इवलाली स्वयभू शिवलिगे एकमेकाना चिकटून होती तिसरे एक हातभर अतरावर होते गुरव म्हणाला, 'शकर-पार्वती अन् तीं पलीकडची गगा ' मी म्हटले, 'शकराला गगा इतकी नावडती कधीपासून झाली ? मागच्या बाजूला सुदर सगमरवरी गणपती बसला आहे, त्याने तर हा 'बिगड' घातला नसेल ?'

बाहेर येऊन देवळाला प्रदक्षिणा घातली प्राकारात तीन-चार बिऱ्हाडे होती त्यातल्या एका घरातून गाईचे दही विकत घेतले आणि दुपारची वेळ साजरी करण्यासाठी जवळच्या तळयाकडे निघालो. 'एरडोऽपि द्रुमायते' अशा एका झाडाच्या नाममात्र सावलीला बसून आम्ही शिदोऱ्या सोडल्या सावली नसली, तर निदान मनासारखा वारा तरी असावा ! या कमीत कमी चारशे फूट उंचीच्या पठारावर वाऱ्याची 'हमामा हुबरी' चालू असायला हवी होती. पण तो कुठल्या वेलींना नाचवीत, कुठल्या कमलवनाना लुबाडीत, कुठल्या भातखाचरांना डोलवीत आणि कुठल्या जलप्रवाहावर तरगमाला उठवीत कोणत्या प्रदेशात हिंडत होता देव जाणे !

पण तापशामक जीवन मात्र त्या तळयात भरपूर होते आणि ते कमालीचे गार होते त्याच्यावर दाट थर साचला होता, पण ते शेवाळ नव्हते. शेवाळ जाळीदार असते, एकसध असते पण हे निव्वळ सुटे कण होते सारवलेल्या काळयाभोर अगणात जणू कोणीतरी वरीचे दाणेच वाळत घातले आहेत. तोच रग, तोच आकार ! हाताने ते द्रव्य दूर लोटून ताब्या भरून घेतला. तो त्याने लगेच सारवासारव केली बाजूला बसून घागर घासणाऱ्या बाईला मी म्हटले

"तुमची पाण्याची चगळ आहे."

"कसली चगळ बाबा ! उन्हाळयात पार आटून जातया तळं" ती बाई मुद्रेवर विषाद उमटवीत म्हणाली.

" अन् मग ? "

" मग काय ! खालून आणायच पानी ! "

खालून म्हणजे दोन मैलावरच्या जेजुरी गावातून, आणि जिथून मोकळ्या अंगाने चढताना आम्हाला धाप लागली, तो डोंगर उरापोटावर घेऊन मी मनात म्हटले, इतके जिवाचे हालताप करून ही माणसे इथे राहतात तरी कशाला ? काय याचे इथे गाठोडे पुरले आहे ! बोलून चालून तोंड वेगाडून जीव जगवायचा, मग तो इथेच का ? पण जन्मदात्या भूमीचे प्रेम मोठे जबरदस्त असते जिवावर किंवा अब्रूवर बेतली, तरच माणूस तिचा मोह सोडतो.

उदरस्थ वैश्वानराला हविर्भाग देऊन कडेपठार सोडले आता आम्हाला खालचे देवस्थान पाहायचे होते तसे पाहिले तर आधी कडेपठार चढणे हे यात्रा नियमाला धरून नव्हते. पण आम्ही तसे नेमाधर्माचे यात्रिक नव्हतोच मुळी, विधिपूर्वक यात्रा करायची तर जेजुरीत तीन दिवस क्षेत्रवास करावा लागतो कडेपठार हा त्यातला शेवटच्या दिवसाचा यात्राविधी होय

परत येताना दोन डोंगरांच्या मधल्या खोल चिंचोळ्या दरीकडे लक्ष जाणे अपरिहार्य होते तिथे वृक्षांच्या एका पुजक्यात जनाबाईचे देऊळ होते फाल्गुन अमावास्येला गावातली सगळी मंडळी इथे येतात आणि लहान लहान गल्या (वाफे) तयार करून त्यात वेगवेगळी धान्ये पेरतात ती सबंध रात्र त्या बीजाचा जलमातीशी संयोग होतो पाडव्याच्या दिवशी गावकऱ्यांसह गावचा पाटील तिथे येतो आणि वाफे उकरतो जे बीज फुगीर आणि अंकुर फोडायला उत्सुक दिसेल ते पीक त्या साली चांगले येईल, असे तो प्रसिद्ध करतो. या प्रकाराला ' गुढचा काढणे ' अशी संज्ञा आहे

गिरिशिखराच्या उतरणीवरून आम्ही खाली खाली येत होतो वाटेत डाव्या बाजूला एका दरडीच्या कडेवर दोन शिळा एकावर एक चढून बसल्या होत्या जरा तोल झुकला तरी खाली पडून दुभंग होतील छबन तिकडे बोट दाखवून म्हणाला, ' हे सासू-सुनेच भांडण खालची वाटोळी घरटाच्या तळीसारखी दिसते, ती सासू वरची गबदुल, ओबडधोबड अन् चौपटीच्या वजनाची दिसते, ती सून म्हणजे सून इथे सासूच्या उरावर बसली आहे. सासूची कणीक तिबायला तिला दुसरे कोणतेही साधन घ्यायला नको तिच्या वजनानेच ते

काम होऊ शकते 'काही दिवस सासूचे तर काही दिवस सुनेचे' अशी म्हण आहे पण या सासूचे 'दिवस' आता कधी येतील ही आशाच करायला नको

पण त्या शिलायुग्माकडे 'आश्चर्यवत्' पाहताना मला एक निराळीच कल्पना सुचली या सास्वा-सुना नव्हेतच मुळी. या दोघी खंडोबाच्या बायका म्हाळसा अन् बाणाई असल्या पाहिजेत देवाच्या अर्धांगी झाल्या म्हणून त्याच्यातला 'सवत इसाळा' काही गेला नव्हता दोघीही एकमेकींची वर्मे कर्मे काढीत आणि एकमेकीच्या काळचाला खिळत. त्यांच्या असंस्कृत ग्राम्य भांडणा-वरचे एक लोकगीत नुकतेच मला ऐकायला मिळाले होते.

म्हाळसा बाणाईला बजावीत होती,

आईक मी सांगते तुजला
चित्त दे माझ्या बोलाला
कां ग तू भुललिस देवाला?
जा तू आपल्या देशाला
झाकल्या पाठीनं जाई म्हणती घे तू ऐकून
एक्या घडीमधि तोंड बाणाई टाकिन उतरून

पण बाणाई म्हाळसेहून तिखट. जणू लवंगी मिरची. तिच्याही ओठावर लगेच लाही फुटली. तिने म्हाळसेचीच नव्हे, तर तिच्याबरोबर देवाचीही उद्धरगत केली—

इतकं ऐकुनश्यानी बाणाईला राग आला फार
रतिमातर तुमच्या घरी न्हाई इच्यार
तू वाण्याची हायेस म्हूण करशिल पडिभार
आम्ही धनगरणी जशा नागिणी मोठ्या शिरजोर
तुज्या देवानं आमच्या घरी वळिली खिल्लार
लेंड्या, लोकर, कन्या मिळाली तुझाच भर्तार

भोळ्या शंभूने नवा अवतार घेतला, कैलास सोडून जेजुरीचे पठार पत्करले तरीही दोन बायकांचा दादला होण्याचे भोग काही त्याच्या वाट्याचे टळले नाहीत. कैलासावर गंगा-गौरी भांडत होत्या, तर इथे म्हाळसा-बाणाई गंगा-गौरींच्या कलहात आर्यता होती, मर्यादशीलताही होती, पण इथले सगळे 'गावरान' काम गंगा-गौरी या एकाच कुळातल्या, एकाच बापाच्या लेकी,

तर या दोघी भिन्न कुळातल्या आणि भिन्न सस्कृतीतल्या ग्रामकन्या म्हाळसा वाण्याची कन्या तर बाणाई धनगराची पोर.

म्हाळसेने नेवाश्याला तीमशेट वाण्याच्या घरी जन्म घेतला होता त्याच्या घरी लक्ष्मी राबत होती या एकुलत्या मुलीला त्याने फुलात ठेऊन वाढवले होते तिची बाल्यदशा मावळून ती आता ' पणात ' आली होती. तिच्या गौर तनूवर गव्हाळी कांती खुलली होती अवयवाना गोलाई आली होती

तीमशेट तिच्या लग्नाची विवचना करू लागला होता लावण्यद्वीपातले हे माणिक कोणाच्या हाती निरवावे, असा त्याला प्रश्न पडला होता एवढ्यात मार्तंड भैरव म्हणजेच खडेराय तिच्या दृष्टीस पडला. त्याच्या दैवी तेजाने तिचे डोळे दिपले त्या पुरुषार्थी नवयुवकाचा तिला छदच लागला खडेरायाचीही तीच अवस्था होती ती सुदरतेची मूस आपल्या अर्धांगी विराजीत करण्यासाठी पडेल ते साहस करायला तो प्रवृत्त झाला होता.

पण सरळ मार्गानेच त्याचा कार्यभाग साधला त्याच्या मागणीला तीमशेटीने मस्तक नमवून रुकार दिला पाली मुक्कामी वैभवाच्या झगमगाटात त्या दोघांचे शभमगल झाले. खडेराय नीलकमलासारखा सावळा, तर म्हाळसा गोरोचनासारखी आरक्त गौर मेघ अन् वीज यांच्यासारखा तो वरवधूसमागम झाला. लोक खडोबाला ' म्हाळसाकांत ' म्हणून सबोधू लागले त्यालाही ती उपाधी भूषणास्पद वाटली.

पण त्यांचा संसार एकमार्गी व्हायचा असता, तर बाणाई कशाला त्याच्या मार्गात आली असती ! बोलून चालून धनगराची पोर काय पाहिले देवाने तिच्यात ? काय म्हणजे ? तिच्या अगातली तरारत्या कोंभाची लवलव. ती रगाने सावळ्या कन्हय्याची बहीण होती. काळ्या शिवारात नि काळ्या मेंढ्यात वाढली होती. जणू नाचती सरसरती कृष्णकमळीची वेल ! जशी चपळ तशीच अवखळ रानातले वारेपाणी पिऊन तिचे सगळे अवयव कसे सकस अन् घाटदार झालेले.

खडोबा तिच्यावर भाळला नसता, तरच नवल ! त्याला ती आपल्या इच्छाशक्तीची प्रतिमा वाटली तिला मिळवायचे, तर तिच्या घरी धनगर बनूनच जायला हवे, तो वेष, ती भाषा, ती वृत्ती त्याने ते परकरले. तिची मेंढरे वळली तिचे नेत्रकटाक्ष झेलले. तिचे रांगडे बोल फुलाचे झेले मानले. तिला रमवून,

हसवून खेळवून तो तिच्या अंतरात शिरला आणि मग एके दिवशी धनगराने बाणाईचा हात देवाच्या हाती दिला. बाणाईला घोड्यावर आपल्यापुढे बसवून तो घरभरणीसाठी निघाला

म्हाळसा अन् बाणाई ! एका म्यानात दोन तलवारी त्याचा खणखणाट कधीच थांबेना खंडोबाला ती कटकट सोसवेनाशी झाली त्या दोघींत स्नेह-भाव निर्माण होणे कालत्रयी अशक्य आहे, हे जेव्हा त्याला कळले, तेव्हा त्याने दोघींना अलग केले म्हाळसेला आपल्याजवळ ठेवले अन् बाणाईला गडाच्या पायथ्याशी नवे घर बांधून दिले बाणाईच्या भावाला त्याने हेगडी (प्रधान) नेमले आणि त्याच्यावरच बाणाईचे संरक्षणही सोपवले.

आता आम्ही उतरत उतरत गडाच्या पातळीवर आलो तिथून डाव्या उजव्या हाताला दोन तळी दिसली. डाव्या हाताचे तळे आपल्या पुऱ्या वैभवात लहरत होते तर उजव्या हाताचे 'ते हि नो दिवसा गता ' असा उदास, खिन्न भाव दाखवीत होते. हे उदास तळे पेशव्याच्या हातचे आहे. सदतीस एकर क्षेत्रफळात अष्टकोनी आकाराने त्याची बांधावळ झाली होती. आता त्यात डोंगरातून वाहून आलेले मातीचे थरच्या थर साचले होते. खालच्या भागाला मधल्याच तुकड्यात जे थोडेसे उथळ पाणी होते, त्यावर आकाशात मधेच उपटलेल्या एका भटक्या ढगाची सावली पडली होती. ते तळे जणू मला सांगत होते, 'माझ्या वाट्याला चक्रनेमिक्रम नाही. अशी डोंगरांची खर वाहून वाहून येईल थरांवर थर चढतील एक दिवस सगळे सपाट होईल. थोडा बहुत शिल्लक उरेल तो खालचा दगडी बांध आणि मग शतकानंतरचे इतिहास संशोधक म्हणतील, की कोण्या धनवंताच्या अष्टकोनी वाड्याचा हा चौथरा असावा.'

जुनी जेजुरी याच तलावाच्या परिसरात वसली होती. गडावरच्या देवळाचे मुख्य द्वारही याच बाजूने होते पण काय कारण घडले नकळे, तिकडची वस्ती उठून गडाच्या पश्चिम भागाला आली पण तिथे पाण्याची सोय नव्हती. लोकांची ही अडचण जाणून इंदूरचे अधिपती तुकोजीराव होळकर यांनी त्या बाजूला नवे तळे खोदले मग देवाचे पूर्वबाजूचे महाद्वार बुजवले गेले आणि उत्तरद्वार हेच महाद्वार ठरले

बुजवलेल्या द्वाराच्या बाजूने उत्तरेकडे जात असता तिथल्या भिंतीला दोन घसघशीत मधाची पोळी दिसली. त्यातून दोन दोन तांब्ये मध सहज निघाला

असता ते दोन्ही ओथबे नुसते रवरव हालत होते तिथे माश्यावर माश्या चढल्या होत्या नुसतीच भाऊगर्दी पण ना कलह ना ईर्ष्या! कोणी त्यांच्या सचित मधुकोशाला हात लावायला येऊ दे, की संघटित हल्ल्याला एका पायावर तयार! तीर्थयोनीला संघटनेचे महत्त्व प्रतिपादावे लागत नाही ते सगळे माणसासाठीच करावे लागते आणि तरीही माणूस म्हणतो, 'मी शहाणा!'

मधमाश्यावरून भुग्याची गोष्ट आठवली भुगे कोरडे काष्ठ फोडतात तुळया बहाले पोखरतात संस्कृत कवी त्याच्या मधुपानाचे अन् गुंजारवाचे कौतुक करू देत, पण महाविध्वंसक प्राणी आहे तो. मात्र जेजुरीचे देवस्थान यवनांच्या भंजक आक्रमणापासून वाचवून त्याने आजवरच्या सर्व विध्वंसक पापाचे क्षालन केले आहे

जेजुरीच्या उत्तरेस पधरा मैलावर भुलेश्वर नावाचे शिवस्थान आहे ते मोडून तोडून मुसलमानांचा बेहोष तांडा जेजुरीवर येऊन आदळला तटावर त्यांची पहिली पहार बसली मात्र, प्रवेशद्वाराजवळच्या एका छिद्रातून भुग्यांचे कारजे वर उसळले. प्रत्येक भुगा सूं सूं करीत धावत यायचा अन् विध्वंसकाच्या अंगावर कूस मारायचा. त्यांच्या तोंडावर, गळ्यावर, हातावर सगळीकडे टच्च् टेंगूळवजा गाठी उठल्या वारायला हात उगारावा, तर तो क्षणात करवदाच्या घडासारखा व्हावा बिलक्षण आग असह्य खाज त्या मदमत्ताची थोबाडे सुजून दुप्पट झाली ते परचक्र गडगडत गडाखाली आले त्या पंच-क्रोशीतून तोंड काळे करीपर्यंत त्या भुग्यानी त्यांचा पाठलाग सोडला नाही

हे वर्तमान ऐकून औरंगजेब चांगलाच चपापला त्याला कळले की, हिंदूंचे सगळेच देव काही 'सौम्य रूप' घेऊन बसलेले नाहीत काही देवामध्ये चांगलाच डख आहे तो मग खंडेरायाच्या दर्शनाला आला धूर्तपणे नव्हे, तर नम्रपणे. त्याने सव्वा लाखाचे एक अनर्घ्य रत्न देवाला अर्पण केले भुग्यांच्या प्रकरणातून ते पुढे आले होते अन् त्याचा आकारही तसाच होता म्हणून सुवर्णकोंदणात बसवलेल्या त्या रत्नाला लोकही भुगाच म्हणू लागले

आम्ही मंदिराच्या प्राकारात पाय ठेवला तेव्हा घड्याळाने नुकतेच दुपारचे दोन ठोके दिले होते काळ्या फरशीवर सर्वत्र ऊन टळटळत होते पितळी कासवावर देवासम्मुख उभे राहून आम्ही 'येळकोट मल्हार' गरजलो आणि आत शिरलो. पहिल्याच दालनात दोन बाजूंना दोन दगडी घोडे दिसले. लहानखुरे

नव्हेत; तर भलेभक्कम उजव्या हाताच्या घोड्यावर खंडेराय आरूढ झाला होता डाव्या हाताचा मात्र पाठीवर जीन गिरवीत मोकळाच आहे कोण बरे त्याच्यावर स्वार होईल? बहुधा हेगडी असेल पण छे! प्रधानाने तर देवाच्या आधी सज्ज असायला हवे. मग कोण म्हाळसा स्वार होईल? शक्य आहे तिची तयारी कुठली झटपट व्हायला! नायकाचा चेंगटपणा हा काही आजच्याच जमान्यातला नव्हे

गर्भागारात सगळी रचना वरच्याचसारखी दिसली. तशीच लिंगे, त्याच दोघी सवती तीच खंडेरायाची बैठी मूर्ती इथे आगळे वेगळे होते ते वैभव! विशेष होती ती सार्वत्रिक भव्यता. या श्रीमतीमुळेच देवाला स्वत भोवती कोट उभारून घ्यावा लागला होता. सपत्ताला कुपण अपरिहार्यच!

इथली ही बडेजावी पेशवे अन् इतर काही दौलतवाले भक्त यानी निर्माण केलेली आहे नारायणराव पेशव्यांचा खून झाल्यानतर त्यांच्या दुर्भागी पत्नीला बारभाईनी पुरदर गडावर नेऊन ठेवले होते तिच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली तेव्हा तिला दिवस गेलेले होते तिच्या उदरी पुत्र जन्मण्यावरच बारभाईच्या कारस्थानाचे यश अवलबून होते पण ती गोष्ट सर्वस्वी दैवाधीन होती अशा वेळीच माणसे देवाला साकडे घालतात नाना फडणिसांनी त्यावेळी खडोबाला एक भरभक्कम नवस केला. 'गगाबाईला मुलगा होऊ दे एक लक्ष रुपये देवा, मी तुझ्या कामी लावीन!' आणि खडेराय नवसाला पावला

गगाबाईचा पुत्र सवाई माधवराव जेव्हा गादीवर बसला, तेव्हा नानांनी तो नवस दिरगाई न करता फेडून टाकला पचवीस हजार रुपये खर्चून त्यांनी चांदीच्या देवमूर्ती बनवल्या दगडी मडपी चांदीने मढवली उरलेल्या रकमेत सोन्याचे मुखवटे, कवच, छत्री, कलगी-तुरा इत्यादी राजोपचाराची सामग्री केली

पण याच श्रीमंतीमुळे डाकू, दरोडेखोर यांना काळ्या रात्री भाले कुऱ्हाडी घेऊन देवाच्या भेटीस येण्याची वासना झाली कर आहे तिथे डर असायचीच सुमारे शभर वर्षांपूर्वी राघू भागऱ्या नावाच्या एका बलदड कोळ्याने इग्रजाविरुद्ध बड पुकारले अहमदनगरच्या एका जमादाराचा हा तरणाबांड पोरगा त्याने आपल्याभोवती निधड्या छातीचे बरेच लोक जमा केले आणि एक दिवशी त्याने इग्रजी सत्तेला आव्हान दिले. पुणे जिल्ह्याच्या वायव्येकडील पर्वतश्रेणीचा आश्रय घेऊन त्याने उपद्रव सुरू केला शक्य तो प्राणहानी न करता

लूटमार करायची असे त्याचे धोरण होते. तशी ' शास्त्रमर्यादा ' त्याने आपल्या टोळीला घालून दिली होती. त्याचा डावा डोळा श्रीमंतांकडे अन् उजवा गरिबांकडे असे तो जणू महाराष्ट्राचा रॉबिनहूड होता जणू जर्मनीतला गॉट्झ व्हॉन होता धनवंत त्याचे नाव ऐकताच थरथरू लागत दीनदुबळे त्याला दुवा देत कारण त्याचे हात गरिबाच्या पोटात जात असत ऋणको शेतकऱ्याचे घर खाऊन दार तोंडी लादणाऱ्या शॉयलाकी वृत्तीच्या सावकाराचे त्याने नाक कान कापले की गरिबाना सुखाच्या गुदगुल्या होत राघू भागऱ्याला खंडोबाचे वरदान आहे, अशी ग्रामजनाची समजूत होती त्याच्या पुडाईच्या रोमहर्षक कथा ते जिवाचे कान करून ऐकत

पण याच राघू भागऱ्याने एका रात्री जेजूरीच्या देवस्थानावर धाड घातली चौदा तोळे सोन्याचा खंडोबा नेहमी गळ्यात मिरवणारा हा 'देवाचा भक्त' देवावरच उलटला भोळ्या सांबाच्या जीवनातला हा दुसरा भस्मासूर होता. त्याने चांदीच्या मूर्ती उचलल्या. खंडोबाबरोबरच म्हाळसेलाही हालवले औरंगजेबाची देणगी तो ' भुगा ' ही त्याने घोंगडीच्या घडीत कोंबला बरीचशी इतर चीज वस्तूही हातासली. ना कोणाचा विरोध ना प्रतिकार ! अंधारातून तो काळपुरुष आला अन् पुनश्च अंधारातच गडप झाला सकाळी लोक दर्शनला येतात, तो देऊळ धुतलेले देव आपला पुनश्च ' उदास जोगी ! '

पण त्या लुटारूना ते जडजोखीम भारी झाले. त्यांनी ते सावकाशपणे नेण्यासाठी ठायी ठायी पुरून ठवले. देवमूर्तीनाही धारत्रीच्या पोटात ठाव घ्यावा लागला. म्हाळसेची श्रीमूर्त बेलसरच्या रानात पुरून ठेवलेली पुढे बारा वर्षांनी एका शेतकऱ्याला सापडली त्याने जेजुरीला खबर दिली आणि मग जेजुरी-करानी मिरवणुकीने ती मूर्ती जेजुरीत आणली आणि मूळच्या जागी स्थापली. ' भुगा ' मात्र उडाला तो उडालाच!

मंदिरातून बाहेर येताना उजव्या हाताच्या देवडीवर खंडोबाचा ' खंडा ' म्हणजे खड्ग भिंतीला टेकून ठेवलेले पाहिले ते चार फूट लांब आणि चार इंच रुंद आहे, पोशाखी माणूस त्याला हात लावण्याच्या फंदात पडला तर पुन्हा एकदा सीता स्वयंवर प्रसंगीचे रावणाख्यान लोकांना दिसण्याचा संभव

हेच खड्ग मल्ल दैत्याशी लढताना खंडोबाच्या हाती तळपले होते, असे सांगतात तो मल्ल दैत्य तरी सामान्य होता का? छे ! भूलोकीचा कृतांतच तो !

त्याचा दगडी पुतळा देवासमोर एका भिंतीला टेकवून ठेवला आहे तोच मुळी नऊ फूट उंच आहे त्याच्यावर तांबड्या रंगाचा हात फिरवलेला असल्यामुळे तो नुकताच कुठल्यातरी मरण–मारणाच्या झुंजावरून आल्यासारखा वाटतो खंडेरायाचे आणि त्याचे रण माजले. ते तरी किती रौद्र–भीषण ! प्रथम आपला आघाडीवरचा सेनासागर त्याने खंडोबावर लोटून दिला खंडोबाने ' अगस्ती ' होऊन त्या सेनासागराचे एकच ' आचमन ' केले. मग मणि-दैत्य पुढे आला त्याने असंख्य शस्त्रास्त्रे देवावर फेकली. शाबरी मायेचे प्रयोगही केले पण त्यालाही वीरशय्येवर अंग टाकणे भाग पडले



मणि-मल्ल हे दोघे बंधू म्हणजे ' दो देही एक प्राण. ' मणीच्या निधनाने मल्लाच्या काळजात क्रोधाचा वणवा पेटला त्याने उरलासुरला दळभार एकत्र करून खंडोबाच्या सैन्यावर धाड घातली हा निकराचा प्रसंग आहे असे जाणून खंडोबाने आपले सैन्य व्यूहबद्ध केले उभय दळात भेरी त्राहाटल्या शंख, कहाळा, मादळ नादावले वर्मे चर्मे चढवून राणे-राऊत घोड्यांवर वळघले वीरांच्या विकट हाका उठू लागल्या ' सकळांमुखी एक आरोळी ' की ' मारा झोडा ! ' शस्त्राला शस्त्राने, अस्त्राला प्रत्यास्त्राने उत्तर मिळू लागले मल्लाचे वीर धडाधड कोसळू लागले खंडोबाच्या सैन्यात रणोत्साहाचे वारे भरले मल्ल चिडला, क्षोभला जसा पर्वकाळचा महासागर !

त्याने जिवाची शर्थ केली सारे बळ अन् तेज पणाला लावले पण अखेर मल्लाच्या कळा हळू हळू क्षीण होऊ लागल्या. गिरिशिखरासारख्या त्याच्या

देहावर जागजागी घाव बसले होते. त्याने मल्लाच्या शरीरातले रक्त पार झिरपून गेले अखेर तो खंडोबाच्या पायाशी कोसळला

पण मरणकाळी त्याची बुद्धी पालटली. वैर सरले अन् भक्तीचा उदय झाला त्याचे जन्मांतरीचे सुकृत पुढे उभे झाले त्याने तशाही स्थितीत खंडोबाचे स्तोत्र केले अन् त्याच्याकडे वर मागितला. ' देवा, माझ्या माथी तुझा पाय कायमचा असू दे, तू ' मल्लारी ' म्हणून जगात मिरव तुझ्या नावाशी माझे नाव निगडित राहू दे. ' देवाने त्याला ' तस्थास्तु ! ' म्हटले. मग तो दैत्यपुंगव कायमचा शांत झाला

शके १३०३ मध्ये वीरपाळ वीरमल्ल याने या देवळाचा गाभारा बांधला खटाव येथील राघोबबाजीने शके १५५७ मध्ये पुढची सदर आणि सभोवतीचा कोट बांधला मुख्य मंदिरामागचे पंचलिंगाचे देऊळ विठ्ठल शिवदेव दाणी सासवडकर याने शके १६११ मध्ये उभारले त्याच्या नजीकचेच भंडारघर शके १६७८ मध्ये श्रीगोंदेकर यांनी निर्मिले नादुरुस्त झालेला कोट अहल्याबाईने पुनश्च बांधला ते काम शके १६६४ ते ९९ पर्यंत चालले होते

मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी हा खंडोबाच्या मोठ्या वार्षिक यात्रेचा दिवस. महाराष्ट्रातल्या सर्व भागातून विशेषत खानदेशातून फार मोठा मेळावा त्या दिवशी इथे जमतो आदल्या दिवशी म्हणजे पंचमीला तेलवणाचा हंडा गडावरून खाली चावडीत येतो भक्तगण यथाशक्ती त्यात तेल घालतात आणि मग हंडा समारंभाने वर चढतो

खंडोबाचे भक्त सगळ्या जातीत आहेत. रामोशी लोकांचे तर ते कुळदैवतच. रामोशाकडून वचनपालन हवे असेल तर त्याला खंडोबाचा भंडार उचलायला लावावा. रामोशी हे पूर्वीचे लिंगायत असे म्हणतात लिंगायत किंवा वीरशैव हे शिवोपासक. पण जेव्हा त्यांच्यात मांसमच्छर खाणे सुरू झाले तेव्हापासून त्यांनी शिवाचे हे दुसरे रूप उपास्य केले वीर जातीचे लोकही खंडोबालाच भजतात अंधळ्या अविवेकी भक्तीची अखेर देहदंडनेत आणि देहदंडनेचा शेवट अघोरीपणात झाला नाही, तरच नवल !

खंडोबाच्या उपासनेत असलेच काही प्रकार कित्येक वर्षे रूढ होते चंपाषष्ठीच्या दिवशी या वीर लोकांपैकी काही वीर आपल्या मांडीत स्वहस्ते सुरा खुपसून घेत आणि त्या ऊन ऊन रक्ताचा टिळा देवाच्या कपाळी लावीत मग

त्या रक्तरंजित वीराची तशा अवस्थेत मिरवणूक निघे. भाविक यात्रेकरूंना त्यांच्या या ' वीरते ' बद्दल आदर वाटे, का करुणा वाटे ते आज समजायला साधन नाही, पण ते वीर मात्र स्वतःला धन्य समजत.

असाच दुसरा अघोरीपणा ' बगाड ' घेण्याचा. काही संकट पडले, तर एखाद्या भक्ताने नवस बोलावा ' मल्लारी देवा, माझ्यावरचे अरिष्ट दूर होऊ दे. माझी मनकामना पुरी होऊ दे. मी चंपाषष्ठीला जेजुरीत बगाड घेईन ' हे बगाड घेणे म्हणजे काय ? एका खांबाला गळ बांधायचा आणि तो आपल्या पाठीत खोचून घेऊन लोंबकळायचे. रक्ताच्या धारा भळभळा वाहायच्या. आचरायला जिवावरचे आणि पाहायला भयासूर ! वर्षानुवर्षे खंडोबाचे देवद्वार असे रक्ताने लाल होत होते ' दगडाच्या देवा बगाड नवस ' म्हणून तुकोबानी त्या प्रकारावर उपहासाचे कोरडे ओढले; पण काही उपयोग झाला नाही. ते रुधिरार्पण बंद करण्यासाठी इंग्रज सरकारला कायद्याचा बडगाच उभारावा लागला

कायद्याने बंद झालेला असाच एक दुसरा प्रकार म्हणजे खंडोबाला मुरळ्या वाहणे माणसाची मती तरी किती विचित्र पाहा ! मूल व्हावे म्हणून देवाला नवस करायचा, की ' मुलगा झाला तर तुझा वाघ्या करीन अन् मुलगी झाली तर तुला मुरळी वाहीन ' यात स्वारस्य काय राहिले ? वांझपण फिटले, कूस उजवली एवढाच त्यात लाभ जे पोर जन्मेल, त्याच्या भवितव्याचा विचार कोणी करावा ! मुरळीने देवाशी लग्न लावायचे आणि जन्मभर निस्संग, निर्विकार राहून सेवाव्रत चालवायचे सोमवती, माघी अमावास्या किंवा चैत्री पुनव यापैकी एखाद्या तिथीला हा लग्नसोहळा व्हायचा मुलीला हळदीने माखायचे, पिवळे वस्त्र नेसवायचे, मुंडावळ्या बांधायच्या आणि देवापुढे उभे करायचे नऊ कवड्याची माळ तिच्या गळ्यात घालायची आणि भटजीने सव्वा रुपया दक्षिणा घेऊन विवाहविधी पुरा करायचा.

एकदा हे मुरळीपद प्राप्त झाले, की ती देवाच्या नावावर भिक्षांदेहीला मोकळी. वृषोत्सर्गाच्या वेळी सोडलेली पाडीच जणू ! सोबतीला वाघ्ये. त्यांचाही धंदा हाच भंडार भरून पोटावर लांब सोडलेली व्याघ्रचर्माची पिशवी, हे त्यांचे भिक्षेचे भांडवल आणि तेच बोधचिन्ह. वस्तुतः वाघ्याचा अन् व्याघ्राचा काहीही संबंध नाही वग्ग म्हणजे भक्त या कानडी शब्दाचा तो अपभ्रंश आहे.

शब्दाचा उगम ठाऊक नसला की मग वडाची साल पिंपळाला लावली जाते ती अशी !

अर्धा तास वर हिंडून आम्ही गड उतरू लागलो. सुबद्ध काळ्या सोपान मार्गावरून उतरताना आमच्या थकलेल्या पायांना सुख वाटत होते वृक्षांच्या शीतल सावलीने त्या सुखात आणखी भर टाकली होती खालपासून वरपर्यंत आमच्या दोन्ही अंगांना लहानमोठ्या दीपमाळांची फौज उभी होती इतक्या विपुल दीपमाळा ज्योतीबाच्या डोंगरानंतर मी इथेच पाहात होतो 'नवलाख पायरी, साडेतीनशे दीपमाळ, अठरा दरवाजे' असा इथला वाक्प्रचारच आहे. दक्षिणेची भव्योत्तुंग गोपुरे, तशाच या महाराष्ट्राच्या दीपमाळा डोंगरपठारावर तर त्या विशेषच प्रेक्षणीय वाटतात खालच्या जोड कमानीकडे आल्यावर डाव्या हाताला हेगडी प्रधानाची देवळी आणि तिच्यात दोन मुनिसदृश मूर्ती पाहिल्या

त्या पलीकडेच धनगरकन्या बाणाईचे मंदिर आहे. बाणाईला शेळ्या मेंढ्या आवडतात, हे सांगायलाच नको म्हणून खंडोबाचे भक्त तिला नवस बोलतात आणि ती नवसाला पावली, की शेळ्या मेंढ्यांच्या प्रतिमा करून तिला वाहतात त्या प्रतिमांना तिने खुशाल गोंजारीत बसावे तेवढाच तिचा विरंगुळा तेवढीच बाल्यदशेत भोगलेल्या सुखाची स्मृती

बाणाई ही मला करुण रसाची ओतीव मूर्ती वाटली तिला खंडोबाने हा सक्तीचा विजनवास दिला आहे वर एवढे वैभव आहे, एवढे सोहाळे आहेत, एवढे यात्रा-उत्सव आहेत, पण त्या भाग्याची धनीण एकटी म्हाळसा बाणाईच्या वाट्याला फक्त व्यथा आणि उसासे खंडोबा फक्त आठवड्यातून एकदा रविवारी तिच्या घरी पायधूळ झाडतो आणि पुढच्या सहा दिवसांचे विरहदुःख तिच्यापुढे उभे करून वर निघून जातो मानाला आचवलेली अन् प्रेमाला दुरावलेली ती खंडिता अबला बहुधा असेच म्हणत असेल – 'नकटे व्हावे; पण धाकटे होऊ नये !'

○ ○ ○

२०६९४
मू. ५९१७

REFBK-0020794